# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

वृत्तपत्रविद्या विषयात

पीएच्. डी. साठी सादर करावयाचा प्रबंध

**संशोधन विषय**

# आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांवर झालेला परिणाम

## (१९८५ ते २००५)

**विशेष अभ्यास**

**श्री. राजीव गांधी यांचा कालखंड**


संशोधक

**श्री. जगन्नाथ शामराव पाटील**

मार्गदर्शक

**डॉ. दीपक टिळक**

कुलगुरू

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


जानेवारी २०११

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
# पुणे

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **श्री. जगन्नाथ शामराव पाटील** यांनी **''आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांवर झालेला परिणाम (१९८५ ते २००५) विशेष अभ्यास : श्री. राजीव गांधी यांचा कालखंड''** हा प्रबंध वृत्तपत्रविद्या विषयातील पीएच्. डी. पदवीसाठी माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे.

प्रस्तुत प्रबंध मौलिक संशोधन करून स्वतंत्रपणे लिहिला आहे. तो या अगोदर कोणत्याही विद्यापीठाच्या कुठल्याही परीक्षेसाठी / पदवीसाठी सादर केलेला नाही.

**डॉ. दीपक टिळक**
कुलगुरू
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

दिनांक :-

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक असे नमूद करतो की, **''आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांवर झालेला परिणाम (१९८५ ते २००५) विशेष अभ्यास : श्री. राजीव गांधी यांचा कालखंड''** हा प्रबंध मी स्वतः माझे मार्गदर्शक डॉ. दीपक टिळक यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनपूर्वक लिहिलेला आहे. त्यातील सर्व मजकूर माझ्या अभ्यासावरच आधारलेला आहे.

हा प्रबंध या व्यतिरिक्त इतर कोणत्याही पदवी अथवा परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

*संशोधक*

**श्री. जगन्नाथ शामराव पाटील**

दिनांक : १६ जानेवारी २०११

# || मनोगत ||

वृत्तपत्रविद्या या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर संशोधन करावे असे मनापासून वाटत होते. त्याची दोन कारणे. एक म्हणजे 'आपलं मन' या नावाने लातूर येथून दैनिक प्रकाशित केले आहे. तसेच शामराव पाटील पत्रकारिता महाविद्यालयही चालवित अहे. या दोन्ही क्षेत्रात अव्वल दर्जाची कामगिरी करण्यासाठी संशोधन प्रकल्प मार्गदर्शक ठरावा असा विषय निवडण्यावर माझा भर होता. त्यासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे डॉ. दीपक टिळक यांच्याशी वारंवार चर्चा केल्यानंतर हा विषय निश्चित केला. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांवर झालेला परिणाम हा विषय त्यांनी मला सूचित केला व मलाही हा विषय योग्य वाटल्यामुळे या क्षेत्रात संशोधनला प्रारंभ केला.

संशोधन कार्यास प्रारंभ केल्यानंतर टिळक महाराष्ट्र विद्यापीठात डॉ. टिळक यांच्याशी वारंवार चर्चा करण्याचा योग आला. त्यांनी या संशोधनासाठी तयार केलेल्या प्रस्तावाप्रमाणे उपयुक्त सूचना केल्या. तसेच पुणे विद्यापीठाच्या रानडे इन्स्टिटयुटमध्ये व जयकर ग्रंथालयात जाऊन विविध विषयांवरील ग्रंथांचे वाचन केले. क्षेत्रीय पाहणीसाठी महाराष्ट्रातील ३०० पत्रकारांची निवड करून अभ्यास विषयाबाबत चाचणी घेण्यात आली व त्या आधारे संशोधन अहवालाचे लेखन केले. २००९ नंतर याबाबत अहवाल लेखनास प्रारंभ केला आणि टप्प्याटप्प्याने हे काम पूर्ण केले.

आज गणेश जयंतीच्या मुहूर्तावर हा प्रबंध सादर करताना मला आनंद होत आहे. या सर्व काळात माझी पत्नी सौ. कीर्ती हिने मला वारंवार प्रेरणा दिली. तसेच माझी मुलगी कु. वैष्णवी, चि. शामराव व चि. भैरवनाथ यांचाही निर्देश करणे अप्रस्तुत होणार नाही. कारण त्यांनी वेळ दिल्यामुळेच मला या कामी अधिक लक्ष घालता आले.

माझे मार्गदर्शक डॉ. दीपक टिळक यांचे पुनश्च आभार व्यक्त करून त्यांनी केलेल्या अमूल्य मार्गदर्शनाबद्दल मी त्यांच्या ऋणात राहू इच्छितो. तसेच या कामी ज्या ज्ञात व अज्ञात व्यक्तींचे मला सहकार्य लाभले त्या सर्वांची मी आभारी आहे. औरंगाबाद येथील श्वेता कम्युनिकेशन ॲण्ड मल्टि सर्व्हीसेसचे डॉ. डी. एम. भोसले व त्यांच्या सहकाऱ्यांनी अल्पावधित सुबक टंकलेखन करून दिल्यामुळे हे सहज शक्य झाले. म्हणून मी त्यांचाही आभारी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील ग्रंथपाल तसे प्रशासकीय अधिकारी यांचेही मी ऋण व्यक्त करतो आणि हे दोन शब्द संपवितो.

**जगन्नाथ शामराव पाटील**

दिनांक : १६ जानेवारी २०११

# अनुक्रमणिका


**प्रकरण १ ले : संकल्पना**

१.१ प्रस्तावना

१.२ माहिती तंत्रज्ञानाचे प्रसारमाध्यमात उपयोजन

१.३ राजीव गांधी युगाचे महत्त्व

१.४ घरातील माध्यम दालन

१.५ बौद्धिक प्रतिभा माध्यमे आणि माहिती तंत्रज्ञान

१.६ माहिती तंत्रज्ञान उपयोजनापूर्वीची मराठी वृत्तपत्रे

१.७ अभ्यास विषयाचे स्वरूप

१.८ महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रांचे तत्कालीन स्वरूप

१.९ अभ्यासाचे महत्त्व

१.१० अभ्यासाची उद्दिष्टे

१.११ वृत्तपत्रसृष्टीतील नवे प्रवाह

१.१२ समारोप

संदर्भसूची

**प्रकरण २ रे : संशोधन पद्धती**

२.१ प्रस्तावना

२.२ वृत्तपत्रविद्या संशोधन

२.२अ गृहितकृत्ये

२.३ अन्वेषणात्मक संशोधन आराखडा

२.४ साहित्य समलोचन
२.५ सामाजिक अनुभव सर्वेक्षण
२.६ अंतर्दृष्टीस चालना देणारे घटक
२.७ प्रश्नावली
२.८ मूल्यमापनतंत्र
२.९ आशय विश्लेषण
२.१० अहवाल लेखन व विश्लेषण
२.११ अभ्यासाचा दृष्टिकोन
२.१२ माहिती संस्कृती आणि वृत्तपत्रे
२.१३ अभ्यासाच्या मर्यादा
२.१४ समारोप
संदर्भसूची

**प्रकरण ३ रे : वृत्तपत्रे व माहिती तंत्रज्ञान : तात्विक विश्लेषण**

३.१ प्रस्तावना
३.२ माहिती तंत्रज्ञान आणि वृत्तपत्रे
३.३ माहिती तंत्रज्ञानाचे सामाजीकरण व वृत्तपत्रे
३.४ प्रसारमाध्यमात माहिती तंत्रज्ञान : नवी सूत्रे
३.५ समाजशास्त्रीय दृष्टिकोन
३.६ भारतीय माहिती तंत्रज्ञानाची प्रगती व वाटचाल
३.७ ग्रामीण संपर्कसेवा व वर्तमानपत्र
३.८ माहिती तंत्रज्ञानाचे लक्ष्य व कार्य

३.९ नवे प्राधान्यक्रम

३.१० इंटरनेट युगातील वृत्तपत्रे : नवे प्रवाह

३.११ रंगित दूरचित्रवाणीशी स्पर्धा

३.१२ मूलगामी सूत्रे

३.१३ नवे स्वागतार्ह प्रवाह

३.१४ इंटरनेटवरील वेब वृत्तपत्रांचे अदभूत विश्व

३.१५ बहुगुणी वेब आवृत्त्या

३.१६ वेब वृत्तपत्रातील जाहिराती

३.१७ समारोप

संदर्भसूची

**प्रकरण ४ थे : सामाजिक पाहणीचा अहवाल**

४.१ प्रस्तावना

४.२ पाहणीची उद्दिष्टे

४.३ समाजशास्त्रीय दृष्टिकोन

४.४ पाहणीचा अहवाल

अ) सर्वसाधारण माहिती

ब) माहिती तंत्रज्ञानाची ओळख

क) माहिती तंत्रज्ञान व वृत्तपत्रे

ड) इंटरनेटचा प्रभाव

४.५ माहिती तंत्रज्ञान अंमलबजावणीतील अडसर

४.६ उपाययोजना

४.७ पाहणीच्या आधारे अनुमान व विश्लेषण

४.८ समारोप

संदर्भसूची

**प्रकरण ५ वे : वृत्तपत्रांच्या मांडणी व सजावटीवर पडलेला प्रभाव**

५.१ प्रस्तावना

५.२ नवी माहिती संस्कृती व वृत्तपत्रे

५.३ नवीन परिपूर्ण वृत्तपत्रांची व्याख्या

५.४ आधुनिक सजावटीची तत्त्वे

५.५ समाजशास्त्रीय दृष्टिकोन

५.६ मराठी वृत्तपत्रातील नवे प्रयोग

५.७ मांडणीचे प्रमुख प्रकार

५.८ संगणकाधारित मांडणीचे फायदे

५.९ पहिल्या पानाची व आतील पानांची मांडणी

५.१० प्रशिक्षणाचे बदलते स्वरूप

५.११ ऑनलाईन पत्रकारिता

५.१२ नवे स्वागताहार्थ प्रवाह

५.१३ समारोप

संदर्भसूची

**प्रकरण ६ वे : माहिती तंत्रज्ञानाचा व्यवस्थापनावरील प्रभाव**

६.१ प्रस्तावना

६.२ नवे व्यवस्थापन शास्त्र

६.३ व्यवस्थापनातील विविध विभाग
६.४ संशोधन व जनसंपर्क विभागाचे वाढते महत्त्व
६.५ मनुष्यबळ विकास प्रशिक्षण
६.६ नवी वितरण तंत्रे
६.७ माहिती तंत्रज्ञानामुळे झालेले लाभ
६.८ नव्या युगात परिपूर्ण वृत्तपत्राची जडणघडण
६.९ तंत्रज्ञान व तत्त्वज्ञान समन्वय
६.१० समारोप
संदर्भसूची

**प्रकरण ७ वे : निष्कर्ष व सूचना**

७.१ प्रस्तावना
७.२ प्रकरणनिहाय सारांश
७.३ ठळक निष्कर्ष
७.४ सूचना व शिफारशी
७.५ नवे प्रमेय
७.६ उपसंहार
७.७ समारोप

**परिशिष्ट**

संदर्भग्रंथूची
नमुना प्रश्नावली

प्रकरण १ ले

# संकल्पना


१.१ प्रस्तावना

१.२ माहिती तंत्रज्ञानाचे प्रसारमाध्यमात उपयोजन

१.३ राजीव गांधी युगाचे महत्त्व

१.४ घरातील माध्यम दालन

१.५ बौद्धिक प्रतिभा माध्यमे आणि माहिती तंत्रज्ञान

१.६ माहिती तंत्रज्ञान उपयोजनापूर्वीची मराठी वृत्तपत्रे

१.७ अभ्यास विषयाचे स्वरूप

१.८ महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रांचे तत्कालीन स्वरूप

१.९ अभ्यासाचे महत्त्व

१.१० अभ्यासाची उद्दिष्टे

१.११ वृत्तपत्रसृष्टीतील नवे प्रवाह

१.१२ समारोप

संदर्भसूची

# प्रकरण १ ले

# संकल्पना

## १.१ प्रस्तावना

वर्तमान युगाचे वर्णन ॲलविन टॉपलरने '' तिसरी लाट '' या शब्दात केले आहे. आधुनिक कालखडात माहिती क्रांतीने कृषी क्रांती  व औद्योगिक क्रांतीपेक्षाही मानवी जीवनाचा चेहरामोहरा संपूर्णपणे बदलून टाकला आहे या संदर्भात कोजस्की व ओर यांनी म्हटले आहे, गेल्या दशकात प्रगत माहिती तंत्रज्ञानाने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रभाव टाकला आहे. आपण संवाद कसा साधतो शिक्षण कसे घेतो वैद्यकीय अशा अनेक बाबतीत माहिती तंत्रज्ञान वरदान ठरत आहे.[१]

जीवनाच्या इतर क्षेत्राप्रमाणे वृत्तपत्रसृष्टीवरही माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव पडला आहे, वृत्तपत्रसृष्टीच्या विश्वातील काळ काम वेगाचे गणित झपाट्याने बदलत आहे. अशा परिस्थितीत आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रावर झालेला परिणाम या प्रबंधात अभ्यासला आहे. य. के. लेले या संदर्भात असे प्रतिपादन करतात की भारतीय वृत्तपत्रे आता खरीखुरी वृत्त देणारीपत्रे झाली असली तरी त्यांना बातम्यांचे महत्त्व पूर्वीही जाणवले होते पण बातम्या मिळविणारी साधने अपुरी होती.[२]

लेले यांनी केलेली ही मीमांसा अत्यंत अर्थपूर्ण आहे कारण त्यावरून आपणास महाराष्ट्र समाज व पाहणीचा बदल त्या काळी महत्त्वाची कल्पना येऊ शकते.

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रावर झालेला परिणाम हा विषय

संशोधनासाठी घेत असतांना येथे समाजशास्त्रीय दृष्टिने मीमांसा केली आहे. एखादा समाजप्रगत तंत्रज्ञान कशा प्रकारे स्वीकारतो व अनुभवतो त्यावर त्या समाजाच्या प्रगतीचे गतिशास्त्र अवलंबून असते. डॅनियल लर्नर यांनी पारंपरिक समाजाचे पतन होऊन नवा प्रगतीशील समाज कसा उदयास येतो ते समाजशास्त्रीय दृष्टिने स्पष्ट केले आहे.[३] भूत वर्तमान आणि भविष्यकाळ याचा विचार करत असतांना येथे आपणास प्रामुख्याने तीन महत्त्वाचे मुद्दे विचारात घ्यावे लागतात. त्रिमिती पातळीवर पहाता माहिती तंत्रज्ञानाच्या आगमनापूर्वीचा मराठी वृत्तपत्राचा चेहरा त्यामध्ये टप्प्या टप्प्याने झालेले बदल व वर्तमान बदल व वर्तमान प्रगत रूप अशा तीन अवस्थांचा वेध येथे घ्यावयाचा आहे.

पहिला टप्पा सध्याची मराठी वृत्तपत्रसृष्टी कशी आहे ते लक्षात आणून देणारा अमोल दुसरा टप्पा हा माहिती तंत्रज्ञानच्या आगमनापूर्वीची मराठी वृत्तपत्राची सृष्टी कशी होती व ती कशी बदलत गेली हे सांगणारा असेल. आशियाई वृत्तपत्रे ही अनिच्छेने बदलतात काय आता प्रश्न प्रा. जॉन ए. लिंट यांनी मांडला होता.[४] त्यांचे हे १९७० या दशकातील मत १९९० या दशकात खोटे ठरले.

भारतामध्ये भूतपूर्व पंतप्रधान कै. राजीव गांधी यांचा कालखंड हा आधुनिकीकरणाचा उषःकाल ठरला त्यांच्या दूरदृष्टीमुळे भारतामध्ये संगणकयुग अवतरले आणि वृत्तपत्रसृष्टीचा समग्र चेहरा मोहरा बदलत गेला वृत्तपत्र व्यवसायामध्ये संगणकयुगाचा प्रवेश झाला आणि डीटीपी त्यामुळे पानांची मांडणी आरेखत व सजावट तंत्र यामध्ये क्रांतिकारक बदल घडून आले. प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वृत्तपत्र व्यवसायातील प्रवेश आणि स्वीकारण्याचा विचार करता टाईम ऑफ इंडिया सारख्या भारतातील प्रभुत्वशाली प्रतिष्ठीत पत्रातही तेथील

कर्मचाऱ्यांनी प्रथम विरोध केला होता. परंतु या तंत्रज्ञानाचे बहुआयामी लाभ पहाता हळूहळू हे बदल अनेक पत्रांनी स्वीकारले पूर्वीची चित्रं आणि कालपरत्वे प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा झपाट्याने झालेला प्रसार आणि एकूणच आधुनिक माहिती तंत्रज्ञानाची गरूडझेप यामुळे टप्प्या टप्प्याने का होईना झालेला बदल या प्रामुख्याने तीन मुद्द्यांवर संशोधन व्हावे असाच येथे प्रयत्न राहणार आहे. या संदर्भात डॉ. वि. ल. धारूरकर यांनी अर्थपूर्ण मीमांसा केली आहे. त्यांच्या मते आधुनिक कालखंडामध्ये प्रत्येक महानगरात सहा गप्पा माजमाचे घर हे जणू माहिती करत बनले आहे.[५] संगणकाधारित इंटरनेट सेवेमुळे गृहीत व हक्कश्राव्य इलेक्ट्रॉनिक माध्यमातील अंतर पार पुसले जात आहे. वेब पत्रकारितेचे आधुनिक काळातील नवे रूप हे अधिक अद्भूत सेना चकणे बनले आहे.[६] तसेच प्रगत तंत्रज्ञानामुळे छोटी दैनिके ही सुद्धा माध्यम जगात स्वतंत्र स्थान निर्माण करीत आहे.[७] आधुनिक तंत्रज्ञानामध्ये संगणकापासून ते इंटरनेटपर्यंत फोन पासून एसटीडी पर्यंत आय. एस. डी. पासून ते मोबाईल, ई- मेल पर्यंत आणि छोट्या ऑफसेट मशीन पर्यंतची सर्व आधुनिक साधने, सामुग्री त्यात दळणवळण, संदेशवहन इ. बाबींचा समावेश आहे. ही सर्व साधने वृत्तपत्रांच्या सक्षमीकरणात प्रेषक ठरली आहे. प्रा. फेड्रिक विल्यम यांच्या मते ही सर्व स्वतंत्राची साधने आहेत त्यामुळे प्रगत युगात अभिव्यक्ती संवर्धनाचे काम स्थुलपणे घडत आहे.[८] प्रगत माहिती तंत्रज्ञानाचे मराठी वृत्तपत्राच्या रचना कर्म पद्धती व प्रकृतीवर झालेला परिणाम हा या अध्ययन व प्रगत संशोधनाचा केंद्रबिंदू होय. आधुनिक माहिती तंत्रज्ञानामुळे वृत्तपत्रसृष्टीत झालेल्या बदलामध्ये वृत्तपत्रातील उत्पादन, वितरण, वृत्त संकलन, मांडणी, जाहिराती, वाचकांच्या आवडी निवडी, पत्रकार, संपादक इ. कार्य

करण्याच्या विचारपद्धती इ. चा अंतर्भाव आहे,. या तर्क पैलूंचा साक्षेपी अभ्यास करून प्रस्तुत विषयांचा उलगडा या प्रबंधामध्ये केला आहे.

## १.२ माहिती तंत्रज्ञानाचे प्रसारमाध्यमात उपयोजन

संगणकाचा शोध व त्यानंतर माहिती तंत्रज्ञानाचा विकास हे दोन विसाव्या शतकातील फार महत्त्वाचे शोध. माहिती तंत्रज्ञान ज्याला आयटी असे संक्षिप्त नाव आहे त्याची मानवाच्या विकास व प्रगतीमध्ये फार मोठी भूमिका आहे. आयटीमुळे विकासाचा वेग एकदम वाढला आहे ही गोष्ट सर्वमान्य झाली आहे. तथापि आयटीचा सर्वाधिक प्रभाव कुठल्या क्षेत्रावर पडला असेल तर तो प्रसारमाध्यमे आणि मनोरंजन उद्योगावर पडला आहे. वृत्तपत्रे तसेच नभोवाणी, दूरचित्रवाणी आणि चित्रपट या माध्यमात माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे मानव समाजाची जीवनशैली झपाट्याने बदलत आहे. बिल गेट्स यांनी सारा विश्व समाज माहितीच्या महामार्गावर आणि चौरस्त्यावर उभा आहे असे म्हटले आहे. शेफाली दास यांनी माहिती तंत्रज्ञानाच्या सर्वांगिण प्रभावाची चर्चा करताना केलेले हे विवेचन अर्थपूर्ण आहे.

जागतिक बँकेच्या विकास अहवालात म्हटले आहे. Our democratic system is evolving a new global character and our media is also undergoing many changes as per global conditions.[9]

माहिती तंत्रज्ञान (Information Technology - IT)ही संज्ञा व्यवस्थापनाच्या व माहिती देण्याच्या प्रक्रियांच्या सर्व घटाकंसाठी वापरली जाते. या पद्धतीत संगणक, हार्डवेअर म्हणजे संगणकाचे भाग, त्याचे प्रोग्रॅम म्हणजे प्रणाली व इंटरनेट हे मुख्य घटक

असतात. यांचे परिचालन आय. टी. विशेषज्ञ करतात. संगणकाचा शोध व त्यानंतर आय. टी. मधील इतर विकास हे विसाव्या शतकातील मोठे यश आहे. प्रगती व विकास साधण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाची फार महत्त्वाची भूमिका आहे हे सर्वमान्य झाले आहे व त्यामुळे एकंदर मानवाला अनेक सामाजिक व आर्थिक लाभ मिळू शकतील. त्यामुळे एकंदर विकास फार जलद होईल असे म्हटले जात असे. त्याचा फायदा सर्वात जास्त प्रसारमाध्यमांना आणि विशेष करून वृत्तपत्रांना झाला आहे. त्यामुळे कमी मनुष्यबळात वृत्तपत्रे अधिक दर्जेदारपणे प्रकाशित होत आहेत. या प्रबंधात माहिती तंत्रज्ञानाचा मराठी वृत्तपत्रांवर झालेला परिणाम अभ्यासला आहे.

माहिती तंत्रज्ञानामुळे उत्पादकतेत वाढ होते. रेल्वेचे आरक्षण, नागरी वाहतूक आरक्षण, बँकिंग, इन्शुरन्स, टेलिफोन बिले बनवणे, विजेची बिले तयार करणे यासाठी आता संगणकाचा वापर होत आहे. त्यामुळे फार गुंतागुंतीची, किचकट कामे अगदी सरळ झाली आहेत. त्यामुळे उत्पादन वाढले व कार्यक्षमता वाढली. हवामानाचे अंदाज वर्तवणे, रेडिओ खगोलशास्त्र, मेलिक्यूलर बायोलॉजी, एरोडायनॅमिक्स वगैरे क्षेत्रात अचूक अंदाज अतिशय जलद वेळात वर्तविण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा खूप उपयोग होतो. इलेक्ट्रॉनिक गव्हर्नन्स, ऑफिसमधील वातावरणाचे आधुनिकीकरण, गुन्हे अन्वेषण व टेलिमेडीसिन (उपग्रहाद्वारे औषधोपचार) वगैरे क्षेत्रातही आता आयटीमुळे फायदा होतो आहे. समग्र मानवी जीवनावर माहिती तंत्रज्ञानामुळे दूरगामी परिणाम होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे नित्याच्या जीवनव्यवहारात सुद्धा फलदायी प्रयत्न होत आहेत.

संगणक आले तेव्हा ऑफिसमधील कर्मचारी कमी केले जातील अशी भीती होती, परंतु

आता इतका काळ गेल्यानंतर हे सिद्ध झाले आहे की, संगणकीकरणाने कामगार कपात होत नाही. उलट कामे अगदी अचूक होऊ लागली, जास्त कार्यक्षमतेने होऊ लागली. काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात संगणकीकरण केल्याने जास्त माणसांना कामे मिळाली. डेटा एंट्री ऑपरेटर ही नवी सेवासंधी फार मोठ्या संख्येने उपलब्ध झाली, पूर्वीचा गैरसमज दूर झाल्याने भारतात माहिती तंत्रज्ञानाचा विकास फार झपट्याने होऊ लागला.

असाही गैरसमज होता की, संगणक फक्त शहरी भागापुरतेच मर्यादित राहतील, परंतु विन्डो आधारित संगणकप्रणाली सुरू झाली. भारतीय भाषांतून सॉफ्टवेअर उपलब्ध झाले. त्यामुळे संगणक चालवण्यासाठी इंग्लिश हेच माध्यम राहिले नाही. टाइम्स ऑफ इंडियासारख्या वृत्तपत्रात सुद्धा कर्मचाऱ्यांचा आरंभी संगणकीकरणास विरोध होता, परंतु तो विरोध मावळला आणि हे तंत्रज्ञान मोठ्या वृत्तपत्रापासून छोट्या वृत्तपत्रांपर्यंत झपाट्याने पसरले.

माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षण क्षेत्राला चांगला होत आहे. स्वावलंबनाने शिक्षण घेण्यासाठी अनेक प्रकारचे सॉफ्टवेअर उपलब्ध आहेत. हेच तंत्रज्ञान दूर अंतरावरून शिक्षण देण्यासाठी वापरले जात आहे. संगणक संपर्क नेटवर्कद्वारा असे शिक्षण देऊन प्रौढ साक्षरतेसाठी याचा मोठा उपयोग केला जात आहे..

संगणकीकरणाला व माहिती तंत्रज्ञानाच्या वापराला भारतात थोडी उशीरा सुरुवात झाली. कारण कामगार संघटनांचा विरोध व एकूणच नवीन काही करण्याची उमेद नसणे हेही आहे. परंतु कॉम्प्युटर पॉलिसी १९८४, इलेक्ट्रॉनिक पॉलिसी १९८५ व सॉफ्टवेअर पॉलिसी १९८६ यामुळे या अडचणींवर मात करता आली. उद्योग व अर्थव्यवस्था यांचे जागतिकीकरण झाल्यानंतर भारत आयटी दृश्याच्या अगदी केंद्रस्थानी दिसत आहे.

...१७

आयटी टास्क फोर्स स्थापन झाल्यानंतर भारतात आयटी क्रांतीला मोठा वेग आला आहे. वृत्तपत्रासारख्या उद्योगाने या क्षेत्रात पुढाकार घेतल्यामुळे मुद्रित माध्यमांचे चित्र पालटले आहे.

सुरूवातील संगणकाचा उपयोग फक्त वैज्ञानिक माहितीसाठी केला जात होता. १९८० च्या दशकात पगारपत्रके वगैरे ठराविक कामाव्यतिरिक्त वस्तूंची मोजणी करण्यासाठी, सूची बनविण्यासाठी केला जाऊ लागला व परिचलनाची कार्यक्षमता वाढवण्यास संगणकाचा उपयोग होऊ लागला. १९९० च्या आसपास आयटी संस्कृती ग्रामीण भागातही जिल्हास्तरावर गेली. भारतीय हार्डवेअर उत्पादकांनी  हे आव्हान स्वीकारून आय. बी. एम. सारखे  व आय. बी. एम. प्रोग्रॅमप्रमाणे काम करणारे पर्सनल कॉम्प्युटर भारतात निर्माण केले गेले. त्यामुळे संगणकाच्या, पी. सी. च्या किंमती एकदम उतरायला लागल्या. त्यामुळे कार्यालयातच नाही तर घरामध्येसुद्धा सहज घ्यायला परवडेल इतकी त्याची किंमत कमी झाली व खऱ्या अर्थाने ते पर्सनल कॉम्प्युटर झाले. त्यामुळे छोट्या वृत्तपत्रांना सुद्धा संगणकाचा वापर फलदायी ठरू लागला.

हार्डवेअर, सॉफ्टवेअरव्यतिरिक्त आय. टी. हा आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे कॉम्प्युटर कम्युनिकेशन नेटवर्क. आय. टी. चे काम यशस्वीरित्या होण्यासाठी अगदी खात्रीलायक संपर्क नेटवर्क उपलब्ध असले पाहिजे. NICNET, INDONET, ERNET, I-NET आता वगैरे नेटवर्क  काम करीत असून, संपूर्ण देशभर नेटवर्कचे जाळे पसरले आहे. ही नेटवर्क मुख्यत: रेल्वे आरक्षण, नागरी हवाई वाहतूक आरक्षणासाठी वापरली जात आहेत. त्याप्रमाणे बँकिंग तसेच लोकसभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण, निवडणूक

काळात माहितीचे प्रसारण यासाठी वापरली जातात. नॅशनल इन्फर्मेटिक सेंटर (NIC) ही संस्था भारत सरकारने पहिली आयटी शिखरसंस्था स्थापन केली.[१०] माहिती संपर्काची जाणीव करून प्रसार वाढवण्यासाठी व कोणत्याही स्तरावर आयटीच्या काही अडचणी असतील तर त्यांना उपाययोजना सुचवून मदत करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे. जीवनाचा असा कुठलाही भाग नाही ज्याला माहिती तंत्रज्ञानाची जोड नाही. वर्तमानपत्रांनी त्यामुळे हे तंत्रज्ञान जाणिवपूर्वक स्वीकारले आणि १९८५ ते १९९५ या काळात जिल्हा वृत्तपत्रापर्यंत या तंत्रज्ञानाचा प्रसार झाला.

## १.३ राजीव गांधी युगाचे महत्त्व

नागरिकांना दर्जेदार सेवा मिळावी यासाठी इलेक्ट्रॉनिक गव्हर्नन्स (EG) चा फार मोठा उपयोग आहे. संगणक संपर्क नेटवर्कद्वारे इलेक्ट्रॉनिक गव्हर्नन्स सरकार व नागरिक यांच्यामध्ये चांगला संवाद घडवू शकते. फक्त नागरिकांची सेवा म्हणजे इ. जी. नाही तर तंत्रज्ञान, प्रक्रियेचे नवे माध्यम आहे, नेतृत्वाची ही नवी पद्धती आहे. नागरिकांना माहिती त्वरित मिळणे शक्य झाले असल्याने नागरिकांना त्यांच्या हक्कांची चांगली जाणीव झाली आहे. हे तंत्रज्ञान प्रामुख्याने राजीव गांधी युगात कृतीत आले. त्याचा प्रसार केंद्रापासून जिल्हा स्तरापर्यंत झाला. माहिती त्वरित मिळावी व सर्व व्यवहार पारदर्शक असावे असा आग्रह आता नागरिक करू लागले आहेत.

जी माहिती अनेकांना पाहिजे असेल ती पुन:पुन्हा गोळा करावी लागणार नाही. एकाच वेळी ही माहिती अनेकांना मिळवता येईल. ही माहिती अद्ययावत ठेवलेली असेल. कुठलीही माहिती जास्तीतजास्त लोकांना कशी मिळेल, त्यात सुरक्षितता व विश्वास दोन्ही

कसे राखता येतील.  यात नवी माहिती कशी घालता येईल याचा विचार केला पाहिजे. माहिती तंत्रज्ञानाचा शिघ्र विकास होण्यास इंटरनेटचा वापर जास्तीतजास्त फायद्यासाठी करण्यामुळे अनेक प्रश्न एकदम सुकर झाले. देशाच्या किंवा इतरही विविध भौगोलिक ठिकाणी असलेल्या ग्राहकांना एकाच वेळी एकाच डेटाबेसमधून माहिती मिळू लागली आहे. द हिंदू, टाइम्स ऑफ इंडिया, केसरी, यासारख्या पत्रांनी पुढाकार घेऊन हे तंत्रज्ञान वर्तमानपत्र क्षेत्रात आणले व रुजविले. ग्राहकांच्या शंका, अडचणी समजावून घेऊन मागल्या बाजूने सामायिक डेटाबेसमधून उत्तरे मिळविता येतात. सुरक्षितता व विश्वास निर्माण होण्यासाठी अनेक तऱ्हेचे सुरक्षिततेचे घटक डेटाबेसमध्ये घेता येतात. मिळालेल्या माहितीचे पृथक्करण करून facilitation counter, Information Kiosks वगैरे अनेक मार्गांनी ही माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवता येते. केबल टीव्हीला इंटरनेट जोडून, टेलिफोन व रेडिओ लिंक जोडून अगदी वाजवी किंमतीत ही माहिती मिळवता येते. त्यामुळे लोकांना प्रशासनात सहभागी करून घेणे व कल्याणकारी योजनांची माहिती देणे शक्य झाले आहे. राजीव गांधी यांनी पंचायत राज कायद्यात केलेले बदल व माहितीच्या साधनांची उपलब्धता या दोन्ही बाबी परस्परांना पूरक ठरल्या आहेत.

अनेक स्त्रोतांतून मिळालेली माहिती एकत्र करून संगणकाच्या साह्याने पृथक्करण करून ही माहिती दाखवणे. आकडे व अक्षरे असा मिश्र डेटा उपलब्ध झाला आहे.  किंवा पेपरवरील नकाशे किंवा उपग्रहाद्वारे दुरून आरेखन करणारी मशिनरी असेल तर GIS पद्धती फार सोयीची असते. ज्या ठिकाणी डेटा फार मोठ्या प्रमाणात आहे. मोठ्या प्रमाणात त्यावर प्रक्रिया करायची आहे अशा ठिकाणी GIS पद्धतीने काम अतिशय

वेगाने, अचूकपणे होते. गणिताच्या चुका अजिबात होत नाहीत. जलस्त्रोत व्यवस्थापन, प्रादेशिक नियोजन, नैसर्गिक स्त्रोत व्यवस्थापन अशा कामांसाठी जीआयएस उपयुक्त असते. खूप मोठा डेटा सॉर्ट करून साध्या पद्धतीने दाखवायचा असेल तर जीआयएस जास्त अपयोगी असते. त्याचा उपयोग वर्तमानपत्रांना हवामानाचा अंदाज, भौगोलिक बदल तसेच नकाशे व चित्रे सादर करण्यासाठी झाला आहे.[११]

## १.४ घरातील माध्यम दालन

ब्ल्यूमेंथाल यांच्या मते नव्या सहस्त्रकातील प्रत्येक घर व त्यातील दिवानखाना हा माध्यम कक्ष बनत आहे.[१२] त्यामुळे आधुनिक घरातील प्रत्येक व्यक्ती मुद्रक, प्रकाशक व संपादक बनत आहे. ही भविष्यकाळातील घराची संकल्पना आहे. जिथे सर्व इलेक्ट्रॉनिक यंत्रणा नेटवर्कच्या साहाय्याने एकाच कनेक्शनद्वारा बाहेरच्या जगाशी संपर्क साधू शकतील. एकाच विंडोमधून अनेक प्रकारची कामे करून घेतली जात आहेत. स्क्रीनला हात लावताच संगणकातील बुकशेल्फमधील पाहिजे ते पुस्तक व त्यातील मजकूर तुम्हाला पाहता येईल. त्यामुळे प्रत्येक व्यक्ती आपल्या छोट्या स्क्रीनवर इंटरनेटद्वारे घरबसल्या देशातील, जगातील किंवा स्थानिक वेबवृत्तपत्र वाचू शकते आणि घडामोडींचा रोज ताजा अंदाज घेऊ शकते. या प्रक्रियेचा मराठी वृत्तपत्रांवर झालेला परिणाम या प्रबंधात अभ्यासला आहे.

पंतप्रधानांच्या कार्यालयातून स्थापन झालेल्या एका खास आय. टी. टास्क फोर्सने सहकारी चळवळ व माहिती तंत्रज्ञान यांची योग्य सांगड घालता येईल का याचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील वारणा खोऱ्यातील साधारण

सारख्या पातळीवर विकास असलेली ७० खेडेगावे निवडली.

सहकारी चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण विकास कसा साधता येतो. याचे वारणा सहकारी संकुल हे अत्यंत चांगले उदाहरण आहे. साखर, दूध, कुक्कुटपालन, घरबांधणी इत्यादी क्षेत्रांत लोकांच्या चांगल्या सहभागाने काम करणाऱ्या २५ सहकारी संस्था इथे आहेत, सर्व सोसायट्यांची वार्षिक उलाढाल ६०० कोटी रुपये आहे. म्हणून खेडेगाव वायरने जोडण्याची संकल्पना राबवण्यासाठी हा परिसर आदर्श असा होता.

NIC, महराष्ट्र सरकार व वारणा विभाग शिक्षण मंडळ यांच्या तिघांच्या सहकार्याने हा प्रकल्प चालू आहे. ५० : ४० : १० या प्रमाणात केंद्र सरकार, राज्य सरकार व वारणा विभाग शिक्षण मंडळ भागीदारी असलेला हा प्रकल्प अडीच कोटी रुपयांचा आहे.

१) सध्याच्या चालू असलेल्या सहकारी सोसायटींच्या उत्पादनातील कार्यक्षमता वाढवणे.

२) सहकारी सोसायट्यांच्या कामात आणखी पारदर्शकता आणणे.

३) या ७० खेडेगावांतून नेटवर्कद्वारे संपर्क असलेली सुविधा केंद्रे (facilitation booths) स्थापन करून त्या द्वारे कृषी, वैद्यकीय व शैक्षणिक माहिती थेट शेतकऱ्यांना द्यावी.

४) NICNET द्वारे इंटरनेटने वारणानगरच्या घराघरातून जगातील महत्त्वाची माहिती मिळावी.

५) प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संस्थांना टेलिएज्युकेश उपलब्ध करून द्यावे.

६) चांगल्या व्यवस्थापनासाठी ग्राहकांबरोबर सुसंवाद असलेल्या मॅपवर आधारित

...२२

माहिती पद्धतीचा विकास करून चांगले व्यवस्थापन करावे.

वारणा प्रकल्पाचे हे उदाहरण वाणगीदाखल दिले आहे. ग्रामीण भागातील सामाजिक व आर्थिक विकासाला छोटी वृत्तपत्रे कलाटणी देत आहेत. त्यांच्या कार्यातील वेग माहिती तंत्रज्ञानामुळे सुधारला आहे. माहिती तंत्रज्ञानाचे वर्तमानपत्रांना झालेले लाभ व त्याचा सर्वांगीण विकासावर पडलेला प्रभाव येथे अभ्यासावयाचा आहे.

ग्रामीण विकासात सुद्धा माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग योजकतेने केला जात आहे. महाराष्ट्रात वारणानगरला हायस्पीड VSAT देऊन शिक्षण केंद्र व व्यापारी केंद्रासाठी इंटरनेट सेवा द्यायची. त्यासाठी LAN द्वारे हायस्पीड वायरलेस नेटवर्कमधून डेटा पाठविण्याची सुविधा मिळेल. आय. टी. सेंटरला फक्त डेटा रिसिव्ह करणारा VSAT - Direct PC देणे. टेलिशिक्षणासाठी देण्यात येते तशी डेटा त्वरित पाठवण्यासाठी डायलिग सुविधा देणे. या डायलअप लाइनने सुविधा बूथना व्यापारी बूथशी थेट संपर्क साधणे शक्य झाले आहे.

संगणक केंद्र, व्यापारी केंद्र व सुविधा बूथ इथे स्थानिक पातळीवरील तरुणांना संगणकाचे प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून कामे केली जातील. त्यामुळे स्थानिक तरुणास रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहेत. वेब व इंटरनेट आधारित अनेक सॉफ्टवेअर विकसित केलेली आहेत. त्यामधून सध्याच्या काही चालू प्रक्रियांचे स्वयंचलन चालू झाले आहे. ऊस उत्पादनाचे वायर्ड मॅनेजमेंट, वारणा डेअरीमध्ये दूध गोळा करण्याचे काम, तक्रारीसाठी नोंदवही व तक्रार निवारणाच्या प्रक्रियांचे स्वयंचलन, वारणा बाजारातील मालाची सूची व विक्रीबद्दल आकडेवारी यांचे संगणकीकरण करून कृषी योजनांबद्दल

माहिती प्रसारित केली जात आहे. पिकांचे तंत्रज्ञान प्रसिद्ध करणे, खेडेगावातील इतर महत्त्वाची माहिती, इतर प्रक्रिया, पद्धतींबद्दल माहिती, मार्केटबद्दल माहिती, शैक्षणिक माहिती व व्यवसाय सल्ला वगैरे माहितींचे संगणकीकरण करणे. या सर्व गोष्टीची माहिती खेडेगावातील कुठलाही मनुष्य सुविधा बूथमध्ये येऊन घेऊ शकेल किंवा जगाच्या कोणत्याही कोपऱ्यातून इंटरनेटद्वारे घेऊ शकेल. या प्रोजेक्टमुळे ही गोष्ट सिद्ध झाली आहे की आय.टी.मुळे माणसाचे जीवनमान उंचावू शकते. त्यांना हवी ती माहिती मिळते. इतकेच नाही तर त्यामुळे रोजगारात वाढ होते.

## १.५ बौद्धिक प्रतिभा माध्यमे आणि माहिती तंत्रज्ञान

हे आता सर्वमान्य झाले आहे की माहिती म्हणजेच ताकद. आजच्या माहिती तंत्रज्ञान युगात तिचा प्रभाव कृषीपासून अंतराळ संशोधनापर्यंत सर्वत्र दिसून येतो. गुंतवणुकीचे इतर प्रकार भांडवलावर अवलंबून असतात पण बौद्धिक ताकद जीवनाच्या गुणवत्तेवर खूप चांगला प्रभाव टाकते. भारतात बुद्धिमत्तेला तोटा नाही आणि मनुष्यशक्ती अफाट आहे. म्हणून भारतात सामाजिक-आर्थिक विकास साधण्यासाठी माहितीची ताकद व माहिती तंत्रज्ञान दोन्ही साधनांची उपयोग करून घ्यायला पाहिजे व त्याद्वारे देशाचा विकास साधायला पाहिजे. यासाठी प्रसारमाध्यमाने प्रगत माहिती तंत्राचा वापर करून लोकांपर्यंत विकासाचे संदेश योजकतेने पाहोचविले जातात. ज्ञान, शहाणपण आणि कौशल्य यांचा परस्पर पूरक उपयोग माहिती तंत्रज्ञानाच्या समन्वित वापरातून होऊ शकतो. ग्रामीण व जिल्हा वृत्तपत्रे यादृष्टीने आपली भूमिका यशस्वीपणे पार पाडत आहेत.

उपरोक्त विविध संवाद कौशल्यांचा समाजाला समग्र जीवन परिवर्तनासाठी उपयोग

होईल ही बाब आता प्रगत तंत्रज्ञानामुळे सर्वांना झपाट्याने कळत आहे. त्यासाठी आपला वेळ, साधनसामुग्री व शक्तीस्त्रोतांचा समयोचित वापर केला असता प्रसारमाध्यमांचा पुढील तीन क्षेत्रात चांगला उपयोग होऊ शकतो.

१. विकासाच्या प्रक्रियेत अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेता येईल.

२. विकास कल्पनांचा सातत्याने पाठपुरावा करता येईल.

३. सामाजिक व आर्थिक विकासात परिवर्तनासाठी लोकांना सिद्ध करता येऊ शकते.

अशा प्रकारे नवे माहिती तंत्रज्ञान विकासाला वरदान ठरू शकते आणि भारतीय समाजाला स्वयंपूर्णता आणि स्वयंभूकडे घेऊन जाऊ शकते. प्रगत तंत्रज्ञानाच्या वापराने वर्तमानपत्रांचा चेहरा संपूर्णपणे बदलला आहे. परंतु तंत्रज्ञानाच्या वारापूर्वी त्यांचे स्वरूप कसे होते हे आता समजून घेतले पाहिजे.

## १.६ माहिती तंत्रज्ञान उपयोजनापूर्वीची मराठी वृत्तपत्रे

प्रगत तंत्रज्ञान हे एखाद्या समाजाचा जाता चेहरामोहरा बदलून टाकते तसे ते व्यवसायाचेही चित्र बदलवून टाकते. या अनुषंगाने येथे महाराष्ट्रातील माहिती तंत्रज्ञानाच्या आगमनापूर्वीची मराठी वृत्तपत्रे, आजची वृत्तपत्रे, झालेले बदल. या तीन मुद्द्यावर भर देऊन येथे मीमांसा करावयाची आहे. प्रास्ताविकात विषयाची माहिती व संशोधनाबाबतचे मुद्दे असावेत असे वाटल्यामुळे तीन मुद्द्यांचा खुलासा केला. आज आता भारत या विषयाची पार्श्वभूमी प्रामुख्याने मांडली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या आगमनापूर्वीचे मराठी वृत्तपत्रांचे स्वरूप पुढीलप्रमाणे मांडता येईल.

## अ) प्रारंभीची मराठी वृत्तपत्रे ( १८३२- १८८१)

पश्चिम भारतामध्ये सामाजिक व राजकीय जागृती बरोबर मराठी वृत्तपत्रांचाही विकास होत गेला ६ जानेवारी १८३२ रोजी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीची मुहूर्तमेढ रोवली त्या कालखंडात वर्तमानपत्रे शीळाप्रेमावर छापली जात असत.[१३] पुढे वृत्तपत्रांच्या आकार मांडणी व शैलीमध्ये काळानुरूप बदल होत गेले असल्याचे दिसून येते. वाचक संख्या मर्मादित होती लोकसंख्याही दाट नव्हती त्यामुळे वृत्तपत्रे पारंपरिक मुद्रण तंत्राच्या आधारे चालली तरी त्यामुळे फारसा फरक पडत नव्हता. जुजबी स्वरूपाचे काही तांत्रिक फेरफार केले जात असत.[१४] तथापि पहिले महायुद्ध सुरू होईपर्यंत एकच तंत्र प्रचलित होते,. वर्तमानपत्रांचा हेतू समाजसुधारणा हा होता व ही पत्रे रूढी परंपरा तसेच अंधश्रद्धावर टीका करून नवीन मूल्ये समाजामध्ये रूजविण्याचा प्रयत्न करत असत. '' दर्पण'' प्रभाकर'' तसेच ज्ञानोदय ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश या पत्रांचा हेतूही असाच होता निबंधमालाकार विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी ख्रिश्चन धर्मप्रसारक पत्रावर टीकेची झोड उठविली व त्यात स्थानिक पत्रे चोख उत्तर देऊ लागली. सूत्रवाद जोपासण्यास प्रारंभ झाला.

## ब) स्वातंत्र्य लढ्यातील वृत्तपत्रे ( १८८१- १९४७)

गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक आणि वामन शिवराम आपटे यांनी केसरी व मराठा ही पत्रे सुरू केली. प्रि. गो. ग. आगरकर हे प्रारंभी ७ वर्ष 'केसरी'चे संपादक होते. आधी राजकीय की सामाजिक असा वाद होऊन लो. टिळकांनी आक्रमक पवित्रा घेतला व आगरकरांनी केसरीचे संपादकत्व सोडले व त्यांनी स्वतंत्रपणे सुधारक पत्र

काढले. महाराष्ट्रातील जनतेच्या हिताहिताचा विचार करण्यावर 'केसरी' पत्राचा भर होता.[१५] 'केसरी' या पत्राने इंग्रज सरकारच्या विरोधात आक्रमक पवित्रा घेतला आणि देशभर राष्ट्रवादी विचारांची ललकारी दिली. १८५७ च्या उठावातील मराठी पत्रांची कामगिरी पहाता त्यापेक्षाही प्रभावी असे काम केसरी पत्राने केले. रा. के. लेले म्हणतात, ''केसरीला लोकप्रियता व प्रतिष्ठा झटपट लाभली पण आर्थिक परिस्थिती चांगली होण्यास मात्र बराच काळ जावा लागला.[१६] लोकमान्य टिळकांचे जहाल आणि आक्रमक अग्रलेख हे स्वातंत्र्यप्राप्ती प्रेरक होते, परंतु इंग्रजी सत्तेने त्यांच्या विरोधात राजद्रोहाचा खटला चालविला. स्वातंत्र्यासाठी त्यांनी आपल्या संपादकीय कारकिर्दीमध्ये तीन वेळा कारावास पत्करला.'' टिळकांच्या भूमिकेवर प्रकाश टाकतांना लेले यांनी म्हटले आहे, ''लोक जागृती कळकळ व संघशक्ती उत्पन्न करणे हेच वर्तमानपत्रकार या नात्याने आपले कर्तव्य समजतो. ही टिळकांची भूमिका होती.''[१७] सुरत अधिवेशनानंतर जहाल व नेमस्त पक्षातील वैचारिक लढाईत गती प्राप्त झाली होती.[१८] प्रखर अशा अंतर्गत व बाह्य विरोधाला न जुमानता टिळकांनी स्वातंत्र्याचा लढा चालविला होता त्याचा प्रभाव पंजाब व बंगाल प्रांतावरही पडला.

### क) आधुनिक महाराष्ट्रापूर्व वृत्तपत्र (१९४७-६०) :

ज्ञानप्रकाश पत्राचा अस्त होत असताना महाराष्ट्रात सकाळसारखे नवे पत्र डॉ. नानासाहेब परूळेकरांनी सुरु केले. डॉ. परूळेकर सकाळ पत्रामध्ये म्हणतात, ''परस्परामध्ये मतभेद असला तरी मतद्वेष नसावा सर्व विचारांचे ओघ अखेर नद्यांप्रमाणे समाजहिताच्या समूहात विलीन व्हावेत असा आमचा प्रयत्न राहील.''[१९]

बलिष्ट संघटित व कार्योन्मुख महाराष्ट्र हे या पत्राचे ध्येय असल्याचे अग्रलेखात नमूद

केले होते.[२०] एक तटस्थ मध्यस्थ या नात्याने सकाळ पत्राने मोलाची कामगिरी बजावली आहे. आचार्य अत्रे यांचे 'नवयुग',कृ. प्र. खाडीलकर यांचा 'नवाकाळ' ही पत्रे या काळात गाजली. मराठी वृत्तपत्रांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मोलाची कामगिरी बजावली आहे.[२१]

**ड) आधुनिक महाराष्ट्रात वृत्तपत्रांचे योगदान (१९६०-२०००) :**

आधुनिक महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर मराठी वृत्तपत्रांच्या विकासाला नवी संजीवनी लाभली. आचार्य अत्रे यांचे 'मराठा' हे पत्र संयुक्त महाराष्ट्र चळवळीत आघाडीवर होते. या पत्राने मराठी बाणा जोपासला. १९७५ साली हे पत्र बंद पडले. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाइम्स', 'नवशक्ती' ही साखळी पत्रे महाराष्ट्रात चांगल्या प्रकारे रुजली. त्यानंतर महाराष्ट्रात जिल्हापत्रांचा विस्तार सुरू झाला. मराठवाडा प्रदेशात 'मराठवाडा', 'गोदातीर समाचार', 'प्रजावाणी' ही पत्रे पुढे आली. नजिकचे गावकरी व कोल्हापूरचे पुढारी हे पत्र तसेच नागपूरहून लोकमत, तरुणभारत ही पत्रे या काळात पुढे आली.[२२] या काळात १९७५ साली आणीबाणीस मराठी पत्रांनी शर्थीने झुंज दिली. लेले म्हणतात, ''प्रसिद्धीपूर्व हुकूमांच्या अंमलाबाबत वृत्तपत्रांच्या क्षेत्रात बराच असंतोष निर्माण झाला. कारण निर्बंध जाचक तर होतेच, पण त्यांच्या अधिकारक्षेत्राच्या मर्यादा निश्चितच केलेल्या नसल्याने त्यांचे पालन करणे वृत्तपत्रांना दुरापास्त ठरू लागले.''[२३]

**इ) आजची प्रगत वृत्तपत्रे (२०००-२०१०) :**

१९८० नंतर भारतामध्ये मुद्रण क्षेत्रात नवीन क्रांतिकारक बदल घडू लागले. राजीव गांधी यांच्या प्रयत्नाने व सॅम पित्रोदा यांच्या दूरदृष्टीने भारतामध्ये संगणक क्रांती घडून

आली. राजीव गांधी यांच्या दूरदृष्टीमुळे संगणकाची पोहोच व उपलब्धता वाढली.[२४] टाइम्स ऑफ इंडियासारख्या पत्रामध्येही संगणकाचा स्वीकार करण्यात तेथील कामगार संघटनांनी विरोध केला होता, पण पुढे जनमत बदलले व हळूहळू साखळी पत्रांपासून ते जिल्हा पत्रापर्यंत संगणकाचा स्वीकार गतीने झाला. १९८२ नंतर 'लोकमत', 'सकाळ', 'केसरी', 'पुढारी' या प्रमुख पत्रांनी संगणकाचा स्वीकार केला. डीटीपी व संगणकाचा वापर यामुळे कमी वेळात अधिक चांगले व सुबक मुद्रण होऊ लागले. कामाचा वेग वाढला आणि वर्तमानपत्राचे कार्यनियोजन हे अल्पावधीतच अधिक सुंदरपणे करता येणे शक्य झाले. वर्तमानपत्रांचे जग पालटण्यात अशा प्रकारे राजीव गांधी यांच्या कारकिर्दीत प्रारंभ झाला. त्यामुळे त्यांच्या कार्यकाळास मध्यवर्ती धरून या संशोधन विषयाची आखणी केलेली आहे. वृत्तपत्राची रचना, स्वरूप व मांडणी याबाबत या काळातच रचनात्मक बदल झाले, हे येथे नमूद केले पाहिजे. माहिती तंत्रज्ञानाच्या आगमनापूर्वी मराठी वृत्तपत्रांचे स्वरूप कसे होते ते पुढील तीन मुद्यांच्या आधारे थोडक्यात सांगता येईल.

**१.अक्षर जुळवणीने मुद्रण :** बहुतेक छोटी वृत्तपत्रे त्यांना रोटरी, लायनो, मोनो हे तंत्र परवडत नसल्यामुळे लेटर प्रेसवर अक्षर जुळवणी करून मुद्रण करत असत. असे मुद्रण करत असताना दरवर्षी टाईपांचे खिळे बदलावे लागत असत. हे काम खर्चिक आणि त्रासदायक होते. अक्षरे खुडल्यामुळे वाचकांना काना, मात्रा, वेलांटी या बाबी वाचता येत नसत. एका आठपानी अंकाची अक्षरजुळवणी करण्यासाठी सुमारे २० ते २५ अक्षर जुळारी काम करत असत. त्यांचे वेतन व त्यांच्या तांत्रिक बाबी याचा विचार करता संगणक तंत्रज्ञानामध्ये चार व्यक्ती हे काम करू शकतात.

**२.पारंपरिक सजावट :** जुन्या पद्धतीमध्ये फोटोचे ठसे ब्लॉक तयार करण्यावर भर दिला जात असे. त्यामुळे छायाचित्रे स्पष्ट दिसत नसत. तसेच वर्तमानपत्रातील मांडणी व सजावट करताना प्रत्येक स्तंभात रूळ टाकण्याची पद्धत होती. आयत्यावेळी महत्त्वाची बातमी आल्यास सगळा मजकूर बदलणे अवघड काम होत असे. बऱ्याच वेळा सेटींग बिघडल्यामुळे पानाची मांडणी साचेबद्धपणे करावी लागत असे.

**३.ग्राफिक तंत्राचा अभाव :** पूर्वीच्या मुद्रणात प्रतीके किंवा रेखाटने वापरण्यास फारसा वाव नव्हता. एखादे प्रतीक किंवा रेखाटन वापरण्यासाठी प्रथम स्केच तयार करून त्याचा ब्लॉक तयार करून नंतर ते पुरवणीत बसवावे लागत असे. त्यामुळे कलात्मक सादरीकरणास जुन्या तंत्रज्ञानामध्ये फारसा वाव नव्हता. कंटाळवाणे व साचेबद्ध असे मुद्रण असल्यामुळे वाचकांचे सामुग्रीकडे लक्ष जात नसे. शाई प्रमाणबद्धपणे वापरली जात नसे. त्यामुळे अक्षर वाचकांच्या डोळ्यात खुपत असत. लयबद्ध मुद्रणाचा अभाव हे पूर्वीच्या सजावट तंत्रामधील एक महत्त्वाचा दोष म्हणून नमूद केली पाहिजे. संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या आगमनाने हे चित्र पूर्णपणे बदलून टाकले आणि वृत्तपत्र क्षेत्रात मांडणी व सजावटीचे नवे तंत्र उदयास आले.

## १.७ अभ्यास विषयाचे स्वरूप

प्रत्येक तांत्रिक क्रांती ही नव्य संवादक्रांतीला जन्म देते आणि त्यातून प्रसारमध्यमांचा चेहरामोहरा बदलून जातो असे गॉर्डन याने म्हटले आहे.[२५] या संशोधन समस्येतील अभ्यास विषयाचे स्वरूप प्रथम ढोबळ मानाने समजावून घ्यावे लागेल. त्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाचे माध्यम जगतावर झालेले परिणाम शोधावे लागतील व विविध पैलूंचे आकलन

करावे लागेल. ‘आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रावर झालेला परिणाम’ पाहताना त्यांच्या दोन्ही बाजूने विचार करावा लागेल. देशात संगणकयुग आले. दळणवळणाची अत्याधुनिक साधने आली. संगणक आणि दळणवळणामुळे माहिती मिळविणे सोपे होत गेले. एस.टी.डी., आय. एस. डी., थेट प्रक्षेपण, व्हिडीओ कॉन्फरन्स, इंटरनेट, एसएमएस, सीडी प्लेअर, डी.व्ही.डी. प्लेअर, संगणकातून विविध रंगाचे वर्गीकरण, ॲनिमेशन, ऑफसेट प्रिंटींग, बहुरंगी व बहुढंगी छपाई या सर्व बाबी माहिती तंत्रज्ञानामुळे सहज साध्य झाल्या. या संदर्भात डॉ. धारूरकर यांनी म्हटले आहे, ‘‘माहिती तंत्रज्ञान नित्य नव्याने बदलत आहे व पुढेही त्यात सातत्याने बदल होत आहेत.’’[२६] माहितीचे संकलन, वर्गीकरण तसेच संपादन, गतिमान मुद्रणाची सोय तसेच अंकाची अव्वल दर्जाची छपाई व वितरण सुविधा तसेच प्रगतीच्या बरोबरच प्रगत संवाद तंत्र व दळणवळणामुळे एकाच वृत्तपत्राच्या गाव, जिल्हा, राज्य आणि देशपातळीवर आवृत्त्या निघू लागल्या. या सर्व बदलाची पार्श्वभूमी ही आधुनिक तंत्रज्ञान आणि माहिती क्रांती यात दिसते. या सर्व प्रक्रियेतून नवा माहिती समाज घडत आहे. तंत्रदृष्टीने प्रगत व माहिती दृष्टीने प्रगत अशा समाजाला माहिती समाज असे म्हटले जाते.[२७] आधुनिक मराठी वृत्तपत्रे ही सुद्धा या प्रगत माहिती समाजाचा एक घटक आहेत, हे आपण विसरता कामा नये.

माहिती सहज साध्य होऊ लागली. इंटरनेट, ई-मेल यामधून सहज आपणास माहिती मिळू लागली. तंत्रज्ञानाचा उगम हा विज्ञानात आणि विज्ञानाचे मूळे हे ज्ञानात असते, असे म्हणतात. या पार्श्वभूमीवर वृत्तपत्र हा ज्ञानाधारित व्यवसाय असल्यामुळे या व्यवसायाची गती ही माहिती व ज्ञान प्रसाराच्या स्रोतावर अवलंबून असते. हेही प्रकर्षाने नोंदविले

पाहिजे. त्यामुळे वृत्तपत्र हा केवळ व्यवसाय न राहता ते एक जीवनकार्य बनले आहे.[२८]

नवे तंत्रज्ञान हे स्थानिक नव्हे तर वैश्विक झाले आहे. मायक्रो इलेक्ट्रॉनिक्स, जैव तंत्रज्ञान, अभिकल्पक निर्मित वस्तू, दूरसंचार, उपग्रहाद्वारे संदेश, वाहन, केबल टी.व्ही. संगणकाचे नेटवर्क या अनेक तंत्रज्ञानातून इंटरनेटचा उगम झाला. संगणकाच्या अनेक प्रणाली नेटवर्कने एकमेकांस जोडून माहितीचे आदान-प्रदान करण्यासाठी व माहिती वाटून घेण्यासाठी जगातील लक्षावधी संगणक एकमेकास जोडलेले आहेत.

प्रा. मोहन आपटे यांनी त्यामुळे इंटरनेटला 'माहितीचा कल्पवृक्ष' असे सार्थपणे संबोधले आहे[२९] व त्याआधारे प्रकट झालेली वेब वृत्तपत्रे हीसुद्धा जगभर उपलब्ध होत आहेत.

वृत्तपत्रांच्या इंटरनेट आवृत्त्या आता निघत आहेत. आजकाल वृत्तपत्रांना माहिती संकलित करणे अवघड नाही. मिळालेल्या माहितीची घनता अधिक वाढविणे, ती माहिती सधन करणे, त्याची मांडणी व सजावट करणे, ले-आऊट, डिझाईन, आकर्षकता, इ.वर भर देणे महत्त्वाचे झाले आहे. वेब आवृत्त्यांचे अद्‌भूत विश्‍व नवीन जगामध्ये आकर्षक ठरत आहे. जगाच्या एका भागातील वाचक दुसऱ्या खंडात जाऊन तेथे आपल्या आवडीचे वृत्तपत्र वाचू शकतो. ही एक मोठी उपलब्धी होय. व्हॉईस ओव्हर तंत्रामुळे आता भावी काळात वृत्तपत्र सामग्री ही ऐकताही येऊ शकेल.[३०]

इंटरनेटमुळे ऑनलाईन पत्रकारिता हा नवीन प्रकार उदयास आला आहे. वृत्तपत्रासाठी हे क्रांतिकारी युग आहे.[३१] वाचकही सामान्य राहिले नाहीत. त्यांचीही विषयाची, वृत्तांची भूक आता वाढत आहे. वाचकांच्या पुढे माहितीचे अगणित भांडार असल्यामुळे त्याला

निवड प्रक्रियेत महत्त्व आले आहे.[३२] गुगलवरील खुली ज्ञानसामग्री व माहिती ही इंटरनेटवरील वेब वृत्तपत्रांना विविध प्रकारची माहिती पुरवित आहे. त्यामुळे ही पत्रे नकाशे, आकृत्या व छायाचित्रांचा अचूक व समर्पक वापर करत आहेत.

एकूणच आधुनिकीकरण, माहितीक्रांती, संगणकयुग, इंटरनेटच्या काळात मराठी वृत्तपत्रेही आपापला ठसा वृत्तपत्र क्षेत्रात उमटवीत आहेत. डॉ. गणेश मुळे यांनी मराठी वृत्तपत्रातील इंटरनेट संज्ञापन या ग्रंथात वैशिष्ट्यपूर्ण मांडणी करून या प्रगत माहितीच्या महाजालामुळे वृत्तपत्रसृष्टीत झालेल्या बदलांची यथार्थ चर्चा केली आहे. त्यांनी शंभराहून अधिक मराठी दैनिकांचा अभ्यास करून इंटरनेट संवाद प्रवाहामुळे झालेल्या बदलांची यथार्थ मांडणी केली आहे.[३३] त्यांनी म्हटले आहे, इंटरनेटवरील उपलब्ध संदेशवहनामुळे माहितीची गती वाढली आहे. तद्वतच खोली आणि सहभागही वाढला आहे.[३४]

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रावर झालेला परिणामाचा कालखंड प्रामुख्याने १९८५ ते २००५ ला घातला आहे. १९८५ पासून म्हणजे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांचे आधुनिकीकरणाचे विचार, त्यांनी आणलेली माहिती क्रांती, संगणक युग यामुळे या माहिती क्रांतीचा पाया रचला गेला. ‘आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रावर झालेले परिणाम’ या विषयात अंतर्भूत असलेले महत्त्वाचे मुद्दे या प्रकरणात पाहिले आहेत.

वृत्तपत्र व्यवसायाच्या रचना व कार्यपद्धतीत प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे झालेले बदल हा या अभ्यासाचा प्रधान केंद्रबिंदू होय. किरण ठाकूर यांनीही या संदर्भात अभ्यास केला आहे.[३५] विषयाचे स्वरूप समजून घेण्यासाठी ते मुद्दे पुन्हा एकदा अभ्यासले असता

त्यातील प्रमुख तीन पैलू पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील. (१) आधुनिक माहिती व तंत्रज्ञान, (२) महाराष्ट्रातील पूर्वीची मराठी वृत्तपत्रे, (३) महाराष्ट्रातील आजची मराठी वृत्तपत्रे, (४) झालेले बदल चांगले / वाईट, (५) १९८५ ते २००५ या वीस वर्षांच्या कालावधीतील शासनाचे (मराठी) भाषिक वृत्तपत्रांबाबतचे धोरण. या अनुषंगाने या अभ्यासात मांडणी करावयाची आहे. कारण शासनाचे धोरण जसे बदलते तसे वृत्तपत्र व्यवसायाचे स्वरूपही बदलत असते.

महाराष्ट्र शासनाने अत्यंत प्रगतीशील दृष्टीने आपल्या माहिती व जनसंपर्क खात्याचे आधुनिकीकरण केले, बातम्या, लेख, यशकथा या प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे वर्तमानपत्रांना त्या त्या फाँटसाईजमध्ये देण्यात येऊ लागल्या त्या मुळे वर्तमानपत्रांना आपला मजकूर लावताना अनेक प्रकारचे लाभ होऊ शकले.

## १.८ महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रांचे तत्कालीन स्वरूप

साधारणत: १९८० ते १९८५ पर्यंतच्या कालखंडात प्रसार माध्यमात वृत्तपत्रांचे योगदान जास्त होते. ग्रामीण भागात दूरदर्शन दिसत नसे. एस.टी.डी., आय.एस.डी. सेवा नाममात्र होती. फोन बुक करावे लागत असत. परंतु सॅम पित्रोदा यांच्या प्रयत्नामुळे भारतामध्ये आलेल्या संदेशवहन क्रांतीने नवयुग आणले. मार्शल मॅकलुहानच्या मते, ''संवाद क्रांतीमुळे जग हे खेडे बनेल. माध्यम म्हणजे संदेश हे त्यांचे सूत्र होते.''[३६] त्याच्या विचाराची प्रचिती महाराष्ट्रात १९९० नंतर येऊ लागली.

दळणवळणाची साधने त्या काळी तुटपूंजी होती. त्यामुळे माहिती मिळविणे, ती मुख्य कार्यालयाकडे पाठविणे या बाबीसुद्धा अवघड असत. विविध वृत्तसंस्था, दूरमुद्रकाद्वारे

आलेल्या बातम्यांचे इंग्रजीतून मराठी भाषेत भाषांतर करणे हे ही मोठे काम वृत्तपत्रांना होते. आता इंटरनेटद्वारे भाषांतरित सामग्रीही वृत्तपत्रांना उपलब्ध होत आहे. हा लाभ महत्त्वाचा म्हटला पाहिजे. हे सर्व लाभ वृत्तपत्रांचा चेहरा-मोहरा बदलणारे ठरले. एकूणच साचेबंद आणि जुन्या पद्धतीने वृत्तपत्राचे काम चालत असे. या संदर्भात डॉ. धारूरकर म्हणतात, ''इंटरनेटचा वापर करण्यात मराठी पत्रेही आघाडीवर आहेत. दै. 'सकाळ' व दै. 'लोकमत' ही पत्रेही इंटरनेट वापरत आहेत व त्यांच्यात तीव्र स्पर्धा आहे.

त्या काळात मशीन छपाई ही ट्रेडलवर करीत. जुन्या पद्धतीच्या त्या मशीनला खिळे जुळवण्यासाठी खूप वेळ लागत असे. वृत्तपत्रात एखादा फोटो छापायचा म्हटला तर त्याचा ब्लॉक करावा लागे. तो ब्लॉक त्या ट्रेडल मशीनवर बसवावा लागे. ट्रेडल मशीनचे खिळे हे शिसाचे असत. बहुरंगी व बहुढंगी छपाई ही अशक्य कोटीतली व अवघड बाब होती. एका साचेबंद पद्धतीने काम चालत असे. वृत्तपत्रांचे पत्रकार बातम्या लिहून त्या पोस्टाने, वाहनाबरोबर मुख्य ठिकाणी पाठवित असत. त्या बातम्या त्यानंतर कंपोज करून त्याचे एक प्रुफ छापून हाताने तपासावे लागे. त्यानंतर दुरुस्ती असली तर पुन्हा खिळे बदलावे लागत असत.

संगणकाच्या पडद्यावर कर्सरचा वापर करून सहज दुरुस्ती करता येते. वृत्तपत्र माध्यमास संगणकाचे बहुउद्देशीय लाभ झाले आहेत.[३७] त्यामुळे वृत्तपत्रे रंगीत दूरचित्रवाणीशी स्पर्धा करीत आहेत.

वृत्तपत्राचे उत्पादन आता जरी संपूर्ण मशीनवर असले तरीही त्या काळच्या एकूण कार्यपद्धतीची रचना पाहिल्यानंतर वृत्तपत्र काढणे, ती चालवणे हे अत्यंत जिकरीचे व

कष्टप्रद काम होते. संगणक युगात हे चित्र बदलले व आता जाहिराती आर्टपूलद्वारे गतीने छापता येतात.[३८] मजकूर, छायाचित्रे, जाहिरात तसेच विशेष पानांची सजावट, रविवार पुरवण्यांचे नवे व्यक्तिमत्त्व या सर्व घटकांचा विचार करता माहिती तंत्रज्ञानाने वर्तमानपत्रांचा चेहरामोहरा बदलला आहे. राष्ट्रीय वृत्तपत्रापासून दैनिक भास्कर, जागरन, द हिंदू, टाइम्स ऑफ इंडिया या राष्ट्रीय वर्तमानपत्रांपासून ते 'महाराष्ट्र टाइम्स', 'लोकसता', 'लोकमत', 'पुढारी' हे राज्यस्तरीय असोत की 'झुंझारनेता', 'यशवंत'सारखी वृत्तपत्रे असोत या सर्व वृत्तपत्रांनी आपल्या पाणांची मांडणी पेजमेकरद्वारे करण्यास सुरुवात केली आहे व रंगीत मुद्रणाचा वापर योजकतेने केला जात आहे.

## १.९ अभ्यासाचे महत्त्व

महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्राचे आजचे बदललेले स्वरूप शास्त्रीयपणे अभ्यासणे हा या प्रबंधाचा हेतू होय. संगणक आले आणि वृत्तपत्राच्या वार्ता त्यावर तयार होऊ लागल्या. ऑफसेट प्रिंटींग आले आणि ताशी हजारोंच्या वेगाने, वेब ऑफसेट आले आणि अखंड छपाई चालू झाली. एकरंगीपासून चाररंगी छपाई सहज होऊ लागली. रंगाचे वर्गीकरण संगणकाद्वारे होऊ लागले. बातम्या इ-मेलद्वारे पाठवल्या जाऊ लागल्या. एस.टी.डी., आय.एस.डी., एस.एम.एस., मोबाईल, इंटरनेट याद्वारे संपर्क प्रभावी झाला. इंटरनेटमुळे माहिती क्रांतीचे युग आले. आता वृत्तपत्राच्या इंटरनेट, वेब आवृत्त्या चालू झाल्या. त्यामुळे भौगोलिक रचना पुसल्या गेल्या. महाराष्ट्रातच काय, परंतु संपूर्ण जगात ही इ-मेल आवृत्ती वाचल्या जाऊ लागली. त्यामुळे वृत्तपत्रांच्या रचना व कार्यपद्धतीमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून आले. या अभ्यासाचे महत्त्व खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) माहिती तंत्रज्ञानाच्या तिसऱ्या लाटेमुळे वृत्तपत्रांचा चेहरा-मोहरा बदलला आहे.[३९] मराठी वृत्तपत्रेही त्यास अपवाद नाहीत. या लाटेस ही पत्रे कशी सामोरे गेली, ते या प्रबंधामध्ये अभ्यासले आहे.

२) प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा भाषिक पत्रावर दूरगामी परिणाम झाला आहे. त्याचे लाभ वृत्तपत्रांना झाले आहेत. एव्हर्ट रॉजर्स यांनी भारताने माहिती क्रांतीस सामोरे जाण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे स्वागत केले आहे.[४०]

३) सिरीका मॅनिकेनन यांच्या मते, ''माहिती प्रधान उद्देश, कौशल्य प्रधान उद्देश व मूल्यप्रधान उद्देश हे संवाद शिक्षणाचे ३ मूलभूत उद्देश आहेत.''[४१] माहिती समाजात कार्य करणारी परिपूर्ण वृत्तपत्रे ही प्रगत तंत्रज्ञानावर आधारलेली असतात. तेव्हा ती अधिक समर्थ बनतात.

४) नव्या जगामध्ये माहितीची गती वाढली आहे व अंतराचा नाश होत आहे. या प्रक्रियेमध्ये वृत्तपत्रेही मागे नाहीत.[४२]

५) अमेरिका व युरोपात वृत्तपत्रांचा खप रोडावत आहे, पण भारतामधील भाषिक वृत्तपत्रे मात्र आघाडीवर आहेत. त्याचे कारण म्हणजे साक्षरता प्रसार व प्रगत तंत्रज्ञानाचा स्वीकार हे होय.[४३]

६) एन. राम यांनी भारतीय वृत्तपत्रे काल व आज या द हिंदूमधील लेखात म्हटले आहे की, नव्या पिढीला नवी माहिती साधने अधिक आवडत आहेत. शहरातील तरुण पिढी इंटरनेटकडे वळली आहे, परंतु अद्यापही जिल्हा स्तरावर भाषिक

वृत्तपत्रे वाचली जात आहेत. कारण त्यांचे नाते मातीशी आहे.[४४]

गोविंद तळवलकर यांच्यामते, न्यूयॉर्क टाइम्स सारखे पत्र ऱ्हास पावत आहे. अमेरिकेतील यूएमए टुडे, शिकॅगो ट्रिब्युन व बाल्टीमोर सन यासारखी पत्रे घसरत आहेत, पण भारतीय भाषिक पत्रे मात्र मंदीच्या लाटेतही टिकून आहेत.[४५] त्यांनी नमूद केल्याप्रमाणे युरोप व अमेरिकेतील वृत्तपत्रे रोडावत असली तरी भारतातील वर्तमानपत्रांचे भवितव्य मात्र उज्ज्वल आहे. कारण भारतात नवा वाचकवर्ग तयार होत आहे व हा वाचकवर्ग अधिक जिज्ञासू व तेवढाच जागरूक आहे. या वाचकाला त्याच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक गरजा पूर्ण करावयाच्या आहेत. या गरजा अत्यंत कमी दरात पूर्ण करण्याचे काम छोटी वृत्तपत्रे करतात. या पाश्‍र्वभूमीवर अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

## १.१० अभ्यासाची उद्दिष्टे

कोणत्याही संशोधनात सुस्पष्ट उद्दिष्टे असावी लागतात व अशी उद्दिष्ट्े शोधकार्यास दिशादर्शक ठरतात. या संशोधन प्रकल्पातील अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे नमूद करता येतील.

१) आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वृत्तपत्रावर झालेला परिणाम अभ्यासणे.

२) माहिती तंत्रज्ञानाचे मुद्रित माध्यमास झालेले लाभ नोंदविणे.

३) महाराष्ट्रातील मराठी भाषिक पत्रावर प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा परिणाम शोधणे.

४) १९८५ ते २००५ या दशकातील बदलाचा साक्षेपी अभ्यास करणे.

५) समकालीन मराठी पत्रकारितेमधील बदलते प्रवाह अभ्यासणे.

## १.११ वृत्तपत्रसृष्टीतील नवे प्रवाह

१९९५ ते २००५ या दशकातील वृत्तपत्र व्यवसातील बदलते प्रवाह पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१) वृत्तपत्रातील बातम्यांचे राजकीय विषय बदलून ऊर्जा, जल व संदेशवहनाच्या वार्तांना नवे महत्त्व येत आहेत. डेव्हिड हालबर्स्टन यांच्यामते, ''नव्या वृत्तविषयांचा शोध व त्यांचा पाठपुरावा हे नव्या पत्रकारितेचे लक्षण आहे.''[४६] निवडणुका, भूकंप, युद्ध असो की खेळ, नव्या वार्तांची हाताळणी ही आता वैशिष्ट्यपूर्ण बनत आहेत.[४७]

२) आयसेनहून सुशी यांच्या मते, ''मुलाखती अथवा वृत्तलेख छापताना त्यांची मांडणी कशी केली जाते, ते महत्त्वाचे ठरते. सामग्रीच्या आशयापेक्षाही प्रगत तंत्रज्ञानामुळे सादरीकरण महत्त्वाचे ठरत आहे.''[४८]

३) पत्रकारिता व सत्य यातील नाते दुरावत आहे. वस्तुनिष्ठता व अचूकतेपासून वृत्तपत्रे दूर जात आहेत[४९] व बाह्य सजावटीस महत्त्व आले आहे.

४) वार्तांची गती व क्षमता वाढली आहे. कन्व्हर्जन्स युगामध्ये मुद्रित तसेच प्रसार माध्यमांत स्पर्धा चालू आहे.[५०] मराठी वृत्तपत्रे ही संगणक युगात गतिमान अचूक व संक्षिप्त वृत्तप्रसारावर भर देत आहेत. सकाळ पत्राने गार्सिया सादरीकरण तंत्र वापरले आहे.

५) माहिती युगात वृत्तपत्रे पूर्वग्रहापासून मुक्त होऊ शकत नाहीत. वृत्तपत्रांनी पूर्वग्रहापासून

मुक्त होऊन समतोल वार्ता प्रसारावर भर दिला पाहिजे.[५१] मराठी वृत्तपत्रेही यास अपवाद नाहीत.

आजची वृत्तपत्रे केवळ एकांगी नव्हे तर ती परिपूर्ण होत आहेत. आपल्या वाचकाला जीवनाच्या सर्व क्षेत्रातील ज्ञान देऊन त्याला अद्ययावत करण्याचे काम या वृत्तपत्रांना करावे लागत आहे. काळाचे संदर्भ लक्षात घेऊन अचूक, संक्षीप्त व नेमकी माहिती अगदी सायंकाळची वृत्तपत्रे सुद्धा देत आहेत. मराठी भाषेत संध्यानंदसारख्या वृत्तपत्राने आपला नवा वाचकवर्ग तयार केला आहे. शिवाय नवाकाळ, सांजवार्ता, दोपहर का सामना, मीड डे यासारखी टॅब्युलाईट वृत्तपत्रे सुद्धा वाचकांना ज्ञान, सौख्य व मनोरंजन ह्या त्रिसूत्रीवर आधारीत ताजी माहिती देण्याचा प्रयत्न करत आहेत.[५२]

## १.१२ समारोप

अशा प्रकारे या प्रकरणामध्ये अभ्यास विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट करण्यात आली. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रावर झालेला परिणाम अभ्यासण्यासाठी पोषक असा दृष्टिकोन या प्रकरणामध्ये विकसित करण्यात आला आहे. या प्रकरणात माहिती तंत्रज्ञानाचा जन्म, विकास, त्याचे वृत्तपत्रक्षेत्रातील पदार्पण तसेच राजीव गांधी युगात झालेले महत्त्वपूर्ण बदल यावर विशेष भर देण्यात आला आहे. कृषी, उद्योग आणि शिक्षण या तीनही क्षेत्राला जोडून माहिती तंत्रज्ञान विकासाचा वेग वाढवते आणि वृत्तपत्रासारख्या माध्यमातून माहितीचे आदानप्रदान करून ही विकासाची फळे लोकांपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न करते हा या प्रकरणाचा गाभा आहे. त्यासाठी येथे वारणा प्रयोग वाणगीदाखल चर्चिला आहे. वारणा प्रयोगाप्रमाणेच पुढारीसारखे ग्रामीण वृत्तपत्रसुद्धा आकर्षक मुद्रणामुळे

व उत्तम मांडणीमुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहे. ‘लोकमत’सारख्या पत्राने देशात चौथा क्रमांक मिळवला आहे तर ‘केसरी’सारखे पत्र आपल्या ई-केसरीद्वारे लोकशिक्षणाचे कार्य करत आहे. ई-सकाळचे  प्रयोगसुद्धा यासंबंधात वाखाणण्यासारखे आहेत.

प्रथम माहिती तंत्रज्ञान उपयोजनापूर्वी मराठी पत्रांची स्थिती स्पष्ट करण्यात आली. पाच टप्प्यातून थोडक्यात आढावा घेण्यात आला. अभ्यास विषयाचे स्वरूप स्पष्ट करण्यात आले. वृत्तपत्रांचे तत्कालीन स्वरूप स्पष्ट करण्यात आले. अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करून उद्दिष्टे मांडण्यात आली. तसेच मराठी वृत्तपत्रसृष्टीतील नवे प्रवाह स्पष्ट करण्यात आले. या प्रकारचे अध्ययन हे समकालीन पार्श्वभूमीवर करावयाचे असल्यामुळे नवीन ग्रंथातील संदर्भ आणि नोंदी यांच्या आधारे पत्रकारितेचा बदलता चेहरा स्पष्ट करण्यात आला आहे. पुढील प्रकरणामध्ये संशोधन पद्धतीवर प्रकाश टाकला आहे.

## संदर्भसूची

१. कॅजन्स्की डेव्हिड ओर जॉन, इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी, प्रेंटिस हॉल, २००१, पृष्ठ १

२. लेले रा.के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २००४, पृष्ठ १०८६

३. लर्नर डॅनियल, पासिंग ऑफ ट्रॅडिशनल सोसायटी,

४. लिंट जॉन ए., एशियन न्यू जपेचर्म, अ रिलव्हंट रेव्होल्यूशन,

५. धारूरकर वि.ल., माहिती तंत्रज्ञान व प्रसार माध्यमे, चैतन्य प्रकाशन, २००७, पृष्ठ ८५

६. कित्ता, पृष्ठ ८७

७. कित्ता, पृष्ठ ८९

८. विल्यम फ्रॅड्रिक टेक्नॉलॉजीज ऑफ फ्रिडम, पृष्ठ ८०

9 World Development Report, Oxford University Press, London-2002, P. 181

१० योजना, माहिती तंत्रज्ञान विशेषांक-२६ जानेवारी २०००, पृष्ठ-३०

११ कुलकर्णी एम. जी., मराठी वृत्तपत्रांतील भूपत्रकारिता, अप्रकाशित प्रबंध, य. च. म. मु. वि. नाशिक.

१२ ब्ल्यूमेंथाल, मेडिया रुम, पृष्ठ-६७

१३. लेले रा.के., उपरोक्त, पृष्ठ ५८

१४. कित्ता, पृष्ठ ५८

१५. कित्ता, पृष्ठ २८९

१६. कित्ता, पृष्ठ ३०१

१७. केसरी अग्रलेख, दि. ११ फेब्रुवारी १९०२

१८. समग्र केळकर वाङ्मय, खंड २, पुणे, १९२८, पृष्ठ २८४८५

१९. सकाळ अग्रलेख, १ जानेवारी १९३२

२०. लेले रा.के., उपरोक्त, पृष्ठ ७५३

२१. फडके य.दि., संयुक्त महाराष्ट्र चळवळ, अप्रकाशित प्रबंध पहा.

२२. धारूरकर वि.ल., मराठी वृत्तपत्रसृष्टीत भारतीय वृत्तपत्रे, पुढारी प्रकाशन, कोल्हापूर, १९८०, पृष्ठ १-९०

२३. लेले रा.के., उपरोक्त, पृष्ठ १०२

२४. कित्ता, पृष्ठ १०३

२५. गॉर्डन, कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड मिडीया, पृष्ठ -४

२६. डॉ. धारूरकर वि.ल., उपरोक्त, पृष्ठ १४६

२७. कित्ता, पृष्ठ १४९

२८. शारदा प्रसाद एच.वाय., एडीटर्स ऑन एडिटिंग, एनबीटी, नवी दिल्ली. १९९३, पृष्ठ ७

२९. आपटे मोहन, इंटरनेट - माहितीचा कल्पवृक्ष, पृष्ठ १-२

३०. किंग्सके , उपरोक्त, पृष्ठ २९४

३१. ठाकूर किरण, इंटरनेट पत्रकारिता, पुणे, पृष्ठ ६

३२. इंफिनेट लायब्ररी स्पॅन, पृष्ठ १८

३३. मुळे गणेश, मराठी वृत्तपत्रातील इंटरनेट संज्ञापन, धुळे, २००२, पृष्ठ १०

३४. कित्ता, पृष्ठ

३५. ठाकूर किरण, इंटरनेट पत्रकारिता हा लेख पाहा.

३६. धारूरकर वि.ल., आजकालची पत्रकारिता, रामराज्य प्रकाशन, १९८५, पृष्ठ १९-२८

३७. कित्ता, पृष्ठ ९१

३८. धारूरकर वि.ल., प्रसार माध्यमे व माहिती तंत्रज्ञान, पृष्ठ ८६

३९. कित्ता, पृष्ठ ८९

४०. टॉफलर ऑल्विन, थर्ड वेव्ह, पृष्ठ १

४१. रॉजर्स एव्हर्ट व इतर, इंडिया फेसिंग इन्फॉर्मेशन रेव्होल्यूशन, सेज प्रकाशन, लंडन, १९९६, पृष्ठ ११

४२. मेनिफेनन सिरीका, कॉमन कम्युनिकेशन करीकुलम, युनेस्को, पॅरिस, १९८०, पृष्ठ २

४३. कॉर्निकोह, डेथ ऑफ डिस्टंस, पृष्ठ १०

४४. राम.एन., प्रेस इन इंडिया ॲण्ड वेस्ट, द हिंदू, १५ ऑगस्ट २००७

४५. तळवळकर गोविंद, डाईंग, यू.एस. प्रेस, एशियन एज, २००९

४६. हालबर्स्टन डेव्हीड, ब्रेकिंग न्यूज, आर्किटेक्चरल प्रेस, २००७, पृष्ठ १३

४७. कित्ता, पृष्ठ ४१०

४८. आमसतसू सुशी, अंडरस्टँडींग जर्नालिझम, केब्रिज प्रेस, २००७, पृष्ठ ५

४९ एन. राम, इंडियन प्रेस, द हिंदू, १५ ऑगस्ट २००८

५०. गोल्डस्टीन टॉम, जर्नालिझम ॲण्ड ट्रूथ, नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटी, २००७, पृष्ठ २१

५१. थॉम लिब, ऑल अबाऊट न्यूज, ॲलन बेकीन, २००९, पृष्ठ ४

५२. डेव्हिड शॉन, जेन वर्लस्टन, मिडीया बायस मॅकफारलँड, कंप. २००७, पृष्ठ २०१

प्रकरण २ रे

# संशोधन पद्धती

२.१ प्रस्तावना

२.२ वृत्तपत्रविद्या संशोधन

२.२अ) गृहितकृत्ये

२.३ अन्वेषणात्मक संशोधन आराखडा

२.४ साहित्य समलोचन

२.५ सामाजिक अनुभव सर्वेक्षण

२.६ अंतर्दृष्टीस चालना देणारे घटक

२.७ प्रश्नावली

२.८ मूल्यमापनतंत्र

२.९ आशय विश्लेषण

२.१० अभ्यासाचा दृष्टिकोन

२.११ माहिती संस्कृती आणि वृत्तपत्रे

२.१२ अभ्यासाच्या मर्यादा

२.१३ समारोप

संदर्भसूची

## प्रकरण २ रे

# संशोधन पद्धती

### २.१ प्रस्तावना

कोणतेही संशोधन हे वैज्ञानिक माहिती संकलनाच्या पद्धतीवर आधारलेले असते, तेव्हा त्याला शास्त्रीय आधार प्राप्त होतो. कार्ल पियर्सन यांनी शास्त्रीय संशोधनातील मूलभूत सत्य प्रभावीपणे मांडले आहे. त्यांच्या मते, 'सत्याचे आकलन होण्यासाठी जवळचा रस्ता नाही. विश्वाबाबतचे ज्ञान शास्त्रीय पद्धतीच्या गवाक्षातूनच करून घेण्याखेरीज दुसरा पर्याय नाही.'[१] वृत्तपत्र कुठल्याही प्रकारचे असो, त्याचे कार्य सामाजिक असते. वर्तमानपत्रामध्ये प्रवाह होणारी सामुग्री ही सामाजिक जीवनावर प्रकाश टाकणारी असते. त्यामुळे वृत्तपत्र संशोधन हे सामाजिक शास्त्रांच्या कक्षेत मोडते.

सत्याच्या यथार्थतेबाबत संशोधनामध्ये  पाठपुरावा करून माहितीचे संकलन करावे लागते. त्यातून नवी प्रमेय विकसित करता येतात. यबाबत शास्त्रज्ञाची भूमिका काय असावी हे सांगातना कार्ल पियर्सन म्हणतात, 'सत्य हे केवळ आपल्या स्वत:साठीच नव्हे तर सर्वांसाठीच सत्य असते यावर शास्त्रज्ञाची दृढ श्रद्धा असते. म्हणून निर्णय घेताना शास्त्रज्ञास आत्मनिष्ठ वा व्यक्तिगत अशा बाजूस सारता आला पाहिजे. अमूक गोष्ट सत्य आहे या निर्णयाबाबतचा शास्त्रज्ञाने केलेला युक्तिवाद केवळ त्याला स्वत:लाच नव्हे तर

इतरांनाही त्याच्या इतकाच पटावयास हवा.'[२] या अभ्यासात माहिती तंत्रज्ञानाचा मराठी वृत्तपत्रांवर झालेला परिणाम राजीव गांधी युगाच्या संदर्भात अभ्यासला आहे. त्यासाठी योजिलेल्या संशोधन पद्धतीची चर्चा या प्रकरणात केली आहे. सामाजिक संशोधनामुळे नवीन माहिती उजेडात येते. त्यांचा इतर लोकांच्या कल्याणासाठी उपयोग होते. म्हणूनच सामाजिक संशोधन महत्त्वाचे ठरते. संशोधन म्हणजे काय, हे पुढील व्याख्येत सांगितले आहे.

''संशोधन म्हणजे, तथ्ये वा तत्वे शोधण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा परीक्षण किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पद्धतशीर केलेले परिश्रम होत.''[३] या प्रबंधामध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रावर झालेला परिणाम अभ्यासावयाचा आहे.

सामाजिक संशोधनात शास्त्रीयपणे तथ्ये संकलित करून त्याआधारे नवीन प्रमेयाची मांडणी करण्यात येते. त्यामुळे संशोधनाबाबत असे म्हटले जाते की, ''नव्यानं उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित स्वीकृत निष्कर्ष व सिद्धांताचे पुन:परीक्षण करण्याच्या हेतूने चिकित्सक व सखोल चौकशी वा प्रयोग म्हणजेच संशोधन होय.''[४] येथे आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या परिणाबाबत अशीच चिकित्सा करावयाची आहे. त्यामुळे या संदर्भात त्याचप्रमाणे वेबस्टरच्या शब्दकोषात संशोधनाची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे, ''A careful critical enquiry of examination in seeking facts or principles, deligent, investing actions in order to ascertain something.''[5] एखाद्या गोष्टीचे निश्चितीकरण या परिस्थितीमागील तत्त्व वा सत्य शोधून काढण्यासाठी वस्तुनिष्ठतेने चौकसरित्या केलेले

प्रयत्न म्हणजे संशोधन होय. वृत्तपत्रविद्या व जनसंवाद संशोधन हे या सूत्रात अपवाद नाही, हे येथे प्रकर्षाने नमूद केले पाहिजे.

''संशोधन ही एक प्रवृत्ती असून ती कोणत्याही एका क्षेत्रापूरती मर्यादित आहे असे नव्हे. तिने जिवाची सर्वच क्षेत्रे व्यापलेली आहेत. इतकेच नव्हे तर संशोधन हे जिवनाच्या सर्वच क्षेत्रांचा कणा झालेले आहे. आज जिवनाचे एकही क्षेत्र असे नाही की, ज्यात संशोधनाचा उपयोग केला जात नाही.''[६] त्यामुळे भाषिक वृत्तपत्रांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रमुख संशोधन प्रकल्प आखला आहे. तर Encyclopedia of Social Sciences मध्ये सामाजिक संशोधनाची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे. "The manuculation of the things, concepts of symbols for the purpose of generlising to extend, correct or Vaity knowledge whether that knowledge aids in construction of theory or in the practice of art."[7] समाजविज्ञान कोषातील हे विश्लेषण मौलिक व अर्थपूर्ण तसेच प्रस्तुत अभ्यासासाठी सुसंगत आहे.

थोडक्यात संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी केलेले पद्धतशीर प्रयत्न असतात. वरील व्याख्येचा मराठीत अर्थ असा की, सामाजिक घटकाविषयीच्या ज्ञानाची कक्षा वाढविण्यासाठी, त्याची प्रचिती घेण्यासाठी, सामान्यीकरण करण्यासाठी, त्याचप्रमाणे व्यवहारिक उपयुक्ततेसाठी विशिष्ट वस्तूंची, संकल्पनांची अथवा प्रतीकांची सुसंबद्ध हाताळणी करणे, म्हणजे सामाजिक संशोधन होय. माहिती तंत्रज्ञानाचा परिणाम हा या संशोधनाचा अभ्यासविषय होय व त्याची सुयोग्य हाताळणी हे या अभ्यासाचे प्रयोजन होय. कोणत्याही शास्त्रीय संशोधनात तथ्य आणि विचारांची पद्धतरशीरपणे

मांडणी करावी लागते. लोकसंवाद संशोधनात विविध प्रक्रियांचा शास्त्रोक्तपणे उपयोग केला जातो. त्यात प्रामुख्याने प्रभाव, प्रक्रिया, संख्यात्मक कार्य आणि बदल, यांचे क्षेत्र आणि प्रभावशिलता इत्यादींचा अभ्यास करावा लागतो.

''लोकसंवाद संशोधनात संवाद कार्याला दिली जाणारी नवनवीन आव्हाने व त्यांना लाभणारा प्रतिसाद यांचे मापन करावे लागते. अशा मापनामुळे शास्त्रीय विश्लेषणात किमान प्रारंभ करता येतो.''[८]

संशोधनात प्रायोगिक व नियंत्रित अशा दोन प्रकारच्या अध्ययनांचा समावेश होतो. 'ॲकॉफ आर. एस यांच्या मते, 'नियंत्रण व हाताळणी हे जवळपास समानार्थी असले तरी अध्ययनांचा सर्वसामान्य असा एक वर्ग व जिथे हाताळणीद्वाराच नियंत्रण केले जाते असा अध्ययनांचा एक विशेष असा दुसरा वर्ग; या दोन प्रकारांमध्ये भेद दर्शविणे काही शास्त्रज्ञ उपयुक्त मानतात. प्रयोगीकरण ही संज्ञा हे शास्त्रज्ञ हाताळणीद्वारा नियंत्रित अशा अध्ययनांच्या विशेष वर्गास लावतात तर नियंत्रित अध्ययनाच्या सर्व सामान्य वर्गास ते 'संशोधन' ही संज्ञा लावतात.[९] येथे दोन्ही पद्धतींचा समतोल उपयोग केला आहे. प्रस्तुत प्रबंधात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या महाराष्ट्रातील मराठी भाषिक वृत्तपत्रावर पडलेल्या प्रभावाचे शास्त्रीय संशोधन करावयाचे आहे. जनसंवाद संशोधनामध्ये प्रभाव अध्ययन हा एक महत्त्वाचा पैलू असून भाषिक वृत्तपत्रासंदर्भात हे अध्ययन प्रथमच केले जात आहे. या पार्श्वभूमीवर वृत्तपत्रविद्या संशोधनातील नवे प्रवाह लक्षात घ्यावे लागतील.

## २.२ वृत्तपत्रविद्या संशोधन

माहिती देणे, विश्लेषण करणे, शिक्षण देणे व मनोरंजन करणे ही पत्रकारितेची चार

प्रमुख कार्ये होत.[१०] मराठी वृत्तपत्रे ही सर्व कार्ये करतात; परंतु त्याच्या या कार्यास प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे कशी गती प्राप्त झाली आहे, हे सामाजिक संशोधनाच्या आधारे तपासावयाचे आहे.

कोणत्याही ज्ञानशाखेत संशोधनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तथ्य आणि विचारांची पध्दतशीर मांडणी करून कोणतेही शास्त्रीय संशोधन केले जाते. म्हणूनच कोणत्याही ज्ञानाच्या पद्धतशीरपणे केलेल्या मांडणीला शास्त्र असे म्हणतात. सामाजिक घटकाविषयी ज्ञानाच्या कक्षात ज्या संशोधनामुळे भर होऊ शकते, त्याला सामाजिक संशोधन म्हणतात. सामाजिक शास्त्रामध्ये अशा सामाजिक संशोधनाला फार महत्त्व असते. वृत्तपत्रविद्या ही अशीच पूरक ज्ञानशाखा होय. कार्ल पिअर्सनच्या मते, ''सत्याकडे जाण्यासाठी समीपचा मार्ग नाही. सर्व सत्ये ही शास्त्रीय कसोट्यांवर पडताळून घ्यावी लागतात.''[११] या अभ्यासातही माहिती प्रगत, प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव याच सूत्राआधारे तपासून घ्यावयाचा आहे. कॉफमनच्या मते, ''विज्ञानाचे प्रामाण्य सिद्ध होण्याइतकेच त्यांची अप्रामाण्यता सिद्ध होणे, हे ही संशोधनाच्या प्रगतीसाठी उपकारक ठरते.''[१२] प्रा. जॉन ए. लिंट यांनी म्हटले होते की, ''आशियातील वृत्तपत्रे प्रगत तंत्रज्ञानाला अनिच्छने सामोरे जात आहेत.''[१३] त्यांनी १९७० या दशकामध्ये केलेले हे विधान भारतामधील व महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी कसे खोटे ठरविले आहे, हे या प्रबंधामध्ये शास्त्रीयपणे अभ्यासावयाचे आहे. त्यामुळे विधाने व सूत्रे पडताळून त्यांची नव्याने मांडणी करणे हे संशोधन प्रक्रियेत अपेक्षित असते. त्या आधारे येथे वाटचाल करावयाची आहे.

मोझरच्या मते, ''सामाजिक घटना व समस्या ह्या बाबत नवीन ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून

केलेल्या क्रमबद्ध संशोधनाला सामाजिक संशोधन म्हणतात.''[१४] या शोध कार्यामध्ये पूर्व संशोधकांचे प्रमेय नाकारून सत्याची नव्याने मांडणी करावयाची आहे. या संदर्भात डॉ. पी.व्ही.यंग यांनी केलेले विवेचन मोलाचे ठरते.

पी.व्ही. यंग यांच्यामते, ''सामाजिक संशोधन म्हणजे सामाजिक जीवनाबाबत नवीन तथ्ये शोधण्यासाठी जुन्या तथ्यांचे परीक्षण करण्यासाठी त्या तथ्यातील अनुक्रम, परस्परसंबंध व कार्यकारणभाव याविषयी स्पष्टीकरण आणि सामान्यीकरण प्रस्थापित करण्याची एक पद्धतशीर प्रक्रिया होय.''[१५] या अभ्यासामध्ये प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वृत्तपत्रावर होणारा परिणाम अभ्यासावयाचा आहे. त्यामुळे या संशोधनासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखडा वापरणे अधिक संयुक्तिक ठरते.

समाजशास्त्रीय संशोधन पद्धती ही एक नवीन व अधिक चिरतरूण शोधप्रणाली होय.

वरील व्याख्यांच्या अभ्यासावरून असे स्पष्ट होते की, सामाजिक संशोधनामुळे नवीन माहिती प्रकाशात येते. या माहितीचा उपयोग इतर लोकांच्या कल्याणासाठी होतो. सामाजिक समस्यांचे मूळ शोधता येऊ शकते. सिद्धांताचे पुनर्परीक्षण करता येऊ शकते. म्हणूनच सामाजिक संशोधन महत्त्वाचे ठरते. या व्यतिरिक्त सामाजिक संशोधचे महत्त्व डॉ. पु.ल. भांडारकर यांनी केलेल्या व्याख्येवरून अधिक स्पष्ट होते. त्यांच्यामते, ''तथ्ये वा तत्वे शोधण्यासाठी करण्यात येणरी चिकित्सा किंवा परीक्षण, किंवा एखादी गोष्ट शोधून काढण्यासाठी सतत व पद्धतशीर केलेले परिश्रम होत.''[१६] वृत्तपत्रविद्या संशोधनासही ही तत्त्वे लागू पडतात. त्यासाठी नव्या प्रमेयाचा शोध मोलाचा ठरतो. न्यूयॉर्क टाइम्सचे संपादक ओ'निल यांच्या मते, ''संक्षेप, भूमिगतता व आकृतीबंध विरोध ही नवपत्रकारितेची

लक्षणे होत.''[१७] ही लक्षणे प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे वैश्विक बनत आहेत काय याचा शोध या प्रबंधामध्ये घ्यावयाचा आहे.

नव्या जगात वृत्तपत्रे परिपूर्ण बनत आहेत. वाचकांचे अधिकाधिक समाधान देऊन त्याच्या माहिती विषयक गरजांची पूर्तता करताना वृत्तपत्रे सर्वसमावेशक दृष्टिकोन घेत आहेत.[१८] त्यांच्या या कार्याचे भारतीय संदर्भात मूल्यमापन करून प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा मराठी भाषिक वृत्तपत्रावर पडत असलेला परिणाम व प्रभाव येथे अभ्यासावयाचा आहे.

भारतासारख्या विविधतेने नटलेल्या बहुभाषिक व बहुसांस्कृतिक राष्ट्रात भाषिक पत्रकारिता हीच राष्ट्रीय पत्रकारिता होय. त्यामुळे भाषिक पत्रांचे रूप-स्वरूप अधिक तेजस्वी व प्रकाशमान कसे होईल या दृष्टीने विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. भाषिक पत्रांचा ताजा रूपवेध हे सांगतो की, भाषिक पत्रे समाज प्रबोधानाचा जागर अव्याहतपणे घडवित आहेत. एडविन जेफरी यांच्या मते, आधुनिक भारतामधील लोकशाही वृत्तीचे खरे पाईक म्हणून ही भाषिक पत्रसृष्टी वैशिष्ट्यपूर्ण भूमिका बजावत आहे. १९६९ पर्यंत विरोधी पक्ष दुबळा असताना वृत्तपत्रेच या देशात विरोधकाची भूमिका पार पाडत होती.

आता नव्या सामाजिक व आर्थिक सुधारणांच्या लाटेत राजकीय प्रबोधनापेक्षाही अधिक महत्त्वपूर्ण कामगिरी या पत्रांना पार पाडावी लागत आहे. मांडणी, सजावट व सादरीकरणाच्या बाबतीत या पत्रांचे स्वरूप लक्षणीय बदलले आहे, परंतु त्यांना आता प्रगत व्यवस्थापन तंत्र, मनुष्यबळ विकास आणि नैतिक आचारसंहिता या उपेक्षित क्षेत्रामध्ये अधिक भरघोस कामगिरी पार पाडावी लागणार आहे. जे. व्ही. विलानिलम यांच्या मते, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्था या आधुनिक संपर्काच्या बाबतीत पाठीचा कणा आहेत.

पत्रकारितेचे शरीर स्थूल होत आहे, पण तिचा आत्मा मारला जात आहे.

एकविसाव्या शतकामध्ये मुक्त व जबाबदार पत्रकारिता विकसित करताना गांधीवादी पत्रकारितेचे तत्त्वज्ञान नवी संजीवनी देऊ शकते. म. गांधी म्हणत असत, 'लोकांना जे पाहिजे ते द्या, पण त्यापेक्षाही अधिक काही तरी द्या' नेमका दुसरा भाग आजची पत्रकारिता विसरत आहे. निहालसिंग यांना भारतीय पत्रांच्या डोळ्यावरची झोप स्पष्ट दिसत आहे तर अरुण शौरी यांना असे वाटते की, पत्रकारितेचा घसरत असलेला दर्जा पहाता वृत्तपत्रांना नैतिक आचारसंहिता आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यावरून भारतीय वृत्तपत्रे सशक्त होण्यासाठी त्यांच्यातील प्रबोधनशक्तींचे स्त्रोत अधिक गतिमान करण्याची वेळ आली आहे. गांधीजी आपल्या आत्मचरित्रात म्हणतात, 'सेवा हे पत्रकारितेचे एकच लक्ष असले पाहिजे, वर्तमानपत्र हे प्रचंड शक्तीशाली माध्यम आहे, परंतु ताबा नसलेली लेखणी केवळ नाश करू शकते.' त्यांचा हा इशारा २१ व्या शतकातील पत्रकारितेला नवी दिशा देणारा आहे. आता माहितीच्या अधिकारानंतर तर आपल्या वृत्तपत्रांची नैतिक जबाबदारी अधिक वाढली आहे. ही जबाबदारी वृत्तपत्रांना चांगल्याप्रकारे पेलता यावी म्हणून वृत्तपत्रविद्या संशोधन साह्यभूत कार्य करत आहे.

वृत्तपत्रांच्या संशोधनामध्ये त्यातील सामुग्री आशय तसेच वाचकांची त्याबाबतची मते अजमावून घ्यावी लागतात. त्यासाठी वाचक सर्वेक्षण करावे लागते. हा अभ्यासविषय तुलनेने नवा असल्यामुळे व त्यात कार्यकारणभावाचा शोध असल्यामुळे येथे अन्वेषणात्मक आराखडा वापरणे उचित ठरते. माहिती तंत्रज्ञानाचा वृत्तपत्र व्यवसायावर सखोल परिणाम झाला आहे. तसेच या व्यवसायाच्या कार्यपद्धतीत अमुलाग्र बदल झाले आहेत. या

बदलांचा काळजीपूर्वक अभ्यास करताना नवनवीन पैलूंचा शोध घ्यावा लागेल. जुन्या पारंपरिक पद्धती कशा बदलल्या व त्याची जागा नव्या तंत्राने घेतल्यामुळे कोणते नवे बदल झाले ते येथे प्रामुख्याने शोधावयाच आहे.

## २.२अ) गृहितकृत्ये

कोणत्याही सामाजिक संशोधनात गृहितकृत्य किंवा हायपोथेसीस याला विशेष महत्त्व असते. गृहितकृत्य म्हणजे संशोधनात विकसित करावयाचे कच्चे निष्कर्ष असतात. त्यामुळे शोधकार्याचा पुढील मार्ग सुकर होतो असे गुड व हॅट यांनी म्हटले आहे. गृहितकृत्याच्या उपयुक्ततेची चर्चा प्रा. पु. ल. भांडारकर यांनी सामाजिक संशोधन पद्धती या ग्रंथात केली आहे. प्रस्तुत संशोधनात पुढील गृहितकृत्ये सुनिश्चित करण्यात आली आहे.

१. विसाव्या शतकातील शेवटच्या दशकात प्रगत माहिती तंत्रज्ञानाने (Information Technology) ज्ञानसंवाद (Dialogue for knowledge) क्षेत्रात क्रांती केली आहे.

२. वृत्तपत्रविद्या व व्यवसाय क्षेत्रात महत्त्वाचे स्थित्यंतर म्हणजे 'दृष्टीकोन पत्रकारिता' (Views paper journalism) ते 'बातम्यांची पत्रकारिता' (Newspaper Journalism) हा वृत्तपत्रविद्या विकासाचा टप्पा निर्माण झाला आहे.

३. पत्रकारितेला यशस्वी व्यावसायिक स्वरूप (Successful Busiess entity) मिळण्यासाठी आधुनिक माहिती तंत्रज्ञान ही मोठी सुविधा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांना

उपलब्ध झालेली आहे. या उपलब्ध सुविधेच्या परिणामाला वृत्तपत्रे सामोरी जातात.

४. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कालखंडात आधुनिकीकरणामुळे संगणकयुग अवतरले आणि वृत्तपत्र व्यवस्थापन अधिक लवचिक व विकासक्षम बनले. हा बदल वृत्तपत्रांचे मालक (भांडवलदार) व कामगार या दोन्ही पक्षांनी बिनविरोध स्वीकारला.

## २.३ अन्वेषणात्मक संशोधन आराखडा

अन्वेषणात्मक अध्ययने ही नव्या कुटप्रश्नांचा शोध घेण्यासाठी केली जातात. प्रा. पु. ल. भांडाकर म्हणतात, 'पुढे गृहितकृत्य मांडणी करता यावी किंवा संशोधन-समस्येचे स्पष्ट स्वरूपीकरण करता यावे या उद्देशाने जी अध्ययने प्रेरीत झालेली असतात त्यांना अन्वेषणात्मक अध्ययने म्हणता येईल.'[१९] हा अभ्यास या दृष्टीने करण्यात आला असून, येथे प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या व्यावसायिक प्रभावाची चर्चा सुनिश्चित उद्दिष्ट समोर ठेऊन केली आहे. सामाजिक संशोधनामध्ये शोध समस्येची नवीनता ही अन्वेषणास पूरक ठरते. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या परिणामाची ही चर्चा त्यामुळे हा अभ्यास आराखडा वापरून करणे अधिक उचित ठरू शकते. घर बांधताना जसा समर्पक व सुसंगत तसा आराखडा लागतो. तसा संशोधन प्रकल्पासाठीही यथायोग्य आराखडा असलातर संशोधनास निश्चित गती लाभू शकते. काट्झने म्हटल्याप्रमाणे, ''अन्वेषणात्त्मक अध्ययने ही शास्त्राच्या प्राथमिक स्थितीचे प्रतिनिधीत्त्व करणारी असतात. या अध्ययनामुळे संशोधन कार्यास शोध समस्येच्या स्वरूपीकरणासाठी पोषक ज्ञान प्राप्त होऊ शकते.''[२०] अन्वेषणात्मक संशोधन आराखडा वापरताना तीन टप्पे महत्त्वाचे असतात, असे सॅल्टीश जहोडा व कूक यांनी म्हटले आहे.[२१] या संशोधनातील प्रत्येक टप्पा हा पृथक प्रकार न मानता त्यास अखंड

अशा शोध प्रक्रियेचा भाग मानले आहे.

या प्रत्येक टप्प्यावर या प्रकल्पात कोणते पाऊल टाकावयाचे आहे, ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल. याबाबत सॅलटीश जहोडा व डवॉइश व कूक इत्यादींनी केलेले विवेचन लक्षात घेण्यासारखे आहे.

अन्वेषणात्मक अध्ययनात १) विषयाशी संबंधित साहित्याचे परीक्षण करणे व विषयाशी संबंधित अन्य विषयांचे ज्ञान करून घेणे. (२) अध्ययनासाठी घेतलेल्या विषयाबाबत अनुभवज्ञान असणाऱ्या जाणकार व्यक्तीचे सर्वेक्षण करणे. (३) ज्या उदाहरणामुळे अंतर्दृष्टीस चालना मिळेल अशा उदाहरणाचे विश्लेषण करणे. या तीन पद्धती आवश्यक आहेत.[२२]

अन्वेषणात्मक आराखडा वापरताना या ३ टप्प्यांचे विशेष महत्त्व आहे. त्याअनुरोधाने हे विश्लेषण मोलाचे व व्यवहार्य ठरू शकेल. जेव्हा संशोधन प्रक्रियेमध्ये सामाजिक संबंधाचे विश्लेषण करावयाचे असते. तेव्हा अन्वेषणात्मक आराखडा वापरणे उचित ठरते.[२३] विषय स्वरूपाचा नीट परिचय या आराखड्यामध्ये करून घ्यावयाचा असतो.

## २.४ साहित्य समलोचन

सामाजिक संशोधनामध्ये अभ्यास विषयाची पार्श्वभूमी समजावून घेण्यासाठी हा टप्पा महत्त्वाचा असतो. प्रा. पु. ल. भांडारकर यांच्या मते, ''संशोधनकर्त्याने निवडलेल्या विषय क्षेत्राशी संबंधित विषयासंदर्भात साहित्याचे वाचन व मनन हा अन्वेषणात्मक अध्ययनातील एक महत्त्वाचा भाग होय.''[२४] ज्या विषयाबाबत गृहितकृत्यांची मांडणीच झालेली नाही. त्या विषयाची मांडणी करण्यासाठी अन्वेषणात्मक अध्ययने उपयुक्त ठरतात.[२५] आधीच्या

अभ्यासकांनी मांडलेल्या गृहितकृत्याचे पुनरावलोकन करण्यासाठीही असे अध्ययन पूरक ठरू शकते. त्यामुळे पूर्व अध्ययन दिशादर्शक ठरतात. अभ्यास विषयाबाबतचे ज्ञान ताजे करण्यासाठी काही बुलेटिन व पत्रिकातील माहितीही पोषक ठरते.[२६] येथे अमेरिकन माहिती केंद्राच्या लेख व ग्रंथाबाबतच्या वेब अलर्ट सेवेचा योग्य तेथे उपयोग केला आहे.

संशोधन संस्थांकडून प्रकाशित होणारे अहवाल हे सुद्धा संशोधकास बरेच वैचारिक खाद्य पुरवित असतात.[२७] माहिती तंत्रज्ञानाबाबत योजना या पत्रिकेत प्रकाशित माहितीचा तसेच वृत्तपत्र निबंधकांच्या वार्षिक अहवालाचाही येथे समर्पक वापर केला आहे. केवळ आपल्याच विषयापुरते ज्ञान उपयुक्त ठरत नाही. इतर अभ्यासविषयाबाबतचे पूरक संदर्भ ग्रंथही अनेक उपेक्षित पैलूंवर प्रकाश टाकण्यासाठी सहाय्यभूत ठरतात.[२८] या प्रबंधामध्ये माहिती तंत्रज्ञान, वृत्तपत्रविद्या, संवादशास्त्र, समाजशास्त्र, इ. पूरक ग्रंथाचा उपयोग केला आहे. प्रकाशित साहित्याचे या आरखडा प्रकरातील महत्त्व सांगताना रा.ना. घाटोळे म्हणतात, ''साहित्य समालोचन ही या प्रकारातील पहिली आवश्यक अट आहे. कारण त्याशिवाय त्या विषयाला लागणारे पूर्वज्ञान प्राप्त होत नाही. अशा प्रारंभिक ज्ञानाशिवाय किंवा सैद्धांतिक आकलनाशिवाय शोधकार्य करणे म्हणजे अंधारात चाचपडणे होय.''[२९] त्यामुळे या शोध कार्यामध्ये तीन ज्ञानशाखांतील १५ नवीन ग्रंथाचा आढावा घेतला आहे. तसेच शोध पत्रिका आणि इंटरनेटवरील सामुग्रीही येथे संशोधनासाठी वापरली आहे.

या प्रकारच्या साहित्य सर्वेक्षणामुळे अभ्यास विषयात कोणते बदल घडून आले आहेत, संशोधक या विषयाकडे कशा पद्धतीने पाहत आहे, त्यांचा कल सकारात्मक आहे की नकारात्मक आहे, त्यांचे दृष्टीकोन पूर्वी कसे होते व आता कसे आहेत हे लक्षात घेता

येते. तसेच  प्रस्तुत संशोधनामध्ये स्वीकारलेला दृष्टीकोन हा पूर्वीपेक्षा कसा वेगळा आहे तेही नमूद करता येते. प्रा. पु. ल. भांडारकर म्हणतात, 'ज्यांचा आपल्या संशोधनविषयाशी प्रत्यक्ष संबंध आहे त्यांच्यापुरतीच संदर्भग्रंथसूची मर्यादित ठेवणे किंवा तेवढ्याच ग्रंथाचे वा साहित्याचे सर्वेक्षण करणे योग्य ठरणार नाही. ज्यांचा संदर्भच सर्वस्वी निराळा आहे अशा दुसऱ्या विषयक्षेत्रातील संशोधनात वापरल्या जाणाऱ्या संकल्पना व सिद्धांताचेही स्वक्षेत्रासंबंधी गृहितकृत्ये मांडताना चांगल्याप्रकारे उपयोग करून घेता येतो.'[३०] या प्रबंधात वृत्तपत्रविद्या, जनसंवादशास्त्र तसेच भाषाशास्त्र, माहिती तंत्रज्ञान तसेच समाजशास्त्र इत्यादी पूरक ज्ञानशाखांतील संशोधनाचा सुद्धा आधार घेतला आहे. तसेच अमेरिकन माहिती केंद्राच्या वतीने प्रकाशित केल्या जाणाऱ्या आर्टीकल व वेब अलर्ट यासारख्या सुचिचाही योग्य उपयोग केला आहे. प्रा. भांडारकरांच्या मते, समूहजीवनाचे अचूक व वस्तुनिष्ठ वर्णन ज्या पुस्तकांमधून ओलेले आहे अशी सृजनशील साहित्यकारांनी व लेखकांनी लिहिलेली पुस्तकेही गृहीतकृत्यांच्या निर्मितीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण साहाय्य देऊ शकतात.'[३१] या अभ्यासासाठी साहित्य समालोचन करताना पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, मराठवाडा विद्यापीठातील पारसनिस संग्रह तसेच रानडे इन्स्टिट्यूट मधील वृत्तपत्रविद्याविषयक ग्रंथ व नियतकालिके यांचा उपयोग करावयाचा आहे.

वृत्तपत्र हाही एक समूह जीवनाचा आविष्कार असतो व त्यातील सामाजिक प्रतिभा ही अनेकांच्या सहयोगातून विकसित झालेली असते. त्यामुळे या प्रतिभेचे आकलन आपणास शास्त्रीयपणे करताना प्रगत तंत्रांचा चांगल्या प्रकारे उपयोग होतो. हे लक्षात घेऊन येथे साहित्य समालोचनाबरोबरच अनुभव सर्वेक्षणावर भर दिला आहे.

## २.५ सामाजिक अनुभव सर्वेक्षण

अन्वेषणात्मक अभ्यास हा सर्वेक्षणाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. प्रा. रा.ना. घाटोळे म्हणतात, ''अनुभव सर्वेक्षण ही या प्रकारातील दुसरी महत्त्वाची गरज होय. संशोधक जे विषयक्षत्र निवडतो त्याबाबत इतरांना काय माहिती आहे, कोणते अनुभव आहेत हे संशोधकाने जाणून घेतले पाहिजे. अशा अनुभवी व्यक्तीशी संपर्क केला पाहिजे. कारण अशा व्यक्तीचे अनुभव हे मार्गदर्शक ठरतात.[३२] परंतु या बाबतीत प्रत्येक व्यक्तीला भेटणे हे परवडणारे नसते. त्यामुळे समग्रातील एखादा घटक निवडून त्याचे अध्ययन करावे लागते. प्रा. घाटोळे म्हणतात, ''समग्रापैकी काही अनुभवी काही अन्नुभवी व्यक्तीची निवड करण्याचे कौशल्य संशोधकाने दाखविले पाहिजे. त्यांची यथायोग्य निवड करून त्यांना योग्य प्रश्न विचारून तथ्ये संकलित केली पाहिजेत.''[३३] प्रा. पु. ल. भांडारकर यांनी या संदर्भात केलेले विश्लेषण मोलाचे आहे. त्यांनी म्हटले आहे, ''आराखडा तयार करताना अपेक्षित समाज घटकाकडून पूरक तथ्ये मिळविता येतात.''[३४]

प्रा. भांडारकर यांच्यामते, ''अनुभव सर्वेक्षणाचा हेतू जाणकार व्यक्तींच्या अनुभवाचे संकलन करणे व त्याचा शोध कार्यासाठी पूरक उपयोग करून घेणे हा असतो.''[३५] या अनुषंगाने येथे महाराष्ट्राच्या मराठी वृत्तपत्रात काम करणाऱ्या ३०० पत्रकारांची यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड करून त्यांची पाहणी करण्याचे योजिले आहे.

प्रा. भांडारकर म्हणतात, ''अभ्यास विषयाबाबत पूरक अशा व्यक्तींची निवड करताना सर्व घटकांना समान प्रतिनिधीत्त्व मिळेल याची खबरदारी घ्यावी लागते.''[३६] अशा प्रकारची काळजी येथे निश्चितपणे घेतली आहे. अनुभव सर्वेक्षण हे शास्त्रीय गृहीतकृत्याच्या

मांडणीचा एक आधार आहे, हे सूत्र प्रामुख्याने मांडले जाते.[३७] त्यामुळे येथे विचारलेले प्रश्न हे गृहीतकृत्याच्या मांडणीसाठी पोषक असे आहेत.

अनुभव सर्वेक्षण हे अनेक प्रकारच्या जटील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी वरदान ठरत आहे. कारण ज्या घटकाचा अभ्यास करावयाचा आहे त्या घटकाचे सामाजिक अनुभव हे प्रश्नांचा गुंता सोडवण्यासाठी दिशादर्शक ठरतात. प्रा. पु. ल. भांडारकर म्हणतात, 'ज्याप्रमाणे अनुभव सर्वेक्षण शास्त्रीय गृहीतकृत्यांच्या मांडणीचा एक आधार आहेत त्याचप्रमाणे निरनिराळ्या प्रकारचे संशोधन हाती घेणे कितपत व्यवहार्य व शक्य आहे याचीही कल्पना अशा सर्वेक्षणावरून येऊ शकते. संशोधनासाठी आवश्यक त्या सवलती कशा व कोठून मिळण्यासारख्या आहेत? अध्ययनासाठी म्हणून निवडलेल्या स्थितीतील कोणत्या घटकांना नियंत्रणात ठेवता येणे शक्य आहे व कोणत्या नाही? समस्येच्या अध्ययनात सहकार्य देण्याची तयारी स्थानीय संघटना व नागरिक कितपत दाखवितात? इत्यादी सारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे अनुभव सर्वेक्षणाद्वारा मिळू शकतात.'[३८] माहिती तंत्रज्ञानाचा मराठी वृत्तपत्र व्यवसायावर झालेला परिणाम अभ्यासताना या परिणामाची तीव्रता किती आहे, पूर्वीचे दृष्टीकोण कसे बदलले, नवा दृष्टीकोन लोकांच्या मनात व कार्यपद्धतीत कसा रुजला याबाबत महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी अनुभव सर्वेक्षणाचा जाणीवपूर्वक उपयोग केला आहे. असा उपयोग करताना नवा दृष्टीकोन कसा स्वीकारायचा हे अंतदृष्टीस चालना देणाऱ्या घटकावरून स्पष्ट होते.

अशा प्रकारे हा दुसरा टप्पा अनुसरताना समस्येबद्दलची माहिती व अनुभव यांचे

विश्लेषण करावयाचे आहे. त्यासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखडा उचित प्रकारे वापरला आहे. यासंदर्भात पुढील घटक प्रामुख्याने मांडावे लागतील.

**अ) भौगोलिक व्याप्ती :** हा अभ्यास महाराष्ट्रापुरता मर्यादित आहे आणि महाराष्ट्रातील मराठवाडा या प्रदेशातील आठ जिल्ह्यांवर येथे विशेष भर दिला आहे. मराठवाडा प्रदेश गोदावरीच्या खोऱ्यात मोडतो. यातील काही भाग सिंचनामुळे संपन्न आहे तर काही भाग दुष्काळी व मागासलेला आहे.

**ब) वृत्तपत्रे :** हा अभ्यास महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रांशी निगडीत आहे. खास करून महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर, नाशिक या शहरांप्रमाणेच मराठवाड्यातील जिल्हा वृत्तपत्रांवर माहिती तंत्रज्ञानाचा कसा परिणाम होत आहे ते अभ्यासावयाचे आहे.

**क) पत्रकार :** या अभ्यासामध्ये सामाजिक पाहणीसाठी निवडावयाचे पत्रकार हे प्रामुख्याने मराठी वृत्तपत्रांत काम करणारे आहेत. त्यामध्ये वार्ताहर, उपसंपादक तसेच मुख्य उपसंपादक, मुख्य वार्ताहार इत्यादींचा समावेश आहे.

**ड) नमुना निवड पद्धती :** ३०० पत्रकारांची निवड करताना हे सर्व पत्रकार मराठी भाषिक असून, त्यांची निवड यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने करावयाची आहे.

**इ) सैद्धांतिक समन्वय व निष्कर्ष :** हा अभ्यास करताना प्रथम ज्ञानसंकलन केले आहे. ग्रंथांचे वाचन करून माहिती मिळविली आहे. त्यानंतर सैद्धांतिक सूत्रे विकसित केली आहेत व ती पाहणीच्या आधारे पडताळून पाहिली आहेत. तत्त्व आणि

व्यवहार यांच्या समन्वयातून काही सैद्धांतिक निष्कर्ष प्रमेय स्वरूपात विकसित केली आहेत व ती शेवटच्या प्रकरणात मांडावयाची आहेत.

## २.६ अंतर्दृष्टीस चालना देणारे घटक

हा अन्वेषणात्मक अध्ययनातील तिसरा महत्त्वाचा टप्प होय. या टप्प्याचे महत्त्व सांगाताना प्रा. भांडारकर म्हणतात, 'अंतर्दृष्टीस प्रेरणा देणारी व गृहीतकृत्ये सुचविणारी उदाहरणे निवडून त्यांचे सखोल अध्ययन करण्याची पद्धतही ज्या विषयक्षेत्रामध्ये समस्यांचे सुस्पष्ट स्वरूपीकरण वा निर्धारण करण्याकरिता पुरेसे मागर्दर्शन उपलब्ध नसते अशा क्षेत्रात कार्य करणाऱ्या शास्त्रज्ञांसाठी उपयुक्त ठरते.'[३९] या अभ्यासात वृत्तपत्रे व पत्रकारांनी माहिती तंत्रज्ञानाचा कसा स्वीकार केला ते शोधावयाचे आहे. त्यामुळे त्यांच्या अंतर्दृष्टीय प्रकट झालेले काही पैलू येथे उदाहरणादाखल घेऊन त्यावर भाष्य करावयचे आहे. अन्वेषणात्मक संशोधनाच्या आराखड्यामध्ये हा तिसरा महत्त्वाचा टप्पा होय.

या संदर्भात रा.ना. घाटोळे म्हणतात, ''हे या प्रकारच्या अध्ययनातील तिसरे महत्त्वाचे तत्त्व होय. कधी कधी अभ्यासविषयाशी पूरक विषयाचे ज्ञान हे अंतर्दृष्टी विकसनास पोषक ठरते.''[४०] अंतर्दृष्टी विकसित केल्यामुळे अनेक नवीन कल्पना सूचतात व त्या खरोखरच संशोधकास नवी दृष्टी देऊ शकतात.[४१] प्रा. भांडारकर यांच्यामते, ''व्यक्ती आणि समाज यातील परस्पर आंतरसंबंधाचे ज्ञान करून घेतले असता अंतर्दृष्टी विकसित होऊ शकते.''[४२] कमीत कमी श्रमात अधिकाधिक माहिती मिळविण्यासाठी यथायोग्य योजना संशोधकास करावी लागते.[४३]

अंतदृष्टीस चालना देणाऱ्या नमुन्याची निवड कशी केली जाते हे सांगताना प्रा

भांडारकर म्हणतात, 'सखोल अध्ययनाद्वारा संकलित केल्या जाणाऱ्या माहितीच्या अनेक तुकड्यांचा समन्वय घडवून आणण्याची क्षमता संशोधनकर्त्यास असते हे आपण गृहीतच धरले आहे. नवनवीन गृहीतकृत्यांची मांडणी करण्याचा हेतूच अशा सेखाल अध्ययनाच्या मुळाशी असल्याने संकलित तथ्यकणांचे एकात्मपूर्ण संघटन करण्याची व यावरून सम्यक अर्थबोध घेण्याची क्षमता संशोधनकर्त्यास असणे फार आवश्यक आहे.'[४४] या पार्श्वभूमीवर येथे निवडलेला नमूना हा या तत्त्वानुसार निवडला आहे. या अभ्यासामध्ये १० ज्येष्ठ पत्रकारांच्या मुलाखती घेऊन त्या आधारे अभ्यासविषयाला पूरक ज्ञान संकलित करावयाचे आहे. हे सर्व करताना पूर्वग्रह आणि अविश्वसनीयता यापासून मुक्त राहिले पाहिजे.[४५]

## २.७ प्रश्नावली

प्रश्नावली हे सामाजिक संशोधनातील तथ्यसंकलनाचे एक महत्त्वाचे साधन आहे. प्रश्नावलीचे महत्त्व सांगताना प्रा. पु. ल. भांडारकर म्हणतात, 'निरीक्षणतंत्राचा वापर प्रामुख्याने प्रत्यक्षत: घडत असलेल्या वर्तनाचे व्यवस्थित वर्णन करण्याकरिता व अशा प्रकारचे परिस्थिती सापेक्ष वर्तन समजण्याकरिता केला जातो. पण जेव्हा निरीक्षण अपुरे पडते तेव्हा प्रश्नावलीचा उपयोग करून योग्य माहिती संकलित करता येते.'[४६]

प्रश्नावली ही नावाप्रमाणेच प्रश्नांची एक पूर्वनियोजित क्रमाने मांडण्यात आलेली यादी असते. ही सामान्यत: उत्तरदात्यांना पोष्टाने पाठविली जाते किंवा काही परिस्थितीत व्यक्तिश: त्यांना दिली जाते, परंतु महत्त्वाची गोष्ट ही की त्या यादीतील प्रश्नांची उत्तरे उत्तरदात्यांनी संशोधनकर्त्याकडून किंवा त्याने नेमलेल्या मुलाखतकाराकडून कोणत्याही

प्रकारचे साहाय्य न घेता लिखित स्वरूपात द्यावयाची असतात. अनुसूचिसुद्धा प्रश्नांची एक अशीच यादी असते. परंतु ही स्वत: मुलाखतकाराजवळ असते. मुलाखतकार वा अध्ययनकर्ता या यादीतील प्रश्न उत्तरदात्यांना विचारतो आणि स्वत: त्यांनी दिलेल्या उत्तरांची नोंद करतो पण काहीवेळा अध्ययनकर्ता ही अनुसूची उत्तरदात्यास देतो व त्यातील प्रश्न त्यांना समजावून देऊन स्वत:च्या उपस्थितीत तो उत्तरदात्याकडून या प्रश्नांची उत्तरे भरवून घेतो.'[४७] येथे प्रश्नावली व अनुसूची या दोन्ही तंत्राचा उपयोग करून माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावाबाबत योग्य ते ज्ञान संकलित केले आहे.

सामाजिक सर्वेक्षणामध्ये प्रश्नावली हे तथ्य संकलनाचे एक प्रभावी साधन मानले जाते. त्यामुळे अभ्यासविषयाबाबतची तथ्ये संकलित करणे सोपे जाते. प्रा. रा.ना. घाटोळे यांच्यामते, ''सामाजिक संशोधनात प्रश्नावलीस फार महत्त्वाचे स्थान आहे. जी तथ्ये संकोचामुळे मुलाखतीत व्यक्त होत नाहीत ती प्रश्नावलीद्वारे सुलभतेने व्यक्त होऊ शकतात.''[४८] प्रश्नावलीमध्ये प्रश्नांची क्रमबद्ध तालिका तयार केलेली असते. प्रश्नावली एकत्रित करून त्यातील उत्तरांचे अध्ययन करून त्या आधारे निष्कर्ष काढता येतात.[४९] गुडे व हॅट यांच्यामते, ''सामान्य रूपाने प्रश्नावली म्हणजे प्रश्नाची उत्तरे प्राप्त करून घेण्याची पद्धती असून तिच्यात प्रश्नपत्रिकेचा उपयोग केला जातो व उत्तरदात्यास त्या प्रश्नाची उत्तरे द्यावी लागतात.''[५०] येथे आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रावर झालेला परिणाम अभ्यासावयाचा आहे व त्यासाठी २० प्रश्नांनी युक्त प्रश्नावली तयार केली आहे व तिचे महाराष्ट्रातील पत्रकारांना वितरण करण्यात आले आहे व त्याआधारे तथ्ये संकलित केली आहेत. प्रश्नावलीचा हेतू विस्तृत क्षेत्रातून यथार्थ व

स्वाभाविक माहिती संकलित करणे हा असतो. त्यामुळे वेळ, धन व परिश्रम याची बचत होते.[५१] प्रश्नावलीमुळे गोपनियता कायम ठेवून तथ्ये संकलित करता येतात. ही गोपनियता अन्य कोणत्याही साधनामुळे प्राप्त करता येत नाही.[५२] हे सर्व लाभ विचारात घेऊन या संशोधनात प्रश्नावलीचा यथायोग्य वापर केला आहे.

## २.८ मूल्यमापनतंत्र

अंतर्दृष्टीस चालना देणाऱ्या घटकाचा विचार करून येथे २० प्रमुख ज्येष्ठ पत्रकारांच्या अभ्यास विषयाबाबत मुलाखती घ्यावयाच्या आहेत. प्रा. रा. ना. घाटोळे यांच्यामते, ''सामाजिक संशोधनाच्या क्षेत्रात मुलाखतीची पद्धती ही सर्वात महत्त्वाची आहे. म्हणून तथ्य संकलनासाठी या पद्धतीचा विशेष उपयोग केला जातो.''[५३] तथ्ये क्रमबद्धपणे प्राप्त करून घेण्यासाठी हे तंत्र साहाय्यभूत ठरते. डॉ. व्ही. पी. यंग यांनी या तंत्राचे महत्त्व सांगताना म्हटले आहे, ''ज्या क्रमबद्ध विधीच्या योगे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या आंतरिक जीवनात कमी अधिकप्रमाणात प्रवेश करते, ती मुलाखत होय. ही मुलाखत घेणारी व्यक्ती अपरिचित असते.''[५४] वृत्तपत्र व्यवसायातील २० ज्येष्ठ व्यक्तींची निवड करून त्यांच्या अंतरंगामध्ये प्रवेश करून अभ्यास विषयाबाबत माहिती संकलित करावयाची आहे. मुलाखतीद्वारे प्रत्यक्ष संपर्कामुळे नवनवीन तथ्ये प्राप्त होऊ शकतात व निरीक्षणाची संधीही प्राप्त होते.[५५] विषयाचे पूर्वज्ञान ज्यांना आहे, त्यांच्याकडून अधिक सखोल तथ्ये प्राप्त करून घेता येतात, हेही महत्त्वाचे ठरते.[५६] ज्येष्ठ पत्रकारांना या प्रश्नाचे पूर्वज्ञान आहे. उपलब्ध माहितीमधील सत्य पडताळून पाहणे हाही मुलाखतीचा प्रमुख उद्देश असतो.[५७] पत्रकारांनी दिलेली माहिती व्यवसायातील ज्येष्ठ व्यक्तींच्या मुलाखतींच्या

आधारे येथे काळजीपूर्वक पडताळून घ्यावयाची आहे.

## २.९ आशय विश्लेषण

प्रसारमाध्यमांच्या संशोधनामध्ये आशयविश्लेषण हे एक प्रभावी तंत्र म्हणून पुढे आले आहे. खास करून समाजशास्त्रीय संशोधनात या तंत्राचा चांगला उपयोग केला जात आहे. संख्यात्मक व गुणात्मक स्वरूपात तथ्यांचे वर्गीकरण करून त्यांची नव्याने मांडणी करण्यासाठी हे तंत्र खरोखर दिशादर्शक ठरले आहे. प्रा. ए. ए. बेर्जर यांनी मिडीया ॲनॅलिसीस टेक्नीक्स या ग्रंथात असे म्हटले आहे की, 'एखाद्या विषयाबाबत लोकांचा कल व दृष्टीकोन कसा बदलत आहे हे समजावून घेण्यासाठी आशयविश्लेषण हे तंत्र पुढे आले आहे.'[५८] या तंत्राचा संख्यात्मक आणि गुणात्मक विश्लेषणासाठी उपयोग केला जात आहे. असा उपयोग करताना कालावधी निश्चिती, घटक निश्चिती, मापन पद्धती, अनुमान हे पैलू प्रामुख्याने विचारात घेतले जातात. बॅरलसन यांनी या तंत्राचा विकास कसा झाला याबाबत सखोल विश्लेषण करणारा ग्रंथ लिहिला आहे व त्यात या पद्धतीचे विकसन स्पष्ट केले आहे. प्रा. हेरॉल्ड लासवेल यांच्या मते, दोन महायुद्ध काळातील प्रचारतंत्र कसे बदलले हे आपण या पद्धतीने समजून घेऊ शकतो. तसेच अमेरिकेतील अध्यक्षीय भाषणात कोणाची भाषणे अधिक प्रभावी व निर्णायक ठरली हे या तंत्राच्या वापरामुळे समजून घेता येते.

मुद्रित किंवा प्रसारित सामग्रीचे शास्त्रीय आकलन करण्यासाठी आशय विश्लेषण हे तंत्र वापरले जाते. बॅरलसन यांनी या तंत्राची व्याख्या करताना म्हटले आहे, ''संज्ञापनातील व्यक्त व प्रकट आशयाचा वस्तुनिठ व्यवस्थित संख्यात्मक वर्णनाचे आशय विश्लेषण हे

एक तंत्र आहे.''[५९] मुद्रित अथवा प्रसारित सामग्रीचे संख्यात्मक व गुणात्मक अध्ययन करण्यासाठी या तंत्राचा वापर होतो. १९३७ साली हेरॉल्ड लासवेल यांनी या तंत्राचा वापर करून अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकीतील भाषणांचा अभ्यास केला होता.[६०] डॉ. आर.के. व्हाईट यांनी हिटलर व रूझवेल्ट यांच्या भाषणाचे विश्लेषण करून त्यांचे आवाहनमूल्य तपासले होते.[६१] आशय लक्षणाची वैशिष्ट्ये, कारणे व परिणाम यांची पडताळणी करण्यासाठी हे तंत्र वापरले जाते.[६२] या प्रबंधात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या परिणामाचे विवेचन करावयाचे आहे. त्यासाठी ही पद्धती प्रेरक व पोषक ठरणार आहे. त्यासाठी घटक निश्चिती व कालावधी निश्चिती व मापन पद्धती हे सूत्रे वापरली जातात.

## क्षेत्रीय पाहणीतील टप्पे

या अभ्यासात वरीलप्रमाणे माहितीचे संकलन करताना वैज्ञानिक पद्धती अनुसरावयाची आहे. त्यातील प्रमुख टप्पे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**अ) मराठी वृत्तपत्रे :** हा अभ्यास माहिती तंत्रज्ञानाचा मराठी वृत्तपत्रावर पडलेल्या प्रभावाशी निगडीत आहे. खास करून असा परिणाम मागास मराठवाडा भागातील वृत्तपत्रावर कसा पडला व त्यांचे चित्र कसे बदलले यावर भर द्यावयाचा आहे. सर्वसाधारण महाराष्ट्रातील वृत्तपत्रांचा अभ्यास करून त्यामध्ये मराठवाडा प्रदेशाबाबत विशेष विचार करावयाचा आहे.

**ब) क्षेत्र :** हा अभ्यास मराठवाडा क्षेत्राशी निगडित आहे. तसेच मुद्रित माध्यम म्हणजे वृत्तपत्र या माध्यमाशी अधिक नाते सांगणारा आहे. कारण इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा समावेश केल्यास हा अभ्यास व्यापक गुंतागुंतीचा होऊ शकतो. त्यामुळे क्षेत्र मर्यादित

ठेवले आहे.

**क) पत्रकार संख्या :** ही पाहणी ३०० पत्रकारांशी निगडीत आहे व हे सर्व पत्रकार महाराष्ट्रातील प्रमुख भाषिक वृत्तपत्रांत काम करणारे आहेत.

**ड) प्रश्नावली :** उपरोक्त नोंदविल्याप्रमाणे पाहणीसाठी नमुना प्रश्नावली तयार करण्यात आली. ती २५ पत्रकारांना दाखवून सुकाणू अध्ययन करण्यात आले. त्यानंतर प्रश्नावलीचा विकास करून पाहणीला सुरुवात करण्यात आली. समस्येशी संबंधित व्यक्ती व संस्था यांच्याकडून समस्येच्या महत्त्वाच्या अंगाविषयी माहिती पोस्टाने, पत्रव्यवहार व वैयक्तिक मुलाखती घेऊन संशोधन विषयाचे अद्ययावत ज्ञान तज्ज्ञांकडून मिळवण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. अती महत्त्वाच्या व्यक्तींकडून अशी माहिती मौखिक स्वरूपात सुद्धा संकलित करावयाची आहे.

## २.१० अहवाल लेखन व विश्लेषण

मिळविलेल्या माहितीचे सांख्यिकी विवरण करून सर्वेक्षणाचा अहवाल द्यावयाचा आहे. संकलित माहितीचे पृथकरण करताना तालिका व आलेख यांचा उपयोग करावयाचा आहे. तसेच मिळविलेल्या माहितीच्या आधारे आशयाचे संख्यात्मक व गुणात्मक विश्लेषण करून त्याआधारे भाष्य करावयाचे आहे. येथे मूल्यमापनतंत्राचे स्वरूप, संख्यात्मक व गुणात्मक असे दुहेरी स्वरूपाचे आहे. तसेच संकलित माहितीचे पृथकरण करून अनुमाने काढावयाची आहेत व त्या आधारे अंतिम निष्कर्ष म्हणून काही सूत्रे मांडावयाची आहेत. यावरून प्रस्तुत अभ्यासाचा अंतिम अहवाल लिहिताना पुढील तीन बाबींवर भर दिला आहे.

१. तथ्यांचे संकलन करून समन्वय साधून नवी सैद्धांतिक मांडणी करावयाची आहे.

२. सर्वेक्षण करून मिळविलेल्या माहितीचे शास्त्रीय पृथ:करण केले आहे व त्या आधारे काही मूल्यभेद करणारी सूत्रे मांडली आहेत.

३. सामाजिक अध्ययनात ओघाने येणाऱ्या अभ्यासाच्या मर्यादांचे भान ठेऊन विवेचनावर भर दिला आहे.

या तीनही घटकांचा विचार करता प्रस्तुत संशोधनासाठी स्वीकारलेला अभ्यासाचा दृष्टीकोन मांडला असता ही सर्व सूत्रे अधिक चांगल्या पद्धतीने प्रकाशमान होऊ शकतील. कारण कोणत्याही सामाजिक संशोधनात सुस्पष्ट दृष्टिकोन जेव्हा मांडला जातो तेव्हा तत्त्व व व्यवहार यामध्ये समतोल साधून संशोधन करणे शक्य होते.

## २.११ अभ्यासाचा दृष्टिकोन

"How you manage your information determines whether you win or lose." असे बिल गेट्स यांनी म्हटले आहे. याचा अर्थ असा की, आपण आपल्याकडील माहितीचे व्यवस्थापन कसे करतो यावरच आपला जय किंवा पराजय अवलंबून असतो. हे सूत्र जीवनाच्या इतर क्षेत्राप्रमाणे प्रसारमाध्यमांच्या बाबतीतही अचूकपणे लागू पडते.[६३] वर्तमानपत्राचे यश हे ते कोणते तंत्रज्ञान वापरतात यावर अवलंबून असते. पूर्वीपेक्षा आता वृत्तपत्रे प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. त्यामुळे त्यांचा माहिती प्रसाराचा वेग वाढला आहे. व त्यांना नवी गती प्राप्त झाली आहे.

"Information means anything that indludes data, text, images,

sound, codes, computer programmes, software and data bases and data means a representation of information, knowledge, facts, concepts or instruction which are being prepared or have been prepared in aformalised manner. अशी व्याख्या माहिती तंत्रज्ञान कायदा २००० मध्ये करण्यात आली आहे.[६४] माहितीच्या या व्याख्येवरून माहिती आणि संगणक यांचे अतूट नाते लक्षात येते.

माहिती हा सर्व प्रकारच्या विकासाचा प्रभावशाली आधार होय असे मानण्यास प्रारंभ झाला. एकविसाव्या शतकात केवळ समाजकारण व अर्थकारणावर नव्हे तर सांस्कृतिक जीवनावरही प्रसार माध्यमांचा प्रभाव पडतो आहे प्रगत माहिती तंत्रज्ञानाविषयी अद्‌भूत अशी जाणीवसुद्धा होत असून त्याद्वारे एक नवी माहिती संस्कृती उदयास आली आहे. प्रा. मार्टीन यांनी आधुनिक समाजाचे वर्णन वैश्विक माहिती समाज असे केले आहे.[६५] तंत्रदृष्ट्या प्रगत व माहितीदृष्ट्या समृद्ध असा मानवी समाज घडविण्याचे सामर्थ्य आधुनिक प्रसार माध्यमामध्ये आहे.

एकविसाव्या शतकामध्ये कृषी क्रांती आणि उद्योगक्रांती पेक्षा माहिती क्रांती ही अधिक प्रभावी ठरणार आहे. त्यामुळे ॲलवीन टॉपलर यांनी या क्रांतीस, तिसरी लाट असे म्हटले आहे. माहितीची लाटही समग्र मानवी जीवनावर जसा प्रभाव टाकत आहे. तशी ती प्रसार माध्यमावरही दूरगामी परिणाम करत आहे.[६६]

यासोदा जोखाई म्हणजे माहिती समाज ही कल्पना १९६० या दशकामध्ये प्रथम जपानमध्ये मांडण्यात आली. माहिती हा सर्व प्रकारच्या विकासाचा प्रभावशाली आधार

होय असे मानण्यास प्रारंभ झाला. माहितीचा वेग हा विकासाची गती वाढवू शकतो हे जगातील संवादशास्त्राच्या अभ्यासकांनी प्रथम लक्षात आणून दिले.[६७] प्रा. विलबूर श्रॅम यांनी मासमिडीया अँड नॅशनल डेव्हलपमेंट हा ग्रंथ लिहून अपूर्व क्रांती घडवून आणली त्यामुळे जगातील सर्व राष्ट्रामध्ये संवाद व माहिती साधनांच्या विकासावर भर देण्यात येऊ लागला.[६८] भारतामध्येही  पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधीच्या काळात भारतीय जनसंचार संस्थेची स्थापना करण्यात आली. माहिती तंत्रज्ञानाचा कृषी व उद्योग तसेच मनुष्यबळ विकास या क्षेत्रात जसा उपयोग होत आहे तसा अत्याधुनिक प्रसार माध्यमातही योजकतेने केला जात आहे नवीन तंत्रज्ञानामुळे प्रसार माध्माचे व्यक्तिमत्व बदलून गेले आहे. माहिती तंत्रज्ञानावर आधारलेली एक नवी संस्कृती उदयास येत आहे. कागदाविना वृत्तपत्रे निघू शकतात आणि थेट पडद्यावर चाललेल्या कार्यक्रमातही आपण आपल्या क्षमतेनुसार सहभागी होऊ शकतो हे सर्व नव्या माहिती तंत्रामुळे शक्य होत आहे. या प्रबंधात माहिती तंत्रज्ञानाचा वृत्तपत्र व्यवसावर पडलेला प्रभाव चिकित्सकपणे अभ्यासला आहे.

## २.१२ माहिती संस्कृती आणि वृत्तपत्रे

संगणकाचा उपयोग करून केल्या जाणाऱ्या माहितीच्या आदान प्रदानास माहिती तंत्रज्ञान असे म्हणतात. प्रत्येक देशातील वर्तमानपत्रे ही त्या देशातील माहिती संस्कृतीचा एक भाग असतात. ही संस्कृती काळाच्या ओघात विकसित झालेली असते. भारतामध्ये ब्रिटिश काळात समाजसुधारणेचे युग पुढे आले. त्यानंतर टिळक व गांधी युगात वर्तमानपत्रांनी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली तर नेहरू युगात नवभारताच्या उभारणीमध्ये वर्तमानपत्रे सक्रिय झाली. राजीव गांधी युगात ही वृत्तपत्रे प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा पुरस्कार करू

लागली. एकविसाव्या शतकात केवळ समाजकारण व अर्थकारणावर नव्हे तर सांस्कृतिक जीवनावरही प्रसार माध्यमांचा प्रभाव पडतो आहे. प्रगत माहिती तंत्रज्ञानाविषयी अद्‌भूत अशी जाणीवजागृती होत असून त्याद्वारे एक नवी माहिती संस्कृती उदयास आली आहे. प्रा. मार्टीन यांनी आधुनिक समाजाचे वर्णन वैश्विक माहिती समाज असे केले आहे. तंत्रदृष्ट्या प्रगत व माहिती दृष्ट्या समृद्ध असा मानवी समाज घडविण्याचे सामर्थ्य आधुनिक प्रसार माध्यमामध्ये आहे. नित्य नव्या विकास जाणिवा प्रगल्भ करण्याचे काम अशा प्रकारची प्रगत साधने करू शकतात.

ब्ल्यूमेनाथाल यांनी म्हटले आहे की घराघरामध्ये नवीन माहितीसाधने गतीने पोहचत आहेत आणि प्रत्येक घराचे रुपांतर माध्यम कक्षेत होत आहे. माहितीचे प्रवाह मुक्त व खुले ठेवणे आता अनेकविध वाहिन्या व जुन्या नव्या माध्यमामुळे प्रभावी होत आहे.[६९] इंटरनेटचा वापर बिल गेटस् यांनी संगणक क्षेत्रात क्रांती घडवून आणली व त्यांनी साऱ्या जगाला नवीन माहितीच्या महामार्गावर आणून सोडले आज मानवी जीवन जसे गतिमानपणे बदलत आहे. तसे हा पुढचा मार्ग अधिक प्रभावी बनत आहे बिलगेटस यांच्या ‘द रोड अहेड’ या ग्रंथाने माहितीच्या महामार्गाची कल्पना मांडली आणि या कल्पनेबद्दल जगभर जिज्ञासा निर्माण झाली जगभर सिटीजन्सप्रमाणे नेटी जन्सची संख्याही वाढत आहे . [७०] अमेरिकेत इंटरनेटचा वापर प्रश्न संरक्षण क्षेत्रात करण्यात आला होता. त्यानंतर पुढे जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये इंटरनेटचा वापर सुरू झाला. आता इंटरनेटमुळे सेकंदात जगाच्या या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत माहितीचे दळणवळण शक्य होत आहे. माहितीची झेप नव्या युगाची साक्ष देत आहे. त्यामुळे सेवा, रोजगार व उद्योगक्षेत्रात नित्य नवा विचार पुढे येत आहे.

इंटरनेटवर वेबसाईटचा विकास करणे विविध आशयांचे वर्गीकरण करून त्या आधारे वेबसाईटचे डिझाईन करणे या कार्यासही अधिक महत्व दिले जात आहे.

लॅन, व्हॅन व मॅनमुळे संगणकाचे जाळे शक्य होत आहे. वॅन-वाईड एरिया , लॅन - लोकल एरिया, मॅन-मेट्रो एरिया नेटवर्क संगणकाचा वापर करताना ग्राफिक तंत्राचा वापरही अत्यंत महत्वाचा ठरत आहे वर्तमानपत्र व मासिकांच्या जगात पेजमेकर तंत्राने अपूर्व क्रांती घडवून आणलेली आहे वृत्तपत्राप्रमाणे आता ग्रंथाचे मुद्रणही संगणकाच्या सुविधेने नवा आकार घेत आहे. ऑन लाईन पत्रकारिता संगणकाचा वापर करून नव्या पानांची मांडणी व सजावट करताना आपण नित्य नवी माहिती वृत्तपत्रात देऊ शकतो तसेच आता दूरचित्रवाणीच्या पडद्यावरही वृत्तपत्राची इंटरनेट आवृत्ती आपण वाचू शकतो. केवळ १४०० रुपयात आपण आपल्या छोट्या पडद्याचे रुपांतर संगणकात करून त्या आधारे इंटरनेटसारखा ज्ञान संकलनासाठी वापर करता येतो त्यामुळे इंटरनेटरूपी माहितीचा कल्पवृक्ष हा आता अगदी घरोघरी पोहचत आहे.[७१] ध्वनी आणि चित्रांचे प्रसारणही आता सहज शक्य होत आहे. इंटरनेटमुळे जगातील अद्भूत वार्ता सर्वदूर पोहचत आहेत वृत्तपत्र कायदा इंटरनेटचा वापर करून सर्च इंजिनाच्या द्वारे विविध प्रकारची माहिती तत्परतेने मिळविता येते. आणि नित्य नव्या ज्ञान क्षितीजांचा शोध घेता येतो. त्यामुळे नजिकच्या भविष्यात शाळामध्ये वृत्तपत्रापेक्षा इंटरनेट आवृत्ती चालविणे अधिक प्रभावी ठरणार आहे. इंदोरच्या नई दुनियाची वेब दुनिया ही पहिल्या भारतीय इंटरनेट आवृत्तीची कल्पना यशस्वी ठरली आहे.[७२] या अभ्यासात गणेश मुळे यांनी केलेल्या संशोधनाच्या आधारे काही तथ्ये लक्षात घेऊन पुढे नवे पाऊल टाकले आहे. गणेश मुळे यांच्या मते, ‘मराठी

वृत्तपत्रातील इंटरनेट संज्ञापनामुळे या पत्रांचा दर्जा वाढला आहे तसेच अद्ययावत माहिती देण्याची त्यांची पद्धती नव्याने विकसित होत आहे.'[७३] जो समाज तंत्रदृष्टीने प्रगत असतो व माहितीदृष्टीने समृद्ध असतो त्याला माहिती समाज म्हटले जाते, असे सिरिका मेनिकेनन म्हणतात.

## २.१३ अभ्यासाच्या मर्यादा

ह्या संशोधनामध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रावर झालेला परिणाम अभ्यासावयसाचा आहे. या अभ्यासामध्ये सामाजिक पाहणी करून तथ्यांचे विवेचन करावयाचे आहे. त्यासाठी सारणीतंत्र वापरावयाचे आहे. प्रा. घाटोळे म्हणतात, ''सारणीद्वारे प्रत्यक्ष संख्यात्मक तथ्ये प्रदर्शित होतात, पण सामाजिक घटना या अधिकांशरितीने गुणात्मक असतात. त्या सारणीद्वारे प्रदर्शित करणे शक्य होत नाही.''[७४] या अभ्यासात इतरही मर्यादांचे भान ठेवले आहे. त्या मर्यादा खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) हा अभ्यास केवळ मराठी वृत्तपत्रापुरता मर्यादित आहे.

२) या अभ्यासासाठी निवडलेले ३०० पत्रकार हे मराठवाडा विभागातील आहेत.

३) माहिती तंत्रज्ञान स्वीकार ही कल्पना अभ्यायसताना सकाळ, लोकमत, सामना या तीन प्रमुख पत्रांचा विचार केला आहे.

४) वृत्तपत्राच्या अंतरंग व बाह्यांगावर झालेला परिणाम येथे अभ्यासावयाचा आहे.

५) हा अभ्यास आशय विश्लेषण व सामाजिक पाहणी या आधारे केला आहे.

## २.१४समारोप

अशा प्रकारे या प्रकरणात प्रस्तुत संशोधन प्रकल्पासाठी योजिलेल्या संशोधन पद्धतीवर प्रकाश टाकला आहे. अभ्यासाची पार्श्वभूमी स्पष्ट करून सामाजिक संशोधन वृत्तपत्रविद्या संशोधन तसेच अन्वेषणात्मक संशोधन आराखडा हे पैलू स्पष्ट करण्यात आले. या अभ्यासाच्या दृष्टीने प्रकाशित साहित्याचे समालोचन, सामाजिक अनुभव सर्वेक्षण तसेच अंतर्दृष्टीस चालना देणारे घटक हे तीन पैलू चर्चिण्यात आले. प्रश्नावली मुलाखत तंत्र तसेच आशय विश्लेषण या तीन तंत्रावर प्रामुख्याने प्रकाश टाकण्यात आला. या अभ्यासाची दिशा स्पष्ट करून संशोधन पद्धती मांडण्यात आली.

तसेच या संशोधनात मूलभूत असा अभ्यासाचा दृष्टिकोन स्पष्ट करून माहिती तंत्रज्ञान या संकल्पनेची कार्यात्मक व्याख्या करण्यात आली. ही व्याख्या माहिती तंत्रज्ञान कायदा २००० वर आधारलेली आहे. तसेच भारतामध्ये विकसित झालेल्या माहिती संस्कृतीचा आढावा घेऊन वृत्तपत्राशी असलेले या संस्कृतीचे नाते स्पष्ट करण्यात आले.

तथ्य संकलनाच्या मर्यादांचे भान राहावे, म्हणून पाच प्रमुख मर्यादांवर प्रकाश टाकण्यात आला. या संशोधनाच्या संदर्भात संदर्भीय अध्ययनासाठी पोषक अशा साहित्याचे समालोचन पुढील प्रकरणात विस्ताराने केले आहे. त्यामुळे अभ्यास विषयाचे आकलन अधिक प्रभावीपणे होऊ शकेल.

## संदर्भसूची


१. पियर्सन कर्ल, द ग्रामर ऑफ सायन्स, जे ॲण्ड सी ब्लॅक, लंडन १९११,आवृत्ती तिसरी पृष्ठ १०-१२

२. कित्ता, पृष्ठ -६

३. भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, आवृत्ती तिसरी, १९८७, पृष्ठ १४

४. कित्ता, पृष्ठ १८

५. वेबस्टर शब्दकोश.

६. डॉ. संत दु.का., संशोधन पध्दती, प्रक्रिया, अंतरंग, पृष्ठ ६

७. इनसायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेस, मॅकमिलन बुक कं., न्यूयॉर्क, १९४४, पृष्ठ १२

८. ब्रूस एच. वेस्टले, सिस्टेमेटीक स्टडी ऑफ मास कम्युनिकेशन, पृष्ठ ३

९. ॲकॉफ आर. एस, द डिझाईन ऑफ सोशल रीसर्च; युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो प्रसे; शिकागो लंडन १९५३, पृष्ठ १ ते ११

१०. बॉण्ड फ्रेजर, एन इट्रोडक्शन टू जर्नालिझम, मॅकमिलन, १९७८, पृष्ठ ८

११. भांडारकर पु.ल., उपरोक्त, पृष्ठ १

१२. कित्ता, पृष्ठ ९

१३. लिट जॉन ए., एशियन न्यूजपेपर्स, अ रिलिव्हंट रिव्होल्यूशन, पृष्ठ ११

१४. घाटोळे रा.ना., उपरोक्त, पृष्ठ ९

१५. कित्ता, पृष्ठ ८-९

१६. भांडारकर पु.ल., उपरोक्त, पृष्ठ १४

१७. धारूरकर वि.ल., उपरोक्त, पृष्ठ ९-१२

१८. भांडारकर पु. ल., उपरोक्त, पृष्ठ -१३४

१९. कित्ता, पृष्ठ ८९-९३

२०. भांडारकर पु.ल., उपरोक्त, पृष्ठ १३४

२१. कित्ता, पृष्ठ १३७

२२. सेल्टिश, जहोडा व इतर, उपरोक्त, पृष्ठ-५३

२३. कित्ता, पृष्ठ

२४. सॅल्टीश जहोडा व कुक, सोशल रिलेशन्स रिसर्च, पृष्ठ ५३

२५. भांडारकर पु.ल., उपरोक्त, पृष्ठ १३७

२६. कित्ता, पृष्ठ १३७

२७. कित्ता, पृष्ठ

२८. कित्ता, पृष्ठ १३७

२९. कित्ता, पृष्ठ १३८

३०. भांडारकर पु. ल., उपरोक्त, पृष्ठ १३८

३१. कित्ता, पृष्ठ-१३८

३२. घाटोळे रा.ना., उपरोक्त, पृष्ठ ५८

३३. कित्ता, पृष्ठ ५८

३४. कित्ता, पृष्ठ ५८

३५. कित्ता, पृष्ठ १३८

३६. कित्ता, पृष्ठ १३९

३७. कित्ता, पृष्ठ १३९

३८. कित्ता, पृष्ठ १४०

३९. कित्ता, पृष्ठ-१४१

४०. घाटोळे रा.ना., उपरोक्त, पृष्ठ ५८

४१. कित्ता, पृष्ठ ५८

४२. भांडारकर उपरोक्त, पृष्ठ १४१

४३. कित्ता, पृष्ठ १४७

४४. कित्ता, पृष्ठ १४१

४५ कित्ता, पृष्ठ १४६

४६. कित्ता, पृष्ठ २८९

४७. कित्ता, पृष्ठ २९०

४८. घाटोळे रा.ना., उपरोक्त, पृष्ठ १२०

४९. कित्ता, पृष्ठ

५०. कित्ता, पृष्ठ १२०

५१. कित्ता, पृष्ठ १२१

५२. कित्ता, पृष्ठ

५३. कित्ता, पृष्ठ १०२

५४. कित्ता, पृष्ठ

५५. कित्ता, पृष्ठ १०३

५६. कित्ता, पृष्ठ १०८

५७. बेर्जर ए. ए., मेडीया ॲनॅलिसीस टेक्निक्स,सेज प्रकाशन लंडन-१९९१, पृष्ठ-६८

५८. बेरलसन बी., कंटेंट ॲनालिसीस इन कम्युनिकेशन रिसर्च, प्री प्रेस, न्यूयॉर्क १९५२, सेल्टिश जहोडा व इतर, उपरोक्त, पृष्ठ ३५३.

५९. भांडारकर पु.ल., उपरोक्त, पृष्ठ २३४

६०. कित्ता, पृष्ठ २३५

६१. कित्ता, पृष्ठ २३५

६२. घाटोळे रा.ना., उपरोक्त, पृष्ठ २२२

६३ गेटस बिल, द रोड अहेड या ग्रंथातील पहिले प्रकरण पहा

६४ माहिती तंत्रज्ञान कायदा २०००, योजना विशेषांक -२०००

६५ मार्टीन, ग्लोबल इनफॉरमेशन सोसायटी, मेलबोर्न युनिर्व्हसिटी प्रेस, पेज-१

६६ टॉपलर ॲलविन, तिसरी लाट, (अनुवाद- शदिनी मोहिते), साहित्य संस्कृती मंडळ, प्रकाशन, मुंबई. १९८५, पृष्ठ ४-५

६७ सिरीका मेनीकेनन, कॉमन कम्युनिकेशन करीक्युलम, युनेस्को, पॅरिस -१९८०

६८. श्रॅम विलबुर, मास मिडया ॲण्ड नॅशनल डेव्हलपमेंट, स्टॅण्डफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस १९६४

६९ ब्ल्युमेनथाल, मिडीया रूम, पेज-१

७०. बिल गेटस, इन्फॉरमेशन सुपर हायवे, द एज ऑफ स्मार्ट फॅमिली, रिडर डायजेस्ट १९९५,

७१. आपटे मोहन, इंटरनेट माहितीचा कल्पवृक्ष, पृष्ठ-८

७२. अशोक चतुर्वेदी यांची मुलाखत

७३. मुळे गणेश, मराठी वृत्तपत्रातील इंटरनेट संज्ञापन, पृष्ठ-२२

७४. कित्ता, पृष्ठ-२२२

प्रकरण ३ रे

# वृत्तपत्रे व माहिती तंत्रज्ञान : तात्विक विश्लेषण


३.१ प्रस्तावना

३.२ माहिती तंत्रज्ञान आणि वृत्तपत्रे

३.३ माहिती तंत्रज्ञानाचे सामाजिकरण व वृत्तपत्रे

३.४ प्रसारमाध्यमात माहिती तंत्रज्ञान : नवी सूत्रे

३.५ समाजशास्त्रीय दृष्टिकोन

३.६ भारतीय माहिती तंत्रज्ञानाची प्रगती व वाटचाल

३.७ ग्रामीण संपर्कसेवा व वर्तमानपत्र

३.८ माहिती तंत्रज्ञानाची लक्ष्य व कार्य

३.९ नवे प्राधान्यक्रम

३.१० इंटरनेट युगातील वृत्तपत्रे : नवे प्रवाह

३.११ रंगित दूरचित्रवाणीशी स्पर्धा

३.१२ मूलगामी सूत्रे

३.१३ नवे स्वागतार्ह प्रवाह

३.१४ इंटरनेटवरील वेब वृत्तपत्रांचे अदभूत विश्व

३.१५ बहुगुणी वेब आवृत्त्या

३.१६ वेब वृत्तपत्रातील जाहिराती

३.१७ समारोप

संदर्भसूची

## प्रकरण ३ रे

# वृत्तपत्रे व माहिती तंत्रज्ञान : तात्विक विश्लेषण

### ३.१ प्रस्तावना

माहिती तंत्रज्ञान नव्याने बदलत आहे आणि पुढेही त्यात सतत बदल होणार आहेत. डेव्हिड कॅजन्स्की व जॉन ऑर म्हणतात, Now, here's a shocker. The information revolution has only just begun. The changes we've seen during the past ten years are hardly the beginning. We are headed toward an unprecendented change in every aspect of how we communicate, educate, track information, slove medical problems and manage every aspect of life.[1] माहिती तंत्रज्ञानाचा नुकताच उदय झाला आहे. गेल्या दशकातील बदल हे अगदी ताजे बदल आहेत. आपण संवाद कसे करतो, शिक्षण कशाप्रकारे देतो, याबाबत प्रत्येक क्षणी नवे बदल होत आहेत. वैद्यकप्रश्न सोडविण्यापासून नित्य जीवनात प्रत्येक क्षेत्रात माहिती तंत्रज्ञान प्रवेश करीत आहे. जीवनातील सर्व क्षेत्रांचे व्यवस्थापन माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने होत आहे. आपल्या बदलत्या जीवन शैलीस आकार देण्याचे काम माहिती संवाद तंत्रज्ञान करत आहे. या व्यवस्थेच्या भावी स्वरूपाबाबत संशोधकानी म्हटले आहे, At the start of the new milluennium , it is generally believed by investors & business leaders within the telecommunications industry that soon we will all be using Vioce Over IP

(VoIP) technology.[2] या सहस्त्रकाच्या प्रारंभी जगभरात व्हॉईस ओव्हर तंत्र वापरले जाण्याची शक्यता आहे. त्याचा उपयोग व्यवसायिक आणि उद्योजक यांना होऊ शकतो.

एकविसाव्या शतकात प्रगत माहिती व संवाद तंत्रज्ञानामुळे नवनवी प्रसारमाध्यमे जन्माला येत आहेत. तद्वतच त्यांच्या माध्यमातून नव्या गतिमान जगाचे प्रतिबिंब उमटत आहे. प्रा. ब्लू मेंथाल यांनी म्हटले आहे, नव्या प्रसारमाध्यमामुळे जणू प्रत्येक घरातील दिवाणखाना हा माहिती कक्ष व माध्यम दालन बनत आहे. या माध्यम दालनात प्रत्येक नागरिकाला माहिती घेणे, देणे व माहितीचा प्रसार करणे ही मूलभूत कार्ये विचारपर्वूक करावी लागणार आहेत.[३] त्यासाठी प्रत्येक नागरिकास माध्यम साक्षरतेप्रमाणेच संगणक साक्षरतेचीही गरज आहे. माहिती संवाद तंत्रामुळे मानवी जीवनात होत असलेल्या अंतर्बाह्य बदलांचा व अशा बदलांचा वृत्तपत्रव्यवसायावर झालेल्या परिणामांचा या प्रकरणात आढावा घेतला आहे.

## ३.२ माहिती तंत्रज्ञान आणि वृत्तपत्रे

मराठी वृत्तपत्रांत माहिती तंत्रज्ञानाचा वापर हा प्रथम पुणे व मुंबई शहरातील वृत्तपत्रांनी सुरू केला. त्यानंतर नागपूर व औरंगाबाद येथेही प्रयोग झाले. केसरी या पत्राने आपली वेब आवृत्ती मराठीत पहिल्यांदा सुरू केली. वर्तमानपत्रे अक्षरजुवळणीसाठी तसेच मांडणी व सजावटीसाठी संगणकाचा उपयोग १९९० या दशकापासून सढळपणे करू लागली. पुढे १९९५ नंतर वर्तमानपत्रात इंटरनेटच्या वापरला अधिक वेग प्राप्त झाला.[४] वृत्तपत्रांची वेब आवृत्ती ही एक नवी संधी होय प्रभावी वृत्तपत्रप्रसारासाठी आता वेब आवृत्तीचा उपयोग केल्यामुळे भावी काळात वृत्तपत्र छपाई व वितरणाची डोकेदुखी कमी होणार आहे. नई दुनिया प्रतिष्ठित हिंदी दैनिकाच्या वेब दुनिया या हिंदी आवृत्तीचे संपादक

अशोक चुतर्वेदी यांनी इंटरनेट आवृत्तीमुळे वृत्तपत्राचे मासिक उत्पन्न गतीने वाढल्याचे नमूद केले आहे.

महाराष्ट्रात लोकसत्ता या पत्राप्रमाणेच सकाळ, पुढारी, सामना, लोकमत इ. वृत्तपत्रे ही आता वेबसाईटवर उपलब्ध होत आहेत आणि अनेक नवीन वृत्तपत्रे ही आता इंटरनेटवरती उपलब्ध होत असतात.

मुद्रित माध्यमाप्रमाणेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातही माहिती तंत्रज्ञानाने प्रवेश केला आहे. माहिती तंत्रज्ञानाने आता रेडिओ व टी. व्ही. माध्यमातही प्रवेश केला आहे. इलेक्ट्रानिक माध्यमांचा माहिती तंत्रज्ञानाने संपूर्ण कायापालट झाला आहे. रेडिओ हे माध्यम आता अधिक प्रगत बनत आहे. फोन इन कार्यक्रम तसेच टेली कॉन्फरन्स व ऑनलाईन कार्यक्रमांनी नवे प्रगत रुप धारण केले आहे. डिजीटल छाया चित्रामुळे दूरचित्रवाणी माध्यम अधिक सूक्ष्म गतिमान बनले आहे. दूरचित्रवाणी माध्यमात इलेक्ट्रॉनिक न्यूज गॅदरिंग इक्वीपमेंट म्हणजे माहिती व वार्ता संकलनाच्या संवेदनशील साधनांचा वापर होत आहे. चरखी दादरी विमान दुर्घटनेचे वर्तमान भारतात अनेक वाहिन्यांनी केले सूक्ष्मपणे होते डिजीटल संपादन तंत्रही प्रभावी ठरत आहे. जिवंत प्रसारण करताना नवी तंत्रे उपयुक्त वरदान ठरत आहेत.

भारतात माहिती तंत्रज्ञान हे केवळ शहरी भागात वापरले जात आहे. त्याचा ग्रामीण भागात प्रसार होणे गरजेचे आहे. भारत हे माहिती सत्ता बनल्याने आपण जगापुढे एक नवा आदर्श ठेवू शकतो. तहलका डॉट कॉम ने भारतात शोध पत्रकारितेचे नवयुग सुरू केले इंटरनेट वृत्तपत्राच्या नव्या आवृत्या पुढे येत आहेत. इंटरनेटद्वारे जाहिरातीही नव्या

स्वरूपात दिल्या जात आहे. इंटरनेटचा अशा प्रकारे सर्वच मुद्रित व दृक श्राव्य माध्यमावर प्रभाव पडत आहे. काळ जसा पुढे जात आहे तसाच माणूस सर्व नित्य कामे इंटरनेटद्वारे करु शकेल आता छोटे सायंदैनिक हे सुद्धा इंटरनेटचा वापर करून नित्य नव्या वार्ता देत आहे. हा ही माहिती क्रांतीचा महिमा वाढत आहे. ज्ञानावर आधारलेले उद्योग अधिक प्रभावी ठरत आहेत. अशा वेळी प्रसार माध्यमांना नवी शक्ती प्रदान करण्यासाठी प्रगत माहिती तंत्रज्ञानाचे सामर्थ्य त्यांना प्रदान करावे लागेल नजिकच्या भविष्याकाळामध्ये प्रसारमाध्यमे प्रत्यक्ष लोकशिक्षणाचे काम करताना तत्व आणि व्यवस्था यात सुसंगत प्रयत्न करावे लागणार आहेत.

युनेस्कोच्या वतीने समान माध्यम अभ्यासक्रम तयार करण्याचे प्रयत्न झाले आहेत. प्रा. सिरीका मेनीकेनन यांनी म्हटले आहे की, असा वैश्विक अभ्यासक्रमाची तीन प्रधान उद्दिष्टे माहिती प्रधान उद्दिष्टे, कौशल्यप्रधान उद्दिष्टे आणि मूल्यप्रधान उद्दिष्टे यांचा विचार करता ही तीनही उद्दिष्टे साध्य करताना प्रसार माध्यमांनी माहिती तंत्रज्ञानाचे प्रगतस्तर ज्ञान साध्य केले पाहिजे नित्य नव्या ज्ञान प्रवाहाची दखल घेऊन विश्वातील अद्ययावत अशा ज्ञानाचे स्वागत करण्यासाठी प्रगत माहिती तंत्रज्ञान अधिक पोषक ठरू लागले.[५] नजीकच्या भविष्यकाळामध्ये प्रसार माध्यमे अधिक सक्षम करण्यासाठी प्रगत माहिती तंत्रज्ञान अधिक पोषक ठरू शकते आता नित्यनूतन माहिती प्रवाहांचे स्वागत करताना या नव्या माहिती तंत्रज्ञानाचा योजकतेने वापर करण्याची गरज आहे. अद्ययावत अशा माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे प्रसार माध्यमे अधिक लोकाभिमुख कार्य करू शकतील त्यामुळे भारतासारख्या बहुविध मिश्र समाजात समतोल विकासाचे स्वप्न साकार होऊ शकते. तिसऱ्या जगातील

राष्ट्रासाठी युनेस्कोने २००१ मध्ये नवा अभ्यासक्रम तयार केला असून, तो आशिया, आफ्रिका व लॅटीन अमेरिकेतील देशांसाठी अधिक उपयुक्त आहे.[६]

वृत्तपत्रे, दृकश्राव्य माध्यमे म्हणजे नभोवाणी, दूरचित्रवाणी व चित्रपटासारख्या माध्यमातही माहिती तंत्रज्ञानाने प्रवेश केला आणि आणि या माध्यमाने पहिल्या क्रमांकाचे रूप दिले आहे. भारत सरकारच्या वतीने प्रकाशित भारत - २००२ या अहवालात म्हटले आहे, आपल्या देशातील बहुसंख्य जनतेला स्वस्थ मनोरंजनाबरोबरच राष्ट्रीय विकासातील त्यांच्या भूमिका व जागृत करण्यासाठी जनसंवादाची साधने महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. जनसंवादाची साधने राष्ट्र निर्मितीच्या कार्यात लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी मार्गदर्शक ठरतात.[७]

या अनुषंगाने भारतातील प्रसारमाध्यमांचे अध्ययन करणे अत्यंत उपयुक्त ठरू शकेल. माहिती तंत्रज्ञानाचा भारतीय समाजावर प्रभाव कसा पडत आहे याबाबत विवेचन करताना असे म्हटले आहे, माहिती तंत्रज्ञानाने सभोवती घडणाऱ्या घटना व घडमोडींबाबतचा तपशील जनतेला तात्काळ उपलब्ध होत आहे. तसेच विविध घटनांचे अन्वयार्थ लावणे सुद्धा त्यामुळे सोपे जात आहे. माहिती तंत्रज्ञान केवळ नव्या माहिती समाजाची उभारणी करत नाही तर भविष्यकाळात होणाऱ्या सामाजिक परिवर्तनाची दिशाही स्पष्ट करू शकते.[८]

## ३.३ माहिती तंत्रज्ञानाचे सामाजिकीकरण व वृत्तपत्रे

समाजशास्त्रीय दृष्टीने विचार करता असे दिसते की प्रगत माहिती तंत्रज्ञानाचे जेव्हा समाजीकरण होते तेव्हा हे तंत्रज्ञान सामान्य माणसापर्यंत पोहचते. १९८० साली ८० या दशकात राजीव गांधी युगात भारतात संगणकाचा प्रयोग झाला. पुढे १९९० नंतर

संगणक अनेक महत्त्वाच्या कार्यालयात पोहोचले. १९९५ नंतर संगणकाने वृत्तपत्र व्यवसायात दमदार पाऊल टाकले. संगणकाच्या प्रवेशाने वृत्तपत्राचा चेहरामोहरा बदलला. त्यांच्या कार्यात आंतरबाह्य बदल झाले. वर्तमानपत्राचे पहिले पान बदलले तसेच आतली पानेही झपाट्याने बदलत गेली. याचा अर्थ असा की, माहिती तंत्रज्ञानाचे समाजिकीकरण करणे हे काळाचे आव्हान आहे. आणि त्यासाठी प्रसार माध्यमाचा उपयोग होतो.

उमा नरुला यांनी नवीन तंत्रज्ञानाचा प्रसार माध्यमावर कसा परिणाम होतो आहे हे स्पष्ट करत असताना म्हटले आहे, Media and information technologies cannot by themselves eradicate social ills, but their absence can reinforce those ills, whereas their presence can offer a resource that can change things for better.[9] माध्यमे व माहिती तंत्रज्ञान मिळून समाजातील दोष ताबडतोब नाहिसे करू शकत नाहीत; परंतु त्यांच्या अनुपस्थितीमुळे हे दोष कायम राहण्याचा धोका असतो. तथापि त्यांच्या योग्य वापरामुळे परिस्थितीमध्ये चांगला बदल घडू शकतो ही त्यांची भूमिका लक्षात घेण्यासारखी आहे. माहिती संवाद तंत्रज्ञान हे सामाजिक परिवर्तनास तसेच नव्या सांस्कृतिक जाणिवा जागृत करण्यासाठी एक वरदान ठरू शकते. सबंध विश्वातील माणसामध्ये मानवता विश्वबंधूत्व तसेच विज्ञाननिष्ठा या जाणिवा रुजविण्यासाठी माहिती तंत्रज्ञान पोषक ठरते. उमा नरुला २१ व्या शतकातील क्रांतीकारक बदलांचा वेध घेताना म्हणतात की, We except in 21st century the pace of innovations in science and thchnology and their applications will be superfast and revolutionary. याचा अर्थ असा की, २१ व्या

शतकात विज्ञान व तंत्रज्ञानातील शोधाची गती एवढी वाढेल की, त्यांचे उपयोजन अधिक गतिमान व क्रांतिकारक स्वरूपाचे ठरू शकेल. प्रसार माध्यमांच्या जगतावर तर नवीन माहिती तंत्रज्ञानाचा अत्यंत दूरगामी परिणाम होत आहे.

पीटर ड्रकर याने म्हल्याप्रमाणे नव्या जगात ज्ञानाचे व्यवस्थापन हा नवा मंत्र आहे.[११]

डिजिटल युगात ज्ञानाचे व्यवस्थापन करताना अचूकता, नेमकेपणा व संक्षेप यांना अधिक महत्त्व दिले जात आहे. हे ज्ञानव्यवस्थापन वैयक्तिक तसेच सामाजिक पातळीवर नवे परिवर्तन घडवून आणत आहेत. प्रत्येक घराचे रूपांतर माध्यम शाखेत होत असून, आपली इच्छा असो की नसो ज्ञानव्यवस्थापन करणे ही आता काळाची गरज बनत आहे.

फिलिप तामस याच्या मते, मानव समाज सुधारणांच्या एका टप्प्यावर उभा आहे. अशा सुधारणा या तत्कालिन आयुधांच्या वापरावर अवलंबून असतात. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर ही सुधारणा नवीन आयुधांचा वापर आपण कसा करतो त्यावर अवलंबून असते.[१२]

## ३.४ प्रसारमाध्यमात माहिती तंत्रज्ञान : नवी सूत्रे

माध्यमामध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या वापराबाबत पुढील काही सूत्रे सांगता येतील.

१. नव्या जागतिक अर्थव्यवस्थेमुळे प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून विकसनशील राष्ट्रे विकसित राष्ट्रांपेक्षा वेगाने पुढे जाऊ शकतात.

२. माहितीचा वेग आणि आदान-प्रदान या बाबतीत इंटरनेटसारख्या सुविधांमुळे माध्यमांचे विश्व क्रांतीकारक गतीने बदलले आहे.

३. विश्वव्यापक संगणकाचे नेटवर्क म्हणजे इंटरनेट हा माहिती क्रांतीचा आधार

बनलेला आहे.

४. माहिती तंत्रज्ञानाचा मूर्त आणि अमूर्त अशा दोन्हीही संदेशवहनासाठी उपयोग होतो आणि त्याद्वारे गतीने विचारप्रसारण घडते.

५. प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यामध्ये प्रसार माध्यमापुढे अनेक नवी आव्हाने असून, त्यास माध्यमे कशी सामोरी जातात यावर त्यांचे भवितव्य अवलंबून आहे.

६. प्रशिक्षित मनुष्यबळ आणि प्रभावी तंत्रज्ञान या दोहोंच्या संतुलनातून माध्यमांची कार्यपद्धती नव्या दिशेने बदलू शकते.

या चर्चेवरून हे स्पष्ट होते की, माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार माध्यमातील प्रवेश ही बाब म्हणजे एक अपरिहार्य अशी प्रक्रिया आहे. नव्या माहिती तंत्रज्ञान साधनामुळे सारे जग उत्साहित झाले आहे. या तंत्रज्ञानास विरोध करण्याऐवजी त्याची उपयुक्तता समजून घेऊन माध्यमांच्या रचनात्मक विकास कार्याची गती वाढविणे हे नव्या युगातील संवादकर्त्यांचे प्रमुख कर्तव्य ठरणार आहे.[१३] माहिती तंत्रज्ञानाच्या वापर आणि प्रयोगाबाबत अत्यंत गतिमानपणे व्यवहार्य असा कार्यक्रम आखणे आणि या साधनांचा उपयोग करून मुद्रित तसेच दृकश्राव्य माध्यमांचा चेहरा-मोहरा बदलून टाकणे हे नव्या तंत्रज्ञानाचे खरे आव्हान आहे.

## ३.५ समाजशास्त्रीय दृष्टिकोन

माहिती तंत्रज्ञान समग्र समाजात बदल घडवते. त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे हे तंत्रज्ञान प्रथम प्रसारमाध्यमावर प्रभाव टाकते. वर्तमानपत्रासारख्या माध्यमात त्याचा प्रभाव

वाढला की समाजाच्या इतर क्षेत्रात त्याची महती व गती अधिक वृद्धींगत होते. नवे माहिती तंत्रज्ञान हे माध्यम विश्वातील परिवर्तनाचा मंत्र बनले आहे. विद्यमान समाज जीवनावर नवीनतम शोधांचा दूरगामी परिणाम होतो आहे. मोहन आपटे यांनी विसाव्या शतकाला शोधाचे शतक असे म्हटले आहे.[१४] कनव्हर्जंस तंत्रामुळे विविध प्रसार माध्यमांच्या रचना व स्वरूपात बदल होत असून, भविष्यकाळात यापेक्षाही अधिक क्रांतिकारक अशा बदलांची अपेक्षा आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी माहिती तंत्रज्ञानाच्या ज्या सुविधा उपलब्ध होत्या त्या सर्व एकत्र केल्या तरी आज केवळ एक व्यक्ती वापरत असणाऱ्या लॅपटॉपमध्ये त्यापेक्षा अधिक क्षमता असल्याचे नोंदविले जाते.[१५] तंत्रज्ञानाच्या बदलाची ही गती केवळ एखाद्या देशाला नव्हे तर समग्र मानव समाजाला एक नवे रूप देत आहे. हा बदल समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यासला असता पुढील तीन बाबी लक्षात येतात.

१. प्रगत बदलाला होणारा विरोध ही त्याची उपयुक्तता सिद्ध झाल्यानंतर मावळतो व हे विरोधक त्याचे समर्थक बनतात.

२. प्रगत तंत्रज्ञानाचा वापर जेवढ्या वेगाने पसरतो तेवढ्या वेगाने समाजाची प्रगती गतीमान होते. कारण त्याचे लाभ उत्पादकता वाढीवर परिणाम करणारे असतात.

३. शोधांचा विस्तार हा तांत्रिक बदलाला नवे सामर्थ्य देणारा असतो. शेती, उद्योग, शिक्षण तसेच प्रसारमाध्यमे या क्षेत्रात हा शोधांचा विस्तार गतीने होतो.[१६]

माणसाचे जीवनमान सुधारण्यासाठी संवादमाध्यम हे फार महत्त्वाचे साधन आहे. गेल्या दहा वर्षात संवादमाध्यमाने जीवनमान उंचावण्यासाठी फार मोठा हातभार लावला आहे. या क्षेत्रात दिवसेंदिवस मोठी प्रगती होत असल्याने अगदी साधे व स्वस्त तंत्रज्ञान विकसित

झाले आहे. देशाच्या प्रगतीमध्ये संवाद तंत्रज्ञान जोडणीचा मोठा वाटा आहे, यात शंका नाही.

माणसा माणसांमध्ये संपर्क साधण्यासाठी अनेक साधने विकसित झाली. तंत्रज्ञान पद्धतीने हे बदल अतिशय जलद पद्धतीने घडवून आणलेले दिसतात. उमा नरुला यांच्या मते माहिती संवाद तंत्रज्ञान हा केवळ लोकजीवनावर नव्हे तर प्रसारमाध्यमांच्या कार्यपद्धतीवर प्रभाव टाकणारा घटक होय.[१७]

भारतामध्येही तंत्रज्ञानाने संवाद माध्यमांमध्ये अशीच प्रगती साधलेली आहे. टेलिकम्युनिकेशन, रस्ता वाहतूक, बंदरांतील वाहूतक किंवा हवाई वाहतूक सर्वांमध्ये अतिशय कार्यक्षम व वाजवी किमतीत उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाचा वाटा मोठा आहे. पूर्वीच्या राजेशाही, कमी गतीने जाणाऱ्या मोटारींच्या जागी आता जास्त सुंदर, सुबक व तंत्रज्ञानामध्ये फार मोठी प्रगती असलेल्या मोटारींची रस्त्यावर एकच झुंबड उडालेली दितसते. कोळशावर चालणाऱ्या, काळाकुट्ट धूर सोडणाऱ्या वाफेच्या रेल्वे इंजिनाच्या जागी आता इलेक्ट्रीक ट्रॅक्शन इंजिने आली आहेत. पूर्वीच्या अवाढव्य टर्बो इंजिन असलेल्या टर्बो विमानांच्या व बायप्लेच्या जागी आता आकाशात फ्लाय-बाय-वायम विमाने फिरताना दिसतात.

## ३.६ भारतीय माहिती तंत्रज्ञानाची प्रगती व वाटचाल

विविध पंचवार्षिक योजनांच्या काळात भारतामध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कोणत्या दिशेने प्रयत्न झाले त्याचा आढावा घेणे उचित ठरू शकतो. असा आढावा घेताना प्रत्येक टप्प्यात कोणते महत्त्वाचे बदल घडून आले त्याची नोंद घ्यावी लागेल.

भरताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा संपूर्ण देशात फक्त ३०० टेलिफोन एक्सचेंज होती. फक्त ८३०० टेलिफोन कनेक्शन सर्व देशात होती, आज भारतात आशिया खंडात सर्वात मोठे टेलिकॉम नेटवर्क आहे ही अभिमानास्पद गोष्ट आहे. १९४८-४९ मध्येच नवीन एक्सचेंज सुरू करण्यास सुरूवात झाली. व्हॉइस टेलिग्राफ सिस्टिम, चॅनेल सिस्टिम सुरू केली गेली. दिल्लीमध्ये २००० लाईनचे एक एक्सचेंज सुरू झाले. प्रमुख ट्रॅक रूटवर बारा चॅनेलची एक कॅरिअर सिस्टिम उभारण्यासाठी पाहणी केली गेली. सर्व देशभर प्रमुख शहरांना जोडणारी ट्रॅक केबल पद्धती उभारण्यासाठी प्रयत्न सुरू झाले.[१८]

१९५१ नंतर नेटवर्कमध्ये सुधारणा होऊन शहरात व ग्रामीण भागात, अगदी मागास भागत टेलिकम्युनिकेशन पोहोचण्यास सुरुवात झाली. दूर अंतराचे सार्वजनिक टलिफोन, टेलेक्स, एस. टी. डी. फोनने देशामध्ये व परदेशाशी संपर्क साधता येऊ लागला. नंतर फॅक्स पद्धतीने माहितीचे आदानप्रदान सुरू झाले.पहिल्या पंचवार्षीक योजनेमध्येच नेटवर्कमध्ये मोठे बदल झाले. मुंबई, दिल्लाी ,कलकत्ता , मद्रस ,पुणे ,कानपूर, अहमदबाद वगैरे शहरामधील एक्सचेंज स्वयंचलीत करण्याचे प्रस्ताव आले. या एक्सचेंजचे नुतनीकरण करून विस्तार करण्याचे ठरले. मोठ्या शहरांना जोडणारे १२ चॅनलचे कॅरिअर उभारले गेल. पाच हजार व त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात एकतरी टेलिग्राफ ऑफिस असावे अशी योजना तयार झाली. प्रत्येक शहरामध्ये, मुख्यालयातून व सबडिव्हिजनमधून सार्वजनिक टेलिफोन सुरू करण्याचे ठरले गेल. हळूहळू छोट्या शहरांमधून व ग्रामीण भागातूनही सार्वजनिक टेलिफोन सुरू करण्याचे ठरवले गेले. दुसऱ्या पंचावार्षिक योजनेच्या काळात पॉइंट टू पॉइंट सबस्क्राइबर ट्रंक डायलिंग (एस.

टी. डी.) सेवा सुरू झाली. या काळात तंत्रज्ञनामध्ये प्रगती झाली होती. नंतर ट्रंक ॲटोमॅटिक एक्सचेंज पद्धतीने सर्व देशभर ही सेवा सुरू झाली.[१९]

तिसऱ्या योजनेत पेंटा कोंटा क्रॉस बार एक्सचेंज, मायक्रोवेव्ह पद्धतीने व टेलेक्स सेवा सुरू झाली. १९७९ व १९८० सालामध्ये उपग्रहाद्वारे संपर्क सुरू होऊन एका नव्या युगाची सुरूवता झाली. सहाव्या योजनेत एसपीसी इलेक्ट्रॉनिक अनॉलॉगग एक्सचेंज सुरू झाली व डिजिटल इलेक्ट्रॉनिक एक्सचेंजची वाट सुकर झाली.[२०]

नंतरच्या दोन योजनांतून टेलिकॉममध्ये फार मोठे बदल घडून आले. १९९७ मध्ये नेटवर्कमध्ये ८७ लक्ष टेलिफोन लाईन होत्या. १ एप्रिल ९२ मधील संख्येपेक्षा ही दीडपटीने जास्त होती. पुढील दहा वर्षांच्या योजनेमध्ये दर शंभर माणसांमागे १.५ टेलिफोन देण्याची योजना आखली आहे. ३१ ऑगस्ट १९९९ रोजी देशात २ कोटी २३ लाख ९० हजार टेलिफोन होते. यंत्रणेची टेलिफोन देण्याची क्षमता २ कोटी ६८ लाख होती. सध्याच्या योजनेतील टेलिडेन्सिटी २.२८ इतकी झालेली आहे असे टेलिकॉम विभागाच्या आकडेवारीवरून दिसते. मार्च ९९ मध्ये मान्यता मिळालेल्या नवीन टेलिकॉम पॉलिसीमध्ये ही डेन्सिटी टेलिघनता २००५ पर्यंत ७ व २०१५ पर्यंत १५ इतकी ठेवण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. ग्रामीण विभागात इसवीसन २००७ पर्यंत दर हजारी एक इतकी घनता असेल. सातव्या योजनेच्या शेवटी म्हणजे सन २००२ पर्यंत प्रत्येक खेड्यात कमीतकमी एक टेलिफोन देण्याचे उद्दिष्ट आहे.[२१]

इंटरनेट, मोबाईल फोन व उपग्रह संपर्क यंत्रणेमुळे टेलिफोन मागणीमध्ये, वापरामध्ये क्रांतिकारक बदल झाले आहेत. मायक्रोवेव्ह व ऑप्टिकल फायबर पद्धती आज नेहमीच्या

परिचयाचे शब्द झाले आहेत. माहिती तंत्रज्ञानामध्ये इतका विकास होत आहे की योजनेमध्ये ठरवलेली उद्दिष्ट्ये पुन्हा तपासून नवीन लक्ष्य बनवावे लागणार आहे. इंटरनेच्या वाढत्या प्रसारासाठी व माहिती तंत्रज्ञानाच्या इतर सेवांकरिता पुरेशी बॅण्ड लांबी उपलब्ध करून देणे गरजेचे झाले आहे. इंटरनेट सुविध प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न चालू आहेत. इंटिलिजंट नेटवर्क टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्याचा विचार आहे. पहिल्या टप्प्यात मोठी नऊ महानगरे व दुसऱ्या टप्प्यात उर्वरित देशभर हे नेटवर्क पसरले जाईल. संपर्कासाठी अतिशय विश्वसनीय माध्यमाची जरूरी आहे. ऑप्टिकल फायबरची उपलब्धता करवून देणे त्याकरिता अतिशय गरजेचे आहे.[२२]

## ३.७ ग्रामीण संपर्कसेवा व वर्तमानपत्र

दूरध्वनी क्षेत्रातील प्रगतीपर्व, त्याचा लाभ वृत्तपत्रांना सुद्धा झाला आहे. खाजगी क्षेत्राचे आगमन होऊनही ग्रामीण क्षेत्रातील टेलिफोन नेटवर्कमध्ये वाढ झालेली नाही. सरकार आता ग्रामीण भागात सार्वजनिक टेलिफोन उपलब्ध करवून देण्यासाठी योग्य पावले उचलत आहे. मल्टिॲक्सेस रेडिओ रिले पद्धतीचा वापर करून हे टेलिफोन दिले जातील. ग्रामीण पार्श्वभूमी लक्षात घेऊन एअरकंडिशनची जरूरी नसणारी, गरम हवेत कार्य करू शकतील अशी स्वीच बनविण्याचे प्रयत्न चालू आहेत. रेडिओ सिस्टिम व इतर यंत्रे भारतातच बनवण्याचा खर्च बराच कमी असतो, त्यांना परीक्षा कमी लागते.

टेलिफोन क्षेत्राची प्रगती टेलिफोनच्या संख्येत बोलायचे तर प्रचंड झाली आहे. ऑगस्ट ९९ अखेरी देशात २५१५० टेलिफोन एक्सचेंज होती व त्यांची क्षमता २६०८ दशलक्ष लाइन इतकी होती. डायरेक्ट एक्सचेंज लाईन २२.३ दशलक्ष होत्या. ग्रामीण

भागात ३.४२ दशलक्ष सार्वजनिक फोन होते. ट्रंक अॅटोमॅटिक एक्सचेंजची क्षमता १.४७ दशलक्ष लाईन होती. मायक्रोवेव्ह व अल्ट्रा हाय फ्रिक्वेन्सी, ट्रान्समिशन १.५२ दशलक्ष रूट किलोमीटर होते. एसटीडी सुविधेमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. सर्व ५६५ जिल्ह्यांच्या ठिकाणांना एसटीडी सुविधा उपलब्ध आहे. एकूण १८७३७ स्टेशनांकरिता ही सुविध मिळू शकते.[२३] परंतु विकासाचे खरे उद्दिष्ट टेलिकॉम यंत्रणेचा लाभ समाजाच्या सर्व थरातील लोकांना अगदी सामान्य माणसाला मिळाला पाहिजे हे आहे. ही घटना मिळवणं कठीण असले तरी शहरी विभागात दर ५०० लोकांमागे एक सार्वजनिक टेलिफोन व राष्ट्रीय महामार्गावर दर दहा किलोमिटरवर एसटीडी सुविधा असलेला एक सार्वजनिक टेलिफोन नवव्या याजनेअखेरपर्यंत देण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

टेलिकॉम सुविधा अधिक कार्यक्षम बनवण्यासाठी काही उपाय योजले पाहिजेत. कालबाह्य झालेली यंत्रणा काढून टाकून त्या जागी डिजिटल स्विच व इतर यंत्रणा बसवली गेली पाहिजे, जिथे जिथे माणसांकडून प्रचालन केलेली ट्रंक सेवा आहे त्याजागी संगणकाद्वारे कामे चालू झाली पाहिजेत. केबल नेटवर्कचे कामसुद्धा संगणकावर आले पाहिजे. पॅकेट स्विच्ड पब्लिक डेटा नेटावर्क (PSPDN) व हायस्पीड व्हेरी स्मॉल अपरचर टर्मिनल (VSAT) नेटवर्क, ए. टी. एम. नेटवर्क व विस्तारित इंटरनेट नेटवर्क या सुधारणा त्वरित होणे आवश्यक आहे.[२४]

इंटरनेट, मोबाइल व मल्टिमिडिया सेवा केवळ सार्वजनिक क्षेत्राकडून दिली न जाता खाजगी क्षेत्राकडून आता सेल्यूलर मोबाईल फोन, रेडिओ पेजिंग, इलेक्ट्रॉनिक मेल, व्हाईसमेल, व्हिडिओ कॉन्फरन्स, ऑडिओ टाय इंटरनेट, पब्लिक मोबाईल रेडिओ ट्रंक

सर्व्हिस व क्लोज युझर ग्रूप सार्व्हस या सेवा व्हीएसटीद्वारे दिल्या जातात.[२५]

## ३.८ माहिती तंत्रज्ञानाची लक्ष्य व कार्य

भारतामध्ये भूतपूर्व पंतप्रधान राजीव गांधी यांच्या काळापासून प्रगत माहिती तंत्रज्ञानाची लक्ष्य गाठण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम हाती घेण्यात आला. सॉफ्टवेअर क्षेत्रात भारतीय तंत्रज्ञांनी एक नवी गरुड झेप घेतली आहे. तथापि लक्ष्यपूर्तीच्या बाबतीत आपली गती तुलनेने कमी पडत आहे की काय, अशी शंका व्यक्त केली जाते. भारतीय सॉफ्टवेअर तंत्रज्ञानामध्ये मौलिक तंत्रज्ञानाचा अभाव, नवीन पॅकेज निर्मितीमधील अडचणी तसेच समन्वयाचा अभाव अशी प्रमुख कारणे सांगितली जातात. जागतिक बाजारपेठेतील माहिती तंत्रज्ञानाचे कल समजून घेण्यात आणि त्यानुसार कुशलतेने पावले टाकण्यास आपले धोरण अधिक प्रभावी करण्याची गरज आहे. भारत अमेरिकन बाजारपेठेवर गरजेपेक्षा अधिक अवलंबून आहे अशी टीकाही केली जाते. तसेच प्रत्येक घराघरात संगणक पोहोचविण्यात आपली गती मंद आहे. रंगीत दूरचित्रवाणी संच घेणारे एक हजारात ३०० लोक आहेत. तर संगणक खरेदी करणारे तुलनेने फारच कमी आहेत.[२६]

भारतामध्ये माहिती तंत्रज्ञानाची शिक्षण देणारी संस्था आणि त्यांची कार्यपद्धती यात अधिक गतीने बदल करण्याची गरज आहे. तसेच नवे तज्ज्ञ विकसित करण्यासाठी आणि जीवनाच्या विविध क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी दमदार अशी पावले उचलण्याची गरज आहे.

## ३.९ नवे प्राधान्यक्रम

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताला आशियाई तसेच विकसनशील देशातील नव्या

बाजारपेठांचा शोध घ्यावा लागेल आणि त्यानुसार आपल्या क्षमतांचा विकास करावा लागेल. त्यासाठी पोषक अशा निधीची तरतूद करणेही गरजेचे आहे.

विकसित तंत्रज्ञानाचे फायदे विविध प्रकारचे असतात, परंतु दीर्घ मुदतीच्या फायद्यासाठी अल्पकाळात पैसा खर्च करणे नेहमीच मान्य होत नाही. तरीही पायाभूत सेवांच्या निर्मितीसाठी व परीक्षेसाठी नवीन आधुनिक तंत्रज्ञान वापरले गेले पाहिजे ही गोष्ट देशाने मान्य केली आहे. पायाभूत सोयींच्या विकासात अनेक प्रकारच्या अडचणी असल्या तरी त्यावर मात करून गेल्या दहा वर्षात संवाद साधनांमध्ये फार मोठी प्रगती झाली आहे ही बाब अभिमानाची आहे. आपल्या आवडत्या कुटुंबातील माणसांपर्यंत संपर्क साधण्यासाठी साधने परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध आहेत व अंतर कितीती असले तरी संपर्क साधण्यास काही अडचण येत नाही ही गोष्ट माहीत झाल्याने देशातील असंख्य लोकांना आंनद झाला आहे. जसजशी आणखी प्रगती होत जाईल तसतशी संवाद साधण्यासाठी खर्च कमी येईल व वेळ वाचेल. त्यावेळी देशाची एकूण प्रगती होण्यास हातभार लागेल.

डॉ. ग. म. रेगे म्हणतात, विचारप्रसारणाची साधने सतत बदलत असतात. त्याचा सर्व घटकांवर परिणाम होतो. या परिवर्तनाचे कारणे अनेक असू शकतात.[२७] या संबंधात माध्यम व श्रोता यांचे परस्पर अनुबंध लक्षात घेण्यासाठी करावयाचे प्रयत्न कसे असावेत याबाबत डॉ. रेगे म्हणतात, 'विविध माध्यमांचा वापर करण्यापूर्वी त्यांच्या संबंधित उपलब्धतेबद्दल वाचकप्रेक्षक वर्गाच्या माध्यम संबंधाच्या आवडी-निवडीबद्दल माध्यमांच्या परस्पर संबंधित गुणदोषाबद्दल व माध्यमांची उचित निवड त्याची योग्य वेळ जेणे करून त्यांची पोच नियोजित ध्येयानुसार विचारप्रसारणार्थीपर्यंत होण्यासाठी एक पूर्व प्राथमिक सर्वेक्षण करण्याची

गरज असते.[२८]

डॉ. राजेंद्र महामुनी यांच्या मते, इंटरनेटवर आपण व्यंगचित्रे, छायाचित्रे, सर्व काही प्राप्त करू शकतो.[२९] इंटरनेटमुळे आपणास पाहिजे त्याप्रकारचे ज्ञान व मनोरंजन सहजपणे उपलब्ध होते. अलिकेकडे टेलिव्हिजन रेटिंग पॉईंट यासारख्या तंत्रामुळे चित्रवाणी माध्यमाच्या श्रोत्यांपुढे कोणत्या आवडी-निवडी आहेत याबाबतचे संशोधन सुद्धा आपण प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे करत आहोत. कार्यक्रमाची लोकप्रियता पडताळून पाहणे आणि त्यात बदल करणे या कामीसुद्धा माहिती तंत्रज्ञानाचा यथोचित उपयोग केला जात आहे. त्यामुळे माध्यमांच्या विश्वात माहिती तंत्रज्ञान गुणात्मक वृद्धीसाठी नवे वरदान ठरत आहे.

डॉ. राजेंद्र महामुनी म्हणतात, एकविसाव्या शतकात प्रवेश करणाऱ्या मानवाच्या आयुष्यात खूप मोठे बदल दररोज होत आहेत. सतत गतिमान होणाऱ्या आयुष्यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा एवढ्याच गरजा भागवून चालत नाही, तर या खेरीज आणखी काही गोष्टींची निकड असते. शिक्षण, करमणूक आणि माहिती या आधुनिक मानवाच्या प्राथमिक गरज झाल्या आहे. [३०] या अनुषंगाने माहिती तंत्रज्ञानाचा योग्य पध्दतीने वापर करून प्रसार माध्यमांना लोकाभीमुख करण्याची गरज आहे. नवीन सहस्त्रकात संपूर्ण जग हे एका खेड्यासारखे लहान झाले आहे आणि त्यामध्ये शिक्षण व मनोरंजन या कार्यासाठी सुद्धा माहितीची नितांत आवश्यकता आहे. अशी माहिती अचूक, संक्षेपाने आणि नेमकी असेल तर समाजाच्या प्रगतीसाठी ती वरदान ठरू शकते. या सर्व बाबतीत यथायोग्य पावले टाकल्यास माहिती तंत्रज्ञान भारताला जागतिक बाजारपेठेत प्रस्थापित करण्यासाठी आणि भारतीय उद्योगधंद्यांना नवीन बाजारपेठ मिळवून देण्यासाठी वरदान ठरू शकते. भारताचे

नवे निर्यातधोरण आणि मनोरंजन उद्योगात भारतीय चित्रपटांचा वाढता दबदबा पाहता प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेती, उद्योग, मनुष्यबळ विकास आणि मनोरंजन इत्यादी क्षेत्रात सुद्धा भारत नव्या बाजारपेठांचा शोध घेऊ शकतो. त्यासाठी इंटरनेट, ई-कॉमर्सद्वारे भारतीय वस्तू व सेवांना नवी बाजारपेठ मिळवून देणे अगत्याचे आहे.

## ३.१० इंटरनेट युगातील वृत्तपत्रे : नवे प्रवाह

प्रा. ब्ल्युमेथॉल म्हणतात, महानगरात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाचं घर आता माध्यम कक्ष बनलेलं आहे अशा वेळी नव्या विचारप्रसारण युगामध्ये एकविसाव्या शतकात जगभरातील वृत्तपत्रांचे व्यक्तिमत्व संपूर्णपणे पालटत आहे या नव्या युगातील वृत्तपत्रांचा बदलता चेहरा कसा असेल या विषयीची ही चर्चा नवी दिशा देऊ शकते.

एकविसाव्या शतकामध्ये सबंध जगभरात एक नवी संज्ञापन क्रांती दृष्टीपथात आली आहे. कृषी क्रांती आणि उद्योगक्रांती पेक्षाही माहिती क्रांतीला विशेष महत्त्व आहे कुठल्याही वृत्तपत्रामध्ये नव्या सहस्त्रकात किती माहिती क्षमता आहे, यावरच वृत्तपत्राचे भवितव्य अवलंबून असणार आहे. माहितीची उपलब्धता सहजपणे होत असताना आता वृत्तपत्रांना आपला आशय अधिक सखोल व सधन करण्यावर भर देण्याची गरज आहे॰ रंगीत मुद्रणाबरोबरच वार्ता विषयांची विविधता आणि उद्‌बोधकता यावर भर द्यावा लागेल. मानवी आस्थेचा इंद्रधनुष्य फुलविताना आता भाषिक वृत्तपत्रांना अनेक नवनवीन उपक्रम हाती घ्यावे लागणार आहेत. त्यामुळे भाषिक वृत्तपत्रे जशी समृध्द होतील तशी ती मांडणी व सजावटीच्या दृष्टीनेही अधिक आकर्षक आणि सर्वांगसुंदर होऊ लागतील. याचा प्रत्येय आज प्रत्येक दैनिक उघडले असता त्यातील प्रत्येक पान व प्रत्येक सदर वाचताना येतो.

कुठले ही प्रसार माध्यम हे अधिकाधिक लोकांच्या पसंतीला उतरावयाचे असेल तर त्यांच्या उपयोजनामुळे श्रोता, प्रेक्षक वा वाचकांची ज्ञानपातळी किती वाढते याला विशेष महत्त्व येत आहे. वृत्तपत्रे आपल्या नित्य अंकासोबत विविध गृहपत्रे स्वरूपातील सामुग्री देत आहेत. त्याचा हेतू दुहेरी स्वरुपांचा आहे एक तर आपल्या वाचकांचे लक्ष विचलित न होऊ देणे हा त्यामागे एक प्रधान हेतू असतो व दुसरे म्हणजे जनसेवा दृष्टिने वृत्तपत्रांना पुरेशी उपयुक्त माहिती वृत्तपत्रे देऊ शकतात! मल्याळम मनोरमा मंगलम तसेच इनाडू ही वृत्तपत्रे आपल्या रोजच्या अंकात नित्य नवे ज्ञान मिळते तसेच त्यांचे गुणात्मकदृष्टीने सकस व दर्जेदार मनोरंजनही घडते! वृत्तपत्रांची ही साहित्यिक आवृत्ती म्हणजे सात्याहिक प्रत्रकारिता समृद्ध होत असल्याचे दिसून येते. ही साहित्यिक पत्रकारिता इंटरनेट युगात अधिक वाढणार आहे कारण वाचकांच्या पसंतीला उतरताना त्यांना माहिती देणे विश्लेषण करणे व शिक्षण देणे याच प्रमाणे रंजन करणे यालाही अधिक महत्त्व येत आहे. त्यासाठी साप्ताहिकाची पुरवणी ही तुलनात्मक दृष्टीने मनोजरंजन समीक्षा करण्यात पोषक ठरते.

## ३.११ रंगती दूरचित्रवाणीशी स्पर्धा

इंटरनेट युगातील वृत्तपत्रांना रंगीत दूरचित्रवाणी वाहिन्याशी स्पर्धा करताना बहुरंगी मुद्रणावरभर द्यावा लागत आहे. वाचकवर्ग केवळ वर लीया रंगा भुलणार नाही, गरज आहे ती गुणात्मक मूल्यभेद दृष्टीची त्यासाठी वृत्तपत्रांना केवळ वरवरची माहिती न देता सखोल असे सामान्य ज्ञान आपल्या वाचकांना प्रदान करावे लागेल. इंझरो म्हणजे इंडीयन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशनच्या सामाजिक शास्त्र विभागाने अलीकडे एक सखोल पाहणी केली

त्यात असे आढळून आले आहे की, दूरचित्रवाणी पाहाणाऱ्यांचे सामान्य ज्ञान हे जास्त असते महानगरातील वाचक टी. व्ही. ही पाहतो आणि वृत्तपत्रही वाचतो मग अशा वाचकांची ज्ञानतृष्णा भागविण्यासाठी वृत्तपत्रांना अधिकाधिक प्रमाणात नवनवे ज्ञान संपादन करावे लागते आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे.

वाचकांना सभोवतीचा इतिहास भूगोल तसेच पर्यटन संस्कृती उत्सव आणि ज्ञान-विज्ञानाची माहिती अपेक्षित असते. वृत्तपत्ररूपी ज्ञानाचा खनिजा जर लुटावयाचा असेल तर त्यामध्ये सकळ विद्या कला आणि ज्ञान शाखांचा अंतर्भाव करायला हवा त्यामुळे अधिकाधिक वाचकांचे  समाधान वृत्तपत्रे करू शकतील॰ आपल्या वाचकांच्या सतत वाढत असलेल्या माहितीविषयक गरजांची पूर्तता आता वृत्तपत्रांना योजकतेने करावी लागणार आहे. दुरचित्रवाणी माध्यमास इडीट बॉक्स म्हटले जाते पण आता त्यामुळे सामान्य जनतेची ज्ञानपातळी सहजपणे वाढत आहे. या गुजरातमधील खेडा जिल्हातील शेतीविषयक नवे प्रयोग करण्यात आले त्यासाठी लोककलावर आधारित कृषि कार्यक्रम सादर करण्यात आले. दिल्ली जवळच्या छत्तेरा यागावी हिदुस्थान टाईम्स या वृत्तपत्राने विकास वार्ताचा. आता वृत्तपत्रे शेती व विकास, कार्यक्रमाबरोबर वृत्तपत्रात आरोग्यविषयक नवि सदरे प्रकाशित होत आहेत.

आरोग्य प्रश्नांची जाणीव प्रसार माध्यमामुळे होत आहे॰ गावातील टी.व्ही. पाहणाऱ्या अनेक प्रेक्षकांना मलेरिया, कॉलरा इत्यादी सामान्य रोगाची माहिती होत असते. या रोगांची लक्षणे व उपाय यांची जाण होते. लक्षणे कळल्यानंतर लसीकरण योजनेचा लाभ घ्यावा असेही त्यांना वाटते आता अनेक वृत्तपत्रे सुद्धा नित्य आरोग्य स्तंभ प्रकाशित करत

आहेत. महाराष्ट्र टाइम्स या दैनिकामध्ये आरोग्य पत्रिका हा स्तंभ त्यातील उपयुक्त माहितीमुळे लोकप्रिय झाला आहे. औरंगाबाद आकाशवाणी केंद्रावरील निरामय जीवन या आरोग्य सदराची अनुक्रमे आवड सतत वाढत आहे.

शेतीमध्ये शेतकऱ्यांना संकरित बियाणे खंताचा वापर करण्याच्या बाबतीतही टीव्हीवर योग्य मार्गदर्शन मिळते. जमिनीचे मसागत व सर्वधन कसे करावे, कश व पत कशी वाढवावी. प्रतवारी कशी सुधारावी याबाबत माध्यमे दिशा दर्शन करतात. खताचा उत्तम प्रकारे वापर केला तर उत्पादनातही वाढते.

दूरचित्रवाणी पहिल्याने ६९ टक्के लोकांना रोजगार संधी बाबात माहिती मिळते. हे या माध्यमाचे यशच होय वृत्तपत्रांनाही या बाबत पुढाकार घ्यावा लागेल. टी.व्ही. न पाहाणाऱ्या लोकापेक्षा ते पाहणाऱ्या लोकांचे सामान्य ज्ञान जास्त असते ही बाब आता सिध्द झाली आहे. तेच सूत्र वृत्तपत्र माध्यमासही लागू करता येईल. वृत्तपत्रांनी जर दूरचित्रवाणीशी स्पर्धा करण्याचे ठरविले तर त्यांना आपल्या आशय व अभिव्यक्तीत बदल करणे भाग आहे.

## ३.१२ मूलगामी सूत्रे

दुरचित्रवाणी माध्मयाबरोबरच भारतीय वृत्तपत्रांना इंटरनेटशी स्पर्धा करावयाची आहे त्यासाठी आता भाषिक वृत्तपत्रांना पुढील ३ सुत्रे कृतीत आणावी लागतील.

१) वाचकांना अधिकाधिक प्रमाणात सहभागी करून घेण्यासाठी आता अनेक नवनवीन कल्पक उपक्रमांची भाषिक वृत्तपत्रांना आखणी करावी लागेल. त्यामध्ये स्वतःच्या पहिल्या पानावर एखाद्या प्रश्न देऊन त्याबाबत वाचकांची मते आलेखाच्या साह्याने प्रकाशित

करावी लागतील. सध्या इंग्रजी वृत्तपत्रे हा उपक्रम करत आहे. भाषिक वृत्तपत्रांना असे पाऊल टाकावे लागेल.

२) काही कल्पनांचा यथार्थपणे पुरस्कार करताना त्यांचा पाठपुरावा करावा लागतो. इंटरनेट युगातील वृत्तपत्रांना आता नवनवीन शोध कल्पनांचा सतत पाठपुरवा करावा लागेल.

केवळ रुक्षपणे माहिती देण्यापेक्षा माहितीचे विश्लेषण करण्यावर भर द्यावा लागणार आहे. अनेक वृत्तपत्रे पहिल्या पानावर वृत्तविश्लेषण सादर करून नवीन तथ्ये प्रकाशित करण्यावर भर देत आहेत.

३) सभोवतीच्या परिस्थितीत संपूर्ण बदल व्हावा या अनुरोधाने करावयाचे प्रयत्न पाहाता दूरचित्रवाणी इंटरनेटपेक्षा वृत्तपत्रे अधिक सक्षमपणे दमदार भूमिका बजावू शकतात सामान्य माणसाचे प्रश्न लक्षात घेऊन, सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना अनुयार्थ लावावा लागेल. तसेच सांस्कृतिक परिवर्तनाचे प्रवाह या बाबत स्थानिक भाषिक पत्रे जेवढी रचनात्मक भूमिका पार पाडतात तेवढी भूमिका इंटरनेट व दूरचित्रवाणी पार पाडू शकत नाही इंटरनेटसारखे खर्चिक माध्यम सामान्य माणसाला कसे परवडणार, त्यामुळे भारतासारख्या राष्ट्रात जागतिकरण्याच्या युगात सुध्दा स्थानिक वृत्तपत्राचे महत्त्व कायम राहणार आहे. या पत्रांनी आपला आशय, मांडणी, मुद्रण तसेच सादरीकरण याबाबतीत नवी पाऊले टाकण्याची गरज आहे. आपले वृत्तपत्र परिपूर्ण व सर्वसमावेशक बनावे म्हणून भाषिक वृत्तपत्राने चांगली पुर्व तयारी केली असता या वृत्तपत्रांचे अंर्तरंग व बाह्यरंग यामध्ये बदल घडू शकतात.

संगणकावर उपलब्ध होत असलेल्या वृत्तपत्रांच्या वेब आवृत्तीमुळे त्यांना लेखणीविना Pen less व कागदाविना Paper less वृत्तपत्रे असे म्हटले जाते. ऑनलाईन आणि ई-पत्रकारिता प्रामुख्याने खाली वैशिष्टावर आधारलेली असते.

१) संगणकाचा वार्ता संकलन व संपादनासाठी वापर प्रामुख्याने केला जातो.

२) ग्राफीक्स म्हणजे आरेखन तंत्राचा वापर योजकतेने केला जातो छायाचित्रे व जाहिरातीच्या अन्ननही या सुविधाचा उपयोग केला जातो.

३) ऑनलाईन पत्रकारितेमध्ये माहितीचे प्रसारण करताना व्हिजुअल कम्युनिकेशन तंत्राचा वापर यथार्थपणे केला जातो.

४) ज्ञान आणि माहितीचे सादरीकरण करताना वेबसाईटचा विकास केला जातो.

५) वृत्तपत्राची ही जगभर कुठे ही इंटरनेटवर उपलब्ध असतो. त्यामुळे स्थानिक पत्र वैश्विक बनते.

६) ई-पत्रकारितेमध्ये लेख वार्ता आणि विविध माहितीचे आदान-प्रदानही वेबसाईटद्वारे घडते. त्यामुळे विचारांचे भेट आदान-प्रदान घडते.

७) वेब वृत्तपत्रामध्ये दिवसभरता अनेक वार्ता या वारंवार अपडेट करता येतात व काळानुरूप वेब आवृत्ती ही वाचकांना अद्ययावत माति देत असते.

८) विविध लेख व वार्ता तसेच पहिल्या पानावर विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे मिळवून ती माहिती तत्काळ संकलीत करून उपलब्ध करून देता येते. वाचकांचा थेट सहभाग हे ऑनलाईन पत्रकारितेचे वेगळेपण होय.

**वेबसाईटचा विकास -** वेबसाईटचा विकास करत असताना पुढील बाबी प्रामुख्याने लक्षात घ्याव्या लागतात.

१) वेबसाईटचे संकलन करताना सामुग्रीचे शास्त्रीय विश्लेषण करावे लागते हे काम कंटेट ॲनॅलिस्ट करतात.

२) प्रत्येक वेबसाईटची सजावट करताना हक्क प्रतीकांचा समर्पक वापर करावा लागतो व त्यासाठी व्हिज्युअल आर्टीस्टचे साहाय्य घेतले जाते.

३) कमी जागेत अधिक चांगली माहिती उपलब्ध करून देणे ही बाब वेबसाईट संपादनात महत्त्वाची असते.

४) संस्थेच्या इतिहास विकास आणि वाटचाल याचे दर्शन घडविताना पध्दतशीर माहिती संकलन करणे अगत्याचे ठरते.

५) वेबसाईट तयार कताना विविध छायाचित्रे, नकाशे, दूरध्वनी क्रमांक इ. तपशील ही देता येतो.

६) आंतरक्रिया घडवून आणण्यासाठी इंटरेक्टीव्ह वेबसाईट याही अलीकडे लोकप्रिय होत आहेत.

७) उत्तम वेबसाईटची निर्मिती करणे हे कलात्मक सृजनशील कार्य करणारे अनेक समूह व्यावसायिक पातळीवर पुढे येत आहेत.

ऑनलाईन पत्रक्षकारिता ही शोधक व विश्लेषणात्मक रूपघेऊन नकाशे प्रकट होत आहे. विविध व्यक्ती व संस्थायांची माहिती समाजाला उपलब्ध करून देण्यासाठी वेबसाईट या साधनाचा अधिक गतीने वापर होत आहे. प्रत्येक वृत्तपत्र आपली वेब साईट आवृत्ती

विकसित करण्याचा प्रयत्न करत असताना आपल्या दूरवरच्या वाचकांच्या आवडी-निवडी लक्षात घेऊन विचार प्रसाराचे कार्य करत आहेत. उत्तम वेबसाईटचा विकास ही एक कलात्मक अभिव्यक्तीची कला होय.

## ३.१३ नवे स्वागतार्ह प्रवाह

अनेक छोटी दैनिके माध्यांमाच्या जगात स्वतःचे स्थान निर्माण करत आहे आणि सायंकाळची वृत्तपत्रे ही इंटरनेटयुगात अधिक सखोल आणि अधिक संपन्न बनत आहेत. वैविध्यपूर्ण आणि तेवढाच नित्य नवा आणि आल्हाददायक अशा मजकूर हा वाचकांना नित्य नवा आनंद देत आहे आणि तसेच नवा विचार प्रकाश देत आहे. संध्यानंद सारखा वृत्तपत्राने इंटरनेटवरून बातम्या घेऊन जगातल्या सचित्र बातम्या देऊन इतर वृत्तपत्रे त्याचे अनुरूप करून किमान एक पान मनोरंजक असा मजकुर देत आहे. त्यात लोकरूची वारता, नाविन्यपुर्ण माहिती, अद्‌भुत चमत्कार, नवे शोध, धक्यादायक कल्पना इत्यादिंचा समावेश होत आहे. तसेच इंटरनेटवरून या वार्ताची छायाचित्र उपलब्ध होत असल्यामुळे त्यांचे अद्‌भुत असे रूप वृत्तपत्रावर सचित्र क्रूप पाहवयास व वाचण्यास मिळत आहे. अमेरिकेतील वृत्तपत्रांचा चमत्कार आता भारतीय वृत्तपत्रात सुद्धा झपाट्याने दिसून येत आहे. नवीन सहस्त्रकांत वार्तामुल्य बदलत आहे, बातम्यांचे विषय बदलत आहे. तसेच त्यांच्या सादरीकरण्याच्या पद्धतीही वेगाने बदलत आहे. प्रत्येक दिवस दुरचित्रवाणी व इंटरनेटच्या युगात नवे चैतन्य घेऊन येत आहे. तद्वत वृत्तपत्रात नवे बदल घडत आहे.

आपले वृत्तपत्र हे सर्वांगसुंदर व परिपूर्ण व्हावे असे वाचकांना वाटते केवळ माहितीची खोगीरभरती करून वृत्तपत्रांचे भवितव्य उज्वल होणार नाही हे वेळोवेळी सिध्द झाले आहे.

माहितीचे आकर्षक पॅकेजिंग करून तिचे उत्तमपणे सादरणीकरण केले तर अशी वृत्तपत्रे अधिक प्रभावी होऊ शकतात. असे परिपुर्ण वृत्तपत्र स्थानिक वाचकाला रोज नवा आनंद देते त्याच प्रमाणे त्यांची इंटरनेट आवृत्तीसुद्धा जगभरातील वाचकाला नवे ज्ञान देऊ शकते.

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की इंटरनेट युगातील वृत्तपत्रे ही नित्य नव्या ज्ञानयुगातील एक समृद्ध अविष्कार बनत आहेत. या पत्रांना आशय व अभिव्यक्ती या दोन्ही अंगानी आपला दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करायला हवा. इंटरनेटचा भाषिक पत्रावर काहीही परिणाम होणार नाही असे म्हणण्यात अर्थ नाही या पत्रांनीही इंटरनेट सामुग्रीचा सुलभ व सुबोधपणे लाभ घेतला तर ही वृत्तपत्रे ज्ञान, शिक्षण व मनोरंजन यात समतोल साधून अधिक आकर्षित व मनोरंजक बून शकतात.

दर्जेदार आशय व बहुरंगी सादरीकरण यातून इंटरनेट युगातील भाषिक पत्रे अधिक देखणी व संग्राह्य बनत आहेत यात संदेह नाही इंटरनेटच्या आगमनाने वृत्तपत्राची रचना व मांडणी यात क्रांतिकारक बदल होत आहेत. तसेच वृत्तपत्रांचे सौदर्यशास्त्रही बदलले आहे. आता नव्या युगात वृत्तपत्रांनी अधिक लोकाभिमुख होण्यासाठी सखोल माहितीपूर्ण आणि समृध्द असा मजकूर घेऊन वाचकासमोर आले पाहिजे. नवीन सहस्त्रकात वृत्तपत्रांच्या विकासाची दिशा लक्षात घेता भारतीय वृत्तपत्रांचे रूप स्वरूप कसे बदलत आहे हे खालील तक्त्यावरून दिसून येईल.

इलेक्ट्रॉनिक युगातील भारतीय वृत्तपत्राचे बदलते चित्र लक्षात घेता खालील पाच प्रवाह आपणास नोंदविता येतील.

१)  भारतामधील अभिजनवादी वाचकवर्ग महानगरात राहतो आणि हा वाचक इंग्रजी वृत्तपत्रे वाचने अधिक पसंत करतो. कारण त्याला अशी वृत्तपत्रे वाचने प्रतिष्ठा वाटते.

२)  भारतीय भाषेमध्ये मलालम मनोरमा हे वृत्तपत्र अग्रेसर असुन त्याच्या खपाचे गमक केरळ मध्ये सारक्षतेचे असल्याचे दिशते. साक्षर वाचक आणि कल्पक दैनिक यांच्या सुसंवादातून वृत्तपत्राचा ठसा उमटतो.

३)  हिंदी भाषीक पट्टामध्ये वृत्तपत्रात कमालीची स्पर्धाअसून दैनिक भास्कर आणि दैनिक जागरण ही दोन वृत्तपत्रे आघाडीवर आहे. हिंदी वृत्तपत्रेच्या तिव्र स्पर्धेमध्ये वाचकांचा सहभाग ही आवश्यक आहे.

४)  गुजराती, तेलगू, बंगाली, मराठी याभाषेतील वृत्तपत्रे अनेक नवे प्रयोग करून वाचकाला आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी रंगीत मुद्रण, शैलिदार साहित्य तसेच वाचकावर प्रभाव टाकण्यासाठी रोचक सामुग्रीचे संकलन करून ही पत्रे वाचकांच्या पंसतीला उतरण्याचा प्रयत्न करत आहे.

५)  भाषिक वृत्तपत्रेसुद्धा आपल्या स्वतंत्र वेबसाईडची आवृत्ती काढून देशात तसे जगात पसरलेल्या आपला वाचकाला आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहे. याप्रयत्नामुळे त्यांच्या जाहिराती तसेच त्यांच्या उत्पन्नातसुद्धा छपाट्याने वाढ होत आहे.

इंटरनेट युगातील वृत्तपत्रे काळानुसार बदलत आहेत. नवीन सहस्त्रकात नवा माणुस, नवा वाचक आणि नवी संस्कृती या दिशेने भारतीय वृत्तपत्राची वाटचाल चालू आहे. त्यांनी गेल्या तिन दशकापूर्वी डी.टी.पी. व ऑफसेट यंत्राचा स्विकार केला होता आणि

आता इंटरनेट युगात आपली वेब आवृत्ती घेऊन वाचकांच्या सेवेसाठी सज्ज झाली आहे. समृध्द माहिती नवे ज्ञान तसेच नवे विश्लेषण यामुळे या पत्रांचा चेहरा-मोहरा बदल आहे. आणि एक प्रकारची नवी सहस्त्रकांची जाणिव नव्या वार्ता व लेखणांच्या रुपाने प्रकट होत आहे.

## ३.१४ इंटरनेटवरील वेब वृत्तपत्रांचे अद्भूत विश्व

जगातले पहिले वृत्तपत्र १००० वर्षांपूर्वी चीनमध्ये निघाले. त्याचे नाव 'चिंग पाओ' म्हणजे राजधानीतल्या बातम्या असे होते. शासन देशातील वार्ता जनतेला देत असे. ग्रीक संस्कृतीमध्ये ज्युलियस सीझरच्या काळात अक्टाडायर्ना या नावाचे पत्र निघत असे. त्याचा अर्थ रोजच्या घटना असा होतो. जगातले पहिले दैनिक 'मॉर्निंग पोस्ट' हे लंडनहून १७७२ साली सुरू झाले. त्यानंतर दुसरे दैनिक 'लंडन टाइम्स' लंडनहून निघू लागले. आजही ते प्रकाशित होते ते प्रतिष्ठीत पत्र मानले जाते. २९ जानेवारी १७८० या दिवशी जेम्स ऑगस्टस् हिक्कीने बेंगॉल गेझेट हे पहिले साप्ताहिक भारतात कलकत्त्यातून प्रकाशित केले.[३१] त्याचे नाव कलकत्ता जनरल अडव्हरटायझर असे पण होते. जगात ५० कोटी लोक वृत्तपत्र विकत घेऊन वाचतात. जगात सर्वाधिक वृत्तपत्रे आता भारतात निघतात. त्यानंतर अमेरिकेचा क्रम लागतो. रशियातही ८००० पेक्षा अधिक वृत्तपत्रे निघतात व १२ कोटी लोक ती वाचतात. १० लाख प्रतीच्या खपाचा आकडा प्रथम पॅरिसच्या 'लेस पॅटिट जर्नल'ने १८८० साली ओलांडला होता.

जपानमधील असायि शिंबुनचा खप १ कोटीपर्यंत गेला आहे. भारताच्या सर्व महानगरातील वृत्तपत्रांच्या खपापेक्षाही एकट्या शिंबूनचा खप जास्त आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट

म्हणजे या पत्राने आपला अंक प्रथम उपग्रहाद्वारे संगणक व दूरचित्रवाणीच्या पडद्यावर उपलब्ध केला. जगातील सर्वात मोठी वृत्तपत्राची आवृत्ती काढण्याचा विक्रम न्यूयॉर्क टाइम्स या दैनिकाने केला. त्याचा १० ऑक्टोबर १९७१ चा अंक ९७२ पानांचा होता व त्यात १० विभाग होते. तर त्यामध्ये जाहिरातींच्या १० कोटी २० लाख एवढ्या ओळी होत्या. या वृत्तपत्राचे एकूण वजन साडेतील किलो होते व त्यावेळी त्याची किंमत अर्धा डॉलर म्हणजे ५० सेंट एवढी होती.[३२]

हिंदुस्थानात उपग्रह संवादाचा उपयोग करून आपल्या पत्राची आवृत्ती प्रकाशित करण्याचा बहुमान 'द हिंदू' या मद्रासच्या राष्ट्रीय वृत्तपत्राने मिळविला. आज भारतामधील १० लाखांपेक्षा अधिक खप असलेले बहुतेक सर्व वृत्तपत्रे आपली वेब आवृत्ती प्रकाशित करत आहेत. जगातील १०० वृत्तपत्रांमध्ये चीन, जपान व भारत या देशांचा वाटा मोठा आहे. गोविंद तळवळकर यांनी लिहिलेल्या एशियन एजमधील लेखात त्यांनी असे म्हटले आहे की, महामंदिच्या फटक्याने अमेरिका व युरोपातील वृत्तपत्रे डबघाईला लागली आहेत तर भारत व चीनमध्ये म्हणजे आशिया व आफ्रिका खंडात वर्तमानपत्राचा खप वाढला आहे.[३३] आता प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे तिसऱ्या जगात सुद्धा इंटरनेटवर आधारित वेबवृत्तपत्रे प्रकाशित होत आहेत. गणेश मुळे यांनी केलेल्या अभ्यासावरून मराठी भाषेत १२० पेक्षा अधिक वर्तमानपत्रांच्या वेब आवृत्त्या प्रकाशित होत आहेत.[३४] या पार्श्वभूमीवर वर्तमानपत्रांच्या वेबआवृत्त्यांचे विविधांगी लाभ कोणते आहेत ते लक्षात घेतले असता वर्तमानपत्रे त्याकडे का वळत आहेत ते समजू शकते. त्याची या अभ्यासाधारे पुढील तथ्ये मांडता येतील.

## ३.१५ बहुगुणी वेब आवृत्त्या

बहुगुणी अशा वेब आवृत्त्यांचे लाभ अभ्यासकाने खालीलप्रमाणे नोंदविले आहेत. डॉ. वि. ल. धारूरकर म्हणतात,

१) वेब आवृत्ती आकर्षक करण्यासाठी तिची व्हिज्युअल तंत्राने सजावट केली जाते. प्रतिके व चित्रे आकर्षकपणे मांडली जातात.

२) मजकूर माहिती तसेच त्यातील तपशील हा काही तासानंतर सहज अद्ययावत करता येतो.

३) वेब आवृत्तीच्या जाहिरातींचा ग्राचहक हा वैश्विक असतो वस्तू व सेवांना मागणी जगभरातील ग्राहक नोंदवू शकतात.

४) संपादक आणि लेखक यांची मते जाणून घेऊन त्यांच्याशी आंतरक्रिया वाचक सहजपणे घडवू शकतात.

५) इंटरनेट किंवा वेब आवृत्ती ही जगभरच्या वाचकांशी संवाद साधते त्यामुळे पत्राचे भाषिक व सांस्कृतिक ग्राहक सहजपणे त्याकडे खेचले जातात.

६) नित्य नफा ज्ञानास सामोरे जाताना नवी सदरे, नवी माहिती यांचे सादरीकरण अधिक उत्तम प्रकारे सजविता येते.

७) वेब वृत्तपत्र हे त्या भागातील लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनस्तराची ओळख करून देणारी असते.

८) आपले पत्र सातासमुद्राकडे पाठविताना इंटरनेटच्या माध्यमाचा उपयोग केल्यामुळे

वेव वृत्तपत्राची पोहोच उपलब्धता ही क्रांतिकारक मार्गाने वाढते वेब जाहिरातींचा विकास वेब वृत्तपत्रातील जाहीराती तयार करताना तिच्यावैश्तिवक वाचक समोर ठेवला जातो.[३५]

अजय सक्सेना यांनी आधुनिक काळात वेब सजावटीची मूलतत्त्वे कोणती आहेत याबाबत साधार विवेचन केले आहे.

वृत्तपत्रे, ग्रंथ, बाजारपेठ संशोधन या बाबतीत भविष्यकाळात येणाऱ्या संभाव्या बदलाबाबत पूर्वी मार्शल मॅकल्युहान आदिंनी भविष्य कथन केले होते; पण आता माहितीच्या महाजालामुळे या सर्व क्षेत्रात स्वप्न साकार होत आहेत. इलेक्ट्रॉनिक प्रकाशन व्यवसायात वर्तमानपत्रे, मासिके, ग्रंथ यांची निर्मिती व वितरण तसेच विपणन संज्ञापन आणि दृकश्राव्य माध्यमातील सीडी व व्हिसीडींचे प्रसारण या क्षेत्रात वेबडिझायनिंगमुळे मौलिक बदल घडून आले आहेत. वृर्तमानपत्रे असोत की अन्य प्रकाशनातील जाहिरती असोत, अत्यंत कमी खर्चात विचार प्रसाराला वेब डिझायनिंगमुळे एक नवी संधी उपलब्ध होत आहे. बीपीएल, विप्रो या सारख्या जागतिक पातळीवरील उद्योग समुहांना आपल्या वस्तु व सेवा जगभर पोहोचविण्यासाठी वेब जाहिराती वरादान ठरत आहेत. अन्य काही संस्था इंटरनेटचा उपयोग आपल्या प्रशासकीय सुधारणांसाठी करत आहेत आणि माहितीच्या अदान प्रदानामुळे विविध कार्पोरेट संस्थांना त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारण करणे शक्य झाले आहे. प्रा. सक्सेना म्हणतात, The Web bypasses the barriers of paper and distrubution costs, allows unlimited updates, and puts information in front of its audience instantly[36] वेब संवादामुळे कागद आणि वितरणाचा खर्च

यावर मात करता येते आणि आपल्या निश्चित लक्ष्य श्रोत्यासमोर योग्य तो संदेश तत्काळपणे ठेवण्याचे कार्य सहजपणे घडून येते. कलात्मक सजावट करणारे व्यावसायिक कलावंत आणि प्रकाशक यांना माहितीच्या महाजालामुळे एक नवी सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. कोणतीही वर्धिष्णू कंपनी आल वेबसाईट जाहिरातीशिवाय आपले अस्तित्व कायम ठेऊ शकत नाही. ज्यांचा चांगला उद्योग आहे व चांगले प्रकाशन आहे त्यांना आता वेब साधनांचे साह्य घेतल्याशिवाय पर्याय नाही.[३७] सबंध जगातील उद्योग - व्यवसाय हे आपले स्थान वेबसाईटवर प्रस्थापित करण्यासाठी संघर्ष करीत आहेत. त्यांना व्यावसायिक वेब सजावटकर्ते आणि तज्ज्ञ यांचे नजरेत भरण्यासारखे गुण लक्षात घेऊन त्यांचा सल्ला घेतल्याशिवाय पुढे वाटचाल करता येणार नाही.

**वेबसाईट डिझाईनचा मार्ग**

तज्ज्ञ असे म्हणतात की, थोडी कल्पकता आणि थोडी मेहनत असेल तर वेबसाईट डिझाईन करण्याच मार्ग अवघड मुळीच नाही. ज्याच्याजवळ उत्तम दर्जाचे सॉफ्टवेअर उपलब्ध आहे त्याला मार्गदर्शन घ्यावे लागते इमेज एडीटरचे. असा संपादक उपलब्ध माहितीचे संकलन व संपादन करून तिची माहिती अद्ययावत स्वरूपात वेब साईटवर ठेवत असतो. तसेच तयार केलेल्या वेबसाईटवरती काही रेखाटने देण्यासाठी कोणत्या युक्त्या योजाव्यात आणि कोणती प्रतिके वापरावित यासाठी ग्राफिक तज्ज्ञ समर्पक असे प्रोग्राम तयार करून देतात. या दोहोंच्या सुसंगत प्रयत्नामुळे चांगली वेबसाईट तयार करता येते.

निर्माण केलेल्या वेबसाईटवरती व्यक्ती किंवा संस्थेची माहिती अचूकपणे नेमकेपणाने आणि संक्षेपाने कशी द्यावयाची हे निष्णात तज्ज्ञाला अवगत असते. मल्टिमिडियातील

विविध सुविधा तसेच मजकुराची कलात्मक व आकर्षक मांडणी करण्याच्या विविध पद्धती यामुळे वेबसाईट डिझाईन करणारे आघाडीवरचे कलावंत आपल्या अंगचे कसब पुरेपुर वापरून उत्तम वेबसाईट कमीत कमी जागेत प्रभावीपणे तयार करतात. अनेक इंटरनेट सेवा प्रदान करणारे सेवाकर्ते हे आपल्या ग्राहकासाठी काही वेळा वेबपेज मोफत सुद्धा उपलब्ध करून देतात. उपलब्ध जागेचा कल्पकतेने कसा उपयोग करायचा हे त्या-त्या तज्ज्ञाच्या क्षमतेवर अवलंबून असते. वर्तमानपत्रांच्या सुद्धा वेबसाईट  असून त्याद्वारे वर्तमानपत्रे आपला जनसंपर्क करतात. तसेच आपले कार्यक्रम व लोकाभिमुख कार्य वाचकांसमोर ठेतात.

## डिझायनरची भूमिका

वर्तमानपत्रांच्या वेबआवृत्त्यांमध्ये डिझायनरची महत्त्वाची भूमिका असते. त्याला बऱ्याचवेळा मास्टर डिझायनर असेही म्हणतात. कुठलीही वेबसाईट आकर्षक, सुंदर आणि संपूर्ण समाधान देणारी असावी, असे म्हटले जाते. पण त्यासाठी डिझायनरला आपल्या प्रतिभेचा परीसस्पर्श करावा लागतो. उत्तम दर्जाचे डिझायनर हे चांगली वेबसाईट तयार करताना कल्पकता आणि व्यवहार्यता यामध्ये सुवर्णमध्ये साधतात. दीर्घकाळ कला व सजावट या क्षेत्रात त्यांचा व्यासंग असल्यामुळे चित्र किंवा प्रतिक कसे निर्माण करावयाचे, त्याला गती कशी द्यावयाची व त्याला अधिक बोलके कसे करावयाचे ही बाब त्यांना अनुभवाने ज्ञान झालेली असते. ते आपल्या संपादनाला तात्विक, संकल्पनात्मक, भौतिक अधिष्ठान देऊन अमूर्त कल्पनांना मूर्त स्वरूप देतात आणि त्यांना प्रेरणादायी व स्फूर्तीप्रद अशा आकर्षक पॅकेजमध्ये रुपांतरित करतात, असे पॅकेज जितके अद्भूत असेल तितक्या

प्रमाणात ते श्रोत्यांच्या मनाची सहज पकड घेते. वेबसाईटद्वारे उत्साहवर्धक वातावरण तयार करण्यासाठी उपभोक्ता किंवा ग्राहक इंटरफेस तंत्राचा प्रभावीपणे उपयोग करत असतो.

तयार केलेला संदेश आपल्या ग्राहकापर्यंत पोहचविताना त्याच्या मनात जिज्ञासा, जागृत करणे इंटरफेस तंत्रामुळे शक्य होते. सहभाग आणि शिक्षण ह्या दोन्ही प्रक्रिया पारदर्शीपणे घडण्यासाठी इंटरफेसचा योजकतेने उपयोग करावा लागतो. ग्राहकाला वस्तू व सेवांच्या खरेदीसाठी निर्णय घेण्यास लागणारी पोषक माहिती इंटरफेस तंत्रामुळे उपलब्ध होते. ग्राहकांचे प्रवर्तन करून त्यांना वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी प्रवृत्त करण्याचे महत्त्वाचे कार्य अशा वेबसाईट करतात. कार्पोरेट क्षेत्रात चांगल्या वेबसाईट तयार करताना ग्राहकांशी आंतक्रिया करणे, संस्थेची प्रतिमा उजळ करणे, तिच्या उद्दिष्टाबाबत वातावरण निर्मिती करणे यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. बऱ्याच वेळा या मार्गात काही अडथळेही असतात पण त्यावर मात करण्यासाठी कुशल वेबसाईटस् संपादक हे पुढील उपाय काळजीपूर्वक योजतात, असे प्रा. सक्सेना यांना वाटते.[३८]

**१. संकल्पना :-** चांगली वेबसाईट तयार करत असताना प्रथम संकल्पनांची स्पष्टता असणे आवश्यक असते. मुद्रित माध्यमात म्हणजे वृत्तपत्रात तर चांगली वेबसाईट तयार करत असताना आपणास काय सांगावयाचे आहे, कुठे व कसे सांगावयाचे आहे याबाबत निश्चित, स्पष्ट संकल्पना नोंदवाव्या लागतात. वेबसाईट कोणासाठी तयार करावयाची आहे, तिच्यातील संदेश हा कुठल्या श्रोत्यांसाठी आहे तसेच त्या संदेशात संवादाचे सामर्थ्य किती आहे या प्रश्नाची उत्तरे शोधून वेबसाईट जीवंत आंतरक्रिया देण्यासाठी

समर्थ रुप  देता येते. या सर्व प्रश्नांची उत्तरे आपणाजवळ असतील तर चांगली आंतरक्रिया घडविणारी आणि अपेक्षित हेतू साध्य करणारी वेबसाईट तयार करणे सोपे होते.[३९]

**२. सजावट तंत्र :-** वेबसाईटची सजावट करताना प्रथमत: पूर्व नियोजन करणे आवश्यक असते. आपली कल्पना मध्यवर्ती ठेऊन तिचा प्रभाव सर्वदूर पोहोचविण्यासाठी सरळता, समतोल, भारतत्त्व, लयतत्त्व तसेच प्रभूत्त्व या सूत्रांचा उपयोग करावा लागतो. वेबसाईटला अधिकाधिक लोकांनी भेट द्यावी म्हणून त्यातील कथानक रंगवावे लागते. तसेच आशयाला अधिक सुसंवादी रुप द्यावे लागते. म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जावे लागते. वेबसाईट माहिती व कार्यपद्धती जर कल्पकतेने देत असेल तर अनेक ग्राहक तिच्याकडे आकर्षित होतात.[४०]

**३. वेबसाईट निर्मिती:-** तपशिल मांडणे (टेक्स्ट), प्रतिमा तयार करणे (इमेज) तसेच दृकश्राव्य प्रतिकांचा वापर करणे आणि साईटला भेट देण्यासाठी तिचे स्वरूप आकर्षक बनविणे आणि हे सर्व गणित प्रभावी करणे हे वेबसाईट निर्मितीमधील महत्त्वाचे टप्पे आहेत. आपली वेबसाईट यशस्वी होण्यासाठी कलात्मक दृष्टीने उपलब्ध सुविधांचा वापर करून संस्थेच्या विकासाची यशकथा आणि तिच्या सेवांचा प्रभाव योजकतेने मांडणे गरजेचे असते. व्यापार, शिक्षण तसेच प्रबोधन या तीनही बाबतीत वेबसाईट आकर्षक करण्यासाठी केलेले प्रयत्न जेव्हा लोकांच्या पसंतीस उतरतात तेव्हा वेबसाईट यशस्वी झाले असे म्हणता येईल.[४१]

**४. विपणन :-** आपण निर्माण केलेल्या वेबसाईटला अधिक लोकांनी भेट दिली

आणि तिची कल्पना उचलून धरली म्हणजे त्या कल्पनेचे विपणन झाले असे म्हणता येईल. वेबवरिल ही निर्मिती केवळ मनोरंजक कल्पक राहत नाही तर ती संस्थेला आर्थिक लाभही प्राप्त करून देते. आपल्या संस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ज्या दिशेने प्रयत्न करण्यात आले होते ते प्रयत्न किती सफल झाले यावर वेबसाईटचे अंतिम यश अवलंबून असते. वाचक किंवा प्रेक्षक हा वेबसाईटला किती प्रतिसाद देतो यावरून ती कल्पना समाजात किती प्रमाणात रुजत आहे ते लक्षात येते.[४२]

## ३.१६ वेब वृत्तपत्रातील जाहिराती

वेबसाईटवरील जाहिराती ह्या उपरोक्त चार वैशिष्ट्यांतून साकार झालेल्या असतात. वेब जाहिराती केवळ मुद्रित नसतात तर त्यांना दृकश्राव्य तसेच आंताक्रियात्मक रूपही असते. ग्राहक आपल्या कौशल्यांचा उपयोग करून या जाहिरातींद्वारे वस्तू व सेवांची मागणी करू शकतो. वेब जाहिरात ही जगातील प्राचिन काळापासून विकसित झालेल्या आणि आधुनिक काळापर्यंत पोहोचलेल्या जाहिरातींचा परिपाक होय. वेब जाहिराती या वृत्तपत्राप्रमाणेच दृकश्राव्य माध्यमाचा अविभाज्य भाग बनत आहेत. अनेक जाहिरात संस्था वस्तू व सेवांचे अनन्य विक्री लक्षण (युएसपी) काढून जाहिरात कल्पना मांडत असतात. प्राचिन काळी लोक प्रथम ओरडून जाहिराती करत. नंतर त्या भिंतीवर रंगविल्या जात १४५० साली मुद्रणाचा शोध लागल्यानंतर १० वर्षांनी १४६० साली विल्यम कॅक्स्टन या ग्रस्थाने प्रथम खिश्चन धर्माच्या पुस्तकाचा प्रसार करण्यासाठी पहिली जाहिरात निर्माण केली होती. या पुस्तकाच्या पहिल्या जाहिरातीनंतर जगात व्यापारी, उत्पादक, राजकीय नेते, कार्यकर्ते, उद्योजक हे जाहिरातीवर अमाप खर्च करू लागले. आजची वेब जाहिरात ही मुद्रण, चित्र

आणि संबोधन या तीनही कलांचा संगम आहे. असे म्हणतात की, १९६८ साली अमेरिकेत जाहिरातींवर १८० कोटी डॉलर्स खर्च करण्यात आले होते. पश्चिम जर्मनीने ४० कोटी, जपानने १५ कोटी, इंग्लंडने १२ कोटी डॉलर एवढ्या रक्कमा जाहिरातीवर खर्च केल्या होत्या. नवीन सहस्त्रकात तर जाहिरातीवरचा खर्च चौपट वाढला आहे कारण उत्पादनातील नफ्याच्या ४० टक्के रक्कम बहुराष्ट्रीय संस्था जाहिरातीवर खर्च करत आहेत. त्यामुळे मल्टी लेव्हल मार्केटींग ही नवी कल्पना उदयास येत आहे. अशा वेळी वेबसाईट जाहिराती केवळ राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठा उपलब्ध करून देत आहेत. भारतात आकाशवाणीवर पहिली जाहिरात १५ नोव्हेंबर १९६५ रोजी व्यापारी सेवेच्या रुपाने सुरू झाली तर दूरदर्शनवर अशी जाहिरात ४ जानेवारी १९७६ रोजी सुरू झाली. भारतात इंटरनेट आल्यापासून वेबसाईट जाहिरात हे एक नवे क्षेत्र उदयास आले आहे व वेब जाहिराती बाबत असे म्हटले जाते की, वेब जाहिरात ही केवळ कला नव्हे तर ते एक शास्त्र आहे. वेब जाहिरातीद्वारे जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेल्या आपल्या ग्राहकाला आकर्षित करण्यासाठी नवे कल्पक प्रयत्न केले जात आहेत. आशय विश्लेषक आणि वेब मास्टर या नव्या कल्पना उदयास आल्या असून जर चांगली वेब जाहिरात तयार केली तर तिच्यामुळे मिळणारे उत्पन्न हे दसपट वाढू शकते असे म्हटले जाते. भारतीय भाषेतील नयी दुनिया या हिंदी दैनिकाच्या वेब आवृत्तीचे मासिक जाहिरात उत्पन्न ३२ लाख रुपये एवढे झाले आहे. यावरून भाषिक पत्रे सुद्धा वेब जाहिरातींच्या द्वारे जगाच्या कानाकोपऱ्यात सर्वदूर पसरलेल्या आपल्या ग्राहकाला आकर्षित करण्यासाठी वेब जाहिरातींचा प्रभावीपणे उपयोग करत आहेत.

इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या वृत्तपत्रांच्या वेब आवृत्त्या या अत्यंत परिपुर्ण व सुसज्ज तसेच अद्ययावत करण्याची स्पर्धा चालू आहे आणि अशा स्पर्धेतून एक नवे वातावरण तयार होत आहे. भक्कम अनुभव, उत्तम पूर्वतयारी आणि यथार्थ नियोजन ही वृत्तपत्राच्या वेबसाईट आवृत्तीच्या यशाची त्रिसुत्री होय असे म्हणता येईल. या सर्व चर्चेवरून हे लक्षात येते की, वेबसाईट तयार करणे ही कला आहे. कोणतीही वेबसाईट ही केवळ एक तटस्थ उत्पादन नसते तर ती एक सृजनशील अशी प्रक्रिया असते. उत्तम वेबसाईट ही शेवटी चांगल्या कलावंत माणसाने निर्माण केलेली अभिव्यक्ती असते. वर्तमानपत्रासारख्या बौद्धिक क्षेत्रात वेबवृत्तपत्र तयार करताना करावयाच्या कलात्मक सादरीकरणामागे एक कुशल कलावंत आणि एक प्रतिभाशाली संपादक दडलेला असतो. वेब निर्मितीमधील क्षमता आणि शक्ती यांचा संपूर्ण विचार केला असता प्रा. सक्सेना म्हणतात, There are many ways of thinking about this medium as there are types of people involved with its evolution. To understand its potentials, one must bear in mind that humans are behind the creation of the technology and infrastructure as well as the content that resides on it. [43] यावरून हे स्पष्ट होते की, प्रत्येक तंत्रज्ञानाच्या निर्मितीमागे शेवटी माणूस असतो आणि संरचना व आशय हा प्रभावीपणे अभिव्यक्त करण्याचे काम अशा कलात्मक माणसावर अवलंबून असते. वेबवृत्तपत्रांची अद्भूत दुनिया ही अशा पडद्यामागच्या कलावंतावर अवलंबून असते. कारण हे सूत्रधार वेबसाईटला किंवा कोणत्याही वेबप्रकाशनाला कलात्मक व दर्जेदार रुप देत असतात.

## ३.१७ समारोप

या प्रकरणात वृत्तपत्रव्यवसायात माहिती तंत्रज्ञानाने प्रवेश केल्यानंतर वर्तमानपत्रांचे स्वरूप कसे बदलत गेले त्याचा आढावा घेतला आहे. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात भारतामध्ये माहिती तंत्रज्ञानाची वाटचाल कशाप्रकारे होत गेली ते सांगून माहिती तंत्रज्ञानामुळे प्रसारमाध्यमांचे समाजिकीकरण कसे झाले ते नमूद केले आहे. तसेच प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे दूरचित्रवाणी, रंगीत दूरचित्रवाणीशी स्पर्धा करण्यासाठी वर्तमानपत्रांच्या मांडणी व सजावटीत कोणते लक्षणीय बदल झाले ते अभ्यासले आहे. विशेषत: इंटरनेट युगात वेब आवृत्त्यांचा चमत्कार व त्यांचे अदभूत विश्व याबाबत गेल्या २० वर्षांत झालेल्या बदलांचा आढावा घेतला आहे. खास करून वेब आवृत्त्यांची मांडणी, सजावट तसेच त्यांच्या सजावटीची तत्वे स्पष्ट करून बहुगुणी वेब आवृत्त्यांच्या लाभांची चर्चा केली आहे. वैश्विक पातळीवरील जाहिराती हे वेब आवृत्यांचे खरे बदलस्थान होय, त्यामुळे या वेब आवृत्त्या विकसित करताना जाहिरातींच्या संकलपनेपासून ते मांडणीपर्यंत सर्व पैलू येथे चर्चिले आहेत.

अशा प्रकारे या प्रकरणात माहिती तंत्रज्ञानाच्या वृत्तपत्र व्यवसायावरील परिणामाची तात्विक व व्यवहार्य बाजू स्पष्ट केली आहे. पुढील प्रकरणात क्षेत्रीय पाहणीचा अहवाल दिला आहे. त्यामुळे वृत्तपत्र व्यवसायावर माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव कसा पडत आहे ते अधिक व्यवहार्यपणे स्पष्ट होऊ शकले आहे.

## संदर्भसूची

1. David Cygansky - John A Orr; Information Techonlogy : Inside & Outside.Prentice hall, 2001.page 1-2
2. IBID, Page-294
३. ब्ल्यू मेंथॉल, द मिडिया रूम, पेज-१
४. मुळे गणेश, मराठी वृत्तपत्रातील इंटरनेट संज्ञापन या ग्रंथातील प्रकरण १ पहा.
५. सिरीका मेनिकेनन, कॉमन कम्युनिकेशन करीकुलम, युनेस्को १९८०, पृष्ठ-१०
६. युनेस्को न्यूज, न्यू जर्नालिझम कम्युनिकेशन कोर्स, २००१
७. भारत -२००२, पृष्ठ २८५
८. (मनोरमा इयर बूक-२००२, पृष्ठ २५६)
9. (Mass communication & Technology, Page No. 24)
10. Ibid, (Page 94)
11. Drucker Pitter, Management for change, Page-11
12. (मनोरमा इयर बूक -२००२, पृष्ठः २६३)
१३. (मनोरमा इयरबुक २००२, पृष्ठ -२६६)
१४. आपटे मोहन, शतक शोधांचे, राजहंस प्रकाशन पुणे-२००४, पृष्ठ-२
१५. (मनोरमा इयर बूक-२००२, पृष्ठ -२६२)
१६. रॉजर्स एव्हर्ट, डीफ्युजन ऑफ इनोव्हेशन, पृष्ठ ८
१७. नरूला उमा
१८. योजना २०००
१९. कित्ता
२०. कित्ता
२१. कित्ता

२२. कित्ता

२३. कित्ता

२४. कित्ता

२५. कित्ता

२६. कित्ता

२७. दृक विचार प्रसाराचे विश्व, पृष्ठ -६८

२८. कित्ता, (पृष्ठ -६८)

२९. पावले पत्रकारितेची पृष्ठ १०६

३०. पावले पत्रकारितेची पृष्ठ-९५

३१. एन. के. मूर्ती, जेम्स हिकी अ फरगॉटन हिरो ऑफ इंडियन प्रेस, विदूरा, १९८०

३२. एनसाक्लोपीडीया ऑफ वर्ल्ड प्रेस यातील न्यूयॉर्क टाइम्स हे टिपण पहा.

३३. तळवळकर गोविंद, डाईंग प्रेस इन अमेरिका, एशियन एज, जून -२००९

३४. मुळे गणेश, मराठी वृत्तपत्रातील इंटरनेट संज्ञापन, पृष्ठ-८

३५. धारूरकर वि. ल., माहिती तंत्रज्ञान व प्रसार माध्यमे, चैतन्य प्रकाशन, औरंगाबाद- २००७, पृष्ठ -१८२

३६. सक्सेना अजय, वेब जर्नालिझम, पेज -११

३७. कित्ता, पेज-२१

३८. कित्ता, पेज-४०

३९. कित्ता

४०. कित्ता

४१ कित्ता

४२ कित्ता

43. http:// www. onmag.com/web1.htm

प्रकरण ४ थे

# सामाजिक पाहणीचा अहवाल

४.१ प्रस्तावना

४.२ पाहणीची उद्दिष्टे

४.३ समाजशास्त्रीय दृष्टीकोन

४.४ पाहणीचा अहवाल

अ) सर्वसाधारण माहिती

ब) माहिती तंत्रज्ञानाची ओळख

क) माहिती तंत्रज्ञान व वृत्तपत्रे

ड) इंटरनेटचा प्रभाव

४.५ माहिती तंत्रज्ञान अंमलबजावणीतील अडसर

४.६ उपाययोजना

४.७ पाहणीच्या आधारे अनुमान व विश्लेषण

४.८ समारोप

संदर्भसूची

**प्रकरण ४ थे**

# सामाजिक पाहणीचा अहवाल

## ४.१ प्रस्तावना

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांवर झालेला परिणाम हा शोध विषयक एक व्यवहार्य अभ्याचा पैलू होय. या अभ्यासामध्ये योजिलेल्या विविध प्रमेयांचा विचार करताना तयार केलेल्या प्रश्नावलीच्या आधारे हे अध्ययन करण्यात आले आहे.

प्रसारमाध्यमे समाजीकरणाच्या प्रक्रियेला गती देतात आणि समाजापुढील प्रश्न यथार्थपणे मांडतात.[१] समाजजीवनातील प्रश्न निरोगी दृष्टीने मांडण्याचे कार्य वृत्तपत्रे करतात आणि नवनव्या प्रश्नांना वाचा फोडतात.[२] या बाबी माहिती तंत्रज्ञान हे खरोखरच सर्वंकषदृष्टीने वृत्तपत्रांना नवे सामर्थ्य प्रदान करत आहे.

सामाजिक व आर्थिक प्रश्न हे सभोवतीच्या परिस्थितीशी निगडीत असतात व या प्रश्नांची मांडणी करताना एक व्यवहार्य दृष्टिकोन ठेवावा लागतो. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांवर झालेला परिणाम अभ्यासताना या परिणामाचे सवरूप, व्याप्ती आणि दिशा यांचा विचार करावा लागतो. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावाची चर्चा करताना डॉ. धारूरकर म्हणतात,  माहिती संवाद तंत्रज्ञान घरोघरी पोहचले आहे. जागतिक बँकेच्या २००२ च्या विकास अहवालात त्याच्या शिर्षकात म्हटले होते, नव्या जगात

बाजारपेठासाठी संस्थांची उभारणी केली जात आहे.त्यांची संवादृदष्टीने जोडणी करणे आणि त्यांचे स्पर्धात्मक मूल्य वाढवणे यासाठी माहिती तंत्रज्ञान वरदान ठरत आहे. [३] बाजारपेठचलीत प्रसार माध्यमांचे नवे रूप या माहिती संज्ञापन तंत्राच्या गतिशास्त्राचे ऐक व्यावच्छेदक लक्षण होय. नव्या तंत्राचे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक संदर्भ समजावून घेतले तरच या माध्यमांचे गतिशास्त्र समजू शकते.[४] हे परिणाम समजून घेण्यासाठी नव्या जगात संवाद संशोधनाचे महत्त्व वाढले आहे.

संवाद संशोधनाचे स्वरूप स्पष्ट करताना प्रा. एगी, इमरी व ऑल्ट म्हणतात,Communication research is the scientific study of the mass-communication behaviour of human beings, usualy in current situations requiring thegathering of primary quantitative information. It also includes the study of the communicators their media and content of their message.[५] थोडक्यात काय तर संवाद संशोधन म्हणजे प्रसार माध्यमे, लोकाची वागणूक यांचा ताजा काळजीपूर्वक आकडेवारी मिळवून संख्यात्मक दृष्टिने अभ्यास करणे होय. सवादकर्ते त्यांनी वापरलेली माध्ये व त्यातील आशय याचाही अभ्यास या संदर्भात केला जातो.

यावरून असे स्पष्ट होते की, प्रसार माध्यमांच्या वर्तमान जीवनातील प्रभावाची चर्चा त्यामुळे संवाद संशोधनाचा एक अविभाज्य भाग ठरते.

या पार्श्वभूमीवर अभ्यासाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन येथे समजावून घेतला पाहिजे.

कारण वृत्तपत्र ही एक सामाजिक संस्था असल्यामुळे वृत्तपत्रांचा समाजावर पडलेला प्रभाव अभ्यासणे ही बाब सुद्धा समाजशास्त्रीय पक्रियेचा एक महत्त्वाचा घटक होय.

## ४.२ पाहणीची उद्दिष्टे

सामाजिक संशोधनामध्ये विशिष्ट विषयाची निवड केल्यानंतर त्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी सुनिश्चित उद्दिष्टे ठरविणे गरजेचे असते. डॉ. पु. ल. भांडारकर म्हणतात, समस्यासूत्रणापासून निष्कर्ष मांडणीकडे संशोधन जसजसे अग्रेसर होत जाते तसतसे संशोधनकर्त्याचे लक्षकेंद्र बदलत जाणे स्वाभाविकच असते. पण हा बदल संशोधनपदांमधील पृथ:क्कतेचे द्योतक मानण्याऐवजी विशिष्ट अवस्थेत संशोधनकर्त्याने कोणत्या प्रश्नावर जास्त लक्ष द्यावयास हवे, हेच दर्शविणारा आहे.[६]

यावरून आपणास या संदर्भात उद्दिष्टांचे महत्त्व लक्षात येते. प्रा. कोहेन व नॅगेलने म्हटल्याप्रमाणे, काही व्यवहारिक वा सैद्धांतिक अडचण उपस्थित झाल्याखेरीज खऱ्या अर्थाने कोणतीच चौकशी वा संशोधन सुरू होत नाही. ज्या तथ्यांच्या आधारे समस्येचे वा अडचणीचे निराकरण करावयाचे असते त्या तत्यांमधील संबंधव्यवस्था समजण्यासाठी अडचण वा समस्या मार्गदर्शक ठरू शकते.[७] त्यामुळे प्रस्तुत अभ्यासात सामाजिक अध्ययनाची चौकशीचे घटक ठरवून त्या आधारे मीमांसा केली आहे.

या अभ्यासातील सामाजिक पाहणीचे प्रमुख तीन उद्देश खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

१. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचे प्रसारमाध्यमातील स्वरूप लक्षात घेणे.

२.	माहिती तंत्रज्ञानाच्या वृत्तपत्रावरील स्वरूप अभ्यासणे

३.	या परिणामाच्या अनुषंगाने माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावातील अडसर दूर करणे.

## ४.३ समाजशास्त्रीय दृष्टिकोन

प्रसारमाध्यमे ही एक अपरिहार्य सामाजिक संस्था असते. त्यामुळे या संस्थेचे स्वरूप व तिच्या भावी प्रभावाची चर्चा करताना समाजशास्त्रीय दृष्टिकोन अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

सर्वेक्षण पद्धतीचा सामाजिक संशोधनावर प्रभाव एवढा आहे की बऱ्याचवेळा या पद्धतीला सर्वेक्षण पद्धती असे म्हटले जाते.[८] प्रा. रा. ना. घाटोळे यांनी या संदर्भात म्हटले आहे,'सामाजिक संशोधकांचे प्रमुख कार्य नवीन ज्ञान संपादन करून जुन्या ज्ञानात भर टाकणे आणि प्राप्त केलेल्या ज्ञानाच्या आधारे सामाजिक निष्कर्ष काढणे, हे असते.'[९] समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचे महत्त्व सांगताना गुड व हॅट म्हणतात, नवा समाजशास्त्रीय दृष्टीकोन समाजापुढील बदलत्या प्रश्नाचे आकलन करण्यासाठी पोषक ठरतो. त्यामुळे समाजशास्त्र ही एक नवीन ज्ञानशाखा आहे.[१०] प्रा. चार्लस राईट यांच्या मते, प्रसारमाध्यमे व समाज यांच्यामध्ये सातत्याने आंतरक्रिया घडत असतात. त्यांचे आकलन शास्त्रीय दृष्टीने करावे लागते.[११]

नव्या जगामध्ये प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव जीवनाच्या सर्व क्षेत्रावर पडत आहे. वर्तमानपत्र हेही त्यास अपवाद नाही. डेव्हिड कॅजन्स्की व जॉन ऑर म्हणतात, Now, here's a shocker. The information revolution has only just begun. The changes we've seen during the past ten years are hardly the

beginning. We are headed toward an unprecendented change in every aspect of how we communicate, educate, track information, slove medical problems and manage every aspect of life.[12] माहिती तंत्रज्ञानाचा नुकताच उदय झाला आहे. गेल्या दशकातील बदल हे अगदी ताजे बदल आहेत. आपण संवाद कसे करतो, शिक्षण कशाप्रकारे देतो, याबाबत प्रत्येक क्षणी नवे बदल होत आहेत. वैद्यकप्रश्न सोडविण्यापासून नित्य जीवनात प्रत्येक क्षेत्रात माहिती तंत्रज्ञान प्रवेश करीत आहे. जीवनातील सर्व क्षेत्रांचे व्यवस्थापन माहिती तंत्रज्ञानाच्या मदतीने होत आहे. आपल्या बदलत्या जीवन शैलीस आकार देण्याचे काम माहिती संवाद तंत्रज्ञान करत आहे. या व्यवस्थेच्या भावी स्वरूपाबाबत संशोधकानी म्हटले आहे, At the start of the new milluennium , it is generally believed by investors & business leaders within the telecommunications industry that soon we will all be using Vioce Over IP (VoIP) technology. [13] या सहस्त्रकाच्या प्रारंभी जगभरात व्हॉईस ओव्हर तंत्र वापरले जाण्याची शक्यता आहे. त्याचा उपयोग व्यवसायिक आणि उद्योजक यांना होऊ शकतो. त्यावरून वृत्तपत्रासारख्या या प्रभावाची मीमांसा येथे समाजशास्त्रीय दृष्टीने करावयाची आहे.

## ४.४ सामाजिक पाहणीचा अहवाल

माहिती तंत्रज्ञानाचा वृत्तपत्रावर पडलेला प्रभाव अभ्यासताना या संशोधनप्रबंधात ३०० पत्राकरांची पाहणी करण्यात आली. त्या पाहणीचा अहवाल या प्रकरणात क्रमाने मांडला आहे.

## अ) सर्वसाधारण माहिती

### उत्तरदात्यांचे वास्तव्य


सामाजिक पाहणीमध्ये उत्तरदाते कोणत्या भागात निवास करतात याला महत्त्व असते. या संदर्भात प्रा. रा.ना. घाटोळे म्हणतात, ''सामाजिक सर्वेक्षणात विवक्षित भौगोलिक क्षेत्राचा अथवा स्थनाचा अभ्यास केला जातो.''[१४] या पार्श्वभूमीवर प्रस्तुत पाहणीमध्ये निवडलेल्या ३०० पत्रकारांचे राहण्याचे ठिकाण व त्याचा तपशील खालील तालिकेत दिला आहे.

**तालिका क्र.१**

**उत्तरदात्यांचे वास्तव्य**

| तपशील | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|
| शहरी | १९८ | ६६% |
| ग्रामीण | १०२ | ३४% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |

**तालिका क्र. १ उत्तरदात्यांचे वास्तव्य टक्केवारी**



या तालिकेवरून असे स्पष्ट होते की, ६६ टक्के उत्तरदाते शहरी भागात राहत असून,३४ टक्के ग्रामीण भागात राहतात. यावरून असे दिसते की, महाराष्ट्रातील पत्रकारांचा कल नागरी भागात राहण्याकडे अधिक आहे. नागरी भागात राहणारे पत्रकार माहिती तंत्रज्ञानाच्या प्रक्रियेला अधिक गतीने सामारे जातात असे म्हणता येईल.

**उत्तरदात्यांचा वयोगट**


समाजाशास्त्रीय अभ्यासात वयोगटाला विशिष्ट म्हत्त्व असते. कारण वयामुळे प्रगल्भता स्पष्ट होते. यासंदर्भात प्रा. घाटोळे यांच्यामते, ''सामाजिक सर्वेक्षण पध्दतीत पूर्णपणे वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केला जातो. ज्यामुळे सर्वेक्षणामुळे मिळालेले निष्कर्ष सुक्ष्म व शुध्द असतात.''[१५] या पाहणीतील उत्तरदात्याचा वयोगट व त्याचा तपशील खालीलप्रमाणे दिला आहे.

**तलिका क्र.२**

**उत्तरदात्याचा वयोगट**

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| २५ ते ३० | ११६ | ३८.६६% |
| ३० ते ३५ | ९३ | ३१% |
| ३५ ते ४० | ६७ | २२.३४% |
| ४० ते ५० | २४ | ८% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |

**तालिका क्र. २ उत्तरदात्यांचा वयोगट टक्केवारी**




या तालिकवरून ह स्पष्ट हात का, २५ त ३० वयागटाताल उत्तरदात्याचा सख्या ३६.८८ टक्के एवढी आहे तर त्यांना ३० ते ३५ वयोगटातील उत्तरदाते ३१ टक्के आहेत. तसेच ३५ ते ४० या वगोटातील उत्तरदाते २२.३४ टक्के एवढे आहेत तर ८ टक्के उत्तरदाते हे ४० ते ५० वयोगटातील आहेत. माहिती तंत्रज्ञानाला सामोरे जाणारे व त्याचा स्वीकार करणारे उत्तरदाते २५ ते ३० या वयोगटातील आहेत. कारण हा गट संगणकाचा वापर व इंटरनेटचा उपयोग करण्यामध्ये अधिक उत्साही असतो.

**ब) १ पत्रकाराच्या वाचन सवयी**

या पाहणीमध्ये पत्रकार हा प्रामुख्याने मूलभूत घटक असल्यामुळे त्याच्या आवडी-निवडी महत्त्वाच्या ठरतात. रॉबर्ट ऑलिव्हर म्हणतात, लोक आणि विचार तसेच लोक आणि लोक यात समन्वय साधणारा संवाद हाच खरा प्रभावशाली जनसंवाद असतो.[१६] या पार्श्वभूमीवर पत्रकारांना विचारलेल्या वृत्तपत्र वाचनविषयक प्रश्नांचा तपशील या गटात दिला आहे.


**ब-१ वृत्तपत्राचे वाचन**

वर्तमानपत्र किती नियमित वाचले जाते याला सामाजिक पाहणीत अधिक महत्त्व असते. कारण वाचनाची नियमितता ही माध्यमाच्या प्रभावातील एक महत्त्वाची प्रक्रिया होय. उमा जोशी म्हणतात, आजची प्रसारमाध्यमे वाचकांना शिक्षण देण्याचे व मनोरंजन करण्याचेही काम करत आहेत. त्यामुळे लोकव्यवहारात ते वाचकांना पूर्णपणे सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करत आहेत.[१७] या पार्श्वभूमीवर या पाहणीमध्ये आपण वृत्तपत्र नियमित वाचका का असा प्रश्न विचार असता पुढील माहिती उपलब्ध झाली.

**तालिका क्र. ३**

**वृत्तपत्र वाचनाची नियमितता**

| **तपशिल** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | २८२ | ९४% |
| नाही | १८ | ६% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |



याचा अर्थ असा होतो की, उत्तरदात्यापैकी ९४ टक्के पत्रकार नियमित वाचक आहेत. तर ६ टक्क्यांनी नकारात्मक मत नोंदवले आहे. यावरुन असे दिसते की, बहुसंख्य पत्रकार त्या व्यवसायात असल्यामुळे वृत्तपत्रे नियमितपणे वाचतात आणि आपली ज्ञानाची पातळी उंचवितात.


**ब २ वृत्तपत्रांची संख्या**

वृत्तपत्रकार किती वृत्तपत्रे वाचतात यावरुन त्यांचा तौलनिक दृष्टीकोन स्पष्ट होतो. आधुनिक काळात वर्तमानपत्र हे लोकांच्या सेवेचे साधन बनले आहे. कारण त्यामध्ये विविध प्रकारची उपयुक्त माहिती वाचकांच्या ज्ञानात भर टाकत असते. प्रा. जॉन होहेनबर्ग म्हणतात, जनसेवा पत्रकारीता एक नवे वळन आहे. परंतु नजीकच्या भविष्यकाळात त्याचा अधिक परिपोष होणार आहे.[१८] या पार्श्वभूमीवर आपण किती वृत्तपत्रे वाचता, असा प्रश्न विचारला असता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे.

## तालिका क्र. ४

## वाचल्या जाणाऱ्या देनिकांची संख्या

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| एक | १४५ | ४८.३३% |
| दोन | ३४ | ११.३३% |
| तीन | १३ | ४.३३% |
| चार | ६ | २% |
| यापेक्षा जास्त | २ | ०.६४% |
| **एकूण** | | |




या तालिकेवरुन हे स्पष्ट होते की, एक वृत्तपत्र वाचणाऱ्या पत्रकारांची संख्या १४५ (४८.३३%) आहे. त्यानंतर दोन वृत्तपत्रे वाचणाऱ्या पत्रकारांची संख्या ३४ असून हे

प्रमाण (११.३३%) आहे तर तीन वृत्तपत्र वाचणाऱ्यांची संख्या १३ म्हणजे (४.३३%) आहे तर चार वृत्तपत्रे वाचणाऱ्यांची संख्या ६ म्हणजे (२.००%) आहे. चार पेक्षा जास्त वृत्तपत्र वाचणाऱ्यांची संख्या २ म्हणजे (०.६४%) एवढी आहे. याचा अर्थ असा होतो की, बहुसंख्य पत्रकारांच्या कार्यालयात अनेक वृत्तपत्रे येत असल्यामुळे ते आपल्या घरी एकच वृत्तपत्र घेत असावेत. तथापी सुमारे ५१% पत्रकार दोन पेक्षा जास्त वृत्तपत्रे वाचतात असे दिसून येते. आपल्या स्पर्धक वृत्तपत्रात काय छापून आले आहे. त्यांची मांडणी व सजावट कशी आहे हे समजून घेण्यासाठी त्यांचा असा प्रयत्न दिसतो.


**दैनिक वाचनाचा कालावधी**

एखादे वृत्तपत्र वाचक किती वेळ वाचतो या वरुन दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक म्हणजे वर्तमानपत्राची सखोलता व त्यातील मजकूराची सर्वसमावेशकता आणि दुसरे म्हणजे त्यावरुन वृत्रपत्राची वाचकाची पकड घेण्याची क्षमता स्पष्ट होते. एडवर्ड गेरॉल्ड यां्च्या मते वृत्तपत्र ही एक सामाजिक संस्था असते. आणि एका विशिष्ट समुहाचे नव्हे तर समग्र समाजाचे प्रतिनिधीत्व करणे ही वर्तमानपत्रांची नैतिक जबाबदारी असते.[१९] खरे वृत्तपत्र विविध विषयांची हाताळणी करुन वाचकांना दीर्घकाळ आकर्षित करते व वाचकांच्या हाती राहते. या पाश्‍र्वभूमीवर आपण एक दैनिक किती वेळ वाचता असा प्रश्न विचारला असता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे.

## तालिका क्र. ५

## वृत्तपत्र वाचकांचा कालावधी

| तपशील | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|
| ५ मिनिटे | ३६ | १२% |
| १० मिनिटे | ७६ | २५.३३% |
| २० मिनिटे | १०२ | ३४% |
| ३० मिनिटे | ८६ | २८.६७% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |




उपरोक्त तालिकेवरुन हे स्पष्ट होते की, वीस मिनिटे वृत्तपत्रे वाचणाऱ्या पत्रकारांची संख्या १०२ म्हणजे (३४.००%) आहे त्यानंतर तीस मिनिट वृत्तपत्र वाचणाऱ्या वाचकांची संख्या ८६ म्हणजे (२८.६७%) आहे. तिसऱ्या क्रमांकावर १० मिनिट वृत्तपत्र वाचणारे पत्रकार वाचक असून त्यांची संख्या ७६ म्हणजे (२५.३३%) आहे तर पाच मिनिटात वृत्तपत्र वाचणाऱ्या पत्रकारांची संख्या ३६ म्हणजे (१२%) आहे. या वरुन

असे दिसते की, २० मिनिटे वृत्तपत्र वाचणाऱ्या पत्रकारांची संख्या सर्वाधिक आहे. त्यानंतर ३० मिनिट वाचणाऱ्यां पत्रकारांचा क्रम लागतो. यावरुन असे म्हणता येईल की, सामान्य वाचकापेक्षा पत्रकार वाचक अधिक गंभीर पणे वृत्तपत्र वाचतात.

## अधिकच्या अंकाची निवड


रोज आपल्या घरी एखादा अंक घेतात परंतु त्या पलीकडे जाऊन रुची पालट म्हणुन एखादा अंक स्वतंत्रपणे बाजारात जाऊन विकत घेतात. त्यामागे जिज्ञासा अधिक्य आवड व विषिष्ट परि्स्थिती हे घटक कारणीभूत असतात. उमा जोशी यांच्या मते, वर्तमानपत्राच्या मांडणी व सजावटीत अद्यायावत बदल होत आहेत. व या बदलाचा परिपाक म्हणजे वर्तमानपत्रे ही रंगीत चित्रवाणीशी स्पर्धा करत आहेत.[२०] या पार्श्वभूमीवर रोजच्या दैनिकापेक्षा आपण एखादा अंक विकत घेऊन वाचता काय, असा प्रश्न विचारला असता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे.

### तालिका क्र. ६

### अधिकच्या अंकाची निवड

| तपशील | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ९१ | ३०.३४% |
| नाही | २०९ | ६९.६६% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |

या तालिकेवरुन असे स्पष्ट होते की, अधिकचा अंक विकत न घेण्याकडे बहुतेक उत्तरदात्यांचा कल आहे. पत्रकारांपैकी २०९ म्हणजे (६९.६६%) जणांनी नकारात्मक उत्तर दिले आहे तर अधिकचा अंक विकत घेतो असे म्हणणाऱ्या पत्रकारांची संख्या ९१ म्हणजे (३०.३४%) आहे. याचा अर्थ असा की, ६९% पत्रकार सकाळी उठल्यावर एकच वृत्तपत्र वाचतात व दुसरा अंक विकत घेऊन वाचत नाहीत. त्यांच्या वृत्तपत्राच्या कचेरीत सर्व अंक येत असल्यामुळे त्यांना अधिकचा अंक विकत घेणे योग्य वाटत नसावे. यावरुन असे दिसते की, बहुतेक पत्रकार आपल्या कचेरीत पर्यायी अंक वाचतात.




**मासिक व पाक्षिकाची पसंती**


दैनिक हे रोजच्या रोज माहिती देते तर पाक्षिक किंवा मासिक हे विशिष्ट कालावधीनंतर प्रकाशीत होते व ते घटनांचे विश्लेषण करते. उमा जोशी म्हणतात, चित्रवाणी माध्यमांचा प्रेक्षक जसा वाढतो तसा तो नवीन प्रकाशने वाचत असतो. आपल्या वाचकाला अधिकची माहिती पाश्र्वभूमीच्या स्वरुपात देण्याकडे मासिकांचा कल असतो.[21] या पाश्र्वभूमीवर दैनिकासोबत आपण एखादे मासिक किंवा पाक्षिक विकत घेता काय, असा प्रश्न विचारला

असता पुढील माहिती समोर आली आहे.

**तालिका क्र. ७**

**मासिक पाक्षिकाची पसंती**

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ११८ | ३९.३३% |
| नाही | १८२ | ६०.६७% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |




या तालिकेवरुन असे स्पष्ट होते की, १८२ म्हणजे (६०.६७%) टक्के पत्रकार वाचक पाक्षिक किंवा मासिक विकत घेऊन वाचक नाहीत. तर ११८ म्हणजे (३९.३३%) पाक्षिक किंवा मासिक विकत घेऊन वाचणे पसंत करतात. याचा अर्थ असा की, दैनिकात रात्रपाळी करणाऱ्या उपसंपादकाला ताजी संदर्भ सामुग्री म्हणून विषय निवडीसाठी व

मांडणीसाठी पाक्षिक किंवा मासिक उपयोगी पडते.

## क - माहिती तंत्रज्ञान व वृत्तपत्रे

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रावर झालेला परिणाम या पहाणीच्या आधारे अभ्यासला आहे. त्यामुळे माहिती तंत्रज्ञानाचे वर्तमानपत्राशी असलेले नाते स्पष्ट केले पाहिजे, डॉ. धारुरकर म्हणतात- संगणकाचा प्रत्येक घरात प्रवेश होतो आहे. संगणकाचा उपयोग बहुउद्देशीय विकासासाठी होतो आहे. अनेक संगणकाना जोडून विकसित करण्यात आलेले माहितीचे महाजाल संबंध जगाला समीप आणत आहे.[२२] या पार्श्वभूमीवर या गटामध्ये विविधप्रकारचे पाच प्रश्न विचारण्यात आले त्यापैकी प्रत्येक प्रश्नास पत्रकाराने दिलेली उत्तरे लक्षणीय असून त्याचा तपशील पुढे दिला आहे.

## भाषिक वृत्तपत्रात नविन तंत्राचे आगमन


आधुनिक माहिती तंत्रज्ञानाने वृत्तपत्र या माध्यमाचा चेहरा मोहरा बदलला आहे. डॉ. धारुरकर यांच्या मते, माध्यमक्षेत्रातील उद्योजकांच्या प्रत्येक एककात संगणकाचा उपयोग नवचैतन्य आणणारा ठरला आहे. विकास प्रकल्पांचे आरेखन करण्यासाठी संगणक एक आदर्श साधन बनले आहे. संगणक प्रशिक्षण संस्थाचा वेग वाढत आहे. देशात सध्या ७० हजार आय.टी. तज्ञ तयार केले. जगभरात २.२ लाख प्रोग्रामर्सची गरज आहे. नव्या जगास लागणारे मनुष्यबळ भारत वेगाने पुरवित आहे.[२३] या पार्श्वभूमीवर भाषिक वृत्तपत्रात माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव पडणे अपरिहार्य आहे. त्यामुळे या पाहणीत तुमच्या मते मागील किती वर्षांपासून भाषिक वृत्तपत्रात नवे तंत्रज्ञान आले असा प्रश्न विचारला

असता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे

**तालिका क्र.८**

**भाषिक वृत्तपत्रात नविन तंत्राचे आगम**

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| १० वर्षे | ५२ | १७.३३% |
| १५ वर्षे | ७८ | २६% |
| २० वर्षे | ८० | २६.६७% |
| २५ वर्षे | ९० | ३०% |
| **एकूण** | | |




या तालिकेवरुन असे दिसते की, २५ वर्षापासून भाषिक वृत्तपत्रात माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढला आहे असे म्हणणाऱ्यांची संख्या ९० म्हणजे (३०.००%) आहे. त्यानंतर २० वर्षापासून प्रभाव वाढला आहे असे मत मांडणाऱ्यांची संख्या ८० म्हणजे २६.६७%

आहे तर १५ वर्षापासून हा प्रभाव वाढला आहे असे म्हणणाऱ्यांची संख्या ७८ म्हणजे २६% आहे तर दहा वर्षापासून असा प्रभाव वाढला आहे असे म्हणणाऱ्यांची संख्या ५२ म्हणजे १७.३३% आहे. याचा अर्थ असा की, पंचवीस वर्षापासून १९८५ पासून भाषीक वृत्तपत्रात माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढला आहे असे बहुतेक जणांना वाढते. भूतपुर्व पंतप्रधान राजीव गांधी यांच्या काळात माहिती तंत्रज्ञानाचा प्रवेश झाल्यामुळे हा प्रभाव वाढणे क्रमप्राप्त ठरते. खास करुन १९८५ ते २००५ हा वीस वर्षाचा काळ माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभाव वाढीसाठी पोषक ठरल्याचे आपणास दिसून येते.


**संगणकाच्या वापरामुळे झालेले लाभ**

संगणक हे बहुउद्देशीय तंत्रज्ञान आहे त्यामुळे मानवाची जीवनशैली बदलून गेली आहे. तसेच प्रसार माध्यमांनाही संगणकाचा लाभ झाला आहे. वृत्तपत्रया माध्यमासाठी संगणकाचे लाभ मौलीक ठरले आहेत. डॉ. धारुरकर म्हणतात भारतीय समाजाचे वृत्तपत्रीकरण झपाट्याने घडून आले तर लोकशाही स्थिर होऊ शकते त्यासाठी इंटनेटद्वारे वेब वृत्तपत्रांचा प्रसार करणे आवश्यक आहे. डॉ. रसाळ म्हणतात, जोपर्यंत ग्रामीण भागात वृत्तपत्रांचा प्रसार होणार नाही तोपर्यंत खेड्याचे चित्र संपुर्णपणे बदलू शकणार नाही. ज्या खेड्यात वृत्तपत्र पोहंचते तेथे विकासाचा विचार पोहंचतो व तेथे स्वयंसेवी संस्था अधिक उभ्या राहतात.[२४] या पार्श्वभूमीवर संगणकाच्या वापरामुळे वर्तमानपत्रांना कोणते लाभ झाले आहेत. असा प्रश्न विचारला असता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे.

## तालिका क्र. ९

## संगणकाच्या वापरामुळे झालेले लाभ

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| मुद्रण सुधारले | ८२ | २७.३४% |
| सजावट वाढली | १०२ | ३४% |
| छायाचित्रे स्पष्ट दिसू लागली | ८९ | २९.६७% |
| मजकूर अधिक प्रमाणात उपलब्ध | २७ | ९% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |




या तालिकेवरुन असे स्पष्ट होते की, सर्वाधिक म्हणजे १०२ म्हणजे ३४% पत्रकारांना असे वाटते की, माहिती तंत्रज्ञानामुळे मांडणी व सजावच वाढली आहे. तसेच ८९ म्हणजे २९.६७ % पत्रकारांना असे वाटते की, आता पुर्वीपेक्षा छायाचित्रे सुस्पष्ट

दिसू लागली आहेत. तर त्यानंतर ८२ म्हणजे २७.३४% पत्रकारांना वृत्तपत्राचे मुद्रण सुधारले आहे असे वाटते त्यानंतर २७ म्हणजे ९% पत्रकारांना असे वाटते की नव्या तंत्रज्ञानामुळे मजकूर पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात उपलब्ध होत आहे.

यासर्व पैलूंचा विचार करता बहुसंख्य पत्रकारांनी माहिती तंत्रज्ञान हे भाषिक वृत्तपत्रांना वरील चारही कारणामुळे वरदान ठरले आहे असे वाटते.


**वृत्तपत्रातील मनुष्यबळाचे प्रमाण**

आधुनिक माहिती तंत्रज्ञानामुळे वृत्तपत्रव्यवसायातील काळ काम वेगाचे गणीत झपाट्याने बदलले आहे. माहितीचे स्वयंचलन हे नव्या व्यवस्थापनाचे गतीतत्व होय. पिटर ड्रकर यांच्या मते The demands on the skill, knowledge, performance, responsibility and intigrity of the manager have doubled in every genaration during the past half century.[25] कौशल्य ज्ञान व कामगीरी याचा विचार करता गेल्या ५० वर्षात वृत्तपत्रव्यवस्थापकाची जबाबदारी वाढली आहे. कारण त्याला कमी मनुष्यबळाच्या आधारे अधिक चांगले काम करावयाचे आहे या पाश्र्वभूमीवर संणकामुळे वर्तमानपत्रावर अवलंबून असलेलया मनुष्यबळाचे प्रमाण कमी झाले काय असा प्रश्न विचारला असता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे.

## तालीका क्र. १०

### वृत्तपत्रातील मनुष्यबळाचे प्रमाण

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | १७८ | ५९.३४% |
| नाही | १२२ | ४०.६७% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |




या तालिकेवरुन असे स्पष्ट होते की, वर्तमानपत्रातील मनुष्यबळाचे प्रमाण माहिती तंत्रज्ञानामुळे कमी झाले आहे असे १७८ म्हणजे ५९.३४% पत्रकारांना वाटते तर नाही म्हणणाऱ्या पत्रकारांची संख्या १२२ म्हणजे ४०.६७% आहे. याचा अर्थ असा की, माहिती तंत्रज्ञानामुळे कामाचा वेग वाढला असून वर्तमानपत्रावर अवलंबून असणाऱ्या मनुष्यबळाचे प्रमाण कमी झाले आहे. जितके माहिती तंत्रज्ञान अद्ययावत होईल तितके

वर्तमानपत्राचे प्रकाशन अधिक सुलभ होईल आता ४-५ पत्रकार एखादे जिल्हा वर्तमानपत्र सुलभपणे प्रकाशित करु शकतात.

### वृत्तपत्र निर्मितीचा खर्च

वर्तमानपत्र हा एक भांडवलप्रदान उद्योग होय. डॉ. अनिलकुमार उपाध्याय म्हणतात, वर्तमानपत्र हे संपुर्ण समाजाशी तादात्म्य करणारे माध्यम असते.[२६] या माध्यमाच्या निर्मितीसाठी लागणारा खर्च कमी झाला तर ना नफा ना तोटा या तत्वावर वर्तमानपत्र अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचू शकते. वर्तमानपत्राच्या विक्रीमुल्या पेक्षा त्याचे निर्मीती मुल्य अधिक असल्यामुळे हा खर्च नियंत्रीत ठेवणे गरजेचे असते. या पार्श्वभूमीवर वर्तमानपत्र काढण्यासाठी लागणारा खर्च कमी झाला काय, असा प्रश्न विचारला असाता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे.

**तालीका क्र. ११**

**वृत्तपत्र निर्मितीचा खर्च**


| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ७७ | २५.६६% |
| नाही | २२३ | ७४.३४% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |

या तालीकेवरुन असे दिसते की, वर्तमानपत्राच्या निर्मितीचा खर्च कमी झाला नाही असे म्हणणाऱ्यांचे प्रमाण २२३ म्हणजे ७४.३४% एवढे आहे तर होय म्हणणाऱ्यांचे प्रमाण

७७ म्हणजे २५.६६% एवढे आहे.

याचा अर्थ असा की, वर्तमानपत्राची निर्मिती अनेक कारणामुळे जटील होत आहे. व हा भांडवल प्रधान उद्योग असल्यामुळे त्याचा निर्मिती खर्च वाढला आहे. कागद, उर्जा, व छपाईची साधने व वितरणाची वाहतूक

या माध्यमाचा निर्मिती खर्च वाढला आहे




**सामान्य वाचकाचे हित**

प्रगत माहिती तंत्रज्ञान हे वर्तमानपत्राचे

पथ्यावर पडले आहे. वर्तमानपत्रातील साम्

यामुळे सामान्य वाचक अधिक आनंदी व


लोकांच्या राहणीमान व जीवनमानात संपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी प्रसार माध्यमे माहिती तंत्रज्ञानाद्वारे यथार्थपणे भूमिका पार पाडू शकतात. त्यसाठी शिक्षण, पर्यावरण व आरोग्य या तीन क्षेत्रावर अधिक भर द्यावा लागेल. लोकांच्या जीवनशैली बदलण्यासाठी

काही प्राधान्यक्रम सुनिश्चित करावे लागणार आहेत.[२७] या पाश्र्वभूमीवर वर्तमानपत्रे सामान्य वाचकाला पूर्वीपेक्षा अधिक परवडू लागली काय,असा प्रश्न विचारला असता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे.

**तालीका क्र. १२**

**सामान्य वाचकाचे हित**

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | २६६ | ८८.६६% |
| नाही | ३४ | ११.३४% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |




याचा अर्थ असा की, नवीन तंत्रज्ञानामुळे वर्तमानपत्रात झालेले बदल सामान्य वाचकाला परवडू लागले आहे असे म्हणणाऱ्या पत्रकारांची संख्या २६६ म्हणजे ८८.६६% आहे तर नाही म्हणणाऱ्यांची संख्या ३४ म्हणजे ११.३४% आहे.

यावरून असे दिसते की, नवीन तंत्रज्ञानामुळे सामान्य वाचकाला वर्तमानपत्र परवडत आहे. अनेक वृत्तपत्र समुह स्पर्धेच्या युगात वाढता खर्च सहन करुनही १ रु. अंक देत आहेत, त्यामुळे सामान्य वाचकाला फायदा झालेला आहे.

**मांडणी व सजावटीवर झालेला परिणाम**

प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे वर्तमानपत्राच्या मांडणी व सजावटीवर दूरगामी परीणाम झाले आहेत. उमा जोशी म्हणतात की, The Print media is facing the challenge of electronic media but they have an important role to play as a social watch dog, social monitor, cunstructive critic and stimulator of new ideas.[२८] माहिती तंत्रज्ञानामुळे वर्तमानपत्रे नव्या जगात आपली भूमिका समर्थपणे वठवीत आहेत. डॉ. धारूरकर म्हणतात येत्या दहा वर्षात सर्वासाठी शिक्षण हे उद्दिष्ट साध्य करावयाचे असेल तर प्रसार माध्यमांना सक्रीय राहून यथार्थ भूमिका पार पाडावी लागेल.[२९] नव्या माहिती तंत्रज्ञानामुळे वर्तमानपत्राच्या मांडणी व सजावटीत महत्त्वाचे बदल झाले आहेत. डॉ. धारुरकर म्हणतात की, छायाजुळणीमुळे वृत्तपत्र आकर्षक व वाचनिय बनते तर संगणक संपादनामुळे ते निर्दोष बनते. वाचक आपल्या इच्छेनुसार आकर्षक वृत्तपत्राची निवड करतात.[३०] या पाश्‍र्वभूमीवर या गटामध्ये एकूण पाच प्रश्‍न विचारण्यात आले. त्याचा तपशील पुढे दिला आहे.

**ड १ मांडणीचे आकर्षक स्वरुप**


प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे वर्तमानपत्राची मांडणी पूर्वीपेक्षा जास्त आकर्षक झाली आहे.

विकसित अर्थव्यवस्थेमध्ये साक्षरतेच्या वाढत्या प्रसाराबरोबरच वृत्तपत्राची मागणी वाढत असताना मागणी व पुरवठ्यात मेळ घालण्यासाठी हे नवे माहिती तंत्रज्ञान उपयुक्त ठरले आहे. या परिवर्तनप्रवाहाचे मुळ कारण नवी अद्ययावत उपकरणे, छायाजुळणी व ऑफसेट मुद्रण हे होय [३१] या पार्श्वभूमीवर प्रगत तंत्रज्ञानामुळे पूर्वीपेक्षा मांडणी अधिक आकर्षक झाली आहे असे वाटते का असा प्रश्न विचारला असता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे.

**तालिका क्र. १२**

**मांडणीचे आकर्षक स्वरुप**

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | | |
| नाही | | |
| **एकूण** | | |



या तालिकेवरुन हे स्पष्ट होते की, मांडणीचे आकर्षक स्वरूप झाले आहे असे म्हणणाऱ्यांची संख्या २६३ म्हणजे ८७.६६% एवढी आहे तर ३७ म्हणजे १२.३४% उत्तरदात्यांनी नकारात्मक मत नोंदविले आहे. यावरुन मांडणी अधिक आकर्षक होत असल्याचे पत्रकारांनी मान्य केले आहे.


## मराठी वृत्तपत्रातील मांडणीचे नवे स्वरुप

प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे वर्तमानपत्रातील मांडणी पूर्वीपेक्षा अधिक आकर्षक झाली आहे तसेच वर्तमान पत्रे योग्य मांडणीचा उपयोग करत आहेत. प्रा, जॉन्सन म्हणतात, The make up editor observes the balance but not symmetry. the object is to balance the focal points on the page [३२] पहिल्या पानाची मांडणी करणारे संपादक समतोल साधण्याचा प्रयत्न करत असतात या पार्श्वभूमीवर मराठीवृत्तपत्रात समांतर विषम वर्तुळाकार मांडणी यापैकी कोणती मांडणी अधिक वापरतात असा प्रश्न विचारला असता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे.

**तालिका क्र. १३**

**मराठी वृत्तपत्रातील मांडणीचे नवे स्वरुप**

| तपशील | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|
| १ समांतर | १७० | ५६.६६% |
| २ विषम | ७० | २३.३४% |
| ३ वर्तुळाकार | ६० | २०% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |




या तालिकेवरुन असे स्पष्ट होते की, समांतर मांडणी अधीक वापरली जाते असे १७० म्हणजे ५६.६६ % पत्रकारांना वाटते तर विषम मांडणी ७० म्हणजे २३.३४% पत्रकारांनी पसंती दिली आहे. तर वर्तुळाकार मांडणीस २० % पत्रकारांनी पसंती दिली आहे.

याचा अर्थ असा की, मराठी वृत्तपत्रात समांतर मांडणी हा प्रयोग अधिक लोकप्रिय

आहे.

## व्यंगचित्रे व रेखाटनांचे सुयोग्य प्रमाण

वर्तमानपत्रे केवळ अक्षरांच्या छपाईने सुंदर होत नाहीत. तर त्यांच्या बरोबर व्यंगचित्रे रेखाटने ही सामुग्री ही पोषक ठरते. माहिती तंत्रज्ञानामुळे सजावटीच्या या तंत्रात अनुकूल बदल झाले आहेत. आधुनिक मुद्राक्षरकलेमध्ये ग्राफिक या शास्त्राला विशेष महत्त्व आहे. प्रा. एडमंड अर्नोल्ड यांच्या मते समग्र वृत्तपत्राच्या सजावटीचे शास्त्र म्हणजेच ग्राफिक आहे.[३३] या पार्श्वभूमीवर व्यंगचित्रे व रेखाटने वापरण्याचे प्रमाण संगणकामुळे अधिक सुधारले आहे काय, असा प्रश्न विचारला असता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे.

**तालीका क्र. १४**

**व्यंगचित्रे व रेखाटनांचे सुयोग्य प्रमाण**


| तपशील | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १८६ | ६२% |
| नाही | ११४ | ३८% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |

या तालिकेवरुन असे दिसते की, व्यंगचित्रे व रेखाटनांचे सुयोग्य प्रमाण आहे असे म्हणणाऱ्यांची संख्या १८६ म्हणजे ६२ % आहे तर नाही म्हणणाऱ्यांची संख्या ११४ म्हणजे ३८% आहे.

याचा अर्थ असा की, माहिती तंत्रज्ञानामुळे व्यंगचित्रे व रेखाटने यांचे प्रमाण सुधारले आहे असे बहुसंख्य पत्रकारांना वाटते.

**टंकाचा समर्पक आकार**


संगणकामुळे वर्तमानपत्रातील अक्षराची झीज कमी झाली आहे. तसेच टाईप किंवा चटंकाचा आकार कमी जास्त करणे शक्य इलेक्ट्रॉनिक न्युजरुम चे अवतरण म्हणजे सं नामी संधी होय.[३४] या पार्श्वभूमीवर माहित कमीजास्त करणे सहज शक्य झाले आहे माहिती उपलब्ध झाली आहे.



## तालिका क्र. १५

## टंकाचा समर्पक आकार

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ३०० | १००% |
| नाही | ० | ०% |
| **एकूण** | **३००** | **१००%** |




वरील तालिकेवरुन सर्वच उत्तरदात्यांनी टंकाचा आकार कमी जास्त करणे माहिती तंत्रज्ञानामुळे शक्य झाले आहे याबद्दल पत्रकारांने एकमुखी प्रतिसाद झाला आहे.

**पेजमेकरचा वापर**


अलीकडे वृत्तपत्रात पानाची मांडणी करण्यासाठी पेजमेकर हे तंत्र वापरले जात आहे. तसेच त्यासाठी कॉर्क एक्सप्रेस या नव्या सॉफ्टवेअरचा वापर केला जात आहे. प्रा. एडमंड अर्नोल्ड म्हणतात, While front pages are conspicious most of a

newspaper consists of inside pages many of there carry advertising as well as editorial matter[३५] या पाश्‍र्वभूमीवर भाषिक वृत्तपत्रे पेजमेकरचा वापर करून पानांची मांडणी नव्याने करत आहेत काय, असा प्रश्‍न विचारला असता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे.

**तालिका क्र. १६**

**पेजमेकरचा वापर**

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | ३०० | १००% |
| नाही | ० | ०% |
| **एकूण** | | |




वरील तालिकेवरुन सर्वच्या सर्व ३०० उत्तरदात्यांनी पेजमेकरचा वापर करुन वर्तमानपत्रे पानाची समर्पक मांडणी करत आहेत याबद्दल पत्रकारांने एकमुखी प्रतिसाद दिला आहे.

## ई) १) मराठी वृत्तपत्रांमध्ये इंटरनेटचा वापर

इंटरनेटच्या आगमनामुळे मराठी वृत्तमानपत्रांमध्ये अनेक नवीन बदल घडून येत आहेत. वार्ता मिळविण्याची आणि त्यासोबत छायाचित्रे प्रकाशित करण्याची संधी नव्याने उपलब्ध होत आहे. प्रा.ब्लुमेथॉल म्हणतात, महानगरात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाचं घर आता माध्यम कक्ष बनलेलं आहे अशा वेळी नव्या विचारप्रसारण युगामध्ये एकविसाव्या शतकात जगभरातील वृत्तपत्रांचे व्यक्तिमत्त्व संपूर्णपणे पालटत आहे. या नव्या युगातील वृत्तपत्रांचा बदलता चेहरा कसा असेल या विषयीची ही चर्चा नवी दिशा देऊ शकते.[३६] या पार्श्वभूमीवर मराठी वृत्तपत्रात इंटरनेटचा वापर केव्हापासून सुरू झाला असा प्रश्न विचारला होता? त्या आधारे प्राप्त झालेली माहिती पुढील तालिकेमध्ये दिलेली आहे.


**तालिका क्र. १७**

**मराठी वृत्तपत्रात इंटरनेटचा वापर**

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| पाच वर्षे | १८३ | ६१ टक्के |
| दहा वर्षे | ९४ | ३१.३४ टक्के |
| पंधरा वर्षे | २३ | ७.६७ टक्के |
| **एकूण** | **३००** | **१००%** |

या तालिकेवरून हे स्पष्ट होते की, सर्वाधिक म्हणजे पाच वर्षांपासून इंटरनेटचा वापर वृत्तमानपत्रात होतो असे म्हणणाऱ्या पत्रकारांची संख्या १८३ असून हे प्रमाण ६१ टक्के एवढे आहे.

त्यानंतर दहा वर्षांपासून इंटरनेटचा वापर म्हणजे ३१.३४ टक्के एवढी आहे तर म्हणणाऱ्या पत्रकारांची संख्या २३ म्हणजे की, सर्वाधिक पत्रकारांच्या मते मराठी वृत्त झाला आहे.




**ई) २) इंटरनेटचे वाजवी दर**


दूरसंदेश क्षेत्रातील वैज्ञानिक प्रगतीमुळे इंटरनेट सुविधांचे दर कमी होत आहेत. त्याबरोबर त्यांचा ग्राहक वर्गही वाढत आहे. डॉ. धारूरकर यांच्या मते भारतात इंटरनेटच्या वापराची उपयुक्तता दिवसेंदिवस गतीने वाढत आहे. त्याचे ग्राहक जसे वाढतील तशी

त्याची क्षमताही सतत वाढत जाईल.[३७] दूरसंदेश क्षेत्रातील प्रगतीमुळे इंटरनेटचे दर कमी झाले काय, असा प्रश्न विचारला होता त्या आधारे पुढील माहिती समोर आली आहे. त्याची माहिती खाली दिली आहे.

**तालिका क्र. १८**

**इंटरनेटचे वाजवी दर**

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | २३२ | ७७.३३ टक्के |
| नाही | ६८ | २२.६७ टक्के |
| **एकूण** | | |




या तालिकेवरून हे स्पष्ट होते की, सर्वाधिक म्हणजे २३२ (७७.३३) टक्के पत्रकारांच्या मते दूरसंदेश क्षेत्रातील प्रगतीमुळे इंटरनेटचे दर कमी झाले आहेत तर ६८ म्हणजे (२२.६७) टक्के पत्रकारांच्या मते असा प्रभाव पडलेला नाही. यावरून असे


म्हणता येईल की, इंटरनेटचे दर हळूहळू कमी होत आहेत व त्याचा वर्तमानपत्रांना लाभ होत आहे.

### ई) ३) इंटरनेटमुळे वृत्तपत्रांना झालेले विशेष लाभ

इंटरनेट म्हणजे वर्तमानपत्रांना जणू एक कल्पवृक्ष ठरला आहे. इंटरनेटचे बहुउद्देशीय लाभ असून त्यामुळे वर्तमानपत्रे नवे रूप धारण करीत आहे. त्यांना एक प्रकारची ताजी माहिती उपलब्ध होत आहे. डॉ. धारूरकर यांच्या मते संगणकाचे कमी होत असलेले भाव, टेलिफोन दरामध्ये जाहीर करण्यात आलेल्या सवलती, तसेच इंटरनेट जोडणीतील अनेक प्रकारच्या सवलती यामुळे इंटरनेट ग्राहकांच्या संख्येत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. आज इंटरनेट क्षेत्रात ९ हजार लोक रोजगार धारण करत आहे. परंतु येत्या काही वर्षात वेबडिजाईनर, वेबप्रोग्रामर, डाटाबेस एडमिनिस्ट्रेटर, वेब मास्टर, कंटेंट क्रिएटर, आईएसपी इफ्रास्टक्चर इत्यादी तज्ज्ञांच्या संख्येत वाढ होऊन या क्षेत्रात १५ लाखांहून अधिक रोजगार संधी उपलब्ध होत आहे.[३८] इंटरनेट वापरामुळे पुढीलपैकी कोणते लाभ वर्तमानपत्रांना झाले आहेत असा प्रश्न विचारला असता पुढील माहिती उपलब्ध झाली आहे.

## तालिका १९

| तपशील | उत्तरदाते | टक्केवारी |
|---|---|---|
| ताज्या वार्ता मिळतात | १६३ | ५४.३३ टक्के |
| भाषांतराचे काम सोपे झाले | ४३ | १४.३४ टक्के |
| छायाचित्रे मिळू लागली | ३८ | १२.६७ टक्के |
| जागतिक वर्तमानपत्रांचे संदर्भ कळू लागले | ३४ | ११.३४ टक्के |
| चित्रवाणी वाहिन्यांवरील बातम्या उपलब्ध | २२ | ७.३२ टक्के |
| **एकूण** | | |




वरील तालिकेवरून हे स्पष्ट होते की, सर्वाधिक म्हणजे १६३ (५४.३३) टक्के

उत्तरदात्यांना असे वाटते की, इंटरनेटमुळे ताज्या वार्ता मिळतात. तर ४३ (१४.३४) टक्के पत्रकारांना असे वाटते की भाषांतराचे काम सोपे झाले आहे. तर ३८ (१२.६७) टक्के  पत्रकारांना असे वाटते की, आता वर्तमानपत्रांना जलद छायाचित्रे मिळू लागली आहेत. तर ३४ (११.३४) टक्के पत्रकारांना असे वाटते की, जागतिक वर्तमानपत्रांचे संदर्भ स्थानिक वृत्तपत्रांना कळू लागले आहेत. याचा अर्थ असा की, इंटरनेटमुळे वृत्तपत्रांना ताज्या बातम्या गतीने मिळत आहेत.


### ई) ४) वेब आवृत्तीमुळे स्वावलंबन

इंटरनेट युगात भाषिक वर्तमानपत्रे आपली वेबसाईट तयार करीत आहेत. वेब वृत्तपत्रांचे हे विश्व अत्यंत अद्‌भूत आहे.  तज्ज्ञ अभ्यासकांच्या मते वेब आवृत्ती आकर्षक करण्यासाठी तिची व्हिज्युअल तंत्राने सजावट केली जाते. प्रतिके व चित्रे आकर्षकपणे मांडली जातात. मजकूर माहिती तसेच त्यातील तपशील हा काही तासानंतर सहज अद्ययावत करता येतो. यावरून प्रश्न विचारला असता असे लक्षात येते की या तालिकेवरून हे स्पष्ट होते की, सर्वाधिक १७६ म्हणजे  ५८.६७ टक्के पत्रकारांना वेब आवृत्तीमुळे वृत्तपत्रे स्वावलंबी होत आहे असे वाटते तर १२४ म्हणजे ४१.३४ टक्के पत्रकारांना त्याचा लाभ होत नाही असे वाटते. याचा अर्थ असा की, इंटरनेटवर आधारलेल्या स्वत:च्या वेब आवृत्तीमुळे वृत्तपत्रे अधिक स्वावलंबी होत आहेत.

## तालिका २०

## वेब आवृत्तीमुळे स्वावलंबन

| **तपशील** | **उत्तरदाते** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| होय | १७६ | ५८.६७ टक्के |
| नाही | १२४ | ४१.३४ टक्के |
| **एकूण** | **३००** | **१००%** |




### ई) ५) पत्रकाराने सूचित केलेले उपाय

वर्तमानपत्रातील माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरासाठी काही उपाय सूचित केले पाहिजेत. उमा जोशी यांच्या मते प्रगत तंत्रज्ञानामुळे वर्तमानपत्राच्या मुद्रण, मांडणी, सजावट व दृकप्रतिमामध्ये लक्षणीय बदल झाले आहेत.[३९] या पार्श्वभूमीवर वर्तमानपत्रातील माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरासाठी काही उपास सुचित करा असा प्रश्न विचारला होता. त्याची उत्तरे पुढील ३ मुद्यांमध्ये दिली आहे.

१)  पत्रकारांना नवीन माहिती तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासाठी प्रभावी प्रशिक्षण वर्गाची गरज आहे. असे प्रशिक्षण अत्यंत काळजीपूर्वक योजना करून आखले पाहिजेत. त्यासाठी वर्तमानपत्राच्या मनुष्यबळ विभागाने पुढाकार घेतला पाहिजे.

२)  आपले व्यावसायिक ज्ञान व कौशल्य सतत वर्धिष्णु ठेवण्यासाठी पत्रकाराने स्वत:हून प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी त्यानी विशेष पत्रिका, नियतकालिके आणि ग्रंथाच्याद्वारे माहिती मिळविली पाहिजे. वर्तमानपत्रांनी असे संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून दिले पाहिजे.

३)  काळानुरून बदल होत जाणाऱ्या वृत्तपत्र व्यवसायात तंत्रज्ञानाची नवी पाऊले पडत आहेत. त्यासाठी पत्रकारांना नवीन दृष्टीने काल सुसंगत प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय जनसंचार संस्था प्रेस इन्स्टिटय़ूट ऑफ इंडिया तसेच प्रेस कौन्सिल यांनी पुढाकार घेतला पाहिजे. विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या विभाग आणि वर्तपत्र संस्था यांनी एकत्र येऊन दरवर्षी प्रशिक्षणाचे कार्यक्रम आखले पाहिजेत.

**तुलनात्मक अध्ययन : तंत्रज्ञानामुळे झालेले फायदे**

१९८५ पूर्वी महाराष्ट्रातील वृत्तपत्रे सनातनी होती. ती लेटरप्रेसवर छापली जात असत. तसेच सिलेंडर किंवा रोटरी तंत्राने त्यांची छपाई होत असे. २००५ नंतर त्यांचे चित्र बदलले. या बदलाचे लाभ लक्षात घेता साधारणपणे मुद्रणासाठी लागणारे मनुष्यबळ, वर्तमानपत्रातील पानसंख्या तसेच वाढलेल्या बातम्यांची संख्या, छायाचित्रांची संख्या,

व्यंगचित्रांची संख्या याबाबतीत तुलना केली असता पुढीलप्रमाणे चित्र स्पष्ट होते.

| अ.क्र. | विविरण | १९८५ पूर्वी | २००५ नंतर |
|---|---|---|---|
| १. | मनुष्यबळ | ४० | ०८ |
| २. | पानसंख्या | ०८ | १६ |
| ३. | बातम्यांची संख्या (पहिलेपान) | ३० | १२० |
| ४. | छायाचित्रांची संख्या | ०१ | ०४ |
| ५ | व्यंगचित्रे | ०० | ०२ |

या तालिकेवरून हे स्पष्ट होते की, १९८५ पूर्वी वर्तमानपत्रांचा दर्जा व सजावट अत्यंत सुमार होती. परंतु आता प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे पेजमेकर तंत्राचा वापर होत आहे. पानाची तत्काळ मांडणी करता येणे शक्य झाले आहे. नव्या सॉफ्टवेअरमुळे व्हिज्यूअल डिस्पले टेक्निक्स (व्हीडीटी) तंत्र उदयास आले आहे. रंगीत छायाचित्रे तसेच ग्राफिक्स सजावटीची प्रतिमाने यांचा वापर वाढला आहे. पूर्वी वर्तमानपत्राचे पान लावण्यासाठी दोन तास लागत असत. आता हे काम अवघ्या पाच ते दहा मिनिटांत पूर्ण होते. शिवाय कोणताही मजकूर अल्पावधीत वाढवता येतो, बदलता येतो किंवा त्याला नवे स्वरूप देता येते. प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे वर्तमानपत्रातील आशय, सजावट, मांडणी तसेच रेखाटनांचा वापर इत्यादी वैशिष्ट्ये पाहता भाषिक वर्तमानपत्रेसुद्धा संपूर्णपणे बदलली आहेत. त्यांच्या काळ, काम, वेगाचे गणित नवे रूप धारण करीत आहे.

## ४.५ माहिती तंत्रज्ञान अंमलबजावणीतील अडसर

वृत्तपत्र व्यवसायात रोज नवे प्रवाह येत आहेत. तसेच या नव्या प्रवाहांचे ज्ञान व भान पत्रकारांना असले पाहिजे. त्यांना अद्ययावत अशा तंत्रज्ञानाची ओळख करून दिली पाहिजे. उमा जोशी यांच्या मते आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यामध्ये शिक्षण, मनोरंजन तसेच प्रबोधन ही कामे एकाच वेळी करावयाची आहे. देशापुढील समस्यांपूर्तीमध्ये जर वाचकांना सहभागी करून घ्यावयाचे असेल तर त्यांना नवीन तंत्रज्ञानाची माहिती असली पाहिजे.[४०] आजची वर्तमानपत्रे ग्राहक केंद्री बनत आहेत व ग्राहकांना उपयोगी अशी माहिती देत आहेत. त्यामुळे त्यांच्यापुढे बाजारपेठ प्राधान्याने विचारात घेतली जात आहेत.[४१] माहिती तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीत पुढील अडसर दिसून येतात.

### अ) तांत्रिक अडसर

बऱ्याच वेळा भाषिक वर्तमानत्रांमध्ये तांत्रिक मनुष्यबळ अपुरे असते. या वर्तपत्राकडे तज्ज्ञ तंत्रज्ञ उपलब्ध नसतात. छोट्याशा बिघाडासाठी त्यांना आयटी अभियंत्याकडे मार्गदर्शन घ्यावे लागते. संगणकाचे हार्डवेअर, सॉफ्टवेअर तसेच इंटरनेटवरील तंत्रज्ञान याबाबत भाषिक वर्तमानपत्रातील मनुष्यबळ नेहमी संकटात सापडलेले असते. त्यांना त्यासाठी सल्ला सेवेवर अवलंबून राहावे लागते. जागतिकीकरणानंतर तंत्रज्ञानाचा झपाटा वाढला आणि संवाद क्रांतीमुळे माध्यमांना बाजारपेठ समजून घेण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानावर अवलंबून राहावे लागत आहे.[४२]

## ब) आर्थिक अडचणी

भाषिक वर्तमानपत्रांचे वित्तीय व्यवहार हे सीमीत असतात त्यांना जाहिराती व वितरणातून अल्प प्रमाणात फायदा होतो. त्यातही नफा व तोटा यातील समकक्ष बिंदू त्यांना सातत्याने गाठावा लागतो. आर्थिक अडचणींमुळे ही वर्तमानपत्रे तंत्रज्ञानाकडे पुरेसे लक्ष देऊ शकत नाही. नवीन सॉफ्टवेअर खर्चिक असल्यामुळे पायरेटेड व्हर्जन वापरण्याकडे त्यांचा कल असतो. आर्थिक अडचणीमुळे साधन सामुग्रीची टंचाई भासते. त्यामुळे तंत्रज्ञानाकडे लक्ष देता येत नाही.[४३]

## क) व्यावसायिक प्रशिक्षणाचा अभाव

वृत्तपत्र व्यवसायात यंत्रापेक्षा माणसे मोठी असतात. परंतु त्यांना सतत मार्गदर्शनाची गरज असते. जर त्यांना योग्य ते मार्गदर्शन योग्य वेळी मिळाले नाही तर त्यांच्या कामात अनेक चुका होतात. व त्या चुका वर्तमानपत्राला परवडणाऱ्या नसतात. या चुका होऊ नयेत म्हणून वर्तपत्रांना विशेष प्रशिक्षणाची गरज असते. त्यासाठी वर्तमानपत्राने स्वत:चा मनुष्यबळ विकास विभाग निर्माण केला पाहिजे. पण भाषिक वर्तमानपत्राकडे अल्प सुविधामुळे असा विभाग निर्माण करता येत नाही. पत्रकारितेमुळे चुका आणि शिका हे तत्व टाळून प्रत्यक्षात प्रशिक्षण घेण्यावर भर दिला पाहिजे.[४४]

## ड) जनसंपर्काचा अभाव

प्रगत माहिती तंत्रज्ञान वापरताना अलीकडे इंटरनेट, वेबसाईट, एसएमएस या तंत्रांचा

वापर केला जात आहे शिवाय वर्तमानपत्राच्या विक्री व प्रसाराचे अनेक नवे प्रयोग केले जात आहेत. परंतु छोट्या वर्तमानपत्रात जनसंपर्क विभाग नसतो. त्यामुळे त्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे नवे मार्केटिंग तंत्र वापरता येत नाही. एकविसाव्या शतकात थेट जनसंपर्काला महत्व आले आहे व ते प्रगत तंत्रज्ञानामुळे शक्य होते.[४५]

## इ) संशोधनाचा अभाव

छोट्या वर्तमानपत्रात संशोधन व विकास हा विभाग नसतो. भाषिक वर्तमानपत्रे संशोधनावर पुरेशी रक्कम खर्च करू शकत नाही. त्यामुळे साचेबद्ध अशा समस्यांना त्यांना रोज सामोरे जावे लागते. जर वर्तमानपत्रात संशोधन विभाग असेल तर त्यामुळे त्यांच्यापुढील जिवंत समस्या चांगल्या प्रकारे सोडविता येऊ शकतात. प्रा. इप्पन यांच्या मते छोट्या वर्तमानपत्रात संशोधनाचा अभाव असतो.[४६]

## ई) वार्ता संकलन व संपादन समस्या

भाषिक वर्तमानपत्रात ताज्या वार्ता मिळविणे व त्या संपादन करणे ही अवघड बाब आहे. त्यासाठी त्यांना प्रगत माहिती तंत्रज्ञानावर अवलंबून राहावे लागते. जर क्वॉर्क एक्स्प्रेस, इन डिजाइन, पेज मेकर यासारखे सॉफ्टवेअर वर्तमानपत्रांकडे नसेल तर त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. वार्ता संकलन व संपादन सुविधांचा अभाव ही एक प्रधान समस्या असल्याचे दिसून येते.[४७]

## ४.६ उपाययोजना

या पार्श्वभूमीवर वर्तमानपत्रात माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरासाठी पुढील उपाय सूचित करता येते.

१) भाषिक वर्तमानपत्रांना प्रगत तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी व्यावसायिक संघटनांनी प्रशिक्षणाचे वर्ग असले पाहिजेत. त्यासाठी या संघटनांनी पुढाकार घेऊन प्रत्येक वृत्तपत्रात किमान २ ते ३ तज्ज्ञांना विशेष प्रशिक्षण दिले पाहिजे.

२) वर्तमानपत्रापुढे असलेल्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन त्यांना प्रगत सॉफ्टवेअर घेण्यासाठी बँकांनी कर्ज उपलब्ध करून दिले पाहिजे. तसेच त्यांना पुरेसे आर्थिक पाठबळही प्राप्त करून दिले पाहिजे. तसेच वृत्तपत्र क्षेत्रात परकीय गुंतवणुकीला एफडीआय परवानगी दिल्यामुळे भाषिक वृत्तमानपत्रांनी विदेशी गुंतवणूकदार यांचे साह्य घेतले पाहिजे.

३) संघटनांनी आणि वर्तमानपत्रांनी तसेच विद्यापीठातील विभागांनी एकत्र येऊन ३ दिवसांचे किंवा ५ दिवसांचे प्रशिक्षण वर्ग आखले पाहिजेत. शिबिरे, अभ्यास वर्ग व कार्यशाळा यांच्या आयोजनातून नवीन माहिती तंत्रज्ञानाचा प्रसार चांगल्या पद्धतीने होऊ शकतो. तसेच इंटरनेट वापराबाबत व सायबर कायद्याबाबत प्रशिक्षणाची गरज आहे.

४) भाषिक वर्तमानपत्रांनी आपल्या वस्तू व सेवांच्या विपणनासाठी नवीन तंत्रज्ञानाचा

वापर केला पाहिजे. प्रगत जनसंपर्कामुळे वर्तमानपत्रे अधिक चांगल्या प्रकारे आपली प्रतिमा निर्माण करू शकतील. त्यांना आपली संकेत स्थळे तयार करणे व त्या आधारे प्रतिष्ठा उंचावणे याबाबत प्रशिक्षण दिले पाहिजे.

५) प्रत्येक छोट्या व भाषिक वर्तमानपत्राने आपल्या व्यवस्थापन विभागात संशोधन विभाग सुरू केला पाहिजे. त्यासाठी त्यांनी काही संस्थांचा सल्लाही घेतला पाहिजे. या प्रकारचा सल्ला संस्थेला चांगले काम करण्यासाठी वरदान ठरू शकतो.

६) नव्या तंत्रज्ञानाच्या आधारे वार्तांचे संकलन व संपादन करण्यासाठी नव्या प्रशिक्षण वर्गावर भर दिला पाहिजे. खास करून इंटरनेटच्या आधारे बातम्या कशा घ्याव्यात, वृत्तसंस्थांच्या बातम्या कशा वापराव्यात, प्रसिद्धी खात्याने दिलेला मजकूर कशा प्रकारे वापरावा याबाबत प्रशिक्षणाची गरज आहे तसेच पर्यावरण, ऊर्जा, पाणी आणि ग्राहकहित इत्यादी क्षेत्राबाबत प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

## ४.७ पाहणीच्या आधारे अनुमान व विश्लेषण

या अभ्यासातील सामाजिक पाहणीच्या आधारे खालील अनुमाने काढता येतील. ही अनुमाने प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीवर आधारलेली आहेत.

अ) वृत्तपत्र वाचकांची मानसिकता तंत्रज्ञानामुळे बदलली आहे. जे वृत्तपत्र सुबक छापले जाते त्याकडे वाचक अधिक आकर्षित होत आहेत. माहिती तंत्रज्ञान वापरणाऱ्या वृत्तपत्रांची संख्या झपाट्याने वाढली आहे. १० पैकी सहा वाचक अंक विकत

घेऊन वाचतात तर अन्य वाचक शेजारी किंवा ग्रंथालयातून वाचन करतात. वृत्तपत्रांप्रमाणेच ज्याची क्रयशक्ती जास्त आहे असा वाचक एका कुटुंबात दोन ते तीन मासिके व पाक्षीके घेऊन आपली माहितीची पातळी उंचावत आहे.

ब) माहिती तंत्रज्ञानाचा वापर करताना वृत्तपत्रे प्रगत सल्लासेवा घेत आहेत. मुद्रणातील नवे प्रयोग समजावून घेत आहेत. रंगीत छपाई, मांडणी व सजावट तंत्र यावर भर दिला जात आहे. जुन्या तंत्रज्ञानापेक्षा नवे तंत्रज्ञान अधिक किफायतशीर आहे व लाभदायक आहे असे वृत्तपत्रांच्या लक्षात आले आहे. पूर्वीपेक्षा आता मनुष्यबळाचा वापर कमी होत आहे. जेथे ४० अक्षरजुळारी लागत असत तेथे आता चार किंवा आठ डीटीपी ऑपरेटर ते काम पूर्ण करत आहेत. वर्तमानपत्रांच्या आकाराप्रमाणे पानांची मांडणी व सजावट केली जात आहे. तसेच विविध आकरांच्या तीन-चार पुरवण्या आठवडाभर वाचकांना दिल्या जात आहेत. तसेच रंगीत छपाईबरोबरच आकर्षक व्यंगचित्रे देऊन रेखाटने काढून आरेखन पद्धतीचा उपयोग करून वृत्तपत्राची सजावट केली जात आहे. हे पेजमेकर व ग्राफिक तंत्रामुळे शक्य झाले आहे. प्रा. एडमंड अर्नाल्ड यांनी मांडलेल्या परिपूर्ण वृत्तपत्राच्या सजावटीचे तंत्र आता जिल्हा पातळीपर्यंत पोहोचले आहे.

क) मांडणी व सजावटीमध्ये आकर्षक बदल झाले आहेत. प्रमाणबद्धता, लयबद्धता, सरळता, भारतत्त्व, समतोल हे नव्या सजावटीचे गुण असून, आपले पान वाचकाच्या पसंतीस उतरेल अशा पद्धतीने त्यात विविध सजावट तंत्रांचे व मांडणी

पद्धतीचे योजकतेने उपयोजन केले जात आहे. जे वृत्तपत्र अधिक कलात्मक मांडणी करते ते वृत्तपत्र वाचकांचे लक्ष वेधून घेत आहे.

ड) अलिकडे गेल्या दहा वर्षात इंटरनेटचा प्रभाव वाढला आहे. सबंध जगातील घटना व घडामोडी काही मिनिटांच्या आत छोट्या वृत्तपत्रांना उपलब्ध होत आहेत. त्यामुळे छोटी वृत्तपत्रे, छायाचित्रे, अद्ययावत माहिती व विश्लेषण याबाबतीत इंटरनेटवर अवलंबून राहत आहेत. तसेच जगातील विविध वृत्तपत्रांच्या वेब आवृत्ती वाचून त्याआधारे मांडणी व सजावट करण्याचा प्रयत्न केला जातो. इंटरनेटमुळे जागतिक पातळीवर वेबआवृत्त्यांचा प्रभाव पडत असून, सायबर युगात ऑनलाईन पत्रकारिता नवे रूप धारण करत आहे.

## ४.८ समारोप

या प्रकरणात अशा प्रकारे सामाजिक पाहणीचा क्षेत्रीय अहवाल सादर केला आहे. प्रथम ३०० पत्रकारांच्या पाहण्याची उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आली. समाजशास्त्रीय दृष्टीकोन स्पष्ट करण्यात आला. पाहणीचा अहवाल ५ प्रमुख विभागांतून मांडण्यात आला. त्या आधारे २२ तालिका देऊन त्यांचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यात आले. जागतिकीकरणानंतर माहिती तंत्रज्ञानाचा रेटा एवढा वाढला आहे की, वर्तमानपत्रे त्यापासून मुक्त राहू शकत नाहीत. भाषिक पत्रांच्या पुढे असलेल्या ६ समस्यांची नोंद करून त्या आधारे उपाययोजना स्पष्ट करण्यात आली. खरे तर प्रगत तंत्रज्ञान हे कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे द्योतक असते. डॉ. कलाम यांच्या मते माहिती तंत्रज्ञान ही एक सामाजिक बदलाची शक्ती आहे.

जर समाजाचे बदलते स्वरूप अधिक गतिमान करावयाचे असेल तर प्रगत तंत्रज्ञानाचा स्वीकार अपरिहार्य आहे. तंत्रज्ञान हे राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीचे गमक आहे आणि राष्ट्रीय विकासाला वेग देण्यासाठी प्रसार माध्यमांनी नवी वाटचाल केली पाहिजे. अधिकाधिक लोकांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे, विकास कल्पनांचा पाठपुरावा करणे व लोकांना परिवर्तनासाठी सज्ज करणे या ३ बाबींवर अधिक भर दिला पाहिजे.[४८] या दृष्टीने सामोरे जाण्याची गरज आहे.

अशाप्रकारे या प्रकरणामध्ये माहिती तंत्रज्ञनाचा वृत्तपत्र माध्यमावर पडलेल्या प्रभावाची व परिणामाची चर्चा करण्यात आली. वृत्तपत्र व्यवसायात माहिती तंत्रज्ञानाचा प्रवेश झाल्यावर त्याची ओळख कशी झाली. वृत्तपत्रे माहिती तंत्रज्ञानात कशा प्रकारे सामोरे जात आहेत त्यांच्या कार्यपद्धतीवर इंटरनेटचा प्रभाव कसा पडत आहे या अनुषंगाने येथे मीमांसा करण्यात आली. त्यामुळे परिपूर्ण वृत्तपत्राच्या सर्वंकष रचनेवर पडलेला माहिती तंत्रज्ञानाचा परिणाम व त्याची तीव्रता समजावून घेणे शक्य झाले आहे. पुढील प्रकरणात मांडणी व सजावट यादृष्टीने अभ्यास केला आहे.

## संदर्भसूची


१. बर्जर ए. ए., मिडिया ॲनालिसिस टेक्निक्स, पृष्ठ-१८

२. कित्ता, पृष्ठ-२१

३. डॉ. धारूरकर वि. ल., माहिती तंत्रज्ञान व प्रसारमाध्यमे, चैतन्य प्रकाशन औरंगाबाद. पृष्ठ-१८३

४. कित्ता, पृष्ठ-१८३

५. एगी, इमरी व ऑल्ट, ए इंट्रॉडक्शन टू मास कम्युनिकशेन, हार्पर रो-१९७९, पृष्ठ-२९९-३००

६. भांडारकर पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, पृष्ठ-३८

७. कित्ता, पृष्ठ-३९

८. घाटोळे रा. ना, समाजशास्त्रीय संशोधन पध्दती, श्रीमंगेश प्रकाशन, कोल्हपूर, २००२, पृष्ठ २५

९. कित्ता, पृष्ठ-२६

१०. गुड व हॅट, सोशन सर्वे रिसर्च, पृष्ठ-८

११. राईट चार्ल्स,

12. David Cygansky - John A Orr; Information Techonlogy : Inside & Outside.Prentice hall, 2001., Page-293

13 IBID,Page-294

१४. घाटोळे रा. ना,, उपरोक्त, पृष्ठ-२५

१५. कित्ता, पृष्ठ-२६

१६ सोधी कृष्ण, कम्युनिकेशन ॲण्ड व्हॅल्यूज, सोमय्या, मुंबई-१९८५, पृष्ठ २६-२७

१७ जोशी उमा, मास कम्युनिकेशन ॲण्ड मिडिया, अनमोल, नवी दिल्ली-२००५, पृष्ठ-२८

१८ होहेनबर्ग जॉन, द प्रोफेशनल जर्नलिस्ट चतुर्थ संस्करण न्यूयॉर्क १९७८ पृ.५४४

१९ गेराल्ड एडवर्ड, द सोशल रिसपॉन्सीबीलीटी ऑफ दी प्रेस ईस्ट-वेस्ट, सेंटर हॉनलूलू १९६३, पृ. ७

२० जोशी उमा, उपरोक्त पृ. २७

२१ कित्ता पृ ३३

२२ डॉ. धारुरकर वि.ल. प्रसारमाध्यमे व माहिती तंत्रज्ञान पृ १३६

२३ कित्ता पृ १३६

२४ कित्ता पृ. १३८

२५ ड्रकर पिटर द प्रॅक्टीस ऑफ मॅनेजमेंट, बटरवर्थ-हॅनिमन ऑक्सफर्ड २००६ पृ३६३

२६ उपाध्याय अनिल कुमार, पत्रकारीता और जनसंचार सिध्दांत एवं विकास, भारती प्रकाशन वाराणसी,२००८ पृ ४७

२७ प्रसारमाध्यमे व माहिती तंत्रज्ञान उपरोक्त पृ १३८

२८ जोशी उमा उपरोक्त पृ २७

२९ धारुरकर उपरोक्त पृ १३८

३० धारुरकर वि.ल. संपादन कला व शास्त्र पृ. ११६

३१ कित्ता पृ ११६

३२ कित्ता पृ ६१

३३ कित्ता पृ ५८

३४ कित्ता पृ १११

३५ डॉ. धारुरकर प्रसारमाध्यमे आणि तंत्रज्ञान पृ ६३

३६ कित्ता, पृ. ८५

३७ कित्ता पृ. ६८

३८ कित्ता पृ. ६८

३९ जोशी उमा, उपरोक्त, पृ. २७

४० कित्ता पृ. २७

४१ कित्ता पृ. ३३

४२ पोटलर फिलीप मार्केटिंग मॅनेजमेंट १३ वी आवृत्ती, पियरसन एज्युकेशन प्रकाशन, नवी दिल्ली २००९, पृ.१७

४३ डॉ. धारूरकर शोध माध्यमांचा, शुभदा प्रकाशन, १९८७, पृ. ३६.

४४ कित्ता पृ. ३७

४५ धारूरकर वि. ल. माहिती तंत्रज्ञान आणि प्रसार माध्यमे, उपरोक्त पृ. १११

४६ इप्पन के.ई. रूरल प्रेस इन इंडिया विदूर खंड २०, अंक १ फेब्रुवारी १९८३.

४७ धारूरकर वि.ल.शोध माध्यमांचा, उपरोक्त, पृ. ३६

४८ कलाम ए.पी.जे. सायन्स टेक्नॉलॉजी ॲण्ड सोशल ट्रान्सपरमेशन प्रकरण १ पृ. ३

**प्रकरण ५ वे**

# वृत्तपत्रांच्या मांडणी व सजावटीवर पडलेला प्रभाव


५.१ प्रस्तावना

५.२ नवी माहिती संस्कृती व वृत्तपत्रे

५.३ नवीन परिपूर्ण वृत्तपत्रांची व्याख्या

५.४ आधुनिक सजावटीची तत्त्वे

५.५ समाजशास्त्रीय दृष्टिकोन

५.६ मराठी वृत्तपत्रातील नवे प्रयोग

५.७ मांडणीचे प्रमुख प्रकार

५.८ संगणकाधारित मांडणीचे फायदे

५.९ पहिल्या पानाची व आतील पानांची मांडणी

५.१० प्रशिक्षणाचे बदलते स्वरूप

५.११ ऑनलाईन पत्रकारिता

५.१२ नवे स्वातग्राई प्रवाह

५.१३ समारोप

संदर्भसूची

**प्रकरण ५ वे**

# वृत्तपत्रांच्या मांडणी व सजावटीवर पडलेला प्रभाव

## ५.१ प्रस्तावना

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाने वर्तमानपत्रावर प्रामुख्याने वृत्तपत्रांच्या मांडणी व सजावटीवर त्याचा प्रभाव कसा पडला ते या प्रकरणात अभ्यासाले आहे. प्रा. एडमंड अरनॉल्ड यांच्या मते, 'संगणकाच्या आधारे अक्षरांची जुळणी करणारा संगणकज्ज्ञ हा एकाच वेही संकेतीकरण व विसंकेतीकरण करण्याचे काम करतो.'[१] त्याचप्रमाणे तो वृत्तपत्रातील सामुग्री एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचवितो तसाच त्यांच्या संगणकावर पेजमेकरच्या आधारे तो पानाची मांडणीही करत असतो.[२]

प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव हा केवळ बड्या साखळी वृत्तपत्रावर पडत आहे व भाषिक वृत्तपत्रे ही त्यातून मुक्त आहेत असे प्रारंभी वाटत होते पण तंत्रज्ञानाची सहज उपलब्धता आणि वापर यामुळे आता हे तंत्रज्ञान अगदी छोट्या वृत्तपत्रापर्यंतही पोहचले आहे. सीमा शहा यांनी माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव हा केवळ तात्पुरता नसून तो दूरगामी व भविष्यकालिन महत्त्वाचा ठरला आहे.[३] आधुनिक वृत्तपत्रांमध्ये वस्तुनिष्ठता आणि सुबकता यांचे प्रतिबिंब उमटविण्यासाठी हे नवे तंत्रज्ञान वरदान ठरले आहे.[४] भाषिक वृत्तपत्रांच्या मांडणी व सजावटीवर प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव कसा पडतो आहे त्याचा या

प्रकरणात विचार केला आहे. मांडणी व सजावटीवर पडलेला माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव यातून वर्तमानपत्राचे नवे सौंदर्यशास्त्र विकसित झाले आहे. वर्तमानपत्र केवळ आशयदृष्टीने समृद्ध असून चालणार नाही तर ते लयबद्धपणे छापले पाहिजे व त्याची मांडणी जर आकर्षक आणि कलात्मक असेल तर वाचक त्या पत्राकडे अधिक चांगल्याप्रकारे आकर्षिक होतात. मांडणी आणि सजावटीचा विचार करता माहिती तंत्रज्ञानाने पुढील तीन बाबी प्रामुख्याने घडून आल्या आहेत.

१. पारंपरिक मुद्रण आणि मांडणीच्या पद्धती संपूर्णपणे बदलून गेल्या. पूर्वीच्या तंत्रज्ञानातील मानवी श्रमाचे प्रमाण अधिक होते. नव्या तंत्रज्ञानात मानवी श्रम असले तरी त्याची गती अधिक आहे आणि त्यामुळे लागणारे मनुष्यबळ हे सुद्धा कमी आहे.

२. पूर्वीच्या तंत्रज्ञानात रंगीत छायाचित्रे, व्यंगचित्रे आणि रेखाटने यांचा वापर करणे अधिक जिकिरीचे होते. त्यासाठी ब्लॉक प्रोसेस तंत्र वापरावे लागत असे व ते खर्चिक होते. नव्या तंत्रज्ञानात छायाचित्र काढणे व ते बहुरंगी स्वरूपात छापणे ही बाब कलर सेपरेशन तंत्रामुळे अधिक शक्य झाली आहे.

३. वर्तमानपत्रात मुलत: जागा खूप कमी असते आणि ही जागा जाहिरात व मजकूर या द्वंद्वात सापडलेली असते. अशावेळी कमी जागेत अधिक चांगला मजकूर छापण्यासाठी नवे माहिती तंत्रज्ञान वरदान ठरले आहे. कारण त्यामुळे पहिले पान सजविताना कमी जागेत अधिक चांगला व आकर्षक मजकूर दिला जात आहे. शिवाय कोरी जागा हे सुद्धा सजावटीचे एक महत्त्वाचे साधन बनले आहे.[*३]

## ५.२ नवी माहिती संस्कृती व वृत्तपत्रे

एकविसाव्या शतकात केवळ समाजकारण व अर्थकारणावर नव्हे तर सांस्कृतिक जीवनावरही प्रसार माध्यमांचा प्रभाव पडतो आहे. प्रगत माहिती तंत्रज्ञानाविषयी अद्‌भूत अशी जाणीवजागृती होत असून त्याद्वारे एक नवी माहिती संस्कृती उदयास आली आहे. प्रा. मार्टीन यांनी आधुनिक समाजाचे वर्णन वैश्विक माहिती समाज असे केले आहे.*[१] तंत्रदृष्ट्या प्रगत व माहिती दृष्ट्या समृध्द असा मानवी समाज घडविण्याचे सामर्थ्य आधुनिक प्रसार माध्यमामध्ये आहे. नित्य नव्या विकास जाणिवा प्रगल्भ करण्याचे काम अशा प्रकारची प्रगत साधने करु शकतात.

ब्ल्यूमेनाथाल यांनी म्हटले आहे की घराघरामध्ये नवीन माहितीसाधने गतीने पोहचत आहेत आणि प्रत्येक घराचे रुपांतर माध्यम कक्षेत होत आहे. माहितीचे प्रवाह मुक्त व खुले ठेवणे आता अनेकविध वाहिन्या व जुन्या नव्या माध्यमामुळे प्रभावी होत आहे.*[२] इंटरनेटचा वापर बिल गेटस् यांनी संगणक क्षेत्रात क्रांती घडवून आणली व त्यांनी साऱ्या जगाला नवीन माहितीच्या महामार्गावर आणून सोडले आज मानवी जीवन जसे गतिमानपण बदलत आहे. तसे हा पुढचा मार्ग अधिक प्रभावी बनत आहे बिलगेटस यांच्या 'द रोड अहेड' या ग्रंथाने माहितीच्या महामार्गाची कल्पना मांडली आणि या कल्पनेबद्दल जगभर जिज्ञासा निर्माण झाली जगभर सिटीजन्सप्रमाणे नेटी जन्मची संख्याही वाढत आहे अमेरिकेत इंटरनेटचा वापर प्रश्न संरक्षण क्षेत्रात करण्यात आला होता. त्यानंतर पुढे जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये इंटरनेटचा वापर सुरु झाला. आता इंटरनेटमुळे सेकंदात जगाच्या या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत माहितीचे दळणवळण शक्य होत आहे. माहितीची झेप नव्या युगाची

साक्ष देत आहे. त्यामुळे सेवा, रोजगार व उद्योगक्षेत्रात नित्य नवा विचार पुढे येत आहे. इंटरनेटवर वेबसाईटचा विकास करणे विविध आशयांचे वर्गीकरण करुन त्या आधारे वेबसाईटचे डिझाईन करणे या कार्यासही अधिक महत्त्व दिले जात आहे.

लॅन, व्हॅन व मॅनमुळे संगणकाचे जाळे शक्य होत आहे. वॅन-वाईड एरिया , लॅन - लोकल एरिया, मॅन-मेट्रो एरिया नेटवर्क संगणकाचा वापर करताना ग्राफीक तंत्राचा वापरही अत्यंत महत्वाचा ठरत आहे वर्तमानपत्र व मासिकांच्या जगात पेजमेकर तंत्राने अपूर्व क्रांती घडवून आणलेली आहे. आता संपादकीय विभागात पानाच्या मांडणी कॉर्क एक्स्प्रेस, इन-डिझाईन इ. नवीन तंत्रे आली आहेत. या सॉफ्टवेअरच्या वापरामुळे पानांची मांडणी व सजावट अधिक चांगल्या प्रकारे होत आहे. वृत्तपत्राप्रमाणे आता ग्रंथाचे मुद्रणही संगणकाच्या सुविधेने नवा आकार घेत आहे. ऑन लाईन पत्रकारिता संगणकाचा वापर करुन नव्या पानांची मांडणी व सजावट करताना आपण नित्य नवी माहिती वृत्तपत्रात देऊ शकतो तसेच आता दूरचित्रवाणीच्या पडद्यावरही वृत्तपत्राची इंटरनेट आवृत्ती आपण वाचू शकतो. केवळ १४०० रुपयात आपण आपल्या छोट्या पडद्याचे रुपांतर संगणकात करुन त्या आधारे इंटरनेटसारखा ज्ञान संकलनासाठी वापर करता येतो त्यामुळे इंटरनेटरुपी माहितीचा कल्पवृक्ष हा आता अगदी घरोघरी पोहचत आहे. ध्वनी आणि चित्रांचे प्रसारणही आता सहज शक्य होत आहे. इंटरनेटमुळे जगातील अद्भूत वार्ता सर्वदूर पोहचत आहेत वृत्तपत्र कायदा इंटरनेटचा वापर करुन सर्च इंजिनाच्या द्वारे विविध प्रकारची माहिती तत्परतेने मिळविता येते. आणि नित्य नव्या ज्ञान क्षितीजांचा शोध घेता येतो. त्यामुळे नजिकच्या भविष्य शाळामध्ये वृत्तपत्रापेक्षा इंटरनेट आवृत्ती चालविणे अधिक प्रभावी

ठरणार आहे. इंदोरच्या नई दुनियाची वेब दुनिया ही पहिल्या भारतीय इंटरनेट आवृत्तीची कल्पना यशस्वी ठरली आहे.

## ५.३ नवीन परिपूर्ण वृत्तपत्रांची व्याख्या

वर्तमानपत्रांच्या जगात वाचकांचे समाधान ही बाब सर्वात महत्त्वाची ठरते. वृत्तपत्रांचा आशय कितीही सर्वोत्तम व दर्जेदार असला व तो जर सुबकपणे छापला गेला नाही तर त्याचा प्रभाव चांगल्या प्रकारे पडू शकत नाही. थॉमस बर्नर यांनी म्हटल्याप्रमाणे संपादन ही एक कला आहे व ही कला प्रगत तंत्रज्ञानाच्या आधारे कृतीत आणता येते.[५] परिपूर्ण वृत्तपत्र ही कल्पना १९८० नंतर विकसित झाली आहे.

एडमंड अरनॉल्ड यांनी लिहिलेल्या 'डिझायनिंग टोटल न्यूजपेपर्स' या ग्रंथात प्रथम परिपूर्ण वृत्तपत्र ही संकल्पना मांडणी. त्यांच्या या संकल्पनेतून वर्तमानपत्राच्या सजावटीचा प्रभाव समजावून घेतला पाहिजे. डॉ. धारूरकर यांनी वृत्तपत्रसृष्टीवर व त्यातील सांपादन प्रक्रियेवर पडलेल्या महिती तंत्रज्ञानाच्या प्रभावाची मीमांसा करताना म्हटले आहे.

आधुनिक वृत्तपत्र संपादक इलेक्ट्रॉनिक उपकरणावर अवलंबून असलेला ऋषी बनला आहे तर नव्या वृत्तकक्षात व्यवस्थापन शास्त्राचा प्रवेश झाला आहे. एम. बी. ए. व संगणकतज्ज्ञ या वृत्तकक्षेवर अधिराज्य गाजवत आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे वर्तमानपत्रातील आशयाचे व्यवस्थापन अधिक सुलभ झाले आहे. ही प्रक्रिया समजून घेताना असे म्हणता येईल की, आधुनिक परिपूर्ण वृत्तपत्रातील इलेक्ट्रॉनिक न्यूजरूमचे अवतरण म्हणजे संगणकाद्वारे मजकुराचे अचूक संपादन करण्याची नामी संधी होय. एका काळी मध्यम स्वरूपाचे वृत्तपत्र टंक मुद्रणावर आपली सारी भिस्त ठेवत. एक आता

संगणकामुळे वृत्तपत्राच्या कार्यपद्धतीत अमूलाग्र परिवर्तन झाले आहे.[७] वर्तमानपत्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यावर प्रगत मांडणी व सजावट तंत्राचा प्रभाव पडत आहे आणि कमी जागेत अधिक चांगला आशय देण्याकडे वर्तमानपत्रांचा कल दिसून येत आहे. यावरून आधुनिक वृत्तपत्रे प्रगत तंत्रज्ञाच्या आधारे आपले व्यक्तिमत्त्व कसे बदलत आहेत याची यथार्थ प्रचिती येऊ शकते व त्यातून नवी दिशा स्पष्ट होते.

## ५.४ आधुनिक सजावटीची तत्त्वे

प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या आगमनामुळे वर्तमानपत्राच्या मांडणी व सजावटीमध्ये क्रांतिकारक बदल झाले आहेत. पूर्वीच्या जुन्या तंत्रापेक्षा नवे तंत्र अधिक गतीमान आणि तेवढेच फलदायी आहे. वृत्तपत्राची मांडणी व सजावट या संपादनास परस्पर पोषक बाबी आहेत. प्रोफेसर ब्रुस वेस्टले यांनी सजावटीची पुढील प्रमुख वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

१. मजकुराचा शोध, वाचन व आकलनास सजावट उपयुक्त ठरते. सजावटीमुळे कोणताही मजकूर अधिक चित्ताकर्षक व अधिक आनंददायी बनतो व तो वाचकाला गतीने पुढे घेऊन जातो. त्याच्या आकलनात कोणत्याही अडचणी येत नाहीत.

२. दिवसभरातील तयार मजकुरास सुसंघटित व अर्थपूर्ण आकार देता येतो. व्हीज्युअल डिसप्ले टेक्निकमुळे मजकुर व त्याच्या सजावटीतील विविध प्रयोग पर्यायी स्वरूपात पाहता येतात व त्यापैकी कोणता पर्याय चांगला आहे ते पाहून त्याची योग्य प्रकारे अमलबजावणी करता येते.

३. मथळे, त्यांचा आकार त्यास अनुरूप मांडणी व सजावट करण्यासाठी केलेले

प्रयत्न अभिव्यक्तीस पोषक ठरतात. संगणकाधारित संपादनात मथळ्यांचा आकार कमी-जास्त करता येतोव रिव्हर्स पट्टीचा  उपयोग करून वाचकाचे लक्ष वेधून घेता येते.

४. संपादनास पोषक सजावटीमुळे वृत्तपत्र अधिक आकर्षक बनते. चित्रे, प्रतिके, व्यंगचित्रे तसेच रेखाटने ही त्या-त्या पानावर पोषक पद्धतीने घेऊन त्यांची समर्पक मांडणी करता येते. ही मांडणी वाचकाला ज्ञान, सौख्य व आनंद देते.

५. सजावटीमुळे वाचकांच्या सवयीवर नियंत्रण ठेवता येते. वाचक बऱ्याचवेळा चंचल असतात व ते सातत्याने बातम्या सदरे व स्तंभ यांचे पसंतीक्रम बदलतात. त्यांना विशिष्ट स्तंभावर खिळवून ठेवण्यासाठी सजावट अत्यंत पोषक ठरते.

६. वाचकास आपल्या आवडीचा मजकूर अधिक सुलभपणे व आवडीने वाचता येतो. वाचकाच्या पसंतीला उतरेल असा सामुग्रीचा प्रभाव वाढविण्यासाठी सजावट उपयोगी पडते. त्यासाठी शिरोभाग, रंगीत छपाई, व्यंगचित्रे यांचा उपयोग करून वाचकाचे लक्ष सामुग्रीवर खिळवून ठेवता येते.[*४]

वर्तमानपत्रासारख्या रोज प्रकाशित होणाऱ्या प्रकाशनामध्ये  संख्यात्मक व गुणात्मक दर्जा वाढविण्यासाठी मांडणी व सजावटीच्या आधुनिक तंत्रांचा विविधांगानी फायदा होत आहे. भारतातील भाषिक वर्तमानपत्राने सुद्धा या नव्या तंत्रज्ञानाचा लाभ घेतला आहे.

## ५.५ समाजशास्त्रीय दृष्टीकोन

वर्तमानपत्राचा मालकी प्रकार कुठलाही असला तरी वृत्तपत्र ही एक सामाजिक संस्था

असते व त्यातील आशय हा सामाजिक आशय असतो. प्रा. एडवर्ड गेराल्ड यांनी केलेली मीमांसा या संदर्भात खरोखर मोलाची ठरते. त्यांच्या मते, वर्तमानपत्रांची सामाजिक जबाबदारी ही संपूर्ण जबाबदारी असते.[८]

प्रा. विल्बुर श्रॅम यांनी संवाद माध्यमांचे आधुनिक समाजातील स्थान व कार्य स्पष्ट करताना केलेली मीमांसा महत्त्वाचे ठरते. त्यांनी म्हटले आहे. Contemplating a television tube that sees far around the curve of earth, or a facsimile intallation that speaks one million words a minute, it is sometimes hard to remember that they are merely servants of men. And yet these media are neither good nor bad, wasteful nor efficient, except as they are so used. They are neither communistic nor capitalistic. They are equally effective for the dictator and the demotially whatever we make of them.[9] व्यवस्था कोणतीही असो, साम्यवादी असो की लोकशाही असो. नवे तंत्रज्ञ हे सभोवतीच्या जगात बदल घडवून आणण्यासाठी पुरक ठरते आहेत. यावरून आपणास संवादाचे सामाजिक महत्त्व लक्षात येते. याच अनुरोधाने मौलिक चर्चा करताना ते पुढे म्हणतात, Communications research is a development of the last few years.[10] संवादाची पाहोच ही गेल्या काही वर्षांची उपलब्धी आहे. वर्तमानपत्रासारखे माध्यम हे सुद्धा या अनुषंगाने समाजशास्त्राला नवी दिशा देण्याचे काम करत असते. आपले वृत्तपत्र हे नव्या जगात अद्ययावत व तेवढेच परिपूर्ण व्हावे असे प्रत्येक संपादकाला वा मालकाला वाटत असले तरी वृत्तपत्रांच्या पाठीचा कणा असतो त्याचा वाचक. त्याच्या आशा अपेक्षा

पूर्ण करताना सामाजिक हिताचा विचार करूनच वृत्तपत्राला आपले समाजप्रबोधन कार्य गतीने करावे लागते हेही लक्षात ठेवले पाहिजे.

संवादाच्या संशोधनाची गरज व उपयुक्तता दुसऱ्या महायुद्धानंतर जगाच्या लक्षात येऊ लागली. संवादाची सामुग्री, तंत्रज्ञान, आशय व त्याचा प्रभाव याबाबत संशोधन सुरू झाले. याबाबत प्रा. श्रॅम म्हणतात, Communivation Research, about the great problems facing communications, and of how they might contribute to a solution of those problems. They talked of how they might make their efforts more than the sum of their individual efforts, and of how they might use thos efforts towards the better understanding of communications and towards the maximum use of communications for the public good [11] प्रगत संवाद तंत्रज्ञानाचा उपयोग हा सामाजिक हितासाठी होतो व त्यातून जनमत कसे बदलत आहे हे लक्षात येते. वर्तमानपत्रासारख्या माध्यमाने प्रगत तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे त्यांची जनमत प्रकट करण्याची शक्ती अधिक वाढली आहे. संवादाची आधुनिक प्रसारमाध्यमे व समाज यांच्यामध्ये सातत्याने विचार व कल्पनांचे आदानप्रदान होत असते. जॉन बिटलर यांनी त्यास समाजीकरणची प्रक्रिया म्हटले आहे.[११] प्रा. ए. ए. बेर्जर यांनी माध्यम विश्लेषण तंत्र या ग्रंथामध्ये या समाजीकरण प्रक्रियेचे साधार विवेचन कले आहे.[१२] त्यांच्या मते विचार आणि नव्या कल्पनांचा प्रसार करताना प्रगत तंत्रज्ञनासाठी हे निश्चितपण पथ्यावर पडते व त्यातून होणारे बदल हे समाज जीवनावर दूरगामी प्रभाव टाकणरे असतात. त्यामुळे या प्रभावाची मीमांसा या प्रकरणात केली आहे.

## ५.६ मराठी वृत्तपत्रातील नवे प्रयोग

१९८५ नंतर राजीव गांधी युगात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा अवलंब सुरू झाला. गेल्या २० वर्षांमध्ये मराठी वृत्तपत्रांनी माहिती तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्यानंतर अनेक नवे प्रयोग केले आहेत. डॉ. वि. ल. धारूरकर म्हणतात, प्रगत माहिती तंत्रज्ञानाने नव्या संपादन प्रक्रियेत महत्त्वाचे बदल घडवून आणले आहेत. कुठले ही प्रसार माध्यम हे अधिकाधिक लोकांच्या पसंतीला उतरावयाचे असेल तर त्यांच्या उपयोजनामुळे श्रोता, प्रेक्षक वा वाचकांची ज्ञानपातळी किती वाढते याला विशेष महत्त्व येत आहे. वृत्तपत्रे आपल्या नित्य अंकासोबत विविध गृहपत्रे स्वरूपातील सामुग्री देत आहेत. त्याचा हेतू दुहेरी स्वरुपांचा आहे एक तर आपल्या वाचकांचे लक्ष विचलीत न होऊ देणे हा त्यामागे एक प्रधान हेतू असतो व दुसरे म्हणजे जनसेवा दृष्टीने वृत्तपत्रांना पुरेशी उपयुक्त माहिती वृत्तपत्रे देऊ शकतात![१३] असे करताना नव्या मांडणी व सजावट तंत्रामुळे हा मजकूर अधिक आकर्षकपण मांडता येतो. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावातून माहिती रंजन ही नवी कल्पना उदयास आली आहे. या संदर्भात भारतात झालेला बदल लक्षणीय आहे. डॉ. धारूरकर म्हणतात, आपल्या रोजच्या अंकात नित्य नवे ज्ञान मिळते तसेच त्यांचे गुणात्मकदृष्टीने सकस व दर्जेदार मनोरंजनही घडते! वृत्तपत्रांची ही साहित्यिक आवृत्ती म्हणजे सात्याहिक प्रत्रकारित समृध होत असल्याचे दिसून येते. ही साहित्यिक पत्रकारिता इंटरनेट युगात अधिक वाढणार आहे कारण वाचकांच्या पसंतीला उतरताना त्यांना माहिती देणे विश्लेषण करणे व शिक्षण देणे याच प्रमाणे रंजन करणे यालाही अधिक महत्त्व येत आहे.[१४]इंटरनेट युगातील वृत्तपत्रांना रंगीत दूरचित्रवाणी वाहिन्याशी स्पर्धा करताना बहुरंगी

मुद्रणावरभर द्यावा लागत आहे. वाचकवर्ग केवळ वर लीया रंगा भुलणार नाही, गरज आहे ती गुणात्मक मूल्यभेद दृष्टीची त्यासाठी वृत्तपत्रांना केवळ वरवरची माहिती न देता सखोल असे सामान्य ज्ञान आपल्या वाचकांना प्रदान करावे लागेल.[१५] इतर भाषिक वृत्तपत्राप्रमाणेच मराठी वृत्तपत्रामधील करण्यात आलेले प्रयोग हे प्रामुख्याने पुढील ७ घटकांच्या आधारे स्पष्ट करता येतील.

१. पहिल्या पानावर केवळ समांतर व विषम मांडणी प्रकार न वापरता सर्वास व मिश्र मांडणीचे प्रकार नवीन माहिती तंत्रज्ञानाच्या आगमनानंतर हाताळले जात आहेत. एडमंड अरनॉल्ड यांनी संगणकावर आधारित पहिल्या पानाच्या मांडणीचे विविध प्रकार दिले आहेत.[१६] तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे पानांची मांडणी करताना मराठी वृत्तपत्रे नव्या प्रकारांचा वापर करत आहेत असे प्रा. अकलूजकर म्हणतात.[१७]

२. वर्तमानपत्राच्या पहिल्या पानाप्रमाणेच आतील पान व ऑपएड पेज यांची मांडणीही झपाट्याने बदलत आहे.[१८] अशा पानावर चर्चा व परिसंवाद तसेच मतमतांतरे मांडली जातात हे विशेष होय. हिंदूसारख्या पत्राचे हे तंत्र आता सामनाही वापरत आहे.[१९] मराठी वृत्तपत्रे मांडणी व सजावटीची ही नवी तंत्रे १९९० नंतर अधिक वापरत आहेत.[२०]

३. प्रत्येक पान व रविवार पुरवणी तसेच गुरुवार व शनिवारच्या पुरवण्यांना स्वतंत्र नाव देऊन त्यांना एक ओळख प्राप्त करून दिली जात आहेत. त्यासाठी ग्राफिक्स सजावट तंत्र वापरले जात आहे.[२१]

४. भारतीय भाषिक पत्रांचे बदलते व्यक्तिमत्व हे त्यांच्या कला व तंत्रज्ञान विभागाच्या कल्पकतेवर अवलंबून असणार आहे. संपादकीय पानांची मांडणी करताना अनेक नवे प्रयोग केले जात आहेत. असे प्रयोग करताना राष्ट्रीय इंग्रजाी पत्रांचे वा जागतिक पत्राचे आदर्श समोर ठेवले जातात.[२२] इंटरनेटवर या सर्व पत्रांचे नमुने उपलब्ध असल्यामुळे असा प्रभाव अधिक पडत असल्याचे जाणवते.

५. सदरांची मांडणी, त्यातील छायाचित्रे व आलेख तसेच ग्राफिक्स सजावट हे प्रकार व्हिज्यूअल डिस्प्ले तंत्रामुळे यथार्थपणे वापरले जात आहेत. सदरांचे एकत्रीकरण करून त्यांचे रूपांतर ग्रंथात करणे तयामुळे शक्य होत आहे.[२३]

६. खेळ, मनोरंजन, आरेग्य तसेच शेती व वाणिज्य अशा स्वतंत्र पानांची आखणी व मांडणी करताना माहिती तंत्रज्ञान साह्यभूत ठरले आहे. विशेष पानांची सजावट व विशेषांकाचे नियोजन या संदर्भात माहिती तंत्रज्ञानाचा वापर व प्रभाव हा खरोखरच दिशादर्शक ठरला आहे. मजकुराचा आकार कमी जास्त करणे, कोऱ्या जागेचा वापर करणे व समर्पक चित्रांचे उपयोजन या संदर्भात माहिती तंत्रज्ञान पोषक ठरले आहे.[२४]

७. मराठी वृत्तपत्रांतील रविवार पुरवण्यांची मांडणी व सजावट या बाबतीतील नव्या प्रयोगांचे यश हे प्रगत माहिती तंत्रज्ञानावर आधारलेले आहे. कव्हर स्टोरीची मांडणी, विविध सदरांच्या जागांची निश्चिती, बालकांचे पान, ग्रंथ परीक्षण इ. घटक त्यामुळे अधिक उठावदार बनत आहेत. या सर्व प्रयोगांचे रुपांतर हे माहिती

तंत्रज्ञानावर आधारलेले आहे. पूर्वीपेक्षा वाढलेली पानांची संख्या आणि सामुग्रीची विविधता व रंगती मांडणी याचे खरे श्रेय प्रगत माहिती तंत्राकडे जाते हे लक्षात घेतले पाहिजे.[२५]

## ५.७ मांडणीचे प्रमुख प्रकार

दुसऱ्या महायुद्धानंतर जीवनाची गती वाढली. काळ, काम, वेगाचे गणित बदलले आणि त्याप्रमाणे मांडणी व सजावटीचे प्रकारही बदलत गेले. वृत्तपत्रांच्या मांडणी व सजावटीत खरा बदल झाला तो प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या स्वीकारानंतर. १९९० नंतर जगभरात पहिले पान बदलून गेले. त्यातील विषयांची निवड, प्राधान्यक्रम व विविधता या तीनही दृष्टीने विचार करता झालेले बदल हे प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे झाले आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.[२६] त्यामुळे या बदलांचे शास्त्रीय आकलन केले पाहिजे.

आधुनिक वृत्तपत्रातील मांडणी व सजावटीचे प्रमुख प्रकार स्पष्ट करताना डॉ. धारूरकर म्हणतात,  समांतर व उर्ध्वरेषेतील असे ढोबळ मानाने दोन प्रकार पडतात. एका नंतर एक समतोल समांतर मजकूर देण्याची ही पद्धत आहे, तर दुसऱ्या प्रकारात व्हर्टीकल उर्ध्वरेषेत उभी मांडणी केली जाते. तसेच हे वर्गीकरण पुढीलप्रमाणेही केले जाते.

### १) समतोल मांडणी

वृत्तपत्राच्या उजव्या व डाव्या बाजूस सारखेच वृत्तलेख देऊन, त्यांच्यासाठी सारख्याच आकाराच्या टाईपाचा मजकूर वापरून हा समतोल साधता येतो. हा प्रकार साधारणपणे नित्य वृत्तपत्रीय जीवनात बऱ्याचदा वापरला जातो. [२७]

**२) परस्परविरोधी व समतोल**

या प्रकारच्या मांडणीत contrast and balance औपचारिक मांडणी म्हणजे informal balance असे म्हटले जाते. याप्रकारचे महत्त्व सांगताना शॅनली जॉन्सन म्हणतात." Here the make up editor obseover balance but not symmetry. The object is to balance the focal points on the page, so one part does not completely dominates the other parts of the page"[२८] एक बाजू दुसऱ्या बाजूवर प्रभाव टाकणार नाही याची काळजी येथे घेतली जाते. छायाचित्रे व आकर्षक सजावटीस हा प्रकार पोषक ठरतो.

**३) फुगीर मांडणी (** Brace make up)

वृत्तपत्राच्या उजव्या बाजूवर विशेष भर देण्याचे काम या मांडणी प्रकारात केले जाते. एखादे प्रभावी चित्रे नि पुरक मथळे यांची योजना करून या प्रकारात मांडणी केली जाते. हा प्रकार फारसा नेहमी वापरला जात नाही. [२९]

**४) तुटक मांडणी (** Broken make up)

मांडणीच्या या प्रकारातील मोडतोड लक्षात घेऊन त्यास " सर्कस मेक अप" असेही म्हटले जाते. अनेक वृत्तकथा, वृत्तलेख, छायाचित्रे व सजावटीचा वापर करून पहिले पान नटविले जाते. पाश्चात्य राष्ट्रांत हा प्रकार अधिक रूढ आहे.

यापैकी पूर्वी फक्त दोनच प्रकार वापरले जात असत. सममांतर व विषम मांडणी या प्रकाराचे आजी आता नवे प्रकार वापरण्याकडे वृत्तपत्रांचा कल दिसत आहे. संध्यानंदसारख्या

सायंदैनिकाने या संदर्भात केलेले प्रयोग लक्षणीय आहेत.[३०] या सर्व प्रभावांची नवीन मीमांसा करून नावाने मांडणी केली पाहिजे.

## ५.८ संगणकाधारित मांडणीचे फायदे

वर्तमानपत्रामध्ये संगणकाधारित नवीन मांडणी करण्याचे नवे प्रयोग करण्यात येत आहेत. आता भाषिक वृत्तपत्रांना  वृत्तपत्राच्या मुद्रणात छायाजुळणी (फोटो कंपोझ) आणि ऑफसेट मुद्रणाचा प्रवेश अपरिहार्य बनला आहे,‘त्याची प्रधान कार्य पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) साक्षरतेचे वाढलेले प्रमाण , वृत्तपत्रांचा वाढता वेग आणि पत्र उद्योगांमधील स्थित्यंतरे यास सामोरे जाण्यासाठी संगणकाचा स्वीकार अपरिहार्य बनत आहे त्यामुळे टंकाचा वापर ( type) व झीज याचे नित्य होणारे नुकसान भरून काढता येते. [३१]

२) रोटरी सारख्या यंत्राची अजस्त्रता व किचकट तंत्राचा भाग टाळून छाया जुळणी व वेब ऑफसेट मुद्रणामुळे उच्च दर्जाचे मुद्रण करणे शक्य होते.

३) एका छाया जुळणी यंत्राने प्रति तासाला १,१०,००० प्रकारची (कॅरेक्टर्स ) अक्षरे तयार करता येतात. त्यामुळे मांडणी व सजावटीस  उठाव मिळतो.[३२]

४) गुंतागुंतीच्या मुद्रण तंत्राला फाटा देऊन अल्प काळात अचूक मुद्रण प्रत तयार करणे छायाजुळणीमुळे शक्य होते.

५) छायाचित्र, प्रतिकात्मक रेखाटने, सजावटीच्या आकृत्या, अक्षरकला यांचे वृत्तपत्रात

अविष्करण करून पत्राला सजावटीमुळे नवे व्यक्तिमत्त्व देता येते. [३३]

या सर्व कारणामुळेच आधुनिक वृत्तपत्रात संगणकाचा वापर केला जात आहे व त्यामुळे स्थलकालाच्या स्पर्धेत वृत्तपत्राला प्रगत बनविणे शक्य झाले आहे.

या बदलाचे विवेचन करताना पुढील तीन पैलू लक्षात घेतले पाहिजेत.

१. भाषिक वृत्तपत्रे संगणकाचा वापर करून आकर्षकपणे पहिले पान सादर करता येते.

२. विशेष पान व सदरांचा दर्जा वाढला आहे.

३. रविवार पुरवण्यातून सर्वंकष दर्जा प्रकट होत आहे.

## ५.९ पहिल्या पानाची व आतील पानांची मांडणी

माहिती तंत्रज्ञानामुळे वर्तमानपत्रांचे पहिले पान हा जणू त्याचा आरसा बनला आहे. वाचकाला आकर्षित करण्यासाठी पहिल्या पानाची मांडणी कल्पकतेने केली जाते. त्यासाठी वरील एखादा प्रकार न वापरता मिश्र प्रकार वापरण्याकडे संपादकाचा कल दिसून येत आहे. पहिल्या पानाची जाहिरात वाढली की, मांडणी व सजावटीचे प्रकारही बदलतात. बऱ्याचवेळा तात्कालिक गरजांप्रमाणे मांडणीची पद्धती बदलण्याचा निर्णय घ्यावा लागतो. मुंबई लोकमतचे संपादक विवेक गिरधारी यांनी म्हटल्याप्रमाणे पहिल्या पानवरील मांडणी व सजावट जेवढी अदभूत व आकर्षक असेल तेवढ्या प्रमाणात वाचक वर्तमानपत्राकडे अधिक वळतो. बातमी ठळक वार्ता छापताना योग्य निर्णय आणि समर्पक सजावट तसेच संक्षिप्त परंतु प्रभावी विश्लेषण यावर भर दिला जातो. पहिल्या पानावर काही छायाचित्रे व

मार्मिक व्यंगचित्रे असतील तर त्याचाही चांगला प्रभाव पडतो. अँकरवर बऱ्याचवेळा वृत्तविश्लेषण करणारी वृत्तकथा सुद्धा छापली जाते. त्यामुळेही वाचकांना एखाद्या नव्या घटनेबाबत चांगले ज्ञान होऊ शकते.

**आतील पानांची मांडणी**

संपादनानंतर तयार झालेला मजकूर पद्धतशीरपणे मांडता आला तर आतील पानावरील मजकुरास चांगलाच उठाव येतो. साधारणत: आतील पानावरील मजकूराची मांडणी करतांना पुढील तत्त्वे पाळावी लागतात.

१) आतील पानाच्या प्रारंभी प्रभावी मथळ्याचा प्रदीर्घ मजकूर द्यावा. डाव्या बाजूस पूरक छायाचित्रे द्यावे.

२) बहुस्तंभी व एकस्तंभी मथळ्याची योजना करून मजकूरात समतोल साधण्याचा कसोशीने प्रयत्न करावा.

३) आतील पानावर बॅनर पद्धतीचे मोठे बहुस्तंभी मथळे देऊ नयेत. एखा बाजूस एखादा मथळा वापरला तर दुसऱ्या बाजूला दुसरा वापरू नये.

४) मध्येच अडथळा निर्माण निर्जीव मथळा देऊ नये.

५) आतील प्रत्येक पानावर व्यंगचित्र, तक्ता (चार्ट) नकाशा व सजावटीची आरेखन वापरून पानात चैतन्य आणावे.

६) छायाचित्रे त्या त्या पानाच्या प्रारंभीच द्यावीत. जाहीरातीच्या वर किंवा शेजारील बाजूस छायाचित्रे देऊ नका.

७) मथळे व खालील मजकूर यात समतोल ठेवावा.

८) जाहिरातीवर एक दोन इंच मजकूर आल्यानंतर मगच त्यावर मथळे येतील अशी मांडणी करावी.

९) पानापानावर मथळ्यासाठी विविध प्रकारचा व कमी अधिक आकाराचा टाईप योजकतेने वापरावा.

१०) पान अव्यवस्थित व गोंधळलेले दिसणार नाही याची दक्षता घ्यावी.

## ५.१० प्रशिक्षणाचे बदलते स्वरूप

वर्तमान युगात वर्तमानपत्रातील प्रशिक्षणाचे स्वरूप बदलत आहे. विद्यापीठीय अभ्यासक्रमास जोडून वृत्तपत्र समुह आपल्या स्वत:चे प्रशिक्षण वर्ग आयोजित करत आहेत.[३४] त्यामुळे प्रशिक्षणाचे विषयही बदलत आहेत.

१. सर्वसाधारण कौशल्ये ही सर्वांना अवगत असतात. त्यापेक्षा नवीन घटकावर भर दिला जात आहे. सकाळसारख्या पत्राने गार्सीया तंत्र यातून स्वीकारले आहे.

२. ६ सिग्मा तसेच टीक्युएम म्हणजे संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन यासारख्या संकल्पना रुजविण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे भाषिक वृत्तपत्रे अधिक प्रगत व अद्ययावात बनत आहेत.

३. पेजमेकरचा वापर करताना कॉर्क एक्स्प्रेससारख्या नव्या साधनांचा स्वीकार होत आहे. त्याच्या अंमलबजावणीसाठी नव्या प्रशिक्षणतंत्राचा स्वीकार केला जात आहे.

४. वृत्तपत्र क्षेत्रात संपादनात माहिती तंत्राचा वापर करताना इंटरनेटवर आधारित माहिती संकलनासाठी कोणते तंत्र वापरावे तेही या कळात ठरत आहे. इंटरनेटवरून माहिती कशी मिळवावी व तिचे संकलन कसे करावे याबाबतचे प्रशिक्षण वर्ग फलदायी ठरले आहेत.

५. मांडणी व सजावटीच्या क्षेत्रात आयोजित प्रगत वृत्तपत्रांचा प्रभाव भारतीय वृत्तपत्रावर कसा पडत आहे. लोकमत मुंबईचे संपादक विवेक गिरधारी यांनी या संदर्भात घेतलेले प्रशिक्षण व त्यांनी केलेले लेखन इतरांना प्रेरक ठरले आहे.

६. अंतर्गत प्रशिक्षण यंत्रणा व बाह्य साधनसेवा अशा दोनही तंत्राचा वापर वृत्तपत्रे करत आहेत. त्यामुळे त्यांच्या मनुष्यबळास काळानुरूप अद्ययावत असे ज्ञान प्राप्त होत आहे.

## ५.११ ऑनलाईन पत्रकारिता

ऑनलाईन पत्रकारिता आणि ई-पत्रकारिता या नव्या रुपाने प्रकट होत आहे. संगणकाचा वापर करून जेव्हा पत्रकारितेचा विकास केला जातो तेव्हा त्यास ऑनलाईन पत्रकारिता असे म्हटले जाते.

संगणकावर उपलब्ध होत असलेल्या वृत्तपत्रांच्या वेब आवृत्तीमुळे त्यांना लेखणीविना Pen less व कागदाविना Paper less वृत्तपत्रे असे म्हटले जाते. ऑनलाईन आणि ई-पत्रकारिता प्रामुख्याने खाली वैशिष्टावर आधारलेली असते.

१) संगणकाचा वार्ता संकलन व संपादनासाठी वापर प्रामुख्याने केला जातो.

२) ग्राफीक्स म्हणजे आरेखन तंत्राचा वापर योजकतेने केला जातो छायाचित्रे व जाहिरातीच्या मांडणी व सजावटीसाठी या सुविधाचा उपयोग केला जातो.

३) ऑनलाईन पत्रकारितेमध्ये माहितीचे प्रसारण करताना व्हिजुअल कम्युनिकेशन तंत्राचा वापर यथार्थपणे केला जातो.

४) ज्ञान आणि माहितीचे सादरीकरण करताना वेबसाईटचा विकास केला जातो व ही वेबवृत्तपत्रे रोजच्या रोज अद्ययावत केली जातात. त्यासाइी वेबमास्टरचे साह्य घेतले जाते.

५) वृत्तपत्राची ही आवृत्ती जगभर कुठे ही इंटरनेटवर उपलब्ध असतो. त्यामुळे स्थानिक पत्र वैश्विक बनते. तसेच त्याला वैश्विक वाचक व जाहिरातदारही मिळतो.

६) ई-पत्रकारितेमध्ये लेख वार्ता आणि विविध माहितीचे आदान-प्रदानही वेबसाईटद्वारे घडते. त्यामुळे विचारांचे भेट आदान-प्रदान घडते व तत्काळ प्रतिसाद नोंदविता येतो.

७) वेब वृत्तपत्रामध्ये दिवसभरता अनेक वार्ता या वारंवार अपडेट करता येतात व काळानुरूप वेब आवृत्ती ही वाचकांना अद्ययावत माहिती देत असते.

८) विविध लेख व वार्ता तसेच पहिल्या पानावर विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे मिळवून ती माहिती तत्काळ संकलीत करून उपलब्ध करून देता येते. वाचकांचा थेट सहभाग हे ऑनलाईन पत्रकारितेचे वेगळेपण होय.*[५]

---

## ५.१२ नवे स्वातगार्ह प्रवाह

### नवे स्वागतार्ह प्रवाह

अनेक छोटी दैनिके माध्यांमाच्या जगात स्वतःचे स्थान निर्माण करत आहे आणि सायंकाळची वृत्तपत्रे ही इंटरनेटयुगात अधिक सखोल आणि अधिक संपन्न बनत आहेत. वैविध्यपूर्ण आणि तेवढाच नित्य नवा आणि आल्हाददायक अशा मजकूर हा वाचकांना नित्य नवा आनंद देत आहे आणि तसेच नवा विचार प्रकाश देत आहे. संध्यानंद सारखा वृत्तपत्राने इंटरनेटवरून बातम्या घेऊन जगातल्या सचित्र बातम्या देऊन इतर वृत्तपत्रे त्याचे अनुरूप करून किमान एक पान मनोरंजक असा मजकुर देत आहे. त्यात लोकरूची वारता, नाविन्यपुर्ण माहिती, अद्‌भूत चमत्कार, नवे शोध, धक्यादायक कल्पना इत्यादिंचा समावेश होत आहे. तसेच इंटरनेटवरून या वार्ताची छायाचित्र उपलब्ध होत असल्यामुळे त्यांचे उद् भुत असे रुप वृत्तपत्रावर सचित्र क्रूप पाहवयास व वाचण्यास मिळत आहे. अमेरिकेतील वृत्तपत्रांचा चमत्कार आता भारतीय वृत्तपत्रात सुद्धा झपाट्याने दिसून येत आहे. नवीन सहस्त्रकांत वार्तामुल्य बदलत आहे, बातम्यांचे विषय बदलत आहे. तसेच त्यांच्या सादरीकरण्याच्या पध्दतीही वेगाने बदल आहे. प्रत्येक दिवस दूरचित्रवाणी व इंटरनेटच्या युगात नवे चैतन्य घेऊन येत आहे. तद्वत वृत्तपत्रात नवे बदल घडत आहे.

आपले वृत्तपत्र हे सर्वांगसुंदर व परिपूर्ण व्हावे असे वाचकांना वाटते केवळ माहितीची खोगीरभरती करून वृत्तपत्रांचे भवितव्य उज्वल होणार नाही हे वेळोवेळी सिध्द झाले आहे. माहितीचे आकर्षक पॅकेजिंग करून तिचे उत्तमपणे सादरणीकरण केले तर अशी वृत्तपत्रे अधिक प्रभावी होऊ शकतात. असे परिपुर्ण वृत्तपत्र स्थानिक वाचकाला रोज नवा आनंद

देते त्याच प्रमाणे त्यांची इंटरनेट आवृत्तीसुद्धा जगभरातील वाचकाला नवे ज्ञान देऊ शकते.

या सर्व चर्चेवरून हे स्पष्ट होते की इंटरनेट युगातील वृत्तपत्रे ही नित्य नव्या ज्ञानयुगातील एक समृध्द अविष्कार बनत आहेत. या पत्रांना आशय व अभिव्यक्ती या दोन्ही अंगानी आपला दर्जा सुधारण्याचा प्रयत्न करायला हवा. इंटरनेटचा भाषिक पत्रावर काहीही परिणाम होणार नाही असे म्हणण्यात अर्थ नाही या पत्रांनीही इंटरनेट सामुग्रीचा सुलभ व सुबोधपणे लाभ घेतला तर ही वृत्तपत्रे ज्ञान, शिक्षण व मनोरंजन यात समतोल साधून अधिक आकर्षित व मनोरंजक बून शकतात.

दर्जेदार आशय व बहुरंगी सादरीकरण यातून इंटरनेट युगातील भाषिक पत्रे अधिक देखणी व संग्राह्य बनत आहेत यात संदेह नाही इंटरनेटच्या आगमनाने वृत्तपत्राची रचना व मांडणी यात क्रांतिकारक बदल होत आहेत. तसेच वृत्तपत्रांचे सौदर्यशास्त्रही बदलले आहे. आता नव्या युगात वृत्तपत्रांनी अधिक लोकाभिमुख होण्यासाठी सखोल माहितीपूर्ण आणि समृध्द असा मजकूर घेऊन वाचकासमोर आले पाहिजे.

इलेक्ट्रॉनिक युगातील भारतीय वृत्तपत्राचे बदलते चित्र लक्षात घेता खालील पाच प्रवाह आपणास नोंदविता येतील.

१) भारतामधील अभिजनवादी वाचकवर्ग महानगरात राहतो आणि हा वाचक इंग्रजी वृत्तपत्रे वाचने अधिक पसंत करतो. कारण त्याला अशी वृत्तपत्रे वाचने प्रतिष्ठा वाटते.

२) भारतीय भाषेमध्ये मलालम मनोरमा हे वृत्तपत्र अग्रेसर असुन त्याच्या खपाचे गमक

केरळ मध्ये सारक्षतेचे असल्याचे दिशते. साक्षर वाचक आणि कल्पक दैनिक यांच्या सुसंवादातून वृत्तपत्राचा ठसा उमटतो.

३) हिंदी भाषीक पट्टामध्ये वृत्तपत्रात कमालीची स्पर्धाअसून दैनिक भास्कर आणि दैनिक जागरण हि दोन वृत्तपत्रे आघाडीवर आहे. हिंदी वृत्तपत्रेच्या तिव्र स्पर्धेमध्ये वाचकांचा सहभाग ही आवश्यक आहे.

४) गुजराती, तेलगु, बंगाली, मराठी याभाषेतील वृत्तपत्रे अनेक नवे प्रयोग करून वाचकाला आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी रंगीत मुद्रण, शैलिदार साहित्य तसेच वाचकावर प्रभाव टाकण्यासाठी रोचक सामुग्रीचे संकलन करून ही पत्रे वाचकांच्या पंसतीला उतरण्याचा प्रयत्न करत आहे.

५) भाषिक वृत्तपत्रेसुद्धा आपल्या स्वतंत्र वेबसाईडची आवृत्ती काढून देशात तसे जगात पसरलेल्या आपला वाचकाला आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत आहे. याप्रयत्नामुळे त्यांच्या जाहिराती तसेच त्यांच्या उत्पन्नातसुध्दा छपाट्याने वाढ होत आहे.[*६]

मराठी वृत्तपत्रांनाही या सर्व बदलांचे लाभ झाले आहेत. मराठी वृत्तपत्रसृष्टीवर आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांच्या माांडणी व सजावटीवर पडलेला प्रभाव अभ्यासला असता काही लक्षणीय बाबी समोर येतात त्या येथे नोंदवता येतील.

१. लोकसत्ता, लोकमत, सकाळ, पुढारी यासारख्या प्रमुख मराठी वर्तमानपत्रांच्या पानसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. तसेच त्यांच्या आठवड्यातील पुरवण्यांची संख्याही वाढली आहे. या प्रमुख वृत्तपत्रांच्या रविवार पुरवण्या सर्वांगीण व सर्वसमावेशक बनत असून, मांडणी व सजावटीच्या दृष्टीने सुद्धा त्या पूर्वीपेक्षा

अधिक आकर्षक झाल्या आहेत.

२. वर्तमानपत्रात वार्ता आणि लेख प्रकाशित करताना छायाचित्रे देण्याकडे वर्तमानपत्रांच कल वाढला आहे. कारण छायाचित्रे फोटोशॉपमुळे ताबडतोब उपलब्ध होत आहेत व ती योग्य जागी समर्पकपणे देणे शक्य झाले आहे.

३. कलावंतानी काढलेल्या रेखाटनाप्रमाणेच संगणकावर उपलब्ध प्रतिके आणि रेखाटने यांचा समर्पक वापर सुरू झाला आहे. नकाशे तसेच अन्य संदर्भसामुग्री गुगलसारख्या सर्च इंजिनवरून शोधून तिचा योग्य वापर केला जात आहे.

४. वर्तमानपत्रात पत्रास लागणारी भूकंप, महापूर, वादळे इत्यादी आपत्तीच्या घटनासंबंधीची छायाचित्रे इंटरनेटमुळे जगभरातून तात्काळ उपलब्ध होत आहेत. शिवाय पुरवणीतील लेखासाठी पोषक अशा सामुग्रीची निवड व सजावट करणे शक्य झाले आहे.

५. वर्तमानपत्रांच्या विविध सदरापैकी वाणिज्य, चित्रपट, क्रीडा या सदरांना लागणारी ताजी माहिती व रंगीत छायाचित्रे तसेच सांख्यिकी तपशिल सहजपणे उपलब्ध होत आहे व त्याचा वापर योजकतेने केला जात आहे. त्यामुळे महाराष्ट्र टाइम्सपासून ते पुण्यनगरी ते संध्यानंदपर्यंत सर्व वृत्तपत्रे मांडणी व सजावटीच्या बाबतीत विविध प्रयोग कल्पकतेने करत आहेत.

## ५.१३ समारोप

अशाप्रकारे प्रगत माहिती तंत्रज्ञानामध्ये प्रादेशिक, भाषिक वृत्तपत्रांच्या मांडणी व सजावटीवर दूरगामी प्रभाव पडला आहे. या वृत्तपत्रांच्या प्रयोगशील आणि सृजनशील अशा नव्या उपक्रमाचे यश त्यांच्या चालकांनी दाखविलेल्या शहाणपणावर अवलंबून आहे. माहिती

तंत्रज्ञान ही एक सोन्याची खाण आहे, परंतु त्यातील कोणते माणिक-मोती व पाचू वापरावयाचे याचा निर्णय संपादकला घ्यावयाचा आहे. बऱ्याचवेळा परदेशी वर्तमानपत्रातील व अन्य वर्तमानपत्रातील सामुग्री किंवा सजावट तंत्रे जशीच्या तशी घेण्याचा मोह संपादकाला होऊ शकतो, परंतु या मोहापासून दूर राहनू आपल्याला पोषक अशा अनुरूप सामुग्रीची व प्रतिकांची निवड कशी करावी यावरच संपादकाचे यश अवलंबून असते. पहिल्या पान आतील पान, शनिवार-रविवारची पुरवणी या सर्व पुरवण्यांच्या बाबतीत कलात्मक व सौंदर्यपूर्ण दृष्टिकोन ठेवावा लागतो आणि स्थानिक संस्कृतीला साजेशा अशा सामुग्रीची निवड करावी लागते.

प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे मांडणी व साजवटीचे तंत्र बदलले आहे, परंतु या नव्या संपादन तंत्राच्या वापरासाठी अद्ययावत प्रशिक्षण देणे व उपसंपादकांना कलात्मकतेचा तिसरा डोळा विकसित करायला लावणे ही जबाबदारी वृत्तपत्र व्यवस्थापकाची असल्याचे दिसून येते. त्यासाठी वर्तमानपत्रातील मनुष्यबळ विभागाने जाणिवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे. त्यामुळे या प्रबंधाच्या पुढील प्रकरणात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या व्यवस्थापनावर झालेला परिणाम शास्त्रीयपणे अभ्यासला आहे. प्रगत माहिती तंत्रज्ञान आले तसे स्वीकारले गेले असे घडत नाही. त्यामागे एक कल्पकदृष्टी असावी लागते व ही कल्पकता नवीन प्रशिक्षण प्रबोधनातून जन्माला येते हे विसरता कामा नये. या अनुषंगाने या प्रबंधातून पुढे आलेले निष्कर्ष हे पुढील प्रकरणामध्ये सार रुपाने मांडलेले आहेत.

**संदर्भसूची**


१. अरनॉल्ड एडमंड, मॉडर्न न्यूजपेपर डिझाईन, पृष्ठ-८

२. कित्ता, पृष्ठ -८

३. शहा सीमा, आयटी, श्री पब्लिशर्स, नवी दिल्ली, पृष्ठ -६५

४. कित्ता

५. बर्नर थॉमस, द आर्ट ऑफ एडीटींग, पृष्ठ १-२

६. डॉ. धारूरकर वि. ल., संपादन कला आणि शास्त्र, शुभदा प्रकाशन, औरंगाबाद, -१९८९, पृष्ठ-११

७. कित्ता, पृष्ठ -११

८. गेराल्ड एडवर्ड, सोशल रिस्पॉनसीबीलीटीज ऑफ प्रेस, इस्ट-वेस्ट सेंटर होनलूलू-१९८०, पृष्ठ-६

९. श्रॅम विलबुर, कम्युनिकेशन इन मॉडर्न सोसायटीज, सुजीत पब्लिकेशन्स, दिल्ली-२००६, पृष्ठ-३

१०. कित्ता, पृष्ठ -५

११. कित्ता, पृष्ठ-६

११. बिटनर जॉन, मास कम्युनिकेशन ॲन इंट्रॉडक्शन, पृष्ठ-११

१२. बेर्जर ए. ए., मिडिया अनॅलिसिस टेक्निक्स, सेज प्रकाशन, लंडन-१९९०, पृष्ठ-२१

१३. डॉ. धारूरकर वि. ल., माहिती तंत्रज्ञान व प्रसारमाध्यमे, चैतन्य प्रकाशन, औरंगाबाद. पृष्ठ -८५

१४. कित्ता-८५

१५. कित्ता-८६

१६. अरनॉल्ड एडमंड, मॉडर्न न्यूजपेपर डिझाइन, पृष्ठ

१७. अकलूजकर प्रसन्नकुमार, वृत्तपत्रविद्या, श्रीविद्या प्रकाशन, पुणे-२००१, पृष्ठ-७३

१८. धारूरकर वि. ल., संपादन कला व शास्त्र,

१९. कित्ता

२०. कित्ता

२१. अकलुजकर प्रसन्नकुमार, उपरोक्त, पृष्ठ

२२. डॉ. धारूरकर, उपरोक्त, पृष्ठ

२३. कित्ता

२४. कुलकर्णी एस. के., वृत्तपत्र व्यवसायाकडे वाटचाल, सकाळ प्रकाशन पुणे, पृष्ठ-६०

२५. कित्ता

२६. कित्ता

२७. डॉ. धारूरकर वि. ल.

२८. कित्ता

२९. कित्ता

३०. डॉ. धारूरकर वि. ल., परिपूर्ण वृत्तपत्रातील नवे प्रवाह, सांजवार्ता, पृष्ठ१

३१. डॉ. धारूरकर वि. ल., संपादनकला

३२. कित्ता

३३. कित्ता

३४. सरदाना सी. के., मिडीया क्रिटीक्स

*१ मार्टीन, ग्लोबल इन्फॉरमेशन सोसायटी, मेलबोर्न युनिर्व्हसिटी-१९९८, पृष्ठ-८

*२ ब्ल्यू मेंथॉल, द मिडिया रूम, पेज -५

*३ कुलकर्णी एस. के. वृत्तपत्र व्यवसायाकडे वाटचाल, सकाळ प्रकाशन पुणे-२००१ ,पृष्ठ-११

*४ वेस्टले ब्रूस, दि आर्ट ऑफ एडिटिंग, विस्कॉसिन युनिर्व्हसिटी प्रेस-१९८२

*५ डॉ. धारूरक वि., माहिती तंत्रज्ञान व प्रसारमाध्यमे, उपरोक्त, पृष्ठ-८७

*६ कित्ता, पृष्ठ-८८

प्रकरण ६ वे

# माहिती तंत्रज्ञानाचा व्यवस्थापनावरील प्रभाव

६.१ प्रस्तावना

६.२ नवे व्यवस्थापन शास्त्र

६.३ व्यवस्थापनातील विविध विभाग

६.४ संशोधन व जनसंपर्क विभागाचे वाढते महत्त्व

६.५ मनुष्यबळ विकास प्रशिक्षण

६.६ नवी वितरण तंत्रे

६.७ माहिती तंत्रज्ञानामुळे झालेले लाभ

६.८ नव्या युगात परिपूर्ण वृत्तपत्राची जडणघडण

६.९ तंत्रज्ञान व तत्त्वज्ञान समन्वय

६.१० समारोप

संदर्भसूची

**प्रकरण ६ वे**

# माहिती तंत्रज्ञानाचा व्यवस्थापनावरील प्रभाव

## ६.१ प्रस्तावना

वृत्तपत्रासारख्या ज्ञानाधारित व्यवस्थापनामध्ये आधुनिक माहिती तंत्रज्ञानाने प्रवेश केला आणि या व्यवसायाचा चेहरा मोहरा बदलून गेला असा या व्यवसायाचे व्यवस्थापन तंत्रही गतीने बदलत आहे. प्रगत माहिती तंत्रज्ञानावर आधारित निर्मिती प्रक्रिया तसेच मांडणी व सजावटीमधील बदल वितरणाच्या नव्या शास्त्रीय पद्धती यामुळे वृत्तपत्रव्यवसायाचे हे बदलते स्वरूप लक्षणीय असे आहे आधुनिक वृत्तपत्र व्यवस्थापनावर पडलेला माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव स्पष्ट करतांना पीटर ड्रकर म्हणतात "Management faces the first test of its competence and its hardest task in the imminent industrial revolution which we call 'Automation.'"[१] औद्योगिक क्रांतीनंतर व्यवस्थापनाला अनेक कठिण समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यातही तंत्रज्ञानाच्या आधारे झालेल्या बदलाला स्वयंचलन असे म्हणतात. वर्तमानपत्रात असे स्वयंचलन माहिती तंत्रज्ञानामुळे घडून आले आहे. यामुळे या प्रकरणात या दृष्टीने केलेली मीमांसा महत्त्वपूर्ण ठरते त्यासाठी येथे तात्त्विक व व्यवहार्य दृष्टीने चर्चा केली आहे.

प्रगत अशा व्यवस्थापन तंत्राचे बळ माहिती तंत्रज्ञानामुळे वाढले आहे. आपला व्यवसाय

कसा आहे व तो कसा असला पाहिजे याची ओळख झाली तर कोणते व्यवस्थापन तंत्र वापरावयाचे ते चांगल्या प्रकारे समजू शकते. Thre are two kinds of innovation in every business : innovation in product or service, and innovation in the various skills and activities needed to supply them.[२] कुठल्याही आधुनिक व्यवसायात दोन प्रकारचे तांत्रिक शोध महत्त्वाचे असतात. पहिला प्रकार वस्तु व सेवा यांच्याशी निगडीत असतो तर दुसरा प्रकार हा त्यांच्याशी निगडीत काशैल्याशी असतो. वृत्तपत्र व्यवस्थापनात मुद्रण ही बाब उत्पादित वस्तूशी निगडीत आहे तर नवीन विक्री तंत्रे ही बाब कौशल्याशी निगडीत आहे. या दोन्ही बाबतीत संगणकाने चांगला बदल घडवून आणला. माहिती तंत्रज्ञानाच्या आगमनापूर्वी वृत्तपत्रांचे स्वरूप पारंपारिक होते व त्यांच्या व्यवस्थापनाचे चित्रही तेवढेच सनमनी होते. त्यामध्ये माहिती तंत्रज्ञानामुळे बदल झाले ही बाब प्रामुख्याने मान्य केली पाहिजे.

आपल्या उत्पन्नाची गुणवत्ता कायम टिकविणे व ती वाढविणे यावर आता व्यवस्थापनांना भर द्यावा लागत आहे. व्यवस्थापकाला उत्पादनाची प्रक्रिया कशी घडते व ती कशाप्रकारे सुधारता येते त्यामुळे ग्राहाकाचा लाभ कसा होईल या तीन बाबीवर भर द्यावा लागतो.[३] वृत्तपत्राची निर्मिती करतांना आशयाचे व्यवस्थापन निर्मिती तसेच गुणवत्ता अर्ज या प्रमुख बाबीवर भर द्यावा लागतो. भाषिक वृत्तपत्रांच्या रचना मांडणी आणि निर्मितीची पद्धती ही माहिती तंत्रज्ञानामुळे बदलली आहे व ती अधिकाधिक प्रमाणात क्रांतदर्शी रूप धारण करीत आहे . महाराष्ट्रातील भाषिक वृत्तपत्रांचे व्यवस्थापन कसे बदलले आहे व त्यामागे माहिती तंत्रज्ञानाचा परिणाम कसा फलदायी ठरत आहे त्याचे शास्त्रीय विश्लेषण या

प्रकरणामध्ये केले आहे. आता या पार्श्वभूमीवर नवे व्यवस्थापन शास्त्र कसे विभाजित झाले आहे त्यावर भाष्य करणे उचित ठरेल.

## ६.२ नवे व्यवस्थापन शास्त्र

अनेक नवीन तंत्र व कौशल्याचा स्वीकार केल्यामुळे व्यवस्थापन शास्त्राचे रूप अधिक अद्ययावत आणि तेवढेच कालसुसंगत बनत आहे. सर्वोत्तम व्यवस्थापन कौशल्यांच्या विचार करता अलीकडे संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापनावर भर दिला जात आहे. सुगंधी व सॅम्युअल यांच्या मते, संपूर्ण संपूर्णगुणवत्ता व्यवस्थापन ही एक निरंतर प्रहिरा असते व ती जात संपूर्ण प्रयत्नावर आधारलेली असते.[४]

आपल्या वृत्तपत्रांना नवे रूप देण्याचा प्रयास आधुनिक व्यवस्थापन तंत्राचा वापर करून केला जात आहे व त्या आधारे वृत्तपत्रांना नवे व्यक्तिमत्त्व प्रदान केले जात आहे. व त्या आधारे वृत्तपत्रांना नवे व्यक्तिमत्त्व प्रदान केले जात आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये व्यवस्थापक हा महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. पीटर ड्रकर म्हणतात, “ व्यवस्थापकांनी काळाप्रमाणे बदलले पाहिजे नवा बदल स्वीकारण्याची त्यांची क्षमता ही परिवर्तनाला पोषक ठरते.[५]

आधुनिक व्यवस्थापक हा आता सीईओ बनला आहे व एक कार्यकारी प्रमुख या नात्याने आपल्या संस्थेची मूल्ये व कार्य संस्कृती कायम ठेवून त्याला भावी कार्याचे नियोजन करावे लागते.[६] सीईओचे सामर्थ्य वाढले आहे त्याच्या रचना व कार्यपद्धतीमध्ये गुणात्मक बदल होत आहे.[७] या बदलांचा स्त्रीकार गतीने करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान

सहाय्यभूत ठरत आहे.

वृत्तपत्रासारख्या ज्ञानधारित उद्योगांमध्ये सीईओची भूमिका बदल आहे एका बाजूला त्याला आशय व्यवस्थापनाचे ज्ञान हवे तर दुसऱ्या बाजूला त्याला आपल्या निर्मित व वसू सेवेचे गतीने वितरणही करावे लागते तो आता अधिक झाली. गतिमान सारभूत असलेला तसेच चुंबकीय गुण असलेला नेता असावा लागतो.[८]

वृत्तपत्रव्यवस्थानाचे बदलते रूप पाहता आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना पुढील पाच पैलूंवर भर द्यावा लागतो आहे.

१. गुणवत्तेचा शोध घेतांना मात्र घटकांची चौकशी करता येणे शक्य होते.

२. प्राथमिक पहाणीनंतर लक्ष्य साध्य झाले की नाही हे पहाता येते.

३. सभोवतीच्या परिस्थितीवर आधारलेली प्रश्नांचे आकार करता येतात.

४. राजकीय सामाजिक व आर्थिक बदल प्रवेश व्यवस्थापन बदल करता येतात.

५. सीईओ माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षणात योग्य वातावरण तयार करतात. [९]

या सर्व घटकांचा विचार करतांना माहिती तंत्रज्ञान व नवे व्यवस्थापन शास्त्र पाटसर पूरक असल्या दिसून येते. वृत्तपत्रव्यवस्थापनाचे बदलते रूप पहाता आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा स्वीकार करतांना पुढील पाच पैलैवर भर द्यावा लागतो आहे.[१०]

## ६.३ व्यवस्थापनातील विविध विभाग

वृत्तपत्र व्यवस्थापन हे इतर व्यवसायापेक्षा वेगळे असते कारण वृत्तपत्र ही एक नाशवंत

वस्तू होत आणि वृत्तपत्र हे ज्ञानावर आधारित उत्पादन असल्यामुळे त्याची उपयुक्तता वाढतांना दिसते.[११] वृत्तपत्र क्षेत्रामध्ये निर्मिती आणि विहीमूल्य यामध्ये अंतर खूप कमी असते. कारण वृत्तपत्राची निर्मिती खर्च हा बाह्यसू त्यापेक्षा जास्त असतो.निर्मिती व नफा यातील फरक कमी असल्यामुळे समकक्ष बिंदू गाठणे व ती टिकविणे ही बाब कठीण असते.[१२]

आधुनिक वृत्तपत्रातील व्यवस्थापनाचे प्रमुख विभाग पुढीलप्रमाणे नमूद करता येतील

**१) जाहिरात विभाग**

वृत्तपत्राच्या विकासासाठी जाहिरात हे एक महत्तवाचे क्षेत्र होय नवीन जाहिरात मिळविणे व ती प्रकाशित करणे यावर हा विभाग भर देतो.[१३]

**२) वितरण विभाग**

हा विभाग वृत्तपत्राचे अंक दूरवर पसरलेल्या वाचकांपर्यंत पोहोचवितो आणि अंकांची पोहोच व उपलब्धता यात वाढ करतो.[१४]

**३) वसुली विभाग**

वितरण व जाहीरात या दोन मार्गाने वृत्तपत्रांना मिळणारे उत्पन्न वसूल करण्याचे काम या विभागाला करावे लागते.[१५]

या तीनही विभांगामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढत आहे तो आता

१) उपलब्ध जाहिरातींची नोंद आणि त्यांचा नित्य कार्यक्रम निश्चित करणे हे काम

आता संगणकाच्या आधारे होत आहे  त्यामुळे जाहीरातीची मांडणी व सजावट या बाबतीत असा संगणकाचा लाभ होत आहेत्र

१ वृत्तपत्रांची वेब आवृत्ती ही एक नवी संधी होय प्रभावी वृत्तपत्रप्रसारासाठी आता वेब आवृत्तीचा उपयोग केल्यामुळे भावी काळात वृत्तपत्र छपाई व वितरणाची डोकेदुखी कमी होणार आहे·[१६] असे डॉ. धारुरकर म्हणतात.

२) वितरक एजंटाची नोंद करणे व त्यांच्याकडून प्राप्त रकमेची व पुढील येणी याची नोंद संगणकावर रोजच्यारोज करता येते. वितरणातील वाढ व घट याची ताजी माहिती यापुढे उपलब्ध होते.[१७]

३) सैन्य पोटावर चालते तर वृत्तपत्र जाहिरातीवर चालते. २ त्यामुळे जाहिरातीवर आधारलेला नफा व वितरणातून येणारे लाभ याची नोंद आता संगणकामुळे चांगल्या प्रकारे केली जात आहे. [१८]

अशा प्रकारे या तीनही घटकांचा विचार करता माहिती तंत्रज्ञान हे व्यवस्थापनाला वरदान ठरले आहे.

वृत्तपत्रव्यवस्थापनामध्ये संघ भावना निर्माण करणे महत्त्वाचे असते.[१९] वितरणाचे कर्ते हे सांघिक नेतृत्त्वाच्या कुशल उभारणीवर अवलंबून असते. विश्वासार्हता आणि गुणवत्ता जोपासणे हे नव्या युगाचे आव्हान आहे.[२०] आधुनिक वृत्तपत्र व्यवसायाला त्यासाठी अनेक नवीन आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

## ६.४ संशोधन व जनसंपर्क विभागाचे वाढते महत्त्व

आधुनिक वृत्तपत्रांमध्ये संशोधन व जनसंपर्क हे दोन विभाग उदयास येत आहेत. वर्तमानपत्रामधील जाहिराती तसेच नव्या वाचक वर्गाचा शोध या कधीही जाहिरात पोषक ठरू शकते.

प्रत्येक परिपूर्ण वृत्तपत्र संशोधन व विकास या घटकावर भर देत आहे. त्याची ३ कारणे आहेत

१. वृत्तपत्रांना उपलब्ध होणाऱ्या जाहिरातीची उपयुक्तता व प्रभाव असा ही संशोधनातून सिद्ध होते त्यात ती बाजारपेठ संशोधन आवश्यक ठरते.

२. कोणत्या बाजू व सेवांची जाहिरात मिळू शकते या बाबत संशोधनाकडे असता बाजारपेठेतील नवे प्रवाह समजू शकतात.

३. नवा वाचक वर्ग शोधण्यासाठी व त्याच्याशी सातत्याने संपर्क ठेवण्यासाठी वाचक सर्वेक्षण फलदायी ठरते.[२१] त्यामुळे नवा वाचक मिळू शकतो व तो वाढविताही येतो.

या तीनही घटकामुळे संशोधन विभाग उपयुक्त ठरत आहे प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ही नवी जाहिरात प्राप्त करता येते व नवीन वाचकांची नोंदही करता येते.[२२] वर्तमानपत्रातील जनसंपर्क विभागाचे महत्त्वही विशेषत्वाने वाढत आहे त्याची कारणे अशी

१ वृत्तपत्राचे प्रगत युगातील समाजाशी असलेले नाते नव्या जनसंपर्क तंत्रामुळे प्रस्थापित करता येते. डॉ. धारुरकर म्हणतात एकविसाव्या शतकामध्ये जागतिकीकरणाच्या

लाटेबरोबर प्रसार माध्यमाचे व्यक्तिमत्त्व जसे झपाट्याने बदलत आहे तसे जनसंपर्काचे तत्त्वज्ञान आणि व्यवहार यामध्येही क्रांतिकारक बदल होत आहेत.[२३]

२ समुह संपर्क व विविध जनसंपर्क अभियनातून समाजाशी उमललेले नाते पुनश्च गतीने ठेवता येते. नवीन सहस्त्रकामध्ये वैश्विक पातळीवर प्रगत होत असलेला जनसंपर्क आणि भारतीय जनसंपर्क यातील दरी गतीने कमी करण्याची गरज आहे.[२४]

३ कॉर्पोरेट जनसंपर्काचे नवे पैलू वापरून वृत्तपत्र हे अधिक गतिमान होऊ शकते.कार्पोरेट जनसंपर्क हे नवे क्षेत्र आपणास अधिक प्रभावीपणे विकसित करावे लागेल. त्यासाठी मनुष्यबळाचा विकास करणे आणि प्रभावी भावी पिढी तयार करणे ह्यासाठी परिश्रमपूर्वक प्रयत्न करावे लागतील.[२५]

कॉर्पोरेट जनसंपर्काची गती व विकास पहाता प्रगत माहिती तंत्रज्ञान जनसंपर्कातील अंतर केले जात आहे वृत्तपत्र संपादक, वाचक व व्यवस्थापक हे अधिक समीप येत आहे डॉ.धारूरकर म्हणतात, भारतामध्ये जनसंपर्क सेवांना अधिक तत्पर आणि जबाबदार करणे अगत्याचे आहे. त्यामुळे भारतामध्ये जनसंपर्क सेवा अधिक प्रमाणात रुजू शकतात. जागतिकीकरणानंतर जगभर एक नवी पुनर्रचनेची प्रक्रिया सुरू होत आहे.[२६] ॲलविन टॉफलर म्हणतात, ‘पुनर्रचनेची प्रक्रिया आता सुरू करावयाची आहे. सध्याची प्रणाली अधिक विस्कळीत होण्यापूर्वी आणि दहशतीचे थैमान सुरू होण्याअगोदर २१ व्या शतकातील लोकशाहीकडे शांततामय संक्रमण करणे अशक्य होण्याअगोदर म्हणजे आताच नव्याने सुरूवात केली पाहिजे.[२७] यावरून आधुनिक माहिती तंत्रज्ञान वृत्तपत्रावर

कसा प्रभाव टाकीत आहे. ते लक्षात येऊ शकते. त्यासाठी वेब वृत्तपत्रातील अंतक्रियात्मक जाहिराती व त्यांचा जनसंपर्काचे साधन म्हणून होत असलेला उदय याकडेही लक्ष वेधले पाहिजे.

**वेब जाहिराती व जनसंपर्क**

कोणत्याही संकेत स्थळांचे  संकलन व संपादन करताना आणि त्यातील जाहिराती मांडतांना पुढील मुलभूत तत्त्वांचा विचार केला जातो.

**१. संकल्पना**

चांगली वेबसाईट तयार करत असताना प्रथम संकल्पनांची स्पष्टता असणे आवश्यक असते. मुद्रित माध्यमात म्हणजे वृत्तपत्रात तर चांगली वेबसाईट तयार करत असताना आपणास काय सांगावयाचे आहे, कुठे व कसे सांगावयाचे आहे याबाबत निश्चित, स्पष्ट संकल्पना नोंदवाव्या लागतात. वेबसाईट कोणासाठी तयार करावयाची आहे, तिच्यातील संदेश हा कुठल्या श्रोत्यांसाठी आहे तसेच त्या संदेशात संवादाचे सामर्थ्य किती आहे या प्रश्नाची उत्तरे शोधून वेबसाईट जीवंत आंतरक्रिया देण्यासाठी समर्थ रुप  देता येते. या सर्व प्रश्नांची उत्तरे आपणाजवळ असतील तर चांगली आंतरक्रिया घडविणारी आणि अपेक्षित हेतू साध्य करणारी वेबसाईट तयार करणे सोपे होते. अशा संकेतस्थळांचा विकास करून वर्तमानपत्रे सुद्धा आपल्या वाचकांना ताजी माहिती देऊ शकतात.

**२. सजावट तंत्र**

वेबसाईटची सजावट करताना प्रथमतः पूर्व नियोन करणे आवश्यक असते. आपली

कल्पना मध्यवर्ती ठेऊन तिचा प्रभाव सर्वदूर पोहोचविण्यासाठी सरळता, समतोल, भारतत्त्व, लयतत्त्व तसेच प्रभूत्त्व या सूत्रांचा उपयोग करावा लागतो. वेबसाईटला अधिकाधिक लोकांनी भेट द्यावी म्हणून त्यातील कथानक रंगवावे लागते. तसेच आशयाला अधिक सुसंवादी रूप द्यावे लागते. म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जावे लागते. वेबसाईट माहिती व कार्यपद्धती जर कल्पकतेने देत असेल तर अनेक ग्राहक तिच्याकडे आकर्षित होतात. वर्तमानपत्रातील वेब आवृत्तीच्या जाहिराती करताना अशा सजावटीवर लक्ष द्यावे लागते.

### ३. वेबसाईट निर्मिती:

तपशिल मांडणे (टेक्स्ट), प्रतिमा तयार करणे (इमेज) तसेच दृकश्राव्य प्रतीकांचा वापर करणे आणि साईटला भेट देण्यासाठी तिचे स्वरूप आकर्षक बनविणे आणि हे सर्व गणित प्रभावी करणे हे वेबसाईट निर्मितीमधील महत्त्वाचे टप्पे आहेत. आपली वेबसाईट यशस्वी होण्यासाठी कलात्मक दृष्टीने उपलब्ध सुविधांचा वापर करून संस्थेच्या विकासाची यशकथा आणि तिच्या सेवांचा प्रभाव योजकतेने मांडणे गरजेचे असते. व्यापार, शिक्षण तसेच प्रबोधन या तीनही बाबतीत वेबसाईट आकर्षक करण्यासाठी केलेले प्रयत्न जेव्हा लोकांच्या पसंतीस उतरतात तेव्हा वेबसाईट यशस्वी झाले असे म्हणता येईल. आणि अशा वर्तमानपत्रांच्या संकेतस्थळांना वाचक जेवढ्या अधिक प्रमाणात भेट देतात तेवढ्या अधिक प्रमाणात त्या वर्तमानपत्राची लोकप्रियता सिद्ध होते. त्यासाठी वारंवार आपल्या नियोजनात बदल करण्याचा प्रयत्न वर्तमानपत्रे करतात.

## ४. विपणन

आपण निर्माण केलेल्या वेबसाईटला अधिक लोकांनी भेट दिली आणि तिची कल्पना उचलून धरली म्हणजे त्या कल्पनेचे विपणन झाले असे म्हणता येईल. वेबवरिल ही निर्मिती केवळ मनोरंजक कल्पक राहत नाही तर ती संस्थेला आर्थिक लाभही प्राप्त करून देते. आपल्या संस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ज्या दिशेने प्रयत्न करण्यात आले होते ते प्रयत्न किती सफल झाले यावर वेबसाईटचे अंतिम यश अवलंबून असते. वाचक किंवा प्रेक्षक हा वेबसाईटला किती प्रतिसाद देतो यावरून ती कल्पना समाजात किती प्रमाणात रुजत आहे ते लक्षात येते. वेबदुनियासारख्या हिंदी वृत्तपत्राने भाषिक वृत्तपत्राद्वारे आपल्या कल्पनांचे जगभर विपणन केलेले आहे. मराठी वृत्तपत्रेसुद्धा संकेतस्थळांचा विपणनासाठी चांगला उपयोग करत आहेत. दैनिक लोकमत, पुढारी या संदर्भात या पत्रांचे प्रयोग लक्षणीय आहेत.[*१]

वेबसाईटवरील जाहिराती ह्या उपरोक्त चार वैशिष्ट्यांतून साकार झालेल्या असतात. वेब जाहिराती केवळ मुद्रित नसतात तर त्यांना दृकश्राव्य तसेच आंताक्रियात्मक रुपही असते. ग्राहक आपल्या कौशल्यांचा उपयोग करून या जाहिरातींद्वारे वस्तु व सेवांची मागणी करू शकतो. वेब जाहिरात ही जगातील प्राचिन काळापासून विकसित झालेल्या आणि आधुनिक काळापर्यंत पोहोचलेल्या जाहिरातींचा परिपाक होय. वेब जाहिराती या वृत्तपत्राप्रमाणेच दृकश्राव्य माध्यमाचा अविभाज्य भाग बनत आहेत. अनेक जाहिरात संस्था वस्तू व सेवांचे अनन्य विक्री लक्षण (युएसपी) काढून जाहिरात कल्पना मांडत असतात. प्राचिन काळी लोक प्रथम ओरडून जाहिराती करत. नंतर त्या भिंतीवर रंगविल्या जात १४५० साली

मुद्रणाचा शोध लागल्यानंतर १० वर्षांनी १४६० साली विल्यम कॅक्स्टन या ग्रस्थाने प्रथम ख्रिश्चन धर्माच्या पुस्तकाचा प्रसार करण्यासाठी पहिली जाहिरात निर्माण केली होती. या पुस्तकाच्या पहिल्या जाहिरातीनंतर जगात व्यापारी, उत्पादक, राजकीय नेते, कार्यकर्ते, उद्योजक हे जाहिरातीवर अमाप खर्च करू लागले. आजची वेब जाहिरात ही मुद्रण, चित्र आणि संबोधन या तीनही कलांचा संगम आहे. असे म्हणतात की, १९६८ साली अमेरिकेत जाहिरातींवर १८० कोटी डॉलर्स खर्च करण्यात आले होते. पश्चिम जर्मनीने ४० कोटी, जपानने १५ कोटी, इंग्लंडने १२ कोटी डॉलर एवढ्या रकमा जाहिरातीवर खर्च केल्या होत्या.

नवीन सहस्त्रकात तर जाहिरातीवरचा खर्च चौपट वाढला आहे कारण उत्पादनातील नफ्याच्या ४० टक्के रक्कम बहुराष्ट्रीय संस्था जाहिरातीवर खर्च करत आहेत. त्यामुळे मल्टी लेव्हल मार्केटींग ही नवी कल्पना उदयास येत आहे. अशा वेळी वेबसाईट जाहिराती केवळ राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठा उपलब्ध करून देत आहेत. भारतात आकाशवाणीवर पहिली जाहिरात १५ नोव्हेंबर १९६५ रोजी व्यापारी सेवेच्या रुपाने सुरू झाली तर दूरदर्शनवर अशी जाहिरात ४ जानेवारी १९७६ रोजी सुरू झाली. भारतात इंटरनेट आल्यापासून वेबसाईट जाहिरात हे एक नवे क्षेत्र उदयास आले आहे व वेब जाहिराती बाबत असे म्हटले जाते की, वेब जाहिरात ही केवळ कला नव्हे तर ते एक शास्त्र आहे. वेब जाहिरातीद्वारे जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेल्या आपल्या ग्राहकाला आकर्षित करण्यासाठी नवे कल्पक प्रयत्न केले जात आहेत. आशय विश्लेषक आणि वेब मास्टर या नव्या कल्पना उदयास आल्या असून जर चांगली वेब जाहिरात तयार केली तर

तिच्यामुळे मिळणारे उत्पन्न हे दसपट वाढू शकते असे म्हटले जाते. भारतीय भाषेतील नयी दुनिया या हिंदी दैनिकाच्या वेब आवृत्तीचे मासिक जाहिरात उत्पन्न ३२ लाख रुपये एवढे झाले आहे. यावरून भाषिक पत्रे सुद्धा वेब जाहिरातींच्या द्वारे जगाच्या कानाकोपऱ्यात सर्वदूर पसरलेल्या आपल्या ग्राहकाला आकर्षित करण्यासाठी वेब जाहिरातींचा प्रभावीपणे उपयोग करत आहेत.[*२] महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रांच्या वेबजाहिरातींमुळे महाराष्ट्रात सर्वदूर पसरलेल्या मराठी वाचकांना महाराष्ट्रातील वस्तू व सेवांचा परिचय होत आहे व वर्तमानपत्रांचे आर्थिक पाठबळही मजबूत होत आहेत. तथापि जिल्हा वर्तमानपत्रांना वेबजाहिरातीबाबत अद्यापही परिपूर्ण ज्ञान नसल्यामुळे त्यांच्यासाठी प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

## ६.५ मनुष्यबळ विकास प्रशिक्षण

वर्तमानपत्रामध्ये कार्य करणाऱ्या पत्रकार व उपसंपादकांना नित्य नवीन प्रशिक्षणाची गरज असते किंबहुना वृत्तपत्र हे बौद्धिक उत्पादन असल्यामुळे त्याची महती अधिक आहे पुढील ५ कारणांमुळे हे मनुष्यबळ विकास तंत्र महत्त्वाचे ठरते.

१ वर्तमानपत्र व्यवसायाचे स्वरूप नित्य बदले व त्यात नवीन ज्ञान व कौशल्य व शहाणपणाची भर पडत असे.

२ वर्तमानपत्रातील कर्मस कळींना नव्या विशेष ज्ञानाची गरज आहे ऊर्जा, पाळी व संवाद क्षेत्रातील नवे प्रश्न कसे हाताळावेत यासाठी प्रशिक्षण हवे आहे.

३ आपल्या अंगभूत कार्यात सुधारणा ही बाब प्रशिक्षणावर अवलंबून असते.

४. किमान सपना व त्यांचा घास या प्रत्येक वृत्तपत्रात त्यांची कार्य संस्कृती जपावी लागते.

५ आपल्या समतांच्या विकास व माहिती तंत्राची हाताळणी या बाबत यथा योग्य प्रशिक्षण हवे असते व असे प्रशिक्षण दिले तरच वृत्तपत्र प्रगत रूप धारण करू शकते वृत्तपत्रे आपली कार्य संस्कृत व मूल्य रक्षणावर भर देत असते.[२८]

## ६.६ नवी वितरण तंत्रे

आधुनिक वर्तमानपत्राची वाचकापर्यंत गतीने पोहोचण्याची नवीन वितरण तंत्रज्ञाचा वापर यात आहे. आपल्या उत्पादनात वाचकांपर्यंत पोहोचविण्यात येते व नवीन प्रयोग केले जात आहेत रवींद्र रसाळ यांनी वृत्तपत्र प्रकार हा संशोधनपार ग्रंथ प्रकाशित केले आहे त्यांच्या मते ग्रामीण भागात वर्तमानपत्र पोहोचण्यात खरी अडचण आहे ती दळणवळणाची साक्षरतेचा अभाव नवीन वाहतूक प्रणालीची कमतरता रेल्वे व रस्ता वाहतूकीतील समन्वयाचा अभाव हे वितरण प्रमुख अडसर आहेत.[२८] आधुनिक युगांमध्ये पुढील नवीन वितरण तंत्रे उदयास आली आहेत.

१ परिपूर्ण वृत्तपत्राच्या मांडणी व सजावटीत बदल झाल्यामुळे आता वृत्तपत्र एक अद्ययावत उत्पादन बनले आहे

२ वृत्तपत्रांचे प्रगत रूप त्यांचे विहितमूल्य वाढवित आहे व वाचकांचे समाधान वाढत आहे

३. आकर्षक भेट योजना आणि सवलतीमुळे वाचक वृत्तपत्राकडे आकर्षित होत आहेत.[२९]

४ भेट वस्तू आणि सवलती यामुळे वाचकांना आकर्षित करण्याचे प्रयत्न होत आहेत.

५ विविध प्रकारच्या स्पर्धा आणि नव्या बाधित योजना प्रभावी ठरत आहेत शब्दकोडे व सामान्य ज्ञान आपोआप वेगळ्या ज्ञानाधारित स्पर्धा आखल्या जात आहेत.[३०]

वर्तमानपत्रांच्या क्षेत्रात बाजारपेठांचे प्राबल्य वाढले आहे आणि नवीन बाजारपेठ चालीत पत्रकारिता ही आता जाहीराती ही आणि नवीन वितरण तंत्रे यावर भर देत आहे.[३१] कोटलर म्हणतात, बाजारपेठेतील वातावरण बदलले आहे. नव्या वास्तवांना सामोरे जाण्याची गरज आहे. कारण उदारीकरण व खाजगीकरणानंतर बाजारपेठेतील स्पर्धा वाढली आहे.[३२] या सर्व पार्श्वभूमीवर माहिती तंत्रज्ञानामुळे आधुनिक वृत्तपत्राला झालेले लाभ थोडक्यात समजावून घेतले पाहिजेत ही सर्व चर्चा माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात केली असता नवे आकलन सुलभ होऊ शकते. कोटलर यांच्या मते, बाजारपेठेचे सामाजिक संस्कृतीक वातावरण बदलत आहे. तांत्रीक तसेच राजकीय परिस्थिती व कायदेकानून विषयक नियम यातही जागतीकीतरणानंतर बदल होत आहेत.[३३]

ग्राहक हा केंद्र बिंदू बनला असून त्याच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी व्यवस्थापकास आपले उत्पादन सतत अद्ययावत करावे लागते.[३४]

## ६.७ माहिती तंत्रज्ञानामुळे झालेले लाभ

प्रगत माहिती तंत्रज्ञानामध्ये वृत्तपत्रांचे व्यवस्थापन संपूर्णपणे बदलले आहे. श्रेष्ठ गुणवत्ता आणि प्रगत दर्जा यावर भर देऊन वृत्तपत्र व्यवस्थापन केले जात आहे. सॅम्युअल सुगंधी यांच्या मते गुणवत्ता ही विशिष्ट घटकाशी निगडीत असते.[३५] आधुनिक माहिती

तंत्रज्ञानामुळे वृत्तपत्रांना झालेले लाभ व त्याच्या कार्यात झालेले अंतर्बाह्य बदल पुढीलप्रमाणे नोंदविता येतील.[३६]

अंतर्बाह्य बदल

प्रगत माहिती व संवाद तंत्रज्ञानामुळे माध्यमांच्या जगात अंतर्बाह्य बदल होत आहेत. तसेच व्यक्तिचे जीवन हे संपूर्णपणे बदलत आहे. नव्या जीवनशैलीवर प्रसार माध्यमांच्या कार्यपध्दतीचा विलक्षण प्रभाव पडलेला आहे.

१. संवाद क्रांतीच्या नव्या जगात माहिती ही प्रगतीचा मूलमंत्र बनली आहे. त्यामुळे आधुनिक वृत्तपत्रांना आपल्या वाचकास आद्ययावत माहिती देण्यासाठी इंटरनेट सारख्या साधनावर अवलंबुन राहावे लागत आहे.

२. माहितीचे जागतिक महाजाल (World Wide Web) यामुळे इंटरनेट हे एक नवे अदभूत कल्पवृक्ष बनले आहे. या कल्पवृक्षाकडून वाचकाला हवी असलेली कोणतीही माहिती तक्ताळ उपलब्ध होऊ शकते.

३. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माहिती पाठविताना डाटा प्राटोकॉल संकेताचा विकास करण्यात आला आहे. हे संकेत वर्तमानपत्रांना बातम्या व लेख पोहचविण्यासाठी पोषक ठरले आहेत.

४. संगणकावरील सुयोग्य (ग्राफिक्स) प्रतीकांचा विकास हा दृक माहितीची शक्ती वाढवितो. तसेच त्यामुळे वर्तमानपत्राच्या मजकूरास पोषक अशी रंगीत चित्रे व रेषाटने देणे शक्य होते.

५. व्हर्च्युअल रिॲलिटी हे माहिती जगतातील नवे वास्वत आहे. या आभासी जगात वाचकाला काही क्षणामध्ये आपण जगाचा प्रवास घडवू शकतो. व त्याला पाहिजे असलेली कोणतीही माहिती तत्काळ उपलब्ध करु शकतो. वत्रमानपत्रे या गतीमान माहितीचा चांगल्या प्रकारे लाभ घेत आहेत.

६. माहिती, प्रतिमा याचे संक्षेपन ही नव्या तंत्राची उपलब्धी आहे. मथळे, पोट मथळे तसेच छायाचित्रे यांचा आकार आपणास पाहिजे तसा कमी किंवा जास्त करुन घेता येतो त्यामुळे वर्तमानपत्रातील जागेचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे करता येते.

७. डिजिटल व्हीडीओमुळे विकासाचे वास्तव प्रकट करता येते. तसेच विकास विषयक बातम्या, लेख या मध्ये समर्पक छायाचित्रे देऊन संवाजाची शक्ती वाढवता येते.

८. श्राव्य माहितीचे सादरीकरण नमुना व संकेत तसेच डिजीटल ॲड्युओ सुविधा यामुळे नभोवाणी माध्यमाचा चेहरा-मोहरा बदलला आहे. तसेच नभोवाणीवर होणाऱ्या कार्यक्रमांची समिक्षा वर्तमानपत्रे करू शकतात तसेच वेब रेडीओवर श्रोते स्थानिक कार्यक्रम ऐकू ही शकतात.

९. वायरसह व वायरविना दूरध्वनी ही नव्या जगाची क्षमता होय. आता याप्रकारच्या दुरध्वनीवर तसेच भ्रमणध्वनी वर एस.एम.एस व्दारे तत्काळ प्रतिसाद नोंदविता येतो. वार्ताहर उपसंपादक यांना या सेवांचा लाभ होत आहे.

१०. प्रसारण आणि संग्रहण तंत्रज्ञान ज्ञान सुरक्षेस वरदान ठरत आहे. वर्तमानपत्रातील महत्त्वाची सामुग्री सारांश रुपाने नभोवाणी व चित्रवाणी या माध्यमावर सुध्दा

उपलब्ध होत असते त्यामुळे वाचकांना ताजी माहिती प्राप्त होत आहे.

११. रेडीओ फ्रिक्वेन्सीचा नव्या तंत्रामुळे विकास होत आहे तर चित्रवाणी प्रतिमा संग्रहण क्षमता वाढली आहे. वर्तमानपत्रात चित्रवाणी मालिका बाबत प्रकाशीत होणारी समिक्षा वाचकांची अभिरुची वाढवत आहे व्‌ त्यावर चर्चाही घडवून आणत आहे.

१२. इंटरनेटचे संघटन जसे वाढत आहे तसे माहिती समाजात ई-कॉमर्सचे प्रमाणही वाढत आहे. भारतासारख्या देशात सुध्दा दररोज ४८००० नवे ग्राहक ई-कॉमर्स मुळे वाढत आहे. भारत जगातील मध्यमवर्गाची सर्वातमोठी बाजारपेठ असल्यामुळे भारतात वर्तमानपत्रांचा प्रसारही वाढत आहे.

१३. कनव्हर्जन तंत्रामुळे एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात प्रवेश करणे शक्य होत आहे. बहुमाध्यमांचे जग मानवी जीवन समृद्ध करत आहे. एन.राम. यांच्या मत इंटरनेट कडे वळलेल्या तरुण पिढीस वर्तमानपत्राकडे आकर्षित करण्याची गरज आहे.[३८]

१४. प्रसार माध्यमांच्या क्षेत्रातील नित्य नव्या बदलांमुळे लोकांच्या जीवनशैलीत व राहणीमानात गतीने बदल होत आहेत. बौध्दिक संपदा आणि पेटंट कायदे याबाबतही जागरूकता वाढत आहे. माहितीच्या आधिकारामुळे विकसनशील देशातील प्रसारमाध्यमांची जबाबदारी वाढली आहे.[३७]

या सर्व घटनांचा विचार करता वृत्तपत्रांच्या व्यवस्थापनात झालेला बदलांचे नवे आकर्षण मोलाचे ठरते.

## ६.८ नव्या युगात परिपूर्ण वृत्तपत्राची जडणघडण

उत्तर आधुनिक युगात माहितीचे स्वंचलन (information auromation) ही एक नवी प्रक्रिया आहे. जागतीकीकरणानंतर व्यवस्थापनाच्या सर्वच क्षेत्रात बदल होत आहे. व हे बदल वृत्तपत्राच्या व्यवस्थापनातही होत आहे. वर्तमानपत्राच्या वितरणामध्ये नव्या विपणन वाहिन्या (Marketing Channels ) निर्माण केल्या जात आहेत. वाहिन्यांची कार्ये व त्यातील व्यवसायाचा प्रवाह सुद्धा गतीने बदलत आहे. नव्या व्यवस्थापनतंत्राबाबत कोटलर म्हणतात, The CEO or Maneger has to gather information about potential and current customers, Compititors and other actorsa and forces in the marketing Inverionment[39] याचा अर्थ असा की, बाजारपेठेतील स्पर्धक त्यांच्या हालचाली तसेच बाजारपेठेतील बदललेले वातावरण याचे भान व्यवस्थापकाला सतत ठेवावे लागते. कोटलर म्हणतात Direct Marketing can reach prospects at the right movement It lets marketers test alternative media and message to find the most cost-effective approch.[40] अशा प्रकारे व्यवस्थापकास बाजारपेठेतील संभाव्य बदलांची योग्य माहिती असेल तर त्याला आपल्या स्पर्धकावर चांगल्याप्रकारे मात करता येते. टाईम्स ऑफ इंडीया सारख्या वर्तमानपत्राने भारतात प्रथम व्यवस्थापकीय संपादक ही संकल्पना आणली त्यामुळे वृत्तपत्र व्यवसायात बाजारपेठप्रधान नव्या तंत्रांचा प्रभाव वाढत गेला असल्याचे दिसून येते. नव्या जगात तंत्रदृष्टीने प्रगत व माहिती दृष्टीने समृध्द अशा समाजाला माहिती समाज म्हटले जाते. प्रगती माहिती व संवाद तंत्रज्ञानाच्या वाढत्या लोकप्रियतेबरोबर वैश्विक माहिती समाजाची नव्याने जडणघडण होत

आहे. नव्या माहिती समाजाचा जागृत व निरोगी प्रसार माध्यमेही जणू आरसाच असतात. या समाजाचे आरोग्य कसे आहे ते समकालिन माध्यमांच्या अवस्थेवरून ज्ञात होते. पिटर ड्रकर यांच्या मते The major driving forces, behind the trend towards alliances are technology and markets. In the past, technologies overlapped little.[41] याचा अर्थ असा की, माहिती तंत्रज्ञान आणि बाजारपेठ यांचे मिलन होत असून त्यामुळे व्यवसाय पुढे जात आहे. पूर्वीच्या काळात तंत्रज्ञानाला कमी महत्त्व होते ते आता वाढले आहे. कोणतीही संस्था ही केवळ तेथील कर्मचाऱ्यासाठी चालवता कामा नये ती उत्पादनाचा दर्जा व कामगीरी यावर आधारून चालविली पाहिजे.[४२] वृत्तपत्र व्यवसायात सुद्धा जी उत्पादने लाभदायक आहेत तीच चालविली जातात व जी केवळ पांढराहत्ती ठरत आहेत ती बंद केली जात आहेत. टाईम्स समुहाने इल्युस्ट्रेटेड विकली. वामा यासारखी अनेक नियतकालीके बंद केली आहेत. तसेच सकाळ या वृत्तपत्राने युवा सकाळ यानावाचे दैनिक सक्षम होत नाही पाहिले तेव्हा ते बंद केले. वृत्तपत्राच्या अर्थशास्त्रात ज्ञान, अनुभव आणि शहाणपण याबाबींना विशेष महत्त्व असते. केवळ कृती म्हणून उत्पादन चालविले जात नाही तर ते किती किफायतशिर आहे यावर भर द्यावा लागतो. नव्या जगात उत्पादकता आणि नव्या शोधावर आधारीत रचनात्मक बदल याबाबी व्दाररक्षक म्हणून पुढे येत आहेत.[४३] आधुनिक माहिती तंत्रज्ञानाते वाघिणीचे दूध वर्तमानपत्राच्या पचनी पडावे म्हणून पुढील बाबीवर भर दिला पाहिजे.

१. संवाद तंत्रज्ञानाची ओळख करून घेऊन माध्यम साक्षरता वाढविण्याची गरज आहे. त्यासाठी वर्तमानपत्रानी वाचकांना संगणकाच्या आधारे इंटरनेट वापराचे

प्रशिक्षण दिले पाहिजे.

२. मौखिक, अमौखिक संवाद तसेच देहबोली याच प्रमाणे माध्यम तंत्रज्ञान जाणीव जागृती करताना प्रगत माध्यमे मार्गदर्शक ठरत आहेत. मानवाच्या जीवनाला नवा आकार देण्यासाठी जीवनदायी संवाद कौशल्य रुजविण्यावर वर्तमानपत्रानी भर दिला पाहिजे.

३. प्रभावी संवादकर्ता होण्यासाठी संगणक व इंटरनेटचे प्रगत ज्ञान आवश्यक आहे. त्यासाठी जर तत्वास अनुभवाची जोड असेल तर प्रत्येक व्यक्ती मुद्रक, संपादक व प्रकाशक होऊ शकते. त्यामुळे जनमताची जडणघडण करणे अधिक सोपे होऊ शकते.

४. आंतः वैश्विक संवाद असो जी जनसमुह संवाद नवी साधने व्यक्तीचे जीवनमान आणि राहाणीमान उंचाविण्यासाठी मागर्दशक ठरत आहेत. तेव्हा आपल्या वाचकांचे जीवनमान व राहणीमान उंचवण्यासाठी त्यांच्या मित्रमार्गदर्शक व तत्वचिंतक बनले पाहिजे.

५. माध्यमे मुद्रित असोत की दृकश्राव्य नभोवाणी असो की दूरदर्शन चित्रपट असो की, व्हीडीओ त्यांच्या गतिमान विकासासाठी माहिती तंत्रज्ञानाची कुशलता आत्मसात करणे भाग आहे. कारण सर्वमाध्यमाच्या संक्रमणासाठी तसेच निर्मिती व संपादनासाठी माहिती तंत्रज्ञानावर आधारलेली आयुधे पोषक ठरत आहेत.

६. माध्यम क्षेत्रातील व्यावसायिक सेवासंधी प्राप्त करून घेण्यासाठी प्रगत माहिती

संवाद तंत्रज्ञानाचे अद्ययावत ज्ञान ग्रहण करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे वर्तमानपत्राच्या व्यवस्थापकांनी माहिती तंत्रज्ञानात घडत असलेल्या नव्या बदलांचे ज्ञान व भान प्राप्त करुन देण्यासाठी प्रशिक्षणाची सुविधा वाढविली पाहिजे. उमा जोशी यांच्या मते, Mass mesia create impact by playing their role as change agent, reflector and reinforcer of dominant values and attitudes in society which can have a significant impact on the decisions of developement planners, policy makers and legislators that affects developement programmes. अशाप्रकारे नवी प्रसारमाध्यमे परिवर्तनाची घटक बनत आहे आणि त्यांचा विकासातील घटक म्हणून वाटा प्रभावी बनत आहे हे लक्षात घेऊन वृत्तपत्रव्यवस्थापकानी केवळ नफा हा दृष्टीकोन न ठेवता समाजहीत व सामाजिक बांधिलकी या दृष्टीने काम केले पाहिजे.[४४] प्रसारमाध्यमात जाहिरातीत तसेच विविध प्रकारच्या आकर्षक योजना याद्वारे वाचकाला आपणाकडे खेचण्याचा प्रयत्न वर्तमानपत्रे करत आहेत. असे करताना बऱ्याच वेळा जाहिरातीमध्ये महिलांच्या प्रतिमांचा दुरुपयोग होतो, त्यामुळे तो टाळण्यासाठी वृत्तपत्रव्यवस्थापनाने कायदा व नैतिक आचारसंहिता याकडे पुरेसे लक्ष दिले पाहिजे.[४५]

## ६.९ तंत्रज्ञान व तत्त्वज्ञान समन्वय

वर्तमानपत्रातील व्यवस्थापन संक्रमणावस्थेतून जात आहे. परदेशातील वर्तमानपत्रांचा अनुभव लक्षात घेऊन वर्तमानपत्रानी अवास्तव अपेक्षा न बाळगता आपल्या भावी विकासासाठी

संघर्ष केला पाहिजे. युरोप व अमेरिकेत वृत्तपत्रांचा खप ओसरत आहे अशा वेळी भारतीय भाषीक वृत्तपत्रानी नवे प्रयोग केले पाहिजे.[४६] माहिती संवाद तंत्राचा प्रसार माध्यमांत वापर करताना तंत्रज्ञान व तत्त्वज्ञान यात समन्वय साधण्याची गरज आहे. असा समन्वय ही नव्या युगाची हाक आहे. प्रगत तंत्रज्ञान व तत्त्वज्ञान हे हातात हात घालून चालावे तरच नव्या जगामध्ये नवीन प्रसारमाध्यमे सक्षम होऊ शकतील. या प्रमुख घटकांचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

१. नव्या माहिती संवादतंत्राची व नव्या संवाद सिद्धांताची संवादकर्त्यास कालसुसंगत यथार्थ माहिती असणे गरजेचे आहे.[४७]

२. माध्यमे मुद्रित असो की दृकश्राव्य दोहोंनाही माहिती तंत्रज्ञान वरदान ठरत आहे. जिल्हापत्रे ही आता वेबआवृत्तीने वैश्विक रूप धारण करत आहेत. नभोवाणी तसेच चित्रवाणी आणि चित्रपट ही माध्यम आपला श्रोता व प्रेक्षक रोज नव्याने मिळवित आहेत.[४८] असा नवा प्रेक्षक व वाचक हा कल्पकतेकडे वळत आहे.

३. वाचक व श्रोत्यांचे मानसशास्त्र आणि समाजशास्त्र लक्षात घेऊन प्रसारमाध्यमे आपल्या रचना व आशायात बदल करत आहेत. टीआरपीसारख्या तंत्रामुळे हे बदल समजावून घेणे शक्य होत आहे. वेब आवृत्त्यास भेट देणारे वाचक त्यांची लोकप्रियता सिद्ध करतात.[४९]

४. प्रगत समाजाची सामाजिक दृष्टी ही प्रगत माहिती तंत्राच्या वापरावरून ठरत आहे. जुन्या पारंपरिक पद्धतीपेक्षाही आता नवीन अद्यायावत संवाद साधने अधिक लोकप्रिय बनत आहेत. तरुण वर्गात रेडिओ ऐकण्यापेक्षा इंटरनेटवरून ज्ञान

ग्रहण करण्याचा अधिक कल दिसतो. ग्रंथवाचनापेक्षाही नेटवरून संदर्भ शोधण्यासाठी संशोधकांचा अधिक प्रमाणात कल दिसून येतो.[५०]

५. नवी इंटरनेटवर तसेच प्रगत माहिती संवाद तंत्रावर आधरलेली माध्यमे ही नवी माध्यमप्रधान विकास संस्कृती घेऊन प्रकट होत आहेत. या बाजारपेठप्रधान माध्यमाधारित जगावर प्रसार माध्यमांचे आणि प्रगम माहिती तंत्राचे अधिक वर्चस्व आहे. कारण प्रत्येक तांत्रिक क्रांती ही नव्या संवादक्रांतीला जन्म देत आहे.[५१]

६. दूरसंदेशवहन क्षेत्रातील क्रांती आणि नवीन संवाद तंत्राचा वापर यामुळे नवा 'दूर समाज' उदयास येत आहे. त्यामुळे या वैश्विक माहिती समाजात नवे विकास प्रेरक रचनात्मक बदल घडून येत आहेत. जे वृत्तपत्र हे बदल स्वीकारते तेच स्पर्धेत टिकू शकते. पिटर ड्रकर यांनी त्याला व्यवसायाचे नेतृत्त्व करणे म्हटले आहे.[५२]

## ६.१० समारोप

या सर्व चर्चेवरून आधुनिक माहिती तंत्रज्ञानामुळे वृत्तपत्रांच्या रूप स्वरूपात झालेल्या बदलांची मीमांसा करणे सोपे झाले आहे प्रगत वृत.तपत्रांच्या व्यवस्थापन व वितरण तंत्रामध्ये माहिती संवाद संवादतंत्रपूर्व मौलिक बदल झाले आहेत व हे बदल खरोखरच फलदायी ठरले आहेत वर्तमानपत्रांचे व्यवस्थापन प्रगत आणि अद्ययावत करण्याचे सर्वंकष प्रयत्न हे माहिती तंत्रज्ञानामुळे अधिक सुलभ व सुसह्य झाले आहेत. हे या चर्चेचे सार होय.

संज्ञापन आणि व्यवस्थापन ही २१ व्या शतकातील दोन प्रमुख आयुधे आहेत कोणताही प्रगत कवीला त्याशिवाय गतिमान होऊ शकू. नाही खरे तर भावी कालखंडात वृत्तपत्र व्यवस्थापन सुचना प्रणाली विकसित करणाऱ्या प्रयत्न केला पाहिजे. त्यामुळे कार्यालयातील जाहिरात वितरण आणि जनसंपर्क अशा विविध विभागात नवे नवे प्रयोग करता येऊ शकतील शालेय माहिती तंत्रज्ञानावर आधारित नव्या व्यवस्थापन कौशल्यांचा विकास व प्रकार या व्यक्तीत अधिक जाणीवपूर्वक प्रयत्नांची आखणी केली पाहिजे नवी जाहिरात, नवा वाचक तसेच नवी बाजारपेठ या बाबतीत विचारपूर्वक संशोधनाकडे केले असता वृत्तपत्रे अधिक सक्षम होऊ शकतील व्यवस्थापन व वितरण या आयोगाने वृत्तपत्रांचे समीकरण करणे एक माध्यम म्हणून वर्तमानपत्रांनी माहिती तंत्रज्ञानाकडे पाहिले पाहिजे. या दृष्टीने करण्यात आलेल्या गोष्टी दोन दशकातील प्रयत्न हे अधिक फलदायी ठरले आहेत व त्यामुळे वृत्तपत्रांचा चेहरा मोहरा बदलला आहे इंटरनेटमुळे वृत्तपत्रांना दूरवरचा वैश्विक वाचक मिळत आहे तशाच नव्या जाहिरातीही उपलब्ध आहेत. त्यामुळे समर्थ वर्तमानपत्र इतर पत्रापेक्षा पुढे जाते. लोक लोकांच्या आवडीनिवडी तसेच बाजारपेठेतील गरजा लक्षात घेऊन ते आपल्या व्यवस्थापनाची रचना बदलत असते.

व्यवस्थापकाला नव्या जगात केवळ नोकरशाह असून चालत नाही. तर त्याला अनेक नव्या संधी शोधण्यासाठी व्यापक दृष्टिकोन स्वीकारावा लागतो. उद्याचा व्यवस्थापक हा माहिती तंत्रज्ञानाची कवचकुडले घेऊन इतरावर राज्य करत आहे. व तो आपल्या क्षमता मुळे व्य़वस्थापनातील वास्तव लक्षात घेऊन नव्या तंत्राचा वापर करत आहे. सकाळ सारख्या दैनिकात जापानी व्यावसायिक तंत्रे वापरली जात आहेत. टी.क्यू.एम. क्वालीटी

सर्कल सिक्स सिग्मा या सारख्या संकल्पना वृत्तपत्र व्यवसायातही लावल्याजात आहेत. वर्तमानपत्रांकडे कार्पोरेट संस्कृतीच्या दृष्टीने पाहिले जात आहे. तसेच कार्पोरेट उद्योगात घडत असलेल्या नव्या प्रयोगांचे प्रतिबिंब वर्तमानपत्रात उमटत आहे.

ना नफा ना तोटा या सुत्रावर स्वयंसेवी संस्थेसारखी चालणारी वर्तमानपत्रे वर्तमान काळात टिकू शकत नाहीत. त्यांना कार्पोरेट उद्योगाचे तंत्र शिकावे लागत आहे. भविष्यकाळात मागिल अनुभवापासून धडे घेऊन भाषिक वृत्तपत्रानी आपल्या उद्योगाचा दर्जा उंचावण्यासाठी मनुष्यबळ संशोधन विकास यावर भर दिला पाहिजे. १९९० व २००० या नव्या दशकात सर्वच उद्योगात संशोधनाला महत्त्व आले आहे. वृत्तपत्रानी सुध्दा नव्या बाजारपेठा काबीज करण्यासाठी संशोधनावर भर दिला पाहिजे. मुक्त अर्थव्यवस्थेत ज्ञानाधारित उद्योगाला बरेच महत्त्व येत आहे. परंतु १९९० व त्यानंतर आलेला तंत्रज्ञानाचा आलेला प्रभाव आणि २००० नंतर पुढे येत असलेला माहिती रंजनाचा प्रवाह यामुळे माहिती तंत्रज्ञानाकडे पाठ फिरवून स्पर्धेत टिकू शकणार नाहीत. त्यासाठी त्यांना नवे तंत्रज्ञान व नवे व्यवस्थापन कौशल्य आत्मसात करावे लागेल हे या संशोधनाचे सार आहे.

## संदर्भसूची


१. ड्रकर पीटर, द प्रॅक्टीस ऑफ मॅनेजमेंट, एल्सव्हेर इंडिया प्रा. लि.-२००६ पृष्ठ-१७

२. कित्ता, पृष्ठ-६६

३. कित्ता, पृष्ठ-९२

४. सॅम्युअल व सुगंधी, टोटल क्वालीटी मॅनेजमेंट, पृष्ठ-९०

५. ड्रकर पीटर, उपरोक्त, पृष्ठ १५४-१५५

६. अरविंदकुमार ॲण्ड मिनाक्षी, ऑर्गनायझेशनल बिहेविअर, पृष्ठ-४१०

७. कित्ता, पृष्ठ -४८०

८. The changing role of CEO - Horward Buiness review

९. अरविंदकुमार ॲण्ड मिनाक्षी, उपरोक्त, पृष्ठ-४८२

१०. कित्ता, पृष्ठ -४८२

११. डॉ. धारूरकर वि. ल., वृत्तपत्र व्यवस्थापन, य. च. म. मु. वि. नाशिक १९८६ पृ.५

१२. कित्ता, पृ. ६

१३. कित्ता पृ. ७

१४. कित्ता पृ ८

१५. कित्ता पृ ८

१६. डॉ. धारूरकर वि. ल., प्रसारमाध्यमे व माहिती तंत्रज्ञान, चैतन्य प्रकाशन औरंगाबाद २००२, पृष्ठ १२९

१७. कित्ता १२९

१८. कित्ता १२९

१९. सॅम्युअल व सुगंधी, उपरोक्त, पृष्ठ-३४४

२०. कित्ता

२१. बेर्जर ए. ए., मिडिया ॲनालिसिस टेक्निक्स, सेज प्रकाशन लंडन १९८६, पृ. २१

२२. कित्ता

२३. डॉ. धारुरकर वि.ल. प्रसारमाध्यमे व माहिती तंत्रज्ञान पृ. १११

२४ कित्ता पृ १११

२५ कित्ता पृ ११३

२६ कित्ता पृ. ११३

२७ टॉफलर , तिसरी लाट पृष्ठ -३२४

२८. अरविंदकुमार ॲण्ड मिनाक्षी, उपरोक्त, पृष्ठ-४१०

२९. रसाळ रविंद्र, वृत्तपत्र प्रसार व वितरण, नांदेड, पृष्ठ-१२

३०. कित्ता, पृष्ठ-२१

३१. माने दिनकर,

३२. कोटलर फिलीप अण्ड ऑदर्स मार्केटींग मॅनेजमेंट १३ वी आवृत्ती नवी दिल्ली २००२ पृ.१७

३३ कित्ता पृ ८६

३४ कित्ता पृ १८९

३५. सॅम्युअल ॲण्ड सुगंधी, उपरोक्त, पृष्ठ -१७

३६. डॉ. धारूरकर, प्रसारमाध्यमे व माहिती तंत्रज्ञान, उपरोक्त, पृष्ठ १४९

३७. कित्ता पृ. १४८-१४९

३८. एन. राम. द हिंदू १५ ऑगस्ट २००७

३९ कोटलर फिलीप उपरोक्त पृ. १८९

४०. कित्ता पृ. ५१९

४१. ड्रकर पिटर, मेनेजिंग फॉर द फ्युचर, टाटा मॅग्रो हिल, नवी दिल्ली. १९९२ पृ. १७

४२. कित्ता पृ. २१

४३. कित्ता पृ ३०

४४ जोशी उमा मास कम्युनिकेशन ॲण्ड मेडिया, अनमोल प्रकाशन नवी दिल्ली १९९९ पृ. ४९

४५. कित्ता पृ २०७

४६. तळवळकर गोविंद, डाईंग प्रेस इन अमेरिका एशियन एज जुलै २००९

४७. धारुरकर वि.ल. उपरोक्त पृ. १४९

४८. कित्ता

४९. कित्ता

५०. कित्ता

५१. गॉर्डन कम्युनिकेशन आणि मेडीया पृ ५

५२. ड्रकर पिटर, मॅनिजींग फॉर द फ्युचर पृ. ११३

*१. धारूरकर वि. ल., माहिती तंत्रज्ञान व प्रसारमाध्यमे, उपरोक्त, पृष्ठ -१३३-१३४

*२ कित्ता, पृष्ठ-१३६

**प्रकरण ७ वे**

# निष्कर्ष व सूचना

७.१ प्रस्तावना

७.२ प्रकरणनिहाय सारांश

७.३ ठळक निष्कर्ष

७.४ सूचना व शिफारशी

७.५ नवे प्रमेय

७.६ उपसंहार

७.७ समारोप

प्रकरण ७ वे

# निष्कर्ष व सूचना

## ७.१ प्रस्तावना

माहिती तंत्रज्ञान नव्याने बदलत आहे आणि पुढेही त्यात सतत बदल होणार आहेत. डेव्हिड कॅजन्स्की व जॉन ऑर म्हणतात, Now, here's a shocker. The information revolution has only just begun. The changes we've seen during the past ten years are hardly the beginning. We are headed toward an unprecendented change in every aspect of how we communicate, educate, track information, slove medical problems and manage every aspect of life. माहिती तंत्रज्ञानाचा नुकताच उदय झाला आहे. गेल्या दशकातील बदल हे अगदी ताजे बदल आहेत. आपण संवाद कसे करतो, शिक्षण कशाप्रकारे देतो, याबाबत प्रत्येक क्षणी नवे बदल होत आहेत. वैद्यकप्रश्न सोडविण्यापासून नित्य जीवनात प्रत्येक क्षेत्रात माहिती तंत्रज्ञान प्रवेश करीत आहे. त्यामुळे वर्तमानपत्रासारख्या माध्यमाला मानवी जीवनास आकार देण्यासाठी माहिती तंत्रज्ञानावर आधारित प्रगत लोकशिक्षणाचा मार्ग अनुसरावा लागत आहे. मराठी वृतपत्रांनी हे आव्हान कसे पेलवले त्याचा या अंतिम प्रकरणात आढावा घेतला आहे व ठळक निष्कर्ष पुढे मांडले आहेत.

वर्तमानपत्रासारख्या माध्यमास माहिती तंत्रज्ञान हे वरदान ठरले आहे. एकविसाव्या शतकात प्रगत माहिती व संवाद तंत्रज्ञानामुळे नवीनवी प्रसारमाध्यमे जन्माला येत आहेत. तद्वतच त्यांच्या माध्यमातून नव्या गतिमान जगाचे प्रतिबिंब उमटत आहे. प्रा. ब्लू मेंथाल यांनी म्हटले आहे, नव्या प्रसारमाध्यमामुळे जणू प्रत्येक घरातील दिवाणखाना हा माहिती कक्ष व माध्यम दालन बनत आहे. या माध्यम दालनात प्रत्येक नागरिकाला माहिती घेणे, देणे व माहितीचा प्रसार करणे ही मूलभूत कार्ये विचारपर्वूक करावी लागणार आहेत. त्यासाठी प्रत्येक नागरिकास माध्यम साक्षरतेप्रमाणेच संगणक साक्षरतेचीही गरज आहे. प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे पेनलेस व पेपरलेस जर्नालिझम म्हणजे लेखनीविना व कागदाविना वृत्तपत्राचा जन्म अपरिहार्य झाला आहे. सायबर युगातील या नव्या वृत्तपत्राची पूर्वतयारी जणू गेल्या दोन दशकात मराठी वृत्तपत्रे करत आहेत.

प्रगत माहिती व संवाद तंत्रज्ञानामुळे माध्यमांच्या जगात अंतर्बाह्य बदल होत आहेत. तसेच व्यक्तिचे जीवन हे संपूर्णपणे बदलत आहे. नव्या जीवनशैलीवर प्रसार माध्यमांच्या कार्यपध्दतीचा विलक्षण प्रभाव पडलेला आहे. या बदलांचे आकलन करताना प्रस्तुत प्रबंधात सामाजिक पाहणी करण्यात आली. तसेच वृत्तपत्र क्षेत्रातील मान्यवरांच्या विशेष मुलाखती घेऊन त्याआधारे तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले. या पार्श्वभूमीवर प्रत्येक प्रकरणात केलेल्या अभ्यासाचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

## ७.२ ठळक निष्कर्ष

या संशोधनातून पुढे आलेले ठळक निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

१) आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा मराठी वृत्तपत्रावर अंतर्बाह्य परिणाम झाला आहे व या

परिणामामुळे वर्तमानपत्रांचे व्यक्तिमत्व बदलले आहे. मराठी वृत्तपत्रे १९८० पूर्वी लेटरप्रेस व अक्षरजुळणीने छापली जात असत. काही संपन्न वृत्तपत्रेच लायनो, मोनो किंवा रोटरीचा उपयोग करू शकत असत. त्यातही रोटरी मशीन बिघडल्यानंतर त्याच्या दुरुस्तीचे तंत्र अवघड असल्यामुळे वर्तमानपत्रांना त्यासाठी बराच खर्च करावा लागत असे. हायस्पीड रोटरीचे ऑफसेटमध्ये रुपांतर करण्याच्या पद्धतीमध्ये यश न आल्यामुळे मराठवाडा या पत्राचे मुद्रणतंत्र बिघडले व त्याच्या सदोष मुद्रणामुळे हळूहळू या पत्राचा खप कमी होत गेला. केवळ मजकूर चांगला असून चालत नाही तर तो अव्वल दर्जाच्या छपाई यंत्राच्या आधारे प्रकाशित झाला पाहिजे, हे सूत्र लक्षात घेऊन बऱ्याच वर्तमानपत्राद्वारे संगणाकाधारे डीटीपी टंकलेखन व ऑफसेट छपाई या तंत्राचा स्वीकार केला. त्यामुळे वर्तमानपत्रात छायाचित्रांचे व रंगीत छपाईचे प्रमाण वाढले. सध्या १०० टक्के वृत्तपत्रे संगणकाचा उपयोग करून ऑफसेट छपाई करत आहेत. त्यामुळे सुबक, स्वच्छ आणि बहुरंगी छपाई कमी दरात शक्य होत आहे. सुरुवातीच्या काळात संगणक व ऑफसेट मुद्रण याचा खर्च थोडासा जास्त वाटत होता, परंतु आता संगणकाचे दर कमी झाल्यामुळे आणि ऑफसेट छपाई यंत्रे सहज उपलब्ध होत असल्यामुळे वर्तमानपत्राच्या मुद्रण क्षेत्रात क्रांतीकारक बदल झाले आहेत. सुरुवातीला अनिच्छेने स्वीकारलेला हा बदल हळूहळू वर्तमानपत्रांच्या पचनी पडला व तो त्यांनी आता बदल चांगल्याप्रकारे स्वीकारला आहे.

२) माहिती तंत्रज्ञानाचे मुद्रित माध्यमास अनेक लाभ झाले आहेत व त्यातील सर्वाधिक

लाभ वृत्तपत्रांना झाले आहेत. पूर्वीच्या काळात हाताने अक्षरजुळवणी करताना आठ पानांसाठी २० ते ३० माणसे लागत व त्यांच्या कामाची शिफ्ट वारंवार बदलावी लागत असे. परंतु आता चार संगणकाच्या आधारे पाच ते सहा व्यक्ती हे सर्व आठ पानांचे काम करतात. पूर्वी अक्षरजुळवणी करणे, पान लावणे, मुद्रिते तपासणे आणि छपाई सुरू करून ती वेळेत पूर्ण करणे यासाठी भरपूर वेळ लागत असे. तसेच छपाईमध्ये चुकांचे प्रमाण हे अधिक असे, परंतु आता वर्तमानपत्रांच्या जगात झालेल्या मुद्रणविषयक बदलांमुळे छपाईचे काळ, काम, वेगाचे गणीत पूर्णपणे बदलले आहे. अक्षरजुळारी व त्याच्या लहरी यापासून वर्तमानपत्रांची मुक्तता झाली आहे आणि मुद्रणातील दोष संगणकाच्या पडद्यावर तात्काळ दुरुस्त करता येतात. त्यामुळे वर्तमानपत्रांची सुबकता सुधारली आहे. त्यांच्या मांडणी व सजावटीमध्ये बदल झाले आहेत.

३) महाराष्ट्रातील मराठी भाषिक पत्रावर प्रगत माहिती तंत्रज्ञानाने भरीव छाप टाकली आहे. त्यांच्या मांडणी व सजावटीत क्रांतीकारी बदल झाले आहेत. भाषिक वृत्तपत्रांच्या मांडणी व सजावटीमध्ये झपाट्याने बदल झाले आहेत. पेज मेकर, कॉर्क एकस्प्रेस, इन डिझाईन यासारख्या प्रगत सॉफ्टवेअरमुळे पानांची मांडणी करणे तसेच त्यांची रंगीत सजावट करणे यामध्ये ग्राफिक डिझाईन प्रतिकांचा वापर करणे, मथळयांच्या टाईपांचा आकार कमीजास्त करणे या सर्व सुविधा सहजपणे उपलब्ध झाल्या आहेत. पूर्वी वर्तमानपत्रात समांतर आणि विषम मांडणी हे दोनच प्रकार वापरले जात असत. परंतु आता पाच ते सहा प्रकारे विविधांगी व

सुंदर अशी मांडणी केली जात आहे. व्यंगचित्रे व रेखाटनांचा उपयोग वाढला आहे. तसेच पहिल्या पानावर छायाचित्रे व जाहिराती यासुद्धा रंगीत स्वरूपात छापल्या जातात. हे सर्व बदल भाषिक वृत्तपत्रांच्या पथ्यावर पडले आहेत आणि भाषिक पत्रे आपल्या ध्येयधोरणानुसार व ताकदीनुसार आपले स्वरूप झपाट्याने बदलत आहेत. त्यांच्या सौंदर्यपूर्ण अभिव्यक्तीमुळे वर्तमानपत्रांना एक नवे रूप प्राप्त झाले आहे. वर्तमानपत्रांच्या जगातील या सर्व बदलत्या प्रवाहांचे आकलन केले असता भाषिक वृत्तपत्रांच्या नव्या स्वरूपाची कल्पना येते. हे चित्र खरोखरच स्वागतार्ह असे आहे. त्यामुळे भाषिक वृत्तपत्रांना एक नवी उभारी प्राप्त झाली आहे व ही पत्रे परिपूर्ण मांडणी व सजावटीच्या दृष्टीने नवे व्यक्तिमत्व धारण करत आहे.

४) १९८५ ते २००५ या दशकातील बदलांचा साक्षेपी अभ्यास केला असता असे दिसते की, राजीव गांधी युगात माहिती तंत्रज्ञानाच्या स्वीकारास प्रारंभ झाला व पुढे त्यास प्रगत रुप प्राप्त झाले. सबंध देशात आणि महाराष्ट्रातसुद्धा राजीव गांधी युगात संगणक क्षेत्रात मोठी झेप घेण्यात आली. खास करून डॉ. विजय भटकर यांनी पुणे येथे सी-डॅक ही संस्था स्थापन केली व तेथे त्यांनी परम संगणक विकसित केला. त्यामुळे पुणे हे शहर भारतामधील काही मोजक्या आयटी सीटीमध्ये गणले जाते. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात पुण्याने घेतलेली झेप ही सर्व क्षेत्रात पुण्याला अग्रेसर करणारी ठरली. त्याचप्रमाणे वृत्तपत्र क्षेत्रात सुद्धा मराठी वृत्तपत्राने प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा पुण्यामध्ये स्वीकार केला. केसरी या वृत्तपत्राने

हिंदू नंतर भारतीय भाषेत प्रथमच उपग्रह आवृत्ती प्रकाशित करण्यास प्रारंभ केला. अनेक मराठी वृत्तपत्रांनी आपल्या वेब आवृत्त्या सुरू केल्या. मुंबईमध्ये टाइम्स, एक्सप्रेस व प्रीप्रेस या तीनही समुहातील इंग्रजी तसेच भारतीय भाषेतील वर्तमानपत्रांनी सुद्धा माहिती तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्यामुळे वृत्तपत्र क्षेत्रात महत्त्वाचे बदल घडून आले. टाइम्स समूहात कर्मचाऱ्यांनी संगणकाचा स्वीकार करण्यास प्रथम विरोध केला, परंतु टाइम्स समूहाने कणखर भूमिका घेऊन हा विरोध हाणून पाडला. त्यानंतर इतरही वृत्तपत्र समूहांना संगणकाच्या स्वीकारामुळे होणारे फायदे लक्षात आले व त्यांनी सुद्धा संगणक तसेच ऑफसेट मुद्रण या दोनही तंत्रांचा स्वीकार केल्यामुळे लोकसत्ता, नवाकाळ, नवशक्ती, मटापासून ते वार्ताहर, पुण्यनगरी, शिवनेर इत्यादी छोट्या वृत्तपत्रापर्यंत अनेक वृत्तपत्रांनी प्रगत मुद्रण तंत्रज्ञानाचा स्वीकार महाराष्ट्राचे भूषण असलेल्या मुंबई व पुणे या महानगरांनी माहिती तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्यामुळे नगर, नाशिक, औरंगाबाद, नागपूर या शहरातूनही माहिती तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यात आला. लोकमत वृत्तपत्रांने १९८२ साली औरंगाबादेतून माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून प्रगत मुद्रण तंत्रज्ञानाने आपले वृत्तपत्र प्रकाशित केले. त्यानंतर जळगाव, अमरावती, अकोला या शहरातूनही माहिती तंत्रज्ञानावर आधारलेली वर्तमनपत्रे प्रकाशित होऊ लागली. पुढे खानदेश, कोकण, दक्षीण महाराष्ट्र या भागातही वर्तमानपत्रांनीही प्रगत माहिती तंत्रज्ञान स्वीकारले. राजीव गांधी यांचा काळ अशा प्रकारे प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा प्रसाराचा व स्वीकारचा काळ म्हटला पाहिजे.

५)	समकालीन मराठी पत्रकारितेमधील बदलते प्रवाहांचा शोध घेता असे दिसते की, वर्तमानपत्रे अधिक परिपूर्ण होत आहेत व ती राष्ट्रीय व जागतिक पत्राशी स्पर्धा करत आहेत. अमेरिकेच्या सिरॅकस विद्यापीठातील प्रा. एडमंड अरनॉल्ड यांनी परिपूर्ण वर्तमानपत्राची सजावट कशी करावी याबाबत प्रथम संशोधन केले. त्यांच्या संशोधनाचा फायदा जगभरातील इंग्रजी वृत्तपत्रांना झाला. त्यानंतर इंग्रजी वृत्तपत्रातून मांडणी व सजावटीचे नवे वारे भाषिक वृत्तपत्रांमध्ये सुद्धा संचारले. वर्तमानपत्राचे खरे चैतन्य केवळ मजकुरामध्ये नसते. शुद्ध मजकुराबरोबरच आकर्षक मांडणी आणि प्रभावी सजावट असेल तर वाचक वर्तमानपत्र सहजपणे उचलून घेतात आणि सुबक मुद्रण आणि नव्या मांडणी तंत्रामुळे वाचकाला वर्तमानपत्र हवेहवेसे वाटते. त्यातील रिकामी जागा आणि रंगीत छपाई तसेच व्यंगचित्रे व रेखाटने यामुळे मजकूर अधिक भरगच्च होतो. शिवाय रंगीत चित्रवाणी संचामुळे वाचकांना रंगीत पाहण्याची जी सवय लागलेली असते तिही रंगीत छपाईमुळे पूर्ण होते. अशाप्रकारे माहिती तंत्रज्ञानामुळे मांडणी व सजावटीत बदल झाले आहेत.

६)	निर्मिती, व्यवस्थापन, वितरण या तिनही क्षेत्रात प्रगत माहिती तंत्रज्ञानाने वर्तमानपत्रांना नवी दिशा दिली आहे व त्यामुळे त्यांचे चित्र संपूर्णपणे पालटले आहे. पूर्वी वर्तमानपत्राच्या निर्मितीसाठी मानवी श्रमावर म्हणजे अक्षरजुळणीवर अवलंबून रहावे लागत असे. संगणकामुळे चार व्यक्तींचे काम एक व्यक्ती करू लागली आणि अक्षरांची स्पष्टता व सुबकता वाढली. पूर्वीच्या तंत्रात अक्षरे तुटणे, खुडणे, ती झीज होईपर्यंत चालल्यामुळे अवाचनीय होणे असे अनेक दोष होते. संगणकाच्या

प्रवेशामुळे हे सर्व दोष दूर झाले आणि अल्पावधित वर्तमानपत्रे अधिक चांगल्याप्रकारे निर्माण होऊ शकली. सुबकता आणि बाह्यांग या झालेल्या नव्या प्रयोगामुळे वृत्तपत्रांची निर्मिती प्रक्रिया सुधारली. तसेच अलिकडे आधुनिक वृत्तपत्राकडे एक उत्पादन म्हणून पाहिले जात आहे. वृत्तपत्र व्यवसायात गुणवत्ता चक्राने प्रवेश केला आहे. उत्पादनाच्या प्रत्येक टप्प्यावर शुद्ध गुणवत्ता कशी टिकवावी याचा विचार होत आहे. शिवाय पूर्वीच्या पेक्षाही आता जाहिरात, हिशोब व वितरण यापेक्षाही मनुष्यबळ विकास आणि संशोधन तसेच जनसंपर्क या तीन विभागांची भर पडली आहे. सकाळसारखे वर्तमानपत्र पूर्णपणे नव्या मनुष्यबळ विकास तंत्रावर भर देत आहे. त्यातील गार्सिया मांडणी तंत्रामुळे सकाळच्या सादरीकरणात बदल झाला आहे. बाजारपेठ संशोधन, वाचक सर्वेक्षण, आशयविश्लेषण यासारख्या तंत्रामुळे वृत्तपत्र क्षेत्रात संशोधनाला महत्त्व आले आहे. तसेच विविध प्रकारच्या वितरणाच्या योजना आखून वाचकाला आकृष्ट करण्यासाठी नवनवे व्यवस्थापकीय प्रयोग केले जात आहेत. आधुनिक वर्तमानपत्राचे खरे यश माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरात आहे. तसेच संगणकाच्या पडद्यावर आजच्या अंकाची प्रिंट ऑर्डर किती व अंकाचे किती गठ्ठे बांधण्यात आले व कुठे पोहचविण्यात आले या सर्वांची नोंद केली जाते. त्यामुळे निर्मिती, सजावट, वितरण तसेच जाहिरात या सर्व क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानामुळे दमदार पाऊल पडले आहे.

७. नवीन माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोजनातील माहितीचे महाजाल इंटरनेट वर्तमानपत्रांना वरदान ठरले आहे. पूर्वी ताज्या बातमीसाठी फक्त वृत्तवाहिन्या पीटीआय, युएनआय

या वृत्तसंस्थावर अवलंबून राहावे लागत असे. आता मात्र जगातील विविध वृत्तपत्रांची संकेतस्थळे चित्रवाणी वृत्तवाहिन्या तसेच नभोवाणी व दूरदर्शनच्या संकेत स्थळावरून विविध प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रांना सहजपणे मिळतात. इंटरनेटवरून छायाचित्रे , रेखाटने, नकाशे या बाबीही उपलब्ध होतात. शिवाय पान भरण्यासाठी लागणारी मनोरंजक अशी सामुग्री, लेख, साहित्य, पानपुरके, विनोद, राशिभविष्य, दिनविशेष ही माहिती इंटरनेटवरून उपलब्ध होत आहे. त्यामुळे वर्तमानपत्रांच्या या सर्व उपलब्धतेचा विचार करता माहितीचे महाजाल इंटरनेट हे केवळ वेब वृत्तपत्राच्या प्रकाशनासाठीच नव्हे तर रोजच्या वर्तमानपत्रांच्या निर्मितीसाठी सुद्धा एक वरदान ठरले आहे.

## ७.३ सूचना व शिफारशी

या संशोधनातून पुढे आलेल्या ठळक शिफारशी खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. प्रत्येक वृत्तपत्राने आपल्या उपसंपादक, वार्ताहर यांना आपल्या कार्यसंस्कृतीनुसार पोषक अशी प्रशिक्षण योजना तयार केली पाहिजे व ती योजना एखाद्या सल्ला समुहामार्फत आपल्या वृत्तपत्रात राबवली पाहिजे.

२. वर्तमानपत्रात आता नव्या विशेषीकरण युगाचा प्रारंभ झाला आहे. उर्जा, पाणी, दळणवळण यासारख्या वार्ता देतांना संगणकाचा कसा उपयोग करावा याबाबत अद्ययावत प्रशिक्षणाची गरज आहे. हे प्रशिक्षण तात्विक व तांत्रिक या दोन्ही स्वरूपाचे असले पाहिजे.

३. वर्तमानपत्रात मांडणी व सजावट हे एक नवे आव्हान आहे. त्यासाठी परदेशातील संशोधकांनी जे नवे प्रयोग केले आहेत ते भाषिक पत्रांना समजून देण्यासाठी विशेष कार्यशाळा आखल्या पाहिजेत. सकाळ व लोकमत या पत्रांनी याबबात केलेले प्रयोग लक्षणीय आहेत.

४. वर्तमानपत्रांच्या विक्रीचे खरे मर्म वितरणातील पोहोच व उपलब्धतेत असते. अंकाची निर्मिती अव्वल दर्जाची झाल्यानंतर तो तत्काळ वाचकांच्या हाती पडला पाहिजे यासंदर्भात संगणकावर आधारित नवी वितरण प्रणाली समोर येत आहे. त्याचा अनुसर वर्तमानपत्रांनी केला पाहिजे.

५. जाहिरात, जनसंपर्क आणि मनुष्यबळ विकास तसेच वर्तमानपत्रासाठी लागणारे संशोधन याबाबत आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून नव्या संशोधन प्रणालीचा अवलंब केला पाहिजे. त्यासाठी प्रत्येक वर्तमानपत्रात मनुष्यबळ व संशोधन विभाग असे स्थापन केले पाहिजेत.

६. अमेरिकेतील व्यावसायिक वृत्तपत्रे व्यवस्थापन शास्त्राचा वापर करत आहेत. कार्याची विभागणी व वाटणी याबाबतीत एमबीए तज्ज्ञ वर्तमानपत्रात कंटेट मॅनेजमेंट करत आहेत. आता ई-कंटेंट उपलब्ध होत आहे परंतु त्याची मांडणी व सजावट करताना नियोजनाची गरज आहे. असे नियोजन संकणकावरील ग्राफिक तंत्रामुळे सुलभ होत आहे. त्यासाठी योग्य प्रशिक्षणाची गरज आहे.

७. भाषिक वर्तमानपत्रांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात रोज होणाऱ्या बदलाबाबत जर्मनीत द्रुपा येथे दरवर्षी मुद्रण परिषद आयोजित केली जाते. मुद्रण क्षेत्रातील नवे वारे

काही दिवसांतच जगभर पसरते. वर्तमानपत्रांना पुरक अशा या नव्या शोधांची माहिती देऊन त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी भारतातील आयएनएस तसेच इलना या संघटनांनी पुढाकर घेऊन भाषिक वृत्तपत्रांसाठी प्रशिक्षण वर्ग आखले पाहिजेत.

या सर्व सूचनांचा सार असा सांगता येईल की, वर्तमानपत्र हा ज्ञानाधारित उद्योग आहे आणि तो आता संपूर्णपणे माहिती तंत्रज्ञानावर आधारलेला आहे. आधुनिक माहिती तंत्रज्ञानात रोज होणाऱ्या नव्या बदलांना आणि शोधांना सामारे जाऊन वर्तमानपत्रांनी आपले कार्य अधिक अद्ययावत आणि अधिक गतीमान करण्यावर भर दिला पाहिजे.

## ७.४ नवे प्रमेय : सैद्धांतिक मांडणी

गृहितकृत्यांची पडताळणी करून पुढे आलेली सूत्रे म्हणजे नवी सैद्धांतिक मांडणी असते. या अभ्यासामध्ये ३०० पत्रकारांची पाहणी करून प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वृत्तपत्रावर पडलेला प्रभाव काळजीपूर्वक अभ्यासण्यात आला. प्रामुख्याने राजीव गांधी युगात महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रांवर माहिती तंत्रज्ञानाचा जो प्रभाव पडला तो या अभ्यासाचा केंद्रबिंदू होता.

एक व्यवसाय म्हणून पत्रकारिता व वर्तमानपत्र संस्था, तिचे स्पर्धेत टिकूण राहणे व विकास हे माहितीच्या तज्ज्ञ व्यवस्थापनावर अवलंबून असते. प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून माहिती प्रसारणाचा वेग आणि दर्जा (अद्ययावतता) वृत्तपत्रे वाढवीत आहेत. त्यामुळे वृत्तपत्रसंस्थेची आर्थिक परिस्थिती व क्षमता वाढली आहे. माहितीची मांडणी, त्यातील अद्यायावत ज्ञान, विषयांची व्याप्ती, घटना, संकल्पना व मार्गदर्शन या क्षेत्रात क्रांती होऊन वर्तमानसंस्था अधिक शास्त्रीय, अत्याधुनिक, तांत्रिक गुंतागुंतीची व प्रभावी

वेगवान शैली स्वीकारून एक व्यवसाय म्हणून चालवली जाते. एकविसाव्या शतकात आधुनिक तंत्रज्ञान, समाजकारण, अर्थकारण, राजकारण व मनोरंजन या क्षेत्रात नवीन माहितीतंत्र, संस्कृती निर्माण झाली आहे. हे माहितीचे संक्रमण पृथ्वीवरील व बाहेरच्या विश्वातील घडामोडींवर नवीन प्रकाश टाकून ज्ञानाची नवीन दालने उघडून दाखवीत आहे. प्रसार माध्यमावर दूरगामी परिणाम करून वृत्तपत्रसंस्था आणि पत्रकारिता यातील व्यावसायिक यश वाढवीत आहे. पंतप्रधान राजीव गांधींच्या कारकिर्दीत राजीव गांधी युगात वृत्तपत्रांनी प्रगत तंत्रज्ञानाचा स्वीकार केला व त्यासंबंधी अनुकूल अशी जागृती सामाजिक व आर्थिक क्षेत्रात निर्माण केली. ही नवी व्यावसायिक जाणीव वर्तमानपत्र संस्थांच्या वेगवान व वैशिष्ट्यपूर्ण विकासाचे महत्त्वाचे कारण आहे. हा नवीन पायंडा वर्तमानपत्राच्या आणि पत्रकारितेच्या भविष्यकालीन विकासाचा पाया आहे.

माहिती संवाद तंत्रज्ञान घरोघरी पोहचले आहे. जागतिक बँकेच्या २००२ च्या विकास अहवालात त्याच्या शिर्षकात म्हटले होते, नव्या जगात बाजारपेठासाठी संसींची उभारणी केली जात आहे. बाजारपेठचलीत प्रसार माध्यमांचे नवे रूप या माहिती संज्ञापन तंत्राच्या गतिशास्राचे एके व्यावच्छेदक लक्षण होय. नव्या तंत्राचे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक संदर्भ समजावून घेतले तरच या माध्यमांचे गतिशास्त्र समजू शकते. नवे माहिती संज्ञापन तंत्रज्ञान प्रसारमाध्यमांना नवी संजीवनी देत आहे. त्यांच्या गतीवर्धनाशी ते पूरक कार्य करत आहे.

१. प्रगत माहिती संज्ञापन तंत्र माध्यमांना नवी दिशा देत आहे. त्यामुळे माहिती रंजनाची गती वाढली आहे. नवे तंत्र रोज नवे रुप धारण करत आहे. तशी प्रसार

माध्यमांची माहिती ज्ञान व रंजन प्रसाराची क्षमताही वाढते आहे. वर्तमानपत्रे या नव्या युगात प्रबोधनापेक्षा माहिती रंजनावर अधिक भर देत आहेत. आपल्या वाचकाला अद्ययावत करणारी माहिती अधिक चांगल्या प्रकारे सादर करण्याकडे वर्तमानपत्रांचा कल आहे.

२. नवे संज्ञापन तंत्र वाचक, श्रोता व प्रेक्षकांना माहितीपर अथवा रंजन या प्रबोधनपर कार्यक्रमात अधिक सहभागी करून घेत आहेत. त्यामुळे प्रतिसाद व प्रत्याभरणाचा वेग वाढला आहे. वर्तमानपत्राचे संपादक आपल्या लेखनाला मिळणारा प्रतिसाद ई-मेलद्वारा मिळवत आहेत. पूर्वी वाचकांची पत्रे संपादकापर्यंत पोहोचायला व ती छापून यायला बराच वेळ लागत असे. आता हे तंत्र अधिक सुलभ झाले आहे.

३. नवे तंत्र वाचक, प्रेक्षक वा श्रोत्यांना माध्यमांशी गतीने जोडत आहे. या ज्ञानप्रसारक व रंजनक्षमतेबरोबर प्रत्येक माध्यम व वाहिन्यातील अंतर्गत स्पर्धा ही वाढत आहे. वाढत्या स्पर्धेबरोबर दैनिकाचा आशय व वाहिन्यांचे कार्यक्रम हे लोकप्रियतेच्या कसोटीवर उतरत आहेत. वर्तमानपत्रातील गुणात्मक स्पर्धेमुळे त्यांचा दर्जाही उंचावत आहे. प्रत्येक वृत्तपत्र आपल्या वाचकाला अधिकाधिक समाधान देण्याचा प्रयत्न करत आहे.

४. आधुनिक माहिती तंत्रज्ञानामुळे वर्तमानपत्रे इंटरनेटवर उपलब्ध होत आहेत. तसेच दृकश्राव्य साधनांचे मनोरंजनपर कार्यक्रम हे सुद्धा प्रेक्षकांना वेबआवृत्तीवर उपलब्ध होत आहेत. त्यामुळे माध्यमांचे हे संक्रमण मुद्रित व दृकश्राव्य माध्यमातील फरक हळूहळू पुसट करत आहेत.

५. जगाच्या पाठीवर वर्तमानपत्राचा वाचक कुठेही पोहोचला तरी त्याचे स्थानिक जीवनाशी असेलेले नाते कायम असून, त्यामुळे त्याला आपल्या प्रदेशात कोणत्या हालचाली चालू आहेत याचे भान राहते व त्या आधारे तो नव्या जगाकडे अधिक विश्वासाने पाहू शकतो.

६. मांडणी, सजावट तसेच निर्मिती, व्यवस्थापन व वितरण या क्षेत्रात होत असलेले बदल वर्तमानपत्रांच्या पथ्यावर पडले आहेत. आधुनिक वृत्तपत्रे माहिती तंत्रज्ञानावर आधारित बाजारपेठ काबीज करण्यासाठी आधारित व्युहरचनेद्वारे संशोधन करत आहेत. हे संशोधन नवा वाचक शोधण्यासाठी नवी बाजारपेठ मिळवण्यासाठी उपयोगी पडत आहे. तसेच २१ व्या शतकात नवनव्या जनसंपर्क मोहीमा आखून वर्तमानपत्रे आपले उत्पादन वाचकांपर्यंत पोहचवित आहेत. त्यांच्या मनुष्यबळ विकास विभागामुळे कर्मचाऱ्यांना अधिक चांगले प्रशिक्षण मिळत आहे.

७. वर्तमानपत्र व्यवसायात यंत्रापेक्षा माणसे मोठी असतात आणि या माणसांना जर यथायोग्य प्रशिक्षण दिले तर ही माणसे आपल्या व्यक्तीमत्त्वात बदल करून गुणवत्ता धारण करतात आणि स्पर्धेच्या युगात अग्रेसर राहू शकतात.

या सातही सूत्रांचे सार सांगतांना असे म्हणतात येतील की, माध्यम प्रसाराचे परिघ विस्तारले, माहितीचा वेग वाढला तद्वतच नव्या माध्यमांचा उदय व विकास झाला. अंतराचा नाश हे नव्या संवादाचे खरे मर्म होय. लोकल एरिया नेटवर्क ही पद्धती स्थानिक संगणक जोडणीवर भर देते. महानगरातील दूरचे प्रदेश व स्थळे व कार्यालये मेट्रो एरिया नेटवर्कने जोडली जातात तर आता इंटरनेटद्वारे निमिषार्धात जगाच्या एका ठिकाणाहून

दुसऱ्या ठिकाणी संदेश पाठविता येणे शक्य झाले आहे. इंटरनेटद्वो ई-मेल करून वार्ता, ध्वनी आणि चित्रांचेही प्रसारण करता येणे शक्य झाले आहे. इंटरनेटची महती सांगाताना म्हटले आहे की इंटरनेटमुळे प्रत्येक जण संपादक व प्रकाशक होऊ शकतो. वेब रेडिओ व वेब टीव्ही तसेच वेब वृत्तपत्रामुळे प्रसार माध्यमांचे क्षितीज नित्य नव्या गतीने विस्तारत आहे. इंटरनेटची मालकी व प्रशासन ही बाब वैश्विक स्वप्नाची असून विविध सर्व इंजिनद्वारे त्यावरील नोंदी आणि माहितीचे अचूक ज्ञान होऊ शकते. इंटरनेट हे माहितीचे महाजाल मानवी विकास आणि कल्याणासाठी वापरले गेले पाहिजे. त्यातील नैतिक तत्त्वे व आचारसंहिता याबाबत युनोस्कोसारख्या संघटना विचारपूर्वक पावले टाकत आहेत. भाषिक वृत्तपत्राने सुद्धा इंटरनेटचा वापर करताना कॉपीराईट तसेच साबर कायदेकानुन आणि महिलांचा जाहिरातीतील वापर इत्यादी बाबतीत अधिक काळजीपूर्वक पावले टाकली पाहिजेत. कारण प्रगत माहिती तंत्रज्ञान हे एक वरदान आहे. परंतु त्याचा दुरुपयोग होता कामा नये यासाठीही भाषिक वृत्तपत्रांना सावध करण्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे.

## ७.५ उपसंहार

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाने मानवी जीवनाचा कायापालट केला आहे. कृषीक्रांती, औद्योगिक क्रांती यापेक्षाही माहिती क्रांतीला मानवाच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाचे स्थान आहे. या अनुषंगाने आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रांवर झालेला परिणाम १९८५ ते २००५ या प्रबंधात अभ्यासण्यात आला. या आधारे असे लक्षात आले की, राजीव गांधी युगात वृत्तपत्रांची मानसिकता बदलली, त्यांनी पारंपरिक दृष्टीकोन सोडून दिला आणि आधुनिक प्रगतीशिल दृष्टीकोन स्वीकारला. माहिती तंत्रज्ञानामुळे घर, कार्यालय,

उद्योग, व्यवसाय अशा सर्वच क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाने अमुलाग्र बदल घडवून आणले. बौद्धिक प्रतिभेवर आधारलेल्या वृत्तपत्रासारख्या व्यवसायात तर माहिती तंत्रज्ञानाने काळ, काम, वेगाचे गणित संपूर्णपणे बदलून टाकले. माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोजनापूर्वी मराठी वृत्तपत्रे काढणे व टिकविणे व चालविणे हे जिकिरीचे काम होते. कारण ४० अक्षर जुळारी ८ ते १० पानाचे वृत्तपत्र काढण्यासाठी लागत असत. शिवाय टंकांमध्ये वारंवार बदल करावा लागत असे. मजकूर तयार करणे, त्यांचे संपादन, मांडणी, सजावट यासाठी ब्लॉक तंत्र वापरले जात असे. छायाचित्रेही अगदी कमी प्रमाणात दिली जात असत. मजकूरात बऱ्याचवेळा मुद्रणदोष राहत असत. त्यामुळे वाचकांना ज्ञानाचे आकलन म्हणावे तसे होत नसे. या पार्श्वभूमीवर मराठी वृत्तपत्रांचे तत्कालिन सनातनी रूप बदलून मराठी वृत्तपत्राला नवा चेहरा प्रदान करण्याचे काम प्रगत माहिती तंत्रज्ञानाने केले आहे. न्यूयॉर्क टाइम्सचे संपादक ओनील यांच्या मते, संक्षेप आकृतीबंध विरोध आणि भूमिगतता ही नवपत्रकारितेची तीन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. तथापि ही तिनही वैशिष्ट्ये माहिती तंत्रज्ञानाच्या कल्पकतेवर आधारलेली आहेत हे लक्षात येते. तंत्रज्ञानाचे समाजिकरण झाल्यामुळे हे तंत्रज्ञान ग्रामीण भागापर्यंत पोहचले आहे.

ग्रामीण संपर्कसेवेमध्ये माहिती तंत्रज्ञानामुळे क्रांती झाली. जीवनाचे प्राध्यान्यक्रम बदलले, त्याचा लाभ प्रादेशिक व जिल्हा वृत्तपत्रांना सुद्धा होत आहे. इंटरनेट युगातील वेब पत्रकारितेचे नवे प्रवाह लक्षात घेता असे दिसते की, नव्या जगात वृत्तपत्रांनी प्रगत तंत्रज्ञान स्वीकारल्यामुळे त्यांच्या रचना व कार्यपद्धतीत अमुलाग्र बदल झाले आहेत. वृत्तपत्र हे विश्वग्रामातील नवे प्रतिभाशाली ज्ञानमाध्यम बनले आहे. नवीन माहिती संस्कृतीमुळे

संगणकाधारीत वृत्तपत्र मांडणी अधिक आकर्षक बनली आहे. पहिल्या पानाचे व्यक्तिमत्वपूर्णपणे बदलले आहे. आतील पानाची मांडणी नवे रूप धारण करत आहे. तसेच वृत्तपत्राच्या व्यवस्थापनात सुद्धा बदल होऊन एक गतीमान व्यवसाय असे परिपूर्ण वृत्तपत्र व्यवसायाचे स्वरूप पुढे येत आहे. भावी काळात मराठी वृत्तपत्रांनी अधिक गुणात्मक दर्जा गाठण्यासाठी प्रगत माहिती तंत्रज्ञानाच्या संवर्धनासाठी प्रशिक्षणाचा मार्ग अनुसरला पाहिजे. तसेच अंतर्बाह्य बदलांना सामोरे जाऊन ज्ञानयुगात स्पर्धेमध्ये टिकून राहण्याची क्षमता वाढवली पाहिजे. राजीव गांधी युगात वृत्तपत्र व्यवसायात झालेल्या तांत्रिक बदलामुळे महाराष्ट्रातील वृत्तपत्रांचे रूप-स्वरूप संपूर्णपणे बदलले व ही सनातनी वृत्तपत्रे प्रगत आणि अत्याधुनिक रूप धारण करून कार्य करू लागली. हे या अभ्यासाचे सार होय.

## ७.६ समारोप

अशाप्रकारे या प्रबंधात आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा महाराष्ट्रातील वृत्तपत्रावर झालेला परिणाम चिकित्सकपणे अभ्यासण्यात आला आहे. हा अभ्यास १९८५ ते २००५ या वीस वर्षांतील बदलत्या प्रवाहांची नोंद घेणारा राजीव गांधी यांच्या कालखंडातील भारतीय लोकजीवनावर संगणक व माहिती तंत्रज्ञानाचा जो प्रभाव पडला तो अपरिहार्यपणे वृत्तपत्र व्यवसायावर सुद्धा पडला. त्यामुळे तीन गोष्टी घडून आल्या. पहिली बाब म्हणजे वर्तमानपत्रांची निर्मिती व मुद्रणाची पारंपरिक व सनातनी पद्धती बदलून गेली. दुसरी बाब म्हणजे वर्तमानपत्रांच्या मांडणी व सजावट क्षेत्रात अनेकनवे कल्पक प्रयोग समोर आले. त्यामुळे वर्तमानपत्रांचा चेहरामोहरा बदलून गेला आणि तिसरी बाब म्हणजे वर्तमानपत्रांच्या निर्मिती, व्यवस्थापन व वितरण क्षेत्रात अनेक क्रांतीकारी बदल झाले. माहिती तंत्रज्ञानावर आधारित

संशोधन, जनसंपर्क आणि मनुष्यबळ विकास या तीन बाबींवर अधिक भर देण्यात येऊ लागला.

माहिती तंत्रज्ञानाच्या परिणामामुळे भाषिक वृत्तपत्रे संख्यात्मक व गुणात्मक या दोन्ही दृष्टीन बदलून गेली. त्यांच्या व्यक्तीमत्त्वात अंतर्बाह्य बदल घडून आले. भाषिक वृत्तपत्रे मांडणी, सजावट आणि आशय या तीन्ही दृष्टीने विचार करता नव्या व्यवस्थापन तंत्राचा वापर करू लागली. प्रगत माहिती तंत्रज्ञानास नवीन व्यवस्थापन शास्त्राची जोड मिळाल्यामुळे बाजारपेठप्रधान प्रसारमाध्यमांत वर्तमानपत्र हे एक उत्पादन बनले आणि हे उत्पादन अधिकाधिक प्रमाणात वाचकांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू लागले. माहिती तंत्रज्ञानामुळे भाषिक वर्तमानपत्रांना जे लाभ झाले त्यामुळे वर्तमानपत्रांची प्रयोगक्षमता, कल्पकता आणि सुनियोजित कार्य करण्याची व्यवस्थापन क्षमता यात लक्षणीय सुधारणा घडून आल्या. मुंबईच्या लोकसत्ता, मटापासून ते लातूरच्या यशवंत, राजधर्मपर्यंत आणि बीडच्या झुंजारनेता, चंपावतीपत्रापर्यंत तसेच नांदेडच्या गोदातीर व प्रजावाणीपर्यंत वर्तमानपत्रांचे रूपस्वरूप प्रगत माहिती तंत्रज्ञानामुळे संपूर्णपणे पालटले आहे. राजीव गांधी यांच्या कालखंडात प्रारंभ झालेल्या या तांत्रिक क्रांतीने प्रसारमाध्यमांना नवे रूप दिले. तसेच त्यांना जागतिक पातळीवरील नव्या प्रयोगांना सामोरे जाण्याची क्षमताही दिली. हे या संशोधनाचे सार होय.

# परिशिष्ट

## संदर्भ ग्रंथसूची


१. कॅजन्स्की डेव्हिड ओर जॉन, इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजी, प्रेंटिस हॉल, २००१

२. लेले रा.के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २००४

३. लर्नर डॅनियल, पासिंग ऑफ ट्रॅडिशनल सोसायटी,

४. लिंट जॉन ए., एशियन न्यू जपेचर्म, अ रिलव्हंट रेव्होल्यूशन,

५. धारूरकर वि.ल., माहिती तंत्रज्ञान व प्रसार माध्यमे, चैतन्य प्रकाशन, २००७

६. विल्यम फ्रॅड्रिक टेक्नॉलॉजीज ऑफ फ्रिडम

७ योजना, माहिती तंत्रज्ञान विशेषाक-२६ जानेवारी २०००

८ कुलकर्णी एम. जी., मराठी वृत्तपत्रांतील भूपत्रकारिता, अप्रकाशित प्रबंध, य. च. म. मु. वि. नाशिक.

९ ब्ल्यूमेंथाल, मेडिया रुम

१० केसरी अग्रलेख, दि. ११ फेब्रुवारी १९०२

११. समग्र केळकर वाङ्मय, खंड २, पुणे, १९२८

१२. सकाळ अग्रलेख, १ जानेवारी १९३२

१३. फडके य.दि., संयुक्त महाराष्ट्र चळवळ, अप्रकाशित प्रबंध

१४. धारूरकर वि.ल., मराठी वृत्तपत्रसृष्टीत भारतीय वृत्तपत्रे, पुढारी प्रकाशन, कोल्हापूर, १९८०

१५. गॉर्डन, कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी ॲण्ड मिडीया

१६. शारदा प्रसाद एच.वाय., एडीटर्स ऑन एडिटिंग, एनबीटी, नवी दिल्ली. १९९३

१७. ठाकूर किरण, इंटरनेट पत्रकारिता, पुणे

१८. इंफिनेट लायब्ररी स्पॅन

१९. मुळे गणेश, मराठी वृत्तपत्रातील इंटरनेट संज्ञापन, धुळे, २००२,

२०. ठाकूर किरण, इंटरनेट पत्रकारिता हा लेख

२१. धारूरकर वि.ल., आजकालची पत्रकारिता, रामराज्य प्रकाशन, १९८५

२२. टॉफलर ऑल्विन, थर्ड वेव्ह

२३. रॉजर्स एव्हर्ट व इतर, इंडिया फेसिंग इन्फॉर्मेशन रेव्होल्यूशन, सेज प्रकाशन, लंडन, १९९६

२४. मेनिफेनन सिरीका, कॉमन कम्युनिकेशन करीकुलम, युनेस्को, पॅरिस, १९८०

२५. कॉर्निकोह, डेथ ऑफ डिस्टंस

२६. राम.एन., प्रेस इन इंडिया ॲण्ड वेस्ट, द हिंदू, १५ ऑगस्ट २००७

२७. तळवळकर गोविंद, डाईंग, यू.एस. प्रेस, एशियन एज

२८. हालबर्स्टन डेव्हीड, ब्रेकिंग न्यूज, आर्किटेक्चरल प्रेस, २००७

२९. आमसतसू सुशी, अंडरस्टँडींग जर्नालिझम, केंब्रिज प्रेस, २००७

३० एन. राम, इंडियन प्रेस, द हिंदू, १५ ऑगस्ट २००८

३१. गोल्डस्टीन टॉम, जर्नालिझम ॲण्ड ट्रूथ, नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटी, २००७

३२. थॉम लिब, ऑल अबाऊट न्यूज, ॲलन बेकीन, २००९

३३. डेव्हिड शॉन, जेन वर्लस्टन, मिडीया बायस मॅकफारलँड, कंप. २००७

३४ पियर्सन कर्ल, द ग्रामर ऑफ सायन्स, जे ॲण्ड सी ब्लॅक, लंडन १९११,आवृत्ती तिसरी

३५ भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, आवृत्ती तिसरी, १९८७

३६ वेबस्टर शब्दकोश.

३७ डॉ. संत दु.का., संशोधन पध्दती, प्रक्रिया, अंतरंग

३८ इनसायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेस, मॅकमिलन बुक कं., न्यूयॉर्क, १९४४

३९ ब्रूस एच. वेस्टले, सिस्टेमेटीक स्टडी ऑफ मास कम्युनिकेशन

४०	ॲकॉफ आर. एस, द डिझाईन ऑफ सोशल रीसर्च; युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो प्रसे; शिकागो लंडन १९५३

४१.	बॉण्ड फ्रेजर, एन इट्रोडक्शन टू जर्नालिझम, मॅकमिलन, १९७८

४२	लिट जॉन ए., एशियन न्यूजपेपर्स, अ रिलिव्हंट रिव्होल्यूशन

४३	सॅल्टीश जहोडा व कुक, सोशल रिलेशन्स रिसर्च

४४.	बेर्जर ए. ए., मेडीया ॲनॅलिसीस टेक्निक्स,सेज प्रकाशन लंडन-१९९१

४५	बेरलसन बी., कंटेंट ॲनालिसीस इन कम्युनिकेशन रिसर्च, प्री प्रेस, न्यूयॉर्क १९५२

४६	गेटस बिल, द रोड अहेड या ग्रंथातील पहिले प्रकरण

४७	माहिती तंत्रज्ञान कायदा २०००, योजना विशेषांक -२०००

४८	मार्टीन, ग्लोबल इनफॉरमेशन सोसायटी, मेलबोर्न युनिर्व्हसिटी प्रेस

४९	टॉपलर ॲलविन, तिसरी लाट, (अनुवाद- शदिनी मोहिते), साहित्य संस्कृती मंडळ, प्रकाशन, मुंबई. १९८५

५०	सिरीका मेनीकेनन, कॉमन कम्युनिकेशन करीक्युलम, युनेस्को, पॅरिस -१९८०

५१	श्रॅम विलबुर, मास मिडया ॲण्ड नॅशनल डेव्हलपमेंट, स्टॅण्डफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस १९६४

५२	ब्ल्युमेनथाल, मिडीया रूम, पेज-१

५३	बिल गेटस, इन्फॉरमेशन सुपर हायवे, द एज ऑफ स्मार्ट फॅमिली, रिडर डायजेस्ट १९९५

५४	अशोक चतुर्वेदी यांची मुलाखत

५५	मुळे गणेश, मराठी वृत्तपत्रातील इंटरनेट संज्ञापन

५६	तोष्णीवाल अशोक - माहिती महामार्ग विविधा मासिक २००० ते २००२

५७	अभिव्यक्ती माध्यम चर्चेचे मराठी त्रैमासिक, जानेवारी ते मार्च २००२

५८	चौथा स्तंभ दिवाळी अंक २००२

५९ आपटे मोहन - इंटरनेट एक कल्पवृश्र राजहंस प्रकाशन, पुणे. १९९७

६० आपटे मोहन - शतक शोधांचे, राजहंस प्रकाशन, पुणे. २०००

६१ कुलकर्णी एस. के. - पावले पत्रकारितेची, नानासाहेब परूळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्ट, पुणे २००१

६२ गावकरी दिवाळी अंक २००२

६३ दाभाडे एस. टी. - माहिती तंत्रज्ञान आणि स्वंयरोजगार, प्रभात प्रकाशन, मुंबई २००१

६४ पठारे महेश - इंटरनेट

६५ मनोरमा इयर बुक २००२

६६ भारत २००२ - प्रकाशन विभाग माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार.

67 Albrow M. and King E. Globalization, Knowledge, and society, Sage Publication London 1990.

68 APT Yearbook Asia -Pacific Telecommunity Bangkok.

69 Basu A. (1987) Grassroots Movements and the state, In Theory and Society, 16(5) 647-674.

70 Berg Ann-Jorunn The Smart House. in Heap Nick, Ray Thomas et all (eds) Information Technology and Society. Sage Publication London 1995.

71 Bell Daniel (1973) The coming of the Post-industrial Society Basic Books, New York.

72 Beniger J. R. The control Revolution : Technological and Economic Origins of the Information Society, Harvard University Press Cambridge.

73 Boafo S. T. Kwame Communication Technology and Dependent Development in Sub-Saharan Africa, in G. Sussman and J. A. Lent (eds) Transnational Communication. Sage London 1991.

74 Christensen Clyton M. Innovator's Dilemma Harvard Business School Press 1997.

75 Cooley Charles Horton Social Organizations (pp 63) Charles Scribner's Sons, Boston 1909

76 Curras E. in Smith et al (eds) Information, Communication, and Technology Transfer, North Holland New York 1987.

77 Dutton William H. (ed) Information and Communication Technologies : Visions and Realities, Oxford University Press New York 1996.

78 Edge David The social Shapping of Technologies. in Heap Nick, Ray Thomas et al (eds) Information Technology and Society. Sage Publications London 1995.

79 Ellul, J. Preconceived Ideas about Mediated Information. In E.M. Rogers & F. Bally (eds) The Media Revolution in America and Western Europe (pp 95-107) Ablex Norwodd NJ.

80 Giddens Anthony Beyond Left and Right Polity Press Cambridge 1994.

81 Gore A. Basic Principles in Building Information Society in Global Issues online serial Sept 1996.

82 Guntz Bob Information Counting on Digital Interview 15th June'99 Wall street Journal.

83 Hall Stuart The Question of Cultural Identity. in S. Hall. D. Held and T.Mcgrew (eds) Modernity and its Futures. Polity Press Cambridge 1992.

84 Hanson J., Narula Uma (1990) New Communication Technologies in Developing Countries, New Jersey, Lawrence Erlbaum Associates.

85 Lrving L. New Technologies Benefits all Nations in global issues online serial Sept. 1996.

86 Kato H. The Information is there but is it accessible, Intermedia 13(6) pp13-16 1985.

87 Kuo E. C. Y. Information among Asian NIEs in Asian Communication Handbook AMIC Singapore 1993.

88 Knight P. The Electronic Revolution and Developing Countries in Global issues on-line serial Sept. 1996.

89 Lull James Media, Communication, Culture : A Global Approach Polity Press Cambridge.

90 Nock, Ray Thomas et al (eds) Information Technology and Society - Sage Publications London 1995.

91 Lyon David The Roots of the Information Society Idea in Nick, Ray Thomas et al (eds) Information Technology and Society. Sage Publiations London 1995.

92 Mackay Hughie Theorising the IT/Society relationship.

93 Nick, Ray Thomas et al (eds) Information Technology and Society. Sa Publications London 1995.

94 Mainwaring S (1987) Urban popular movements, identity, and democratization in Brazil. Comparative Policital Studies, 20, 131-159.

95 Mann M. The Sources of Social Power Vol. 1 Cambridge University Press Cambridge 1986.

96 Marshal McLuhan (1962) The Gutenberg Galaxy : The Making of Typographical Man, Toronto University Press Toronto.

97 Mcgrew T. Global Society in S. Hall. D. Held and T. Mcgrew (eds) Modernity and its futures. Polity Press Cambridge 1992.

98 Michio Kaku Visions Anchor Books Double Day New York 1997

99 Mohammadi Ali ed. International Communication and Globalization. Sage Publications London 1997.

100 Narula Uma (1990) Grassroots Movements in India. In I. Singh & J. Hanson (eds) Advances in Telematics Vol. 1,127-134 Ablex Norwood NJ.

101 Narula Uma Second thoughts on development Unpublished paper CNET New Delhi 1997.

102 Narula Uma Dynamics of development Unpublished Ph.D. Disseration University of Massachusetts Amherst 1984.

103 Narula Uma & Pearce W. Development as Communication SIU Press Carbondale 1986.

104 Narula Uma New Communication Technologies in Developing Countries : A 1986 case of India. Paper presented at IAMCR international conference, New Delhi.

105 Narula Uma 1994 (revised 1999) Development communication : Theory and Practice Har-Anand Publications New Delhi.

106 Schneider S.C. Information Overload : Causes and Consequences, Human Systems

Management 7 143-153.

107 Thomas Ray Access and Inequality in Nick, Ray Thomas et al (eds) Information Technology and Society. Sage Publications London 1995.

108 Tomlinson J. Cultural Imperialism : A Critical Introduction. Pinter London 1991.

109 Robertson Ronald Globalization : Time-space Homogeneity and Heterogeneity in Mike Featherstone et al (eds) Global Modernites PP 25-44 Sage publications CA 1995.

110 William (ed) Technology and Communication Behavior, Belmont CA Wadsworth.

111 Narula Uma Mass Communication Technology : Theory New Perspectives Har-Anand Publications New Delhi.

112 Alexis Leon Fundamentals of Informantion Technology, UBS Publications 1999

113 David Cygansky - John A Orr; Information Techonlogy : Inside & Outside.Prentice hall, 2001.

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

पीएच्. डी. साठी करावयाचे सर्वेक्षण


**मार्गदर्शक**

**डॉ. दीपक टिळक**

संपादक

दैनिक केसरी, पुणे

**संशोधक**

**जगन्नाथ पाटील**


## माहिती तंत्रज्ञानाचा मराठी वृत्तपत्रांवर झालेला परिणाम : एक अभ्यास

**सर्वसाधारण माहिती**

उत्तरदात्याचे नाव : -----------------------------------------------------------

शहरी / ग्रामीण---------------------------------------शिक्षण ---------------------

वय -------------------- भाषा --------------------------- धर्म : ----------------

व्यवसाय --------------------------------- वार्षिक उत्पन्न ------------------------

---

**गट -अ** **सूचना :** कृपया योग्य पर्यायावर ☐ अशी खूण करावी

प्र.१ आपण वृत्तपत्र नियमित वाचता का?

होय / नाही

प्र.२ आपण किती दैनिके वाचता

एक दोन तीन चार यापेक्षा जास्त

प्र.३ आपण एक दैनिक किती काळ वाचता

५ मिनिटे १० मिनिटे २० मिनिटे ३० मिनिटे

प्र.४. रोजच्या दैनिकापेक्षा आपण एखादा अंक विकत घेऊन वाचता का

होय / नाही

प्र.५ दैनिकासोबत आपण एखादे मासिक किंवा पाक्षीक विकत घेता का?

होय / नाही

**गट ब: माहिती तंत्रज्ञान व वृत्तपत्रे**

प्र.६ तुमच्या मते मागील किती वर्षापासून भाषीक वृत्तपत्रात नवे तंत्रज्ञान आले आहे.

१० १५ २० २५

प्र.७ संगणकाच्या वापरामुळे वर्तमानपत्रांना कोणते लाभ झाले आहेत.

अ) मुद्रण सुधाले

ब) सजावट वाढली

क) छायाचित्रे स्पष्ट दिसू लागली

ड) मजकूर अधिक प्रमाणात उपलब्ध होऊ लागला

प्र.८ संगणकामुळे वर्तमानपत्रावर अवलंबून असलेल्या मनुष्यबळाचे प्रमाण कमी झाले काय

होय / नाही

प्र.९ वर्तमानपत्रे काढण्यासाठी लागणारा खर्च कमी झाला काय

होय / नाही

प्र.१० वर्तमानपत्रे सामान्य वाचकाला पूर्वीपेक्षा अधिक परवडू लागली काय

होय / नाही

**क : मांडणी व सजावटीवर झालेले परिणाम**

प्र.११ प्रगत तंत्रज्ञानामुळे पूर्वीपेक्षा मांडणी अधिक आकर्षक झाली आहे असे वाटते का

होय/ नाही

प्र.१२ समांतर विषम वर्तुळाकार मांडणी यापैकी कोणती मांडणी मराठी वृत्तपत्रे अधिक वापरतात

-----------------------------------------------------------------------

प्र.१३ व्यंगचित्रे व रेखाटने वापरण्याचे प्रमाण संगणकामुळे अधिक सुधारले आहे काय?

होय / नाही

प्र.१४ माहिती तंत्रज्ञानामुळे वर्तमानपत्रातील टंकाचा आकार कमीजास्त करणे सहज शक्य झाले आहे काय?

होय / नाही

प्र.१५. भाषिक वृत्तपत्रे पेजमेकरचा वापर करून पानांची मांडणी नव्याने करत आहेत काय?

होय/ नाही

**ड: इंटरनेटचा प्रभाव**

प्र.१६ मराठी वृत्तपत्रांत इंटरनेटचा वापर केव्हापासून सुरू झाला

पाच वर्षे दहा वर्षे पंधरा वर्षे

प्र.१७ दूरसंदेश क्षेत्रातील प्रगतीमुळे इंटरनेटचे दर कमी झाले काय

होय / नाही

प्र.१८ इंटरनेट वापरामुळे पुढीलपैकी कोणते लाभ वर्तमानपत्रांना झाले आहेत

१. ताजा वार्ता मिळतात

२. भाषांतराचे काम सोपे झाले

३. छायाचित्रे मिळू लागली

४. जागतिक वर्तमानपत्रांचे संदर्भ मळू लागले

५. चित्रवाणी वाहिन्यांवरील बातम्या उपलब्ध झाल्या

प्र १९ स्वत:च्या वेब आवृत्तीमुळे वर्तमानपत्रे अधिक स्वावलंबी झाली काय?

होय/ नाही

प्र.२० वर्तमानपत्रातील माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरासाठी काही उपाय सुचित करा.

----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

उत्तरदात्याची स्वाक्षरी